



नोव्हेंबर-डिसेंबर १९८६

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान.
शिरडीचे अधिकृत मासिक

संपादक

श्री. रा. द. बन्ने

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

: कार्यकारी संपादक :

**प्रा. सौ. इंदिरा खेर**
एम.ए. पी.एच.डी.
(इंग्रजी आवृत्ती)

**श्री. सदानंद चेंदवणकर**
(मराठी आवृत्ती)

---

**वर्ष ६५ वे]** **दिपावली अंक भक्त अनुभव विशेषांक** **अंक ८ व ९**

**किंमत २ रु.**

**दूरध्वनी क्रमांक ४१२२५६१**

---

: कार्यालय :

**''साईनिकेतन'', प्लॉट नं ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-४०० ०१४.**

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख. सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.

श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे हे
श्री साईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.



## श्रीसाई वाक्सुधा

काम, क्रोध, लोभ जाण।
ही नरकाची द्वारें तीन।
यांचे पायीं आत्मविनाशन।
यदर्थ निक्षून त्यागावें।। १५०।।

परम दयाळू साई समर्थ।
साधावया भजुहितार्थ।
तयांलागीं दक्षिणा मागत।
शिक्षणही देत त्यागाचें।। १५१।।

दक्षिणेची काय किंमत।
साधावया गुरूवचनार्थ।
प्राणही द्यावया नाहीं जो उद्यत।
तयाचा परमार्थ कायसा।। १५२।।

खरेंच भक्त कल्याणावीण।
बाबांस काय दक्षिणेचे कारण।
स्वयें तयांचे नव्हतें जीवन।
अवलंबून दक्षिणेवरी।। १५३।।

पोटासाठीं भिक्षा मागत।
दक्षिणेपोटीं नव्हता स्वार्थ।
दक्षिणादानें शुद्ध चित्त।
व्हावेत निजभक्त हा हेत।। १५४।।

श्रीसाईसच्चरित अध्याय १४ वा



**ही दिवाळी व नूतन वर्ष आमच्या सर्व भक्तांना, वाचकांना, हित-चिंतकांना सुखाची, समाधानाची व उत्कर्षाची जावो हीच शुभेच्छा.**

मासिकात प्रकाशित झालेल्या लेखातील
मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.

# दिवाळी अंकाचे मानकरी — १९८६

## अनुक्रमणिका


| क्रमांक | लेखाचे नाव | लेखक/लेखिका | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | | ७ |
| २ | श्री साईनाथांचा शरणार्थी | — श्री. वि. बा. खेर | १० |
| ३ | दुःखद प्रसंग आणि बाबांनी मला काय शिकविले? | — श्री. मु. ब. निंबाळकर | १४ |
| ४ | श्री साईबाबांच्या हयातीत माझ्या वडिलांना आलेले अनुभव | — सौ. शोभना पालकर | १८ |
| ५ | अन् हृदयाची हालचाल पुन्हा चालू झाली | — श्री. सूर्यकांत चंचे | १९ |
| ६ | सारे जीवन साईमय झाले। माझ्या सदनी साईनाथ आले | — सौ. संगीता गोडबोले | २१ |
| ७ | भक्त कैवारी श्री साईबाबा | — डॉ. अनंत एस्. शिंदे | २३ |
| ८ | मूर्तिमंत भगवान श्री साईबाबा | — कु. माधुरी कोंबेकर | २३ |
| ९ | आई, आजोबा कुठे गेले ग? | — डॉ. श्रीपाद परुळेकर | २५ |
| १० | कृपा दृष्टीचे फळ | — सौ. नंदिनी नाडकर | २८ |
| ११ | अन् मी लेखक-कवि संमेलनात सहभागीही झालो | — डॉ. अनिल मोरे | २९ |
| १२ | काय हा साईंचा चमत्कार | — कु. राजश्री नाईक | ३१ |
| १३ | मुलाचा ताप उतरला | — श्री. पी. डी. काळे | ३२ |
| १४ | साई तारी त्यास कोणी मारी | — सौ. शुभांगी सावंत | ३२ |
| १५ | जशी श्रद्धा तसा अनुभव | — श्री. विजयसिंह परदेशी | ३३ |
| १६ | साईमाऊली हाकेला धावली | — भारती लवेकर | ३५ |
| १७ | अंतर्ज्ञानी श्री बाबा | — श्री. सूर्यकांत गर्जे | ३५ |
| १८ | भाव तेथे देव | — सौ. निर्मला राजे | ३६ |
| १९ | ही तर साईचीच लीला | — श्री. किशोर शिवलकर | ३७ |
| २० | शरण मज आला आणि वाया गेला, दाखवा दाखवा ऐसा कोणी! | — सौ. सुशिला नानिवडेकर | ३८ |
| २१ | जया मनी जैसा भाव, तया तैसा अनुभव | — सौ. भारती चव्हाण | ३९ |
| २२ | व्यक्त | — श्री. दत्ता ग. माने | ४० |
| २३ | थांबा बाबा मी आलो | — सौ. अस्मिता दांडेकर | ४१ |
| २४ | मला श्रद्धा मिळाली | — सौ. अश्विनी चीपकर | ४१ |


| क्रमांक | लेखाचे नाव | लेखक/लेखिका | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| २५ | जया मनीं जैसा भाव तया तैसा अनुभव | — श्री. शिवाजी जाधव | ४३ |
| २६ | श्री साईबाबांनी केलेला चमत्कार | — सौ. शोभा देशपांडे | ४४ |
| २७ | श्री साईनी काळाला परतवून लावले | — श्री. नंदू पाटील | ४५ |
| २८ | जया मनी जैसा भाव तया तैसा अनुभव | — सौ. तारा कोंडविलकर | ४६ |
| २९ | बाबांच्या उदीने मुलगा बरा झाला | — श्री. शाम जावळकर | ४६ |
| ३० | बाबांच्या कृपेने पुनर्जन्म | — सौ. अनुराधा पिंपळगावकर | ४७ |
| ३१ | शरण मज आला, आणि वाया गेला दाखवा दाखवा ऐसा कोणी | — श्री. भूषण रेखी | ४८ |
| ३२ | श्री साईनाथांचे अजूनही शिरडीत वास्तव्य | — सौ. अरुणा कर्णिक | ४९ |
| ३३ | साईकृपेचा अनुभव | — श्री. एस्. जी. सावंत | ५० |
| ३४ | असाही एक अनुभव | — सौ. सुनंदा गोसावी | ५२ |
| ३५ | असे पुन्हा एकदा साई धावून आले | — श्री. प्रकाश सामंत | ५३ |
| ३६ | श्री साईची नित्य माझ्या पाठी छाया | — कु. छाया आ. सापळे | ५५ |
| ३७ | बाबांनी मला व बहिणीला नोकरी दिली | — श्री. उ. य. सावंत | ५६ |
| ३८ | जरी हे शरीर गेलो मी टाकून तरी मी धावेन भक्तांसाठी | — सौ. जयश्री घाग | ५७ |
| ३९ | श्री साईलीलेचे साक्षात्कार | — श्री. पा. शं. भुजबळ | ५७ |
| ४० | उदीचा प्रताप | — सौ. उषा महाजन | ६० |
| ४१ | बाबांच्या कृपेने मुलाचा पुनर्जन्म | — श्री. डब्ल्यू. के. शेलार | ६१ |
| ४२ | बाबांचे घडता स्मरण, दुःखास मिळे विराम | — श्री. भालचंद्र गंद्रे | ६२ |
| ४३ | शांतीचा अमोल ठेवा - साईप्रसाद | — सौ. स्मिता सावंत | ६३ |
| ४४ | एक अनुभव | — श्री. तुकाराम पोयरेकर | ६४ |
| ४५ | बाबा मला द्यावी सोबत | — सौ. लिलावती बिनसाळे | ६५ |
| ४६ | साईकृपेने पास झालो | — श्री. मुकुंद मोरे | ६६ |
| ४७ | एक अनुभव.... अनेक अनुभव | — श्री. गुरुदास बांबोळकर | ६६ |
| ४८ | साईराजा, तुम्हीच माझे कल्पतरु | — सौ. निलिमा नाईक | ६८ |
| ४९ | श्री दत्तसाई | — श्री. यशवंत भंडारी | ६९ |

| क्रमांक | लेखाचे नाव | लेखक/लेखिका | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| ५० | श्री साई पोस्टमन | — सौ. प्रमिला पगारे | ७० |
| ५१ | बाबांनी कायम नोकरी दिली | — श्री. देविदास शिंदे | ७० |
| ५२ | शिरडीचे श्री साईबाबा नवसाला पावले | — श्री. अनिल रिसबूड | ७२ |
| ५३ | श्री बाबांनी मुलाला सुयश दिले | — श्री. मधुसूदन सावंत | ७४ |
| ५४ | साई तारी त्याला कोण मारी | — श्री. दिलीप लांडे | ७५ |
| ५५ | [illegible] कृपेने [illegible] उठली | — श्री. राजीव नारकर | ७६ |
| ५६ | नित्य मी जिवंत, जाणा हेचि सत्य.... | — श्री. प्रमोद कोरगांवकर | ७७ |
| ५७ | [illegible] साईकृपेचे दोन अनुभव | — श्री. वाय. एस्. जोशी | ७८ |
| ५८ | साईकृपेने केदारनाथ बद्रीनाथ यात्रा झाली | — श्री. प्रभाकर भालेराव | ७९ |
| ५९ | — साईकृपेने रेडिओ सापडला | — श्री. नारायण मेहता | ८० |
| ६० | शिरडीस ज्याचे लागतील पाय.... | — श्री. रघुनाथ लाड | ८१ |
| ६१ | विसाव्या शतकातील दिव्य शक्ती | — श्री. विश्वनाथ चव्हाण | ८२ |
| ६२ | जया मनी जैसा भाव.... | — श्री. पी. के. साळवी | ८४ |
| ६३ | प्रपंचा घोर पण साईचा आशीर्वाद थोर | — श्री. गणपत परब | ८५ |
| ६४ | साईकृपेने माझ्या नातवंडास जीवदान | — श्री. लक्ष्मण रापतवार | ८६ |
| ६५ | तुमचा मी भार वाहिन सर्वथा.... | — श्री. शूरसेन पोवळे | ८७ |
| ६६ | ही कृपा श्री साईबाबांचीच | — श्री. सुनील कुलकर्णी | ८८ |
| ६७ | अघोर प्रसंगातून तूच वाचविलेस | — श्री. प्रमोद रायसोनी | ८९ |
| ६८ | बाबा प्रसन्न असले तर.... | — श्री. के. पी. पहाडे | ९० |
| ६९ | उभा पाठीशी असता साई.... | — श्री. अंकुश दळवी | ९२ |
| ७० | नित्य मी जिवंत.... | — श्री. पी. जी. कोरगांवकर | ९३ |
| ७१ | साई तारी त्याला कोण मारी | — श्री. चंद्रशेखर तारु | ९४ |
| ७२ | बाबांची अद्‌भूत लिला | — सौ. आर. जी. जाधव | ९४ |
| ७३ | श्रद्धा असता साईवरी, फळे मिळती रसाळ गोमटी | — श्री. मोहन केळुस्कर | ९५ |
| ७४ | श्री साईबाबांचे अश्रू | — श्रीमती सिताबाई नाडकर्णी | ९५ |
| ७५ | वात्सल्यमूर्ती आई म्हणजेच श्री साई | — श्री. बाळा नाईक | ९६ |
| ७६ | असता साई पाठीराखा.... | — सौ. नीता जाधव | ९७ |
| ७७ | साईनाथांची अगाध लीला | — श्री. मधुसूदन चव्हाण | ९९ |

| क्रमांक | लेखाचे नाव | लेखक/लेखिका | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| ७८ | साईनाथांनी राहण्याची खोली बदलून दिली | — सौ. उषा जठार | १०० |
| ७९ | माझा पहिला अनुभव | — श्री. सोमकांत गांवकर | १०१ |
| ८० | देव तारी त्याला कोण मारी | — श्रीमती मनोरमा परुळेकर | १०३ |
| ८१ | मृत्यूच्या दारातून परतले बस प्रवासी | — श्री. संजय परळकर | १०४ |
| ८२ | उदी प्राशनामुळे आईला होणारा त्रास संपला | — सौ. ज्योती कारेकर | १०६ |
| ८३ | अकल्पित अभिषेक | — श्री. अनिल रसाळ | १०६ |
| ८४ | श्री साईबाबा आणि वचनें | — श्रीमती उषा रायरीकर | १०८ |
| ८५ | साईकृपेने घर मिळाले | — एक साईभक्त महिला | १०९ |
| ८६ | साईनामाचा महिमा | — श्री. रामचंद्र कोयंडे | ११० |
| ८७ | साईबाबांच्या उदीचा प्रभाव | — श्री. लक्ष्मण रापतवार | १११ |
| ८८ | फुलांचा सुवास दिसत नसतो | — श्री. कृ. व्य. हवालदार | ११२ |
| ८९ | बहिणीचे लग्न जुळले | — राजश्री रा. कुळकर्णी | ११३ |
| ९० | रेल्वेचा प्रथम वर्ग, बाबा आणि मी | — श्री. आशिष कालेवार | ११४ |
| ९१ | विस्कळीत झालेली वर्कशॉपची घडी साईकृपेने सुरळीत | — सौ. विमल परदेशी | ११५ |
| ९२ | बाबांनी जिवित व वित्त हानीपासून वाचविले | — श्री. ललित शृंगारपुरे | ११६ |
| ९३ | मला आलेले साईकृपेचे अनुभव | — सौ. नलिनी डांगे | ११७ |
| ९४ | त्या दिवशी मी सायकल प्रवासास निघालो असतो तर... | — श्री. सोमनाथ कारखानीस | ११८ |
| ९५ | भक्तनिष्ठ श्री संतश्रेष्ठ साईबाबा | — श्री. मधुकर वखारे | ११९ |
| ९६ | श्री साई चमत्कार | — सौ. सुमित्रा धुरी | १२० |
| ९७ | आईचा दुसरा जन्म | — श्री. सुनिल महाजन | १२१ |
| ९८ | हा रिक्षा ड्रायव्हर कोण? | — श्री. कृ. भा. देशमुख | १२२ |
| ९९ | साई माझा पाठीराखा | — श्री. शं. ग. सारंगधर | १२३ |
| १०० | मागें जें जें त्यास तें तें लाभे | — श्री. सदानंद ल. वाईरकर | १२५ |
| १०१ | मला आलेले साईबाबांचे दोन अनुभव | — श्री. लक्ष्मण देऊ धुरी | १२६ |
| १०२ | साईकृपेमुळे नोकरी मिळाली | — श्री. मधुकर कावळे | १२७ |
| १०३ | शिरडीवाले साईबाबा | — | १२८ |

संपादकीय

# भक्तांनो,
# श्री साईसच्चरिताची नुसती पारायणे नकोत तर....



साईभक्तांनो, साईप्रेमींनो, तुम्ही आपल्या घरी आपल्या आवडीने, आदराने, श्रद्धेने श्री साईबाबांची पोथी श्री साईसच्चरित या नावाने प्रसिद्ध आहे, ती आणली असेल. त्या पोथीचे तुम्ही वाचनही केले असेल, त्या पोथीची तुम्ही पारायणे केली असतील, तुम्ही वाचून सप्ताह पण केले असतील. श्रीबाबांची पोथी वाचून तुम्ही एका चांगल्या अध्यात्मिक ग्रंथाचे वाचन केले असे सहाजिक कुणीही म्हणेल.

पण भक्तांनो, नुसती पोथी वाचून काही उपयोग नाही. स्वतः श्री महाराजांनी या बाबतीत एका भक्ताची चांगलीच कान उघडणी केली तिचे चिंतन प्रत्येकाने करण्यासारखे आहे.

एकदा बेळगाव नजिकच्या वडगांवी पुढील घटना घडून आली. तेथे जमीन मोजणी करण्याच्या हेतूने एक सद्गृहस्थ बरोबरच्या नोकरमंडळीसह गेले, व तिथे त्यांनी मुक्काम ठोकला. त्या गावी एक सत् पुरुष राहात असत. ते मोजणीदार गृहस्थ देवभक्त होते. अगदी तुमच्या आमच्यासारखे! या गावात सत्-पुरुष एक आहेत हे समजताच ते त्यांच्या दर्शनास गेले. त्यांच्याकडे जाऊन त्यांनी साष्टांग प्रणिपात केला. नित्याप्रमाणे त्या सत् पुरुषाने आशीर्वाद दिला. त्या मोजणीदाराच्या मनाला बरे वाटले. त्या सत् पुरुषाचे हातात त्यावेळी निश्चल दासकृत 'विचार-सागर' हा ग्रंथ होता. तो ते वाचत होता. नमस्कार-चमत्कार होऊन मोजणीदार गृहस्थांनी निरोप घेतला. तेव्हा ते म्हणाले, "हे पहा! माझ्या हातात हा ग्रंथ आहे ना! याचे नाव लक्षात ठेऊन तो आपणही वाचावा. तुमचे मनोरथ परिपूर्ण होतील हे विसरू नका हं! पुढे मागे कामाच्या निमित्ताने तुम्ही उत्तर दिशेला जाल त्यावेळी तुमची एका महापुरुषाची भेट होईल. तशी भेट व्हायला भाग्य लागते परंतु तुमच्या भाग्यात ती भेट आहे. पण तुमचे मन काही स्थीर नाही. भेट झाल्यावर ते महापुरुष पुढचा मार्ग तुम्हाला ‹ थित दाखवतील, व तुमचे मन निःसंकोच होईल. त्यांच्या बोधामृताने तुमच्या मनाला शांती मिळेल; व तोच शाश्वत सुख समाधानाचा मार्ग आहे. जा मजेत रहा."

वडगांव येथील मोजणीचे कामकाज संपल्यावर त्या गृहस्थांना जुन्नर येथे जायचे होते; म्हणजे मार्गातील बिकट असा नाणेघाट चढून जावयाचे होते. त्या घाटाची चढण फार बिकट आहे. आता काय करायचे? तिकडे जाताना रेड्यांचा उपयोग करीत असत. घोड्याऐवजी रेडा! रेड्यावर खोगीर घालायचा व त्यावर स्वार व्हायचे! परंतु रेड्यावर स्वार झाल्यावर आदळत आपटत धक्के खात चढणे चढावी लागत. सर्वांग ठणकत

असे. परंतु करणार काय? पायी जाणे अशक्य मग रेड्याची शेपटी धरल्याशिवाय गत्यंतर नव्हते.

त्यांनी भाड्याने एक रेडा मिळविला; व आपला प्रवास सुरू केला. खूप त्रासाचा प्रवास होता तो! पण तो कसाबसा संपवून स्वारी जुन्नरला पेठेत एकदाची दाखल झाली. तेथे जे काही जमीन मोजणीचे कामकाज होते ते तीन-चार दिवसात संपविले. इतक्यात कल्याणला बदली झाल्याचा हुकूम त्यांच्या हाती पडला.

तेथून त्या मोजणीदारास कल्याणला यावे लागले. दैवयोग कसा असतो पहा! कल्याणला आले तर तिथे होते साईभक्त नानासाहेब चांदोरकर. त्यांचेकडून त्यांना साईबाबांची थोरवी समजली. एवढेच नव्हे तर ते म्हणालेही, "मी जातो आहे शिरडीला. तुम्ही या माझ्याबरोबर बाबांच्या दर्शनाला. चांदोरकरांनी अगदी मनापासून सांगितले परंतु ते त्यांच्या मनात शिरले पाहिजे ना! उगाच कसे बरे ते शिरेल? त्याला लागते तशीच पूर्व पुण्याई!

ज्या दिवशी नाना कल्याणहून निघायचे होते त्याच दिवशी त्या मोजणीदारास ठाणे कोर्टात एका फिर्यादी निमित्त साक्षीसाठी हजर रहायचे होते. मोठाच पेचप्रसंग निर्माण झाला. इकडे आड तिकडे विहिर! कोर्टाची तारीख चुकविली तर दंड होण्याची भीती! वरं शिरडीला जाण्याची तर इच्छा व सोबत खूपच चांगली! पण बिचारा पोटार्थी माणूस. नोकरी गेली तर! ही मनात त्याच्या चिंता!

परंतु नानासाहेब चांदोरकर त्यांना आश्वासनपूर्वक म्हणाले, "बाबा रे, त्याची तू काही एक चिंता करू नकोस. श्रद्धायुक्त अंतःकरणाने बाबांच्या दर्शनास ये तेच तुझ्या चिंतेचे निवारण करतील. तो भार त्यांच्यावर सोपवून तू मोकळा हो."

परंतु कसचे मोकळे व्हायला? अंतःकरणात तेवढी श्रद्धा हवी ना! ते भांडवल कुठे होते त्यांच्याजवळ? ते म्हणाले, "मनात चिंतेचा भार ठेऊन येणे आणि जाणे! गोत्यात सापडायला होईल. हे उरकतो एकदाचे काम आणि होतो मोकळा!"

"बाबा तुमची चिंता वहातील. ते तुम्हाला संकटात मुळीच पाडणार नाहीत. तुम्ही आत्ताच चला माझ्याबरोबर" चांदोरकर म्हणाले.

अखेरीस काय झाले? जे व्हायचे तेच झाले! नाना ठरल्याप्रमाणेच गेले शिरडीला मोजणीदार गेले ठाण्याला, कोर्टात हजर रहाण्यासाठी! पण त्यादिवशी तो दावा काही ना काही आकस्मिक कारणामुळे कोर्टापुढे येऊ शकला नाही त्याची तारीख पुढे ढकलण्यात आली.

मोजणीदार गृहस्थास फार मोठा पश्चाताप झाला. नानासाहेबांचे ऐकले असते तर सोन्याहून पिवळे झाले असते आता दुरुस्ती करायची म्हणजे विलंब न लावता शिरडीचे तिकीट काढायचे. अगोदर तिथे नानांची भेट घ्यायची व त्यांच्या मध्यस्थीने बाबांची भेट घ्यायची असे ठरवून ते एकदाचे शिरडीला गेले. तिथे चांदोरकरांची चौकशी केली परंतु ते दर्शन घेऊन लगेच कल्याणला निघून गेल्याचे कळले.

पण शिरडीला अकस्मात त्यांना त्यांचे एक स्नेही भेटले. त्यांचे जवळ त्यांनी आपली सारी रडकथा सांगितली. ते म्हणाले, "अहो! बाबांच्या दर्शनाला इथे मध्यस्थाची मुळीच गरज लागत नाही. त्यांचा दरबार सर्वांना सदा सर्वकाळ खुला आहे. आता तुम्ही बोलावीत आहात तर मी येतो बापडा!"

बाबा त्यावेळी नेहमी प्रमाणे चावडीत बसले होते. दोघांनीही जाऊन त्यांचे दर्शन घेतले. बाबांना ओळख करून द्यायची मुळीच गरज नव्हती. बाबा अंतर्ज्ञानी. दर्शन घेऊन मोजणीदार एका बाजूस जाऊन बसले. त्यांच्याकडे पाहून बाबा म्हणाले, "कसं काय ठीक आहे ना! तुम्हाला वडगांवला एक कानडी अप्पा भेटले. त्यांनी तुम्हाला सांगितले ते सत्य आहे. परंतु हा मार्ग कठीण आहे. रेड्यावर बसून नाणेघाट चढणे एकवार सुलभ म्हणता येईल. परंतु हा अध्यात्माचा घाट चढून पलीकडे जाणे वाटतं तितकं सुलभ नाही बरं! फार कष्ट घ्यावे लागतात!"

मोजणीदाराला हे सारे ऐकून चांगलीच खूणगाठ पटली. त्यांनी बाबांना पुनरपि साष्टांग प्रणिपात केला व म्हणाले, "बाबा! तुम्हीच माझे रक्षण करणारे आहात. मी तुम्हाला शरण आलो आहे. कृपा करा मज दीनावर!" वास्तविक खरे पहाता कुठे वडगाव नि कुठे शिरडी. वडगावला कानडी अप्पा भेटले. त्यांच्या हातातील 'विचार सागर' ग्रंथही पाहिला व त्यांनीच सांगितले की पुढे लौकरच एका महापुरुषाची भेट होईल त्याप्रमाणे भेटही झाली हे केवढे भाग्य! असे विचार मनात घोळताहेत तोच बाबा म्हणाले, "खरं आहे कानडी आप्पांनी सांगितलं ते! त्या ग्रंथाची किंवा इतर कोणत्याही ग्रंथाची महती कितीही असली तरी त्याप्रमाणे आपल्याकडून आचरण घडले पाहिजे. पुस्तकात लिहिलेलं पुस्तकात राहिलं. विचार सागर ग्रंथाचे महात्म्य तुम्हाला वडगावच्या आप्पांनी सांगितले ते अक्षरशः खरे आहे. त्याचा आचार कसा करावा? हे शिरडीत कळेल असं त्यांनी सांगितलं ते अगदी बरोबर आहे. त्याचं असं आहे आपण ग्रंथ वाचावा किंवा ऐकावा. परंतु ऐकल्यानंतर त्याचे मनन केले पाहिजे. त्याची पारायणावर पारायणे झाली पाहिजेत. मनावर त्याचा चांगला पक्का ठसा उमटला पाहिजे. त्याचा निदिध्यास घेतला पाहिजे. ध्यानी मनी ते विचार घोळून त्याप्रमाणे आचरण घडत गेले पाहिजे. असे घडेल जेव्हा तेव्हाच त्या वाचनाचे सार्थक होईल! आपण ग्रंथ वाचला एवढ्यावरच आपली जबाबदारी संपली नाही. तर जे काही वाचले ते प्रत्यक्ष कृतीत उतरले पाहिजे. नाही तर उपड्या घड्यावर पाणी ओतल्याप्रमाणे प्रकार घडायचा. तसं घडता कामा नये. वाचल्याप्रमाणे जर कां आपल्याकडून आचरण घडलं नाही तर ते वाचून व्यर्थ, व्यर्थ होय. तसेच ग्रंथातील महत्वाचा भाग आपणास नाही समजला तर तो सद्‌गुरूकडून समजून घेतला पाहिजे."

श्रीबाबांच्या या उपदेशाने त्या मोजणीदाराचे कान खाडकन् उघडले. मनाची बंद झालेली कपाटे पण एकदम उघडली. संशय निरसन झाले व जे जीवनामृत हवे होते ते पण बाबांच्या कृपेने मिळाले.

तेव्हा भक्तांनो, तुम्ही बाबांची पोथी वाचता ना! वाचा. पण त्या पोथीतून बाबांनी जे काही उपदेशात्मक सांगितलेले आहे ते पण आचरणात आणण्याची सुबुद्धी तुम्हाला होवो. त्यांच्या पोथीचे वाचन करून, मनन करून, चिंतन करून त्या पोथीतील चरणांचा निदिध्यास घ्यायचा हाच यंदाच्या दीपावलीचा संदेश तुम्हाला द्यावासा वाटतो.

# श्री साईनाथांचा शरणार्थी (१८)

लेखक : ब्रह्मीभूत स्वामी साईशरणानंद
अनुवादक : वि. बा. खेर

यानंतर दुसऱ्याच दिवशी दुपारनंतर साडेतीनच्या सुमारास मी व काकासाहेब दीक्षित द्वारकामाईस जायला निघालो. काकासाहेब समोरच्या हनुमान मंदिराच्या मार्गे गेले. मी बुटींच्या बांधत असलेल्या वाड्यातून बाहेर जाण्यासाठी वाड्यात शिरलो. तेवढ्यात एक मोठा दगड माझ्या डोक्यावर पडला व खांद्यावर आपटून खाली पडला. दगडाच्या आघाताने मी मटकन् खाली बसलो व बेशुद्ध झालो. शुद्धीवर आलो तेव्हा 'माणूस असाच मरत असतो' असे जणुकाय बाबा सांगत आहेत असे मला वाटले. शुद्धीवर आलो तेव्हा थोडे दुखत होते. नंतर काकासाहेब मला म्हणाले की, मी तुम्हाला सांगितले होते की बुटीवाड्यातून नको, सरळ शाळेवरच्या रस्त्यावरून चला, पण तुम्ही बुटीवाड्यात शिरला व अपघाताला बळी पडला. असो.

बाबांनी ताबडतोब जखमेवर लावण्यासाठी उदीमिश्रित मलम कोणाबरोबर तरी पाठविले, ते त्याने माझ्या डोक्यावर व खांद्यावर लावले आणि ते पट्टीप्रमाणे चिकटले व जे थोडे दुःख होते ते शमले, व ते सुद्धा कायमचे. काही दिवसांनंतर दुसरे काही औषध लावल्याशिवाय किंवा कांही उपाय केल्याशिवाय ती जखम आपोआप भरून आली.

हा अपघात होण्यापूर्वी साधारण एक तास अगोदर मी बाबांच्या दर्शनाला गेलो होतो. मी खाली सभामंडपात उभा राहिलो असेन किंवा बाबांच्या पाया पडलो असेन ते आता काही नक्की आठवत नाही — परंतु एवढे मात्र खरे की मी तेथे गेलो तेव्हा बाबांनी आपले आसन उंच करून त्याच्या खाली अर्धा हात खोल व रूंद खड्डा खोदलेला दाखविला, ज्याच्यावरून मला माझ्यावर येणाऱ्या मरणघातक आपत्तीची शंका आली.

दगड माझ्यावर पडल्यावर बाबांनी पाठविलेले उदीचे औषध लावल्यानंतर मी त्या बांधत्या वाड्यातच, जेथे आता समाधी आहे तिच्या दक्षिणेकडच्या भिंतीला टेकून बसलो व माझ्या जवळ निर्णयसागरची भगवद्गीतेची प्रत होती तिच्यातून पाठ म्हणण्यास लागलो. इतक्यात काकासाहेब आले त्यांना मी म्हणालो की, बाबा एकदा म्हणाले होते, 'तुला बुटीसाहेबांच्या वाड्यात बसायचं आहे. तेच खरं होतंय असं वाटतं.' नंतर काकासाहेब बाबांना माझी खबर सांगण्यास गेले व थोड्याच वेळात परत येऊन मला म्हणाले की, बाबा म्हणाले, 'त्याला सांग, काही बोलू नकोस.' म्हणून मी काकासाहेबांजवळ काही बोललो नाही. मला अपघात झाल्याचे ऐकून राधाकृष्ण आईने तिची काळी घोंगडी माझ्यासाठी पाठवली. ती पांघरून किंवा अंथरून, दिवे लागेपर्यंत गीतेचे पाठ म्हणत राहिलो. तो दिवस चावडीचा होता. बाबा चावडीला जाऊन आरतीला सुरुवात झाल्यावर किंवा आरती करण्याची तयारी चालली असताना, मी तेथे पोचलो व पुढील खोलीत निजलो. झोपता झोपता दोन वेळा राधाकृष्ण आईचे प्रेमपूर्ण स्मरण झाले. तिने दोन वेळा आपल्या खोलीतून बाहेर येऊन माझ्याकडे करुणापूर्वक दृष्टिक्षेप करून मला म्हणाली,

"आता मी समजले की बाबा तू येथे 'येईपर्यंत' का अधीरतेने वाट पहात होते! तुझ्या आगमनाच्या दोन तीन दिवस आधी खूपच विचारात असत व जे लोक त्यांच्याकडे जात त्यांच्यातील बऱ्याच जणांना रागवत व दोघातिघांना तर त्यांच्या हातचा मारच मिळाला. तू आलास आणि ते शांत झाले व त्यांनी मारण्याचे थांबविले. तुझ्या शिरावर हे मोठे संकट होते. त्या संकटातून तुला वाचविण्याच्या तीव्र इच्छेने त्यांना असे वाटले की जर तू त्या घडीला त्यांच्या तोंडासमोर असल्यास बरे, म्हणून तुझ्या चिंतेने ते सर्वांवर आपला राग काढत असत."

दगड पडून मी बेशुद्ध होऊन खाली बसलो त्या क्षणी माझे नामस्मरण चालूच होते. आणि त्या वेळी देह सुटला असता तर अशुभ झाले नसते, परंतु जे ईश्वराला, बाबांना आवडले ते खरे. बाबांच्या एकाच लेपाने मी वाचलो; वाचलो एवढेच नव्हे तर अपघात होऊन सुद्धा मला त्यायोगे न काही वेदना सहन कराव्या लागल्या का कधी पथारी धरावी लागली! जसे काही झालेच नाही असा मी हिरता फिरता होतो. जेवताना राधाकृष्णआई नार्वेकरांना म्हणाली, "वामनने त्याच्या अवस्थेत गोड खाता कामा नये". परंतु माझी मनःस्थिती त्या वेळी अशी होती की ही सूचना माझ्या लक्षात रहात नसे व माझ्या पानात जे पदार्थ वाढले जात ते मी खाई. या सुमारास मला शरीराची काही परवाच नाही अशा रीतीने मी यथेच्छ विहार करी.

एक दिवशी सकाळी मी राधाकृष्णआईकडे गेलो तेव्हा तिने मला अपानवायु ऊर्ध्व करून प्राणायाम-ऐक्य करण्याची रीत शिकवली व नंतर एका रात्री माझ्याकडून अपानवायु ऊर्ध्व करवून, दहा मिनिटे तिने आपला अपानवायु ऊर्ध्व करून, माझ्या प्राणाशी तिच्या प्राणाचे ऐक्य केले. जणुकाय आमच्या दोघांची या कार्यात शर्यत लागली आहे असा देखावा होणाऱ्या आवाजाने झाला व अखेर माझा अपान अर्धा झाल्यावर राधाकृष्णआई उठून उभी राहिली. या प्रयोगाने तिने माझ्या तुटक्या प्राणात जणुकाय स्वतःच्या प्राणाचे सिंचन करून मला जीवित दानच दिले असे भासले.

एकदा संध्याकाळी मी शिरडी-कोपरगाव सडकेवर एके ठिकाणी बसलों होतो. सुरुवातीला बाबांची आरती मी खूप मोठ्याने म्हणू लागलो तसे थोड्याच वेळात एक आवाज ऐकू आला, 'अरे, आकाश कशाला दुमदुमवितोस?' म्हणून मनातल्या मनात सर्व प्रार्थना करून ध्यानस्थ बसलो. काही वेळाने ब्रह्मरंध्रातून माझ्या नित्य जपाच्या मंत्राचा खूप मोठ्याने परिस्फोट होऊन तो ब्रह्मरंध्रातून निघून उंच उंच चढून आकाशातील सूर्यात विलीन पावला. यावरून मला विचार आला की साईबाबांना विचारून ज्या निराकार प्राप्तीसाठी मी मंत्र जपत होतो त्यासाठीची माझी अपात्रता — जिची नानावल्लीने माझ्या माथ्यावर पथ्थर मारून जाणीव करून दिली होती — त्यामुळे तो ब्रह्मरंध्रातून निघून आकाशात विलीन पावला. या विचारात मी बराच वेळ सडकेवर बसून राहिलो. नंतर राधाकृष्णआई काकासाहेब दीक्षितांसह मला शोधत शोधत तेथे आली व माझा हात धरून ते मला शिरडीला घेऊन गेले. तरीही या अनुभवाने मला गोंधळात टाकले — तर मग आता कुठल्या मंत्राचा जप करावा? बाबांची काय सूचना आहे?

असा विचार आला, परंतु आता ४३ वर्षांनी समजू शकतो की महान मंत्र आवाज करीत ब्रह्मरंध्रातून निघून आकाशात उंच उठून विलीन झाला तो माझी नालायकी सिद्ध करत नव्हता. उलट, या प्रकारे, बाबांनी माझे ब्रम्हांडभेदन करून माझ्या प्राणाचे समष्टि प्राणाशी ऐक्य करून दिले त्याची सूचना होती. हे द्वार सहाव्या-सातव्या भूमिकेचे आहे व गुरूच्या महान कृपेनेच लाभते.

अशाच रीतीने एका संध्याकाळी गावाबाहेर जाऊन मी जवळच सडकेच्या बाजूला बसलो होतो. त्या वेळी एका माणसाने येऊन माझ्याजवळ काही मागितले. त्याला मी माझी चांदीची बटने होती ती दिली आणि तो माणूस गेल्यावर वाटले की बाबा जणुकाय म्हणत आहेत, 'कोणी काही मागण्यास आला तर त्याला सांगावे की मी असा नागडा उघडा आहे, तुला जे काही घ्यायचे असेल ते घे.' याचा अर्थ हे वचन ऐकणारा अधिकारी मुमुक्षू असला तर समजेल की निःसंग, निराकार, निरंजन, प्रावरण रहित ब्रह्म मी आहेच, ते बघ. तुला काय पाहिजे असेल ते घे, असा या वचनाचा अर्थ होतो.

एकदा संध्याकाळनंतर मी ध्यानस्थ अवस्थेत सडकेजवळ बसलो होतो. रात्र झाल्यावर काही काळाने आनंदमय स्थिती होऊन आकाशाकडे लक्ष जाता बाबा व राधाकृष्णआई जणुकाय मला सोडून निघून जात आहेत असे जाणविले. मी दुःखी होऊन दोघांना प्रेमपूर्वक नमस्कार केला व नंतर असा विचार आला, 'बाबांनी तर मला शेवटच्या कक्षेपर्यंत पोचविले, परंतु मी कधीही बाबांना याबद्दल धन्यवाद दिले नाहीत का त्यांचे उपकार मानले नाहीत, व न कधी त्यांचे ऋण फेडले. त्यावेळी मी आवाज ऐकला, 'मी तुला काहीच दुसरं नवं सांगितलं नाही, पण तू गेल्या जन्मात मला शिकविलेस तेच मी तुला शिकविले आहे. माझ्यावर तुझे उपकाराचे देणं होते त्याची मात्र फेड केली आहे.'

एका सकाळी नऊच्या सुमारास मी शंकर, शनी व गणपतींची देवळे आहेत तेथे होतो. तेवढ्यात एकाएकी मला आकाशात कोणी जीव देहापासून मुक्ती पावून जात आहे असा भास झाला. माझी नजर जाताच कोणीतरी जणुकाय म्हणाले, 'बघ, हा अग्निहोत्री जात आहे.' याने बाबा असे दाखवू इच्छित होते की अग्निहोत्रासारखे व्रत करणाऱ्याची गती जरूर ऊर्ध्व असते.

एक दिवस अगदी पहाटे मी उठलो व लेंडीकडे बघितले तर लेंडीला पूर येऊन पाणी शिगोशिग भरून वहात होते. त्या दिशेने जाण्यास काही पाऊले मी उचलली एवढ्यात दक्षिण दिशेकडे मी उभा होतो तेथून एक केवळ कौपिनधारी, अति तेजस्वी, मजबूत बांध्याची, अस्पष्ट मिशा असलेली श्वेतवर्ण मूर्ती माझ्या दृष्टीस पडली. त्या आकृतीच्या खांद्यावर पिशवी होती, व तिच्यातून लहानशी सुताराची करवत डोकावत होती. मी त्या मूर्तीला शंकर समजून आदरपूर्वक नमस्कार केला व मागे फिरलो.

एकदा सकाळी सुमारे साडेचार पाच वाजता, अंधारात मी सडकेवर शौचासाठी निघालो व तेथून थोडे खाली जाता मला कोणीतरी उचलून एका उंचवट्यावर ठेवले. पुष्कळ वेळ माझ्या कानात आवाज आला, 'नाशकला जा, नाशकला जा.' पण मी त्याचा काही अर्थ समजलो नाही. बाबांचे स्थान शिरडी शिवाय मी दुसऱ्या ठिकाणची यात्रा

करत नसे. मला उचलून ठेवले त्या तेथे आजूबाजूला पहाता एक घडियाळ असलेले टॉवर असल्याचा भास झाला. त्यावरून मला वाटते की बाबांनी मला आपल्या सामर्थ्याने उचलून नाशिकला आणले आहे. उंचवट्याजवळ एक चांगली जागा बघून शौचाला बसलो. नंतर काही वेळ विचार करीत बसून राहिलो. उजाडले तेव्हा तेथे न टॉवर न नाशिक दिसले — पण मी मात्र बाबा ज्या जागी शौचाला बसत तिच्या बरोबर समोरच्या टेकाडावरच होतो. माझ्या विस्मयास पार राहिला नाही. मला उचलून घेण्यात बाबांचा काय हेतू होता? हा विचार येताच मी उठून उभा राहिलो व तडक सडकेवर जाण्यास निघालो तसे मला दिसले की सडकेच्या बाजूस जेथून मला बाबांनी उचलले ती जागा खाचखळग्याची होती व तिच्यातून थोडे पाणी वहात होते. मला उचलण्यात आले नसते तर मी खाचखळग्यात पडून माझा पाय मोडला असता व मला चांगलेच लागले असते. 'नाशक'ला पोचविले असा भास झाला त्याचा अर्थ हे ता. २०.६.५९ रोजी लिहिताना समजते की अशा रीतीने मला खाचखळग्यात तसेच पाण्यात पडण्यापासून वाचवून मला बाबांनी जाणीव करून दिली की माझ्यावर त्यांची संपूर्ण कृपा आहे — ही गोष्ट ना-शक म्हणजे निर्विवाद आहे; अथवा असे पण म्हणता येईल की या प्रसंगाने सगुण ईश्वराच्या अस्तित्वाची तसेच त्याच्या भक्तांना संभाळण्याच्या ब्रिदाची वार्ता सत्य आहे व त्याविषयी शंका घेण्याचे कारण नाही. जवळजवळ ४२ वर्षांनंतर बाबांनी मला उचलून ना-शकला पोचविण्याच्या रहस्याचा उलगडा केला; धन्य आहे त्या बाबांची.

शिरडीला गेल्यानंतर एका रात्री मी काकासाहेबांच्या वाड्याच्या माडीवर ज्या खोलीत मधे मधे झरोके आहेत तेथील तसबीरीकडे डोके ठेवून जिन्याजवळच्या दारासमोर निजलो होतो. मी जागा असताना मला भास झाला की माझा जीव बाहेर पडून समोरच्या भिंतीजवळ आहे असे मी प्रत्यक्ष पाहिले. त्यावरून मी समजलो की मी तर आता मेलो, वामनरावाचा अंत झाला; मी आता कोणीतरी दुसरा आहे. दुसऱ्या दिवशी उठलो तेव्हा सुद्धा हाच विचार मनात होता की मी मेलो असून मी कोणी नवी व्यक्ति आहे. ह्या विचाराचा पगडा माझ्या मनावर एवढा बसला की कोणीतरी दुपारी मला विचारले, "वामनराव, तुम्ही काम करत आहा? सांगत का नाही?" तेव्हा मी त्याला उत्तर दिले, "वामनराव तर मेला, केव्हाच मेला. आता वामनराव आहे कुठे?"

अशा रीतीने जीव सुटा करून दाखविण्यात बाबांचा काय हेतू असावा? काय, असे त्यांना सांगावयाचे होते की जीव जातो येतो पण मी तर साक्षी आहे व जीव निघून गेलेला पाहतो; आणि मी तर आहे. जीवाला अशा रीतीने जाताना येताना पाहणारा जो मी ते माझे वास्तविक साक्षी स्वरुप, सच्चिदानंद स्वरुप- जे कायम आहे आणि जे सर्व व्यापार साक्षीवत् पाहते, ते हेच सच्चिदानंद स्वरुप ईश्वराचे स्वतःचे पण आहे; माझे अल्पज्ञपण परिछिन्न रूप मूळजीव पण निघून जाता जे स्वरुप राहते ते सच्चिदानंद स्वरुप आहे. आणि ते ईश्वराची सर्वज्ञता, व्यापकता ईशादि गुण शुद्ध मायेला ओळखून बाजूला ठेवता जे त्याचे शुद्ध स्वरुप आहे, ते हेच स्वरुप, सच्चिदानंद स्वरुप आहे.

# दुःखद प्रसंग आणि बाबांनी मला काय शिकविले?

— श्री. मु.ब. निंबाळकर
१/१४, फाईव्ह स्टार अपार्टमेंट,
बंड गार्डन रोड, पुणे ४११ ००१.

*जीव जरी खरा स्वतंत्र। सुखालागीं कष्टता अहोरात्र।*
*पदरीं पडतें दुःख मात्र। हे तों चरित्र सत्तेचें।। २४।।*
*दुःखे टाळावयालागीं। असता सावधान जागोजागीं।*
*तीं त्या धुंडीत लागवेगीं। त्याचीच मागी घेतात।। २५।।*
*वारूं जातां गळां पडती। झाडूनि टाकितां अधिक लिपडती।*
*वाउगी जीवाची धडपडती ती। अहोराती तो शीण।। २६।।*

-अध्याय १३

सन १९७१ ची गोष्ट. मी नुकताच (३ वर्षांपूर्वी) सरकारी नोकरीतून निवृत्त झालो होतो. माझी अर्धी पेन्शन मी अंशराशी केली होती व मिळालेले पैसे चांगल्या नामांकित कंपनीत दीर्घ मुदतीच्या ठेवीत गुंतविले होते. हेतू हा की, २-३ वर्षात राहाण्यासाठी एखादी चांगली वास्तू बांधावी किंवा विकत घ्यावी. इतकी वर्षे ५ मुलामुलींच्या शिक्षणाच्या आणि एका मुलीच्या लग्नाच्या खर्चामुळे व लष्करातील सतत दूरदूर बदल्यांमुळे या गोष्टीकडे आधी लक्ष घातले गेले नव्हते. १९७१ च्या ऑक्टोबर महिन्यात जागा किंवा वास्तू पाहण्यासाठी मी पुण्यास आलो व बंड गार्डन रोड वरील ३ बेडरुमचा एक फ्लॅट विकत घेण्याचे नक्की केले. मुंबईस परत आलो व त्यासाठी कंपन्यांकडे माझे पैसे परत मागण्यासाठी गेलो आणि मला धक्काच बसला. जवळजवळ सर्वच कंपन्यांनी हात झाडले.
बुडालेली रक्कम चाळीस हजारांचेवर होती. आता कुठला फ्लॅट आणि कुठली वास्तू? मी खूपच निराश झालो. खरे म्हणजे हे ऐकून मला हृदयविकाराचा तीव्र झटकाच यावयाला पाहिजे होता. आयुष्यातील सर्व कमाई गेली होती. अर्ध्या पेन्शनवर पुढील आयुष्य कंठावयाचे होते. त्यातून ४ वर्षांपूर्वीच मी हृदयविकाराच्या आजारामुळे मुंबईत सैनिकी रुग्णालयात १।। महिना राहून आलो होतो. असो!

परंतु श्रीसाईबाबाची नुकतीच भक्ती मी सुरू केली होती. त्यामुळे मी मुळीच विचलीत झालो नाही. श्रीसाईबाबांवर सर्व भार टाकला, आणि पुण्याच्या फ्लॅटसाठी दुसरीकडे पैसे मिळविण्याचा प्रयत्न सुरू केला. आश्चर्य म्हणजे काही कंपन्यांकडून खटपट केल्यावर दहा हजारापर्यंत रक्कम परत मिळाली. माझा एक लहानसा फ्लॅट मुंबईत होता तो विकताना कल्पना नसतांना त्यावर पंधरा हजार जास्त मिळाले. आणि अशा प्रकारे पुण्याचा फ्लॅट ताब्यात घेण्यादिवशी नेमकी जरुर तेवढीच रक्कम गोळा झाली.१००—१५० जास्तही नाही की कमीही नाही.

नंतर कंपन्यांकडून राहिलेले तीस हजार रुपये परत मिळविण्याचा प्रयत्न मी सुरू केला. आता कंपन्या नेहमीचे व्याज देण्यासही असमर्थ झाल्या होत्या. देणेदाऱ्यांच्या

भीतीने त्यांनी आपले पत्तेही बदलले होते — मुंबई शहरा बाहेर उपनगरात निघून गेले होते संपर्क साधता साधता नाकी नऊ आले. मग श्रीसाईच्चरित्रातील ३६ व्या अध्यायातील एका फकीराने त्या गोमंतकातील गृहस्थाला त्याचे तीस हजार रुपये परत मिळविण्याकरिता आवडीचा पदार्थ सोडण्याचा सांगितलेला उपाय मला आठवला व मी माझा आवडीचा पदार्थ 'गुलाबजाम' सोडला. नीट पाळला की नाही ते आठवत नाही पण बाबांनी कृपा मात्र केली. हो! कृपाच म्हणावी लागेल कारण ८—१० वर्षानंतरही या नामांकित कंपन्या कोणाचेच पैसे किंवा व्याजही देऊ शकत नव्हत्या. त्यांचे दिवाळेच वाजले होते. कोर्ट कचेऱ्यांचाही उपयोग होत नव्हता. परंतु मला मात्र एकाएकी सहजपणे पैसे परत मिळू लागले. एका कंपनीतील लेखपालाने तर आपण होऊनच मॅनेजिंग डायरेक्टरांना माझेबद्दल सांगून कंपनी कडून रु. ५००चा दरमहा हप्ता लावून दिला. अशाप्रकारे १९८१ सालापर्यंत (म्हणजे एकूण १० वर्षांनी) माझी सर्वच्या सर्व मुद्दल रक्कम (रु ३०००० ) व्याजाशिवाय का होईना परत मिळाली. बाबांच्या ईच्छेशिवाय हे कधीतरी शक्य होते का?

आता माझा दुसरा अनुभव पहा. माझा तिसरा मुलगा सैन्यात आहे. सन १९८१ साली तो मेजर हुद्यावर होता. नुकताच निलगिरी (वेलिंग्डन) येथील स्टाफ कॉलेजमधून पी.एस.सी. पदवी घेऊन आला होता व नसिराबाद (राजस्थानात अजमेरजवळ) ब्रिगेड हेडकार्टर्स मध्ये महत्त्वाच्या पदावर होता. अचानक एके दिवशी पुण्यास आम्हाला बातमी आली की, त्याला हृदयविकारामुळे सैनिकी रुग्णालयात दाखल केलेले आहे. खरे म्हणजे त्या गोष्टीला १५—२० दिवस होऊन गेले होते पण आम्ही घाबरुन जाऊ म्हणून त्याने आम्हाला कळविले नव्हते व स्वतःच्या पत्नीलाही तशी ताकीद दिली होती. त्या तरुण पोरीने ते पंधरावीस दिवस एकटीने कसे घालविले असतील बाबाच जाणे! पण ही एक आमच्या सैनिकी जीवनाची चुणूक — आमच्या स्त्रियांचेही धैर्यबळ असे तयार होते. असो!

आम्ही तर अर्थात घाबरुन गेलो व लगेच तिकडे जाऊन त्याला वैद्यकिय सुट्टी मिळाल्यावर पुण्यास घेऊन आलो. सविस्तर गोष्टी झाल्यावर कळले की, तो राजस्थानातील जैसलमर जवळ पाकीस्तान सरहद्दीवर कामासाठी गेला होता. तेथून परत येताना रात्री आगगाडीत छातीत कळा येऊ लागल्याने दुसरे दिवशी सकाळी सैनिकी रुग्णालयात गेला होता. तपासणीत हृदयविकार तर निदर्शनाला आलाच परंतु त्याबरोबर मधुमेहही आढळला. वयाच्या ३४ व्यावर्षी असल्या रोगांबद्दल ऐकूनच मनाला धक्का बसला. सैन्यात दरवर्षी वैद्यकीय चाचणी होत असते व त्याच्यात त्यांना कधी यत्किंचितही दोष आढळला नव्हता. तसेच हा माझा मुलगा माझ्या सर्व मुलात जास्त सशक्त व बॉक्सिंग, क्रिकेट, हॉकी सारख्या मर्दानी खेळात प्रावीण्य मिळविलेला. दुर्दैव तर खरेच !

पण आश्चर्य म्हणजे या सर्व घटनांच्यावेळी माझे मन मुळीच बावरले नाही. बाबांच्या कल्याणकर्तृत्वाविषयी श्रद्धा होतीच. त्यांनी सुरवातीलाच सर्व भीती नष्ट झाल्यावरच आम्हाला बातमी कळविण्याची व्यवस्था केली. आता पुढील प्रकृतीची काळजी वाटत होती. पण त्यासाठी औषधे व इतर उपचार सुरू केले होते. दुःख होते ते दुसऱ्याच गोष्टीचे. हा माझा मुलगा त्याचे करीअरचे ऐन शिखरावर होता. आता त्याचे लेफ्टनंट

कर्नलच्या प्रमोशनचे बोर्ड बसणार होते व त्यात निवडून येण्याची १०० टक्के शक्यता होती. सैन्य दलात लेफ्टनंट कर्नलपासून सिलेक्शन ग्रेड असते व पुढच्या प्रगतीची ही फार महत्वाची पायरी असते. मात्र गुणवत्तेमुळे निवड झाली तरी वैद्यकीय चाचणीत पास झाल्याशिवाय सैन्याचे प्रमोशन मिळत नाही. म्हणजे या मुलाचे पुढचे प्रमोशन कायमचे बंद. फक्त १४ वर्षांच्या नोकरीनंतर पुढची सर्व नोकरी याच हुद्यावर घालवायची अणि तीही गुणवत्ता असून. केवढी अपमानास्पद परिस्थिती? अर्थात माझ्या मुलाच्या तरुण मनाला हा केवढा मोठा धक्का होता आणि त्यानेच आपल्या मनाचा तोल सावरण्याचा प्रश्न होता.

पण यातही बाबांनी मला साह्य केले. माझ्या मुलीचीच अचानकपणे भक्ती त्यांनी स्वतःकडे ओढून घेतली. मी न सांगताच आपण स्वतः होऊनच तो शिरडीस जाऊन आला. बाबांच्या फोटोजवळ नियमितपणे उदबत्ती व अंगाला ऊदी लावू लागला. औषधे, योग वगैरे करुन, जिद्दीने वजन कमी करून, सिगरेट, मद्य व साखर अजिबात सोडून त्याने आधी मधुमेहावर कब्जा मिळविला. (डॉक्टरांनी तसे सर्टिफिकेटही दिले) व हृदयविकार वाढू न देता सैन्यातील सर्व दगदगीची व श्रमाची कामे करण्याचे सामर्थ्य मिळविले. मी किंवा त्यानेही प्रमोशन मिळावे म्हणून बाबांकडे कधी नवसही केला नाही. हळूहळू आपल्या नोकरीतील भविष्य त्याने मान्य करून त्याप्रमाणे मनाची तयारी केली. मी व माझ्या पत्नीनेही बाबांनी जे काय केले ते त्याच्या हिताकरताच केले असे मानून घेतले. बाबांनी आमचा मुलगा तर सुखरुप ठेवला होता ना?

पण बाबा भक्तांचे पूर्णपणे कल्याण न करतील तर ते बाबा कसले? गेल्याच वर्षी (१९८५ मध्ये) मुलाच्या लेफ्टनंट कर्नलच्या बोर्डचा रिझल्ट आला आणि त्याला बोर्डाने पास केले. नंतर वैद्यकीय बोर्ड झाले. हृदयविकाराच्या बाबतीत अजून अंशात्मक दोष असल्याने (तो बहुतेक कायमचाच राहतो) त्यांना त्याला पूर्णपणे वैद्यकीय दृष्टीने निर्दोष ठरविता आले नाही, तरी अपवाद म्हणून त्यांनी त्याच्या प्रमोशनला परवानगी दिली आणि आम्ही गेल्या सप्टेंबरमध्ये त्याचेकडे (मध्यप्रदेशात इंदोरजवळ) महू येथील छावणीच्या ठिकाणी असतानाच त्याने खांद्यावर लेफ्टनंट कर्नलची मानचिन्हे चढवली. केवढी बाबांची कृपा ! 'अचिंत्यदानी गुरुमाय' म्हणतात ते उगीच नाही.

अशी कितीतरी उदाहरणे मला देता येतील. पण ही दोनच प्रतीक म्हणून पुरे. बाबांची भक्ती धरल्याने माझी वरील दुःखे दूर झालीच पण त्या प्रसंगांतून नेऊन बाबांनी मला जी शिकवण दिली तीच फार मोलाची आहे. बाबांचे खालील वचन मी आत्मसात करायला शिकलो.

*"इष्टानिष्ट सुखदुःख । संचितानुसार अमृत वा विख ।*
*हे प्रवाहपतित द्वंद देख । धरी न हरिख वा शोक ॥ ६९ ॥*
*जें जें येईल तें तें साहे । अल्ला मालीक वाली आहे ।*
*सदा तयाच्या चिंतनी राहे । काळजी वाहे तो सारी" ॥ ७० ॥*

—अध्याय ३४

या प्रसंगाचे वेळी माझ्या मनाची शांती फारशी ढळली नाही, व बाबांचे "श्रद्धा व सबूरी" हे दोन शब्द सतत मनात ठसत गेले. हळूहळू त्यांच्या कृपेने माझी प्रगती इतकी होत गेली की नुकतेच परवा एकाच दिवशी आमचेकडे लागोपाठ बाथरुमचे दोन नळ निरुपयोगी झाले, विजेचा बल्ब गेला आणि संध्याकाळी टी.व्ही. देखील बंद पडला. महिन्याचा शेवट व हा विनाकारण खर्च आणि तोही भरमसाठ. (आमच्या फ्लॅटच्या एका नळाला ६०-६५ रुपये पडतात आणि रंगीत टी.व्ही.च्या दुरुस्तीच्या खर्चाला तर मर्यादाच नसते). असे काही घडले की सहज संताप येतो. नेमके आपल्याच बाबतीत आणि याचवेळी अशी अडचण का यावी असे वाटते. परंतु माझे मन जरासुद्धा खवळले नाही. झाले त्याला इलाज नाही असे मानून कोणावरही न रागवता न चिडता निरसनाचा उपाय मी शोधू लागलो. मनात म्हणालो, "बाबा या समस्या उत्पन्न करणारे तुम्हीच आहात, समस्याही तुम्हीच आहात आणि त्या सोडविणारेही तुम्हीच आहात." आणि खरोखरीच माझ्या प्रयत्नांना यश येऊन या तीनही समस्या ३-४ दिवसात फारशी दगदग व फारसा पैशाचा व्यय न होता सुटल्या. केवढी ही कमाई!!

वरील अनुभवांवरुन दुःखद प्रसंगांबद्दल व समस्यांबद्दल माझी विचारसरणी आणि कार्यवाही तयार झाली ती अशीः-

(१) या जगात दिसणाऱ्या सर्व वस्तू व व्यक्ती नाशवंत आहेत. कधीतरी त्या तुटणार, फुटणार, जळणार किंवा मृत्यू पावणार हे निश्चित. काही लवकर काही उशीरा. तेव्हा सरासरीच्या न्यायाने तो प्रसंग आपल्या प्रिय वस्तूवर किंवा व्यक्तीवर येणे शक्य आहे.

(२) म्हणून असल्या प्रसंगाला तोंड देण्याची मनाची तयारी नेहमीच ठेवली पाहिजे आणि तो प्रसंग आल्यावर दैवाला किंवा देवाला दोष देऊन किंवा माझ्याच बाबतीत आणि आत्ताच हे का घडले असे म्हणून रडत न बसता व मनाचे स्थैर्य न गमावता, शांतपणे पुढची कारवाई करण्याकडे लक्ष लावले पाहिजे.

(३) नरजन्म महा पुण्याईने मिळतो म्हणतात. तेव्हा आयुष्यात एखादी अप्रिय गोष्ट घडली म्हणून त्याच्याच शोकाने पुढचे सर्व आयुष्य बरबाद करणे मूर्खपणाचे आहे. लक्षात ठेवा की आयुष्याची आपल्या मनाप्रमाणे व परिस्थितीप्रमाणे घडी पुन्हा नीट बसविता येते . ईश्वराने प्रत्येक जीवाला तसे मानसिक बळ दिलेले असते. फक्त त्याने त्याचा उपयोग करुन घेतला पाहिजे.

(४) या सर्व गोष्टी बोलण्याइतक्या सोप्या नाहीत. त्यासाठी माणसाला श्री साईबाबांसारख्या श्रेष्ठ संताची किंवा दैवी शक्तीचा आधार लागतो. त्यांचेकडून या जगात जे घडविले जाते ते आपल्या सर्वांच्या अंतिम कल्याणाकरिताच असते अशी भावना असली म्हणजे आपल्यावर आलेला दुःखद प्रसंगही त्यांचाच प्रसाद म्हणून मानण्याची तयारी होते. मग पुढील मार्ग दाखविण्याचा भार आपण त्यांचे खांद्यावर टाकून निर्धास्त होतो. आणखी आपली 'सबूरी' असली आणि त्यांची कृपा झाली तर कदाचित या वाईटातून चांगलेच उद्‌भवल्याची आपणाला प्रचिती येते.

*सर्वेऽपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयः सर्वे भद्रं पश्यन्तु न कश्चिद् दुःखमवाप्नुयात् ।।*

ओम् शांतिः शांतिः शांतिः

# श्री साईबाबांच्या हयातीत माझ्या वडिलांना आलेले अनुभव

— सौ. शोभना अनंत पालकर
१०६, पहिला मजला,
लोहार आळी, चेंदणी,
ठाणे - ४०० ६०१.

सन १९१४ पूर्वीची कदाचित १९०८-१९०९ ची गोष्ट असेल. माझे वडील चौदा किंवा पंधरा वर्षांचे असतील. माझी आत्या वडिलांच्या पेक्षा मोठी. तेव्हा त्यांच्या भावोजींच्या बरोबर माझ्या वडिलांना शिर्डीस जाण्याचा योग आला. वडील सांगत, "भावोजी नेहमी शिर्डीस जात. मी पण त्यांचेबरोबर एका गुरुपौर्णिमेस शिर्डीस गेलो. गुरुपौर्णिमेचा सोहळा अत्यंत पहाण्यासारखा झाला. गर्दी बरीच होती. २०० ते २५० लोक होते. आलेल्या भक्तांनी बाबांना वस्त्र व दक्षिणा दिली. मी नुकताच नोकरीला लागलो होतो. पगार रुपये १५/-. माझ्याकडे दक्षिणा देण्यास आठ आणे, अधेली होती. सर्वांच्या चांदीच्या रुपयांच्या दक्षिणा पाहून मला अधेलीची लाज वाटली. मी बाबांची पूजा केली. व बरोबर नेलेले उपरणे बाबांच्या हातात दिले. बाबा म्हणाले, ते माझ्या अंगावर घाल. मी त्याप्रमाणे केले व दक्षिणा देण्यासाठी ओशाळून हात पुढे केला. परंतु बाबांनी लगेच अंगावरच्या उपरण्याखाली ताम्हण घेऊन त्यात दक्षिणा टाकण्यास सांगितले, तेव्हा बरेच रुपये ओतल्याचा आवाज आला. बाजूला उभ्या असलेल्या लोकांना वाटले की, मी मुठीने रुपयांचा बटवा आत रिकामा केला की काय? त्यानंतर बाबांनी इतर लोकांच्या पूजेच्या वेळी ते उपरणे व ताम्हण बाजूला केले नाही, ताम्हण तसेच झाकलेले ठेवले. त्यामुळे माझे उपरणे बाबांच्या अंगावरच राहिले. इतरांना प्रसादाचे वस्त्र मिळाले. मी ह्या इतर माणसांच्या इतकाच श्रीमंत आहे ह्याच आनंदात आमच्या वास्तव्याच्या जागेत आलो."

"पुन्हा संध्याकाळी आम्ही आरतीस जमलो. शामसुंदरला मला बोलवण्यास पाठवले. तो घोडा असूनही त्याने मला बरोबर ओळखून काढले व माझा शर्ट धरून ओढू लागला. बाजूच्या मंडळींनी मला सांगितले, 'जा तुला बाबा बोलवीत आहेत.' मी बाबांच्या इथे गेलो. बाबांनी मला माझे उपरणे पुन्हा देवू केले. मी म्हणालो, "देई दान परत घेई दान तो पुढचे जन्मी मुसलमान. मी ते तुम्हाला दिले आहे. मला ते परत नको." बाबा किंचित हसले आणि म्हणाले, "नाही रे बेटा, हा गुरुपौर्णिमेचा प्रसाद आहे तो तू घे." माझ्या बरोबरीच्या मंडळींनी पण मला ते घेण्यास सांगितले. व मी तो प्रसाद घेऊन आलो."

"परंतु बाबांच्या प्रसादाची प्रचिती पुढेच आली. १९१४ साली एन्फ्लुएन्झाची साथ आली. ती पहिलीच साथ असल्याने त्यावेळी ह्या रोगाला औषध नव्हते. ज्याला फ्लू झाला त्याला बोलावणे आले असेच समजत. शे पाचशे माणसे पटापट मेली. डॉक्टर्स काहीच करू शकत नव्हते. ते रुग्णांना देवावर भरोसा ठेवण्यास सांगत. त्याप्रमाणे मला

थंडी भरून ताप आला. अंग ठणकू लागले. काका, आई, बहिण, काकी सर्वजण चिंतातूर झाले. आई तर रडू लागली. डॉ. अभ्यंकरांनी लागत नसल्याचे सांगितले. जवळजवळ बाजार संपत आल्याचे सांगितले. मला गादीवरून घोंगडीवर काढण्यात आले. सर्व शरीर थंडगार पडले. होते. चेहरा काळानिळा झाला होता. सर्व आटोपल्यासारखेच होते. परंतु तेवढ्यात आईला उपरण्याची आठवण झाली. ती म्हणाली, 'त्याचाच प्रसाद आहे. जाऊ दे त्याच्याच बरोबर.' असे बोलून ते उपरणे माझ्या अंगावर घातले. आणि थोड्याच वेळात थोडी छाती हालू लागली. व श्वासोच्छवास सुरू झाला. तेव्हाच सिव्हिल सर्जन डॉ. बिलीमोरिया यांना एक नातेवाईक घेऊन आला. त्यांनी मला तपासले आणि औषध नसल्याने छाती शेकून काढण्यास सांगितले. वांगी आणून ती मध्ये कापून त्या फोडी तव्यावर गरम करावयाच्या आणि छाती शेकून काढण्यास डॉ. बिलीमोरिया यांनी सांगितले. त्याप्रमाणे केल्यावर मला परत उचलून बिछान्यावर घेतले. तोच मी आज माझ्या मुलांना माझ्या मरणाची गोष्ट, हकीकत सांगत आहे.'

अशी ही बाबांची कृपा आमच्या कुटुंबावर अजूनपर्यंत आहे. माझ्या वडिलांना मिळालेला आशीर्वाद त्यांच्या पतवंडांनासुद्धा आज मिळत आहे. श्री संत गजानन महाराज पट्टेकर, ठाणे हेदेखील आज आम्हाला बाबांच्या प्रमाणेच मार्गदर्शन करत आहेत.

# अन् हृदयाची हालचाल पुन्हा चालू झाली

**— श्री. सूर्यकांत गोपाळ चंचे**
मु.पो. नेरळ(पाडा), ता. कर्जत,
जि. रायगड.

माझ्या शेजारी माझी चुलत मावशी राहते. दिनांक १२ जानेवारी १९८६ च्या रात्री तिच्या पतीच्या छातीत दुखायला लागले म्हणून डॉ. अशोक कर्वे यांना बोलावण्यात आले. त्यांनी रक्तदाब वगैरे तपासून उपचार सुरू केले. डॉक्टरने मला सांगितले की, "ह्यांना सौम्य हृदयविकाराचा झटका आला आहे. म्हणून त्यांना जास्त बोलू देऊ नका, हालचाल करू देऊ नका." डॉक्टरने सांगितल्याप्रमाणे मी त्यांच्या मोठ्या मुलास सूचना देऊन रात्री १२.०० वा. झोपायला घरी गेलो. दुसऱ्या दिवशी त्यांचा मोठा मुलगा सकाळी ६.३० वा. कामावर निघून गेला. त्यानंतर ८.०० वा. ते स्वतः व त्यांचा लहान मुलगा डॉ. कर्वे यांच्या दवाखान्यात गेले. तेथेच त्यांना पुन्हा जोरदार झटका आला

तेव्हा डॉक्टरने त्यांच्या मुलास मला बोलावण्यास पाठविले. त्याने धावतच येऊन मला तसे सांगितले. मी लगेच दवाखान्यात गेलो, तेव्हा ते बेशुद्धावस्थेत होते. डॉ. कर्वे यांनी मला डॉ. शितूत यांच्या दवाखान्यातून ऑक्सिजनचे सिलेंडर आणायला सांगितले. मी व त्यांचा मुलगा मिळून धावत पळत कसाबसा सिलेंडर घेऊन आलो. डॉ. शितूतही बरोबर आले. डॉक्टरांना सलाइन लावायला शिरही सापडत नव्हती. एकदाची पायाची शिर सापडली तेव्हा सलायन लावले. डॉ. कर्वे यांनी रुग्णाला कर्जत किंवा मुंबईला न्यायला सांगितले. लवकरात लवकर उपचार व्हावेत म्हणून भाड्याने टॅक्सी करून आम्ही रुग्णास घेऊन कर्जतला निघालो. आमच्या बरोबर डॉ. कर्वेही आले. मी गाडीत बसलो व श्रीसाईबाबांचा धावा सुरू केला. श्रीसाईंना साकडे घातले की, माझी तुमच्यावर श्रद्धा आहे तिला तडा जावू देऊ नका. माझे शब्द संपतात न संपतात तोच डॉक्टरांनी केस संपली म्हणून पुढे न जाता पुन्हा मागे फिरण्याकरिता ड्रायव्हरला गाडी उभी करायला सांगितले. गाडी खूप वेगात होती व ड्रायव्हरने ब्रेक लावल्यामुळे एक जोरदार धक्का सर्वांना बसला तोच त्यांचे हृदय पुन्हा चालू झाले व ते अर्धेअधिक उठून बसले. त्यांना (रुग्णाला) व्यवस्थित करून आम्ही कर्जतकडे निघालो. कर्जतला सरकारी दवाखान्यात डॉ. साबणे यांनी त्यांचा कार्डीओग्राम काढला. डॉ. साबणे यांनी डॉ. कर्वे यांना रुग्ण जास्तीत जास्त ६ तास जगेल, त्यापेक्षा अधिक जगूच शकणार नाही., असे ठामपणे सांगितले. परंतु माझें मन काही हे ऐकायला तयार नव्हते. मी सर्व भार श्रीसाईंवर सोपवला व माझ्याजवळ असलेली उदी मी मावशीकडे देऊन त्यांना कपाळाला लावून पाण्याबरोबर प्यायला देण्यास सांगितले. मी त्यांचा दुसरा सख्खा भाचा व मावशी यांस विचारून संध्याकाळी ४.०० वाजल्यानंतर (म्हणजे ६ तासांनंतर) त्यांना मुंबईला न्यायचा बेत केला. त्याकरिता टॅक्सीची सोय करण्यास मी त्यांच्या दोन नंबरच्या मुलास सांगितले. दरम्यान ते शुद्धीवर आले होते. डॉक्टरांनी तर स्पष्ट सांगितले होते की, रुग्णाच्या हृदयाचे दोन्ही भाग एकमेकांशी सहकार्य न करता वेगवेगळे काम करीत आहेत. अशा परिस्थितीत व त्यांचा मोठा मुलगा हजर नसताना श्रीसाईबाबांवर सर्व भार सोपवून मी त्यांना मुंबईला नेण्याचा निर्णय घेतला होता.

संध्याकाळी ४.३० वा. आम्ही टॅक्सीने रुग्णाला घेऊन मुंबईला निघालो. बरोबर मावशी व इतर चार जण होते. रुग्णाला सलायन लावलेल्या स्थितीतच घेऊन आम्ही ६.०० वाजता के.इ.एम्. रुग्णालयात पोहोचलो, तेथेही डॉक्टरांनी लगेच उपचार सुरू केले व श्रीसाईंच्या आशीर्वादाने त्यांच्या उपचारांना यश येऊन दिवसेंदिवस त्यांची प्रकृती सुधारत गेली. ते दि. २५ जानेवारी ८६ रोजी बरे होऊन घरी आले. आता त्यांची तब्येत ठीक आहे. ते कपडे शिवण्याचे कामही थोड्या प्रमाणात करू लागले आहेत.

सहातासांपर्यंत जगण्याची मुदत असलेली व्यक्ती आज साडे सहा महिने व्यवस्थित असून आपले पूर्वीचे कामही करू लागली आहे. हे कशामुळे शक्य झाले? श्रीसाईनाथांच्या कृपेमुळेच ना? श्रीसाईनाथ भक्तांना दिलेल्या वचनाप्रमाणे आजही त्यांच्या हाकेला धावतात, याचे हे जिवंत उदाहरणच नाही का?

# सारे जीवन साईमय झाले । माझ्या सदनी साईनाथ आले

— सौ. संगीता दि. गोडबोले
(एम.ए.,बी.एड्.)
सेंट्रल स्कूल शिक्षिका, देहू रोड,
परिमल, प्लॉट नंबर ३७२, सेक्टर २८,
प्राधिकरण, पुणे - ४४.

सन १९६० पासून श्री. साईबाबांच्या चरणांचा लाभ झाला. अनंत जन्माची पुण्याई फळाला आली. आज पूर्वीच्या २५ वर्षांमागील आठवणींचा परिमल (सुवास) अजूनही ताजाच आहे. त्या आठवणींनी व साईंच्या लीलांनी नयन प्रेमाश्रुंनी भरलेले आहेत. हे अनुभव शब्दातून प्रकट करणे पूर्णार्थाने कठीणच आहे. तथापि व्यावहारिक पातळीवरून हा थोडासा प्रयत्न आहे.

वयाच्या ६ व्या वर्षापासून मी दरवर्षी गुरुपौर्णिमेला शिरडीला जात होते. त्या लहान वयात तसे परमार्थातले काही कळत नव्हते. पण आईवडिलांच्या संस्काराने आरती, स्तोत्र, पूजा यांचे मात्र मनाला वळण लावले गेले. शिर्डीला जाण्यासाठी बाबांच्या दर्शनाची मी आतुरतेने वाट पहात असे. आजही मला आठवत आहे की, लहानपणी मी बाबांजवळ एकच मागणे मागितले, "बाबा तुमच्या दर्शनाला मला प्रत्येक वर्षी आणा. आपली सेवा अशीच माझ्या हातून अखंड होऊ दे." व ही माझी इच्छा १९८० वर्षाच्या गुरुपौर्णिमेपर्यंत म्हणजे संपूर्ण २० वर्षे बाबांनी पूर्ण केली. मी व माझे आईवडील यांची एकही गुरुपौर्णिमा चुकली नाही.

१९८१ सालापासून काही कारणास्तव गुरुपौर्णिमेच्या उत्सवाला शिर्डीस जाता आले नाही. तथापि वर्षातून २-३ वेळेस शिर्डीस साईनाथांच्या दर्शनाचा लाभ आजतागायत कधीही चुकलेला नाही. अशीच सेवा ते आमच्याकडून करून घेवोत ही साईंच्या चरणी प्रार्थना.

साईंच्या अनुभवाचे तसे दोन प्रकार होतील.

१) लौकिक जीवनातील अनुभव. उदा. — रोग निवारण, पुत्रप्राप्ती, नोकरी मिळणे, बढती वगैरे. साईभक्तांना याचा अनुभव नक्की येणारच.

२) परमात्म्याचा म्हणजेच सद् तत्वाचा साक्षात्कार. मोक्षपदाची प्राप्ती, जीव ब्रह्मैकत्व. हा दुसरा अनुभव साईसारख्या गुरुविना कधीही शक्य नाही. साईसच्चरित्रातून हेमाडपंतांद्वारे प्रत्यक्ष साईंनीच वारंवार सायुज्य मुक्तिचा मार्ग सांगितला आहे. हा अनुभव तसा कठीण आहे. पण अशक्य नाही. साईंच्या बोलाचे आपण आचरण करीत राहिलो, भक्तियुक्त अंतःकरणाने श्रद्धा व सबूरी या वचनांवर विश्वास ठेवून जीवनात राहूनही त्यापासून अलिप्त असे जीवन आपणाला जगता येऊ शकते. निष्काम कर्मयोग साईनाथांनी सोपा करून सांगितला आहे. हा अनुभव मला पूर्णांशाने अजून आलेला नाही. तथापि, पायरीपायरीने हा अनुभव येऊ शकतो.

२५ वर्षांच्या साईभक्तीनंतर सध्या या मोक्षप्राप्तीची ओढ लागून राहिली आहे. 'समस्त

जग हे गुरुस्वरुपची ठसो मानसा' याचा अनुभव येऊ लागला आहे. तथापि, हे अनुभव शब्दांद्वारे सध्या तरी प्रकट करणे शक्य नाही. म्हणून लौकिक जीवनातीलच काही अनुभव देत आहे.

एम्.ए. ची पदवी प्राप्त केल्यावर नोकरीसाठी केंद्रीय विद्यालय संगठन, दिल्ली येथे पहिलाच अर्ज केला. मुंबईला आय्.आय्.टी. पवई, केंद्रीय विद्यालय येथे मुलाखत होती. यावेळचा साईंचा अनुभव तर अविस्मरणीय आहे. रोज घरात बाबांचे दर्शन, पूजा होत असे. मी माझ्या नणंदेच्या घरी ठाण्याला उतरले होते. त्यांच्या घरी साईंचा फोटो नव्हता. मनाला चुकल्यासारखे वाटत होते. तथापि, आम्ही मुलाखतीपूर्वी जवळच असणाऱ्या एका हॉटेलात गेलो. तेथे साईबाबांचा फोटो होता. या फोटोला पाहून काय वाटले? हे साईभक्तांना सांगावयास हवे का? विनम्रपणे तेथे नमस्कार केला व मुलाखत सफल होणार याची ती प्रचीती होती. आणि झालेही तसेच. पुढे १९७८ च्या वर्षी गुरुपौर्णिमेहून मी पुण्याला परत आले. त्यावेळी घरात मला पोस्टमनने टाकलेली नोकरीची ऑर्डर मिळाली. पहिल्याच ठिकाणी अर्ज केला व नोकरीही चांगल्या ठिकाणी मिळाली. तीही गुरुपौर्णिमेहून परत आलेल्या दिवशी! धन्य ती साईची अघटीत लीला!

पहिली नोकरीची ऑर्डर आय्.एन्.एस्. शिवाजी, लोणावळा येथे होती. ज्यावेळी मी पहिल्या दिवशी तेथे गेले, त्यावेळचाही अनुभव लक्षात ठेवण्यासारखा आहे. लोणावळा रेल्वे स्टेशन ओलांडल्यावर आय्.एन्.एस्. शिवाजीला जाण्यासाठी जेथे त्यांची गाडी आहे, तेथे हमालांनी बांधलेले छोटेसे साईमंदिर आहे. या साईमूर्तीचे दर्शन घेताच, आनंदाश्रुंनी माझे मन भरुन आले. नोकरीवर रुजू होण्यापूर्वी परत एकदा मनातील साईदर्शनाची ओढ अशी पूर्ण झाली.

पुढे तेथे मोठा क्वार्टरही मिळाला. तथापि माझे मिस्टर चिंचवडला कामाला असल्याने त्यांना जाण्यायेण्याचा त्रास होता. त्यामुळे एकदा शिर्डीला साईसत्यनारायण केला, त्यावेळी बाबांना बदली व्हावी, याबद्दल विनंती केली. हे सर्व लिहिताना मन साईभक्तीने नुसते ओथंबून वहात आहे की, शिर्डीहून घरी आले त्याचवेळी ८ दिवसांच्या आत बढती मिळून बदली झाली. कोणाचाही वशीला न लावता साईच्या कृपेनेच हे सर्व झाले.

अशीच कृपा साईनाथांची शेवटपर्यंत असावी व शेवटी मोक्षपदाची प्राप्ती व्हावी असे लिहून त्यांच्याच प्रेरणेने लेखणी थांबवते.

**श्री साईलीला मासिकाचा हा नोव्हेंबर-डिसेंबर १९८६ जोड अंक असल्यामुळे डिसेंबर १९८६ चा वेगळा अंक प्रसिद्ध होणार नाही याची कृपया वाचकांनी, वर्गणीदारांनी नोंद घ्यावी. या पुढील अंक १ जानेवारी १९८७ रोजी प्रकाशित होईल.**

**— का. संपादक**

# भक्त कैवारी श्री साईबाबा

— डॉ. अनंत एस्. शिंदे
एम्.बी.बी.एस्.
१२, यशवंत कुंज,
ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स समोर,
नौपाडा, ठाणे-४०० ६०२.

ऑगस्ट १९६५ सालची गोष्ट. त्यावेळी मी ठाणे नगरपालिकेत आरोग्याधिकारी म्हणून काम करीत होतो. माझे सकाळचे काम संपवून मी घरी आलो. घरी आल्यानंतर माझ्या पोटात अचानक दुखू लागले. जीववेण्या कळा येऊ लागल्या. लघवी करण्यासाठी गेलो तर रक्तमिश्रित लघवी झाली. त्यामुळे मुतखड्याचा त्रास होत असावा असे मला वाटले. ताबडतोब क्ष किरण (एक्स रे) काढून घेतला व मुतखडाच असल्याची खात्री करून घेतली. नंतर पुष्कळ उपाय केले पण कशाचाच उपयोग झाला नाही. मला मात्र नेहमी शिर्डीस जाऊन बाबांचे दर्शन घेतल्याशिवाय मुतखडा पडणार नाही असे वाटायचे. पण त्याबरोबरच शिरडीस जाताना जर त्रास झाला तर माझे काय हाल होतील अशी भीतीही वाटायची. त्यामुळे मी लवकर निर्णय घेऊ शकत नव्हतो. असे होता होता १९६६ चा फेब्रुवारी महिना उजाडला. तोपर्यंत मधून मधून कळा चालूच होत्या. फेब्रुवारी महिन्यात मात्र मी पक्का निर्णय घेतला व काहीही झाले तरी आपण शिरडीस जायचेच असा निर्धार करून पत्नीसह शिरडीस प्रस्थान केले. श्री साईबाबांच्या कृपेने रस्त्यात कोणताच त्रास झाला नाही. शिरडीस पोहचताच प्रथम बाबांचे दर्शन घेतले व या त्रासातून माझी त्वरीत सुटका करा अशी त्यांना प्रार्थना केली. नंतर बाबांना अभिषेक केला व दुसऱ्या दिवशी घरी परत जाण्यास निघालो. बाबांच्या कृपेने घरी परततानाही कसलाच त्रास झाला नाही. शिरडीहून परत आल्यानंतर पहिल्याच गुरुवारी पहाटे तीन वाजता माझ्या पोटात दुखू लागले म्हणून मी शौचास गेलो, तो काय आश्चर्य! लघवीवाटे तो मुतखडा बाहेर पडला. अशातऱ्हेने बाबांनी एका मोठ्या संकटातून माझी सुटका केली.

# मूर्तिमंत भगवान श्री साईबाबा

— कु. माधुरी मधुकर कोंबेकर
मु.पो. राजापूर, धोपेश्वर घाटी,
जि. रत्नागिरी.

आयुष्यात येणाऱ्या अनेक दुःखांना हसत सामोरे जाण्याची कला काही व्यक्तींना साध्य झालेली असते. पण तिच्या पाठीमागे असणाऱ्या अधिष्ठानाची मात्र आपण कधीच चौकशी करत नाही. ही कला पाठीशी असणाऱ्या विश्वासक सावलीमुळेच साध्य होते. मनात सतत चांगलेच विचार आणल्याने कुठल्याही प्रसंगाची चांगली बाजू डोळ्यांना

दिसते आणि आलेल्या प्रसंगाचा आनंद ती व्यक्ती मनमुराद लुटू शकते. पण दुःखाचा प्रसंग आला की, अशावेळी हीच कला मनाचा समतोल ढळू न देण्याची फार मोठी कामगिरी पार पाडीत असते. अशावेळी चांगल्या विचारांचे संस्कार माणसाला धीर देणारे ठरतात. आणि त्याबरोबर संतांची पाठराखण कामाला येते. कुणीतरी आपल्या पाठीशी आहे आणि आपल्या मनाचा तोल ढळू न देण्याची काळजी घेतो व अशी भावनाच मनाला धीर देणारी ठरते. कुठलीही संतवाणी ही अशी मनाचा समतोल ढळू न देण्यास मदत करीत असते. प. पू. साईबाबांचे निरनिराळे अनुभव भक्तगण कथन करीत असतात तेव्हा एक गोष्ट निश्चित असते की, मनाच्या असंतुलीत अवस्थेत ह्यांना कुठलीतरी म्हणजेच पू. साईबाबांची सावली आपल्या पाठीशी आश्वासक स्वरुपात उभी असल्याचे जाणवते.

'असता पाठीशी साई माऊली, पळेल दूर दुःखाची सावली'

अश्याप्रकारे निरनिराळ्या भक्तगणांना आलेले अनुभव कोणीही साईलीला मध्ये आपल्या भाषेमध्ये दिल्यास ती एक प्रकारची साईसेवाच केल्यासारखे होईल म्हणून भक्तांना आलेले काही अनुभव मी साईलीलामध्ये देण्याचा प्रयत्न करीत आहे.

मंगळवेढा गावात एकदा बाबा गेले होते. त्या गावातील एका ब्राह्मणाने त्यांना आपल्या घरी येण्यासाठी प्रार्थना केली. त्या ब्राह्मणाच्या घरी गेल्यावर बाबांनी खाण्यासाठी दुधाची खीर मागितली. तेव्हा तो ब्राह्मण म्हणाला, महाराज घरामध्ये गाय आहे, परंतु ती दूध देत नाही. त्या ब्राह्मणाचे म्हणणे ऐकून घेतल्यावर बाबांनी त्या गाईच्या अंगावर हात ठेवला व म्हणाले, 'बाई या ब्राह्मण कुटुंबाला रोज दूध दे.' असे सांगून बाबांनी ब्राह्मणाला दूध काढायला सांगितले. ब्राह्मणाने भरपूर दूध काढले. तेव्हा बाबा म्हणाले या दुधाची बनवलेली खीर मी संध्याकाळी खाईन. येवढे सांगून ते निघून गेले व संध्याकाळी येऊन गाईच्या दुधाची बनवलेली खीर खाऊन त्या ब्राह्मणाला आशीर्वाद देऊन निघून गेले.

एका गावात बाबाजी भट नावाचा वैदिक ब्राम्हण रहात होता. एके दिवशी भर उन्हाळ्याच्या दिवसात बाबा त्याच्याकडे गेले व पिण्यासाठी पाणी मागू लागले. तेव्हा त्या ब्राह्मणाच्या पत्नीने बाबांना नम्रतापूर्वक सांगितले की, महाराज तुम्ही थोडावेळ इथे बसा. मी लवकरच पाणी घेवून येते. तेव्हढ्यात बाबा म्हणाले, घरात विहीर तर आहे मग बाहेरुन पाणी कशाला आणतेस? तेव्हा ती बाई म्हणाली की, उन्हाळ्यात या विहिरीचे पाणी आटते. तेव्हा बाबा म्हणाले, 'त्या विहिरीत भरपूर पाणी आहे. चल मी तुला दाखवतो. बाबांनी त्या विहिरीत वाकून बघताच ती विहीर पाण्याने पूर्ण भरुन गेली. बाबांनी त्या बाईला विहिरीत घडा घालून पाणी काढण्यास सांगितले व त्या पाण्याने त्यांनी आपली तहान भागवली. आज ती विहीर त्या संपूर्ण गावाची एक जीवनधार बनलेली आहे.

अशाप्रकारे बाबांनी कितीतरी अलौकिक चमत्कार घडविले आहेत. आज साईंनी समाधी घेवून अनेक वर्षे झाली. परंतु आज सुध्दा आपल्या भक्तांचे कल्याण करण्यासाठी ते सदैव तत्पर असतात.

# आई, आजोबा कुठे गेले ग?

— डॉ. श्रीपाद परूळेकर
३४, सह्याद्री,
लोंढा - ५९१ ३०१,
कर्नाटक.

मी दवाखान्यात आजारी माणसाला तपासत होतो, इतक्यात एका औषध कंपनीचे फिरते प्रचारक आले. मी त्यांना माझ्या आभ्यासिकेत बसण्यास सांगितले.

दवाखान्यातील गर्दी संपताच मीही आभ्यासिकेत गेलो. याखेपेला काही नवी औषधे नव्हती पण जुन्या औषधांची आठवण करून देवून, ओषधांचे काही नमुने त्यांनी माझ्या समोर ठेवले. मला वाटले ते आता गोड इंग्रजीत एक दोन शब्द सांगून रजा घेणार. पण त्यांनी निराळ्याच विषयाला हात घातला. ते म्हणाले, "तुमच्या घरात आल्यावर मला आपल्या घरात असल्याचा आनंद मिळतो. तुमचं घर आणि आतील सजावट मोहक आहे."

मनुष्य हा स्तुतीप्रिय प्राणी आहे. मी त्याला अपवाद नाही. तरीसुद्धा न राहून मी त्यांना विचारले, "आपणाला आपलेपणा वाटण्यासारखे माझ्या घरात काय आहे?" त्यांनी जरा गळा खाकरला व ते म्हणाले, "योग्य जागी लावलेले बाबांचे फोटो."

मी विचारले, "बाबांचे म्हणजे साईबाबांचे काय?"

"होय" तो उत्तरला.

"त्याबद्दल तुम्हाला एवढे आकर्षण का?" मी पुन्हा प्रतीप्रश्न केला.

"मी चार वर्षाचा असताना ते माझ्या स्वप्नात आले आणि माझा ताप पळाला, वडीलसुद्धा बरे झाले." ते सांगू लागले. मध्येच थांबवून मी त्यांना विचारले. "पण आपल्याला चार वर्षाच्या वयाची आठवण कशी?" प्रश्न जरा खोचक होता पण त्यांनी ते मनावर घेतले नाही, इतके ते बाबांच्या आठवणीने तल्लीन झाले होते. हे पाहून मी त्यांना इत्थंभूत माहिती सांगण्याची विनंती केली. त्यांनी जे सांगितले ते थोडक्यात असे —

त्यांचे वडील कारवार येथील माजाळी गावचे रहिवाशी. त्यांचे नाव कृष्णा वेंकटेश मांगले. वडील नोकरीला मुंबईला होते. हे घराणे मध्यम वर्गातले. मुंबईला ते वरळीच्या कोळीवाड्यात रहात होते. आईचे नाव सुमती. त्यावेळी लक्ष्मीकांत चार वर्षाचा होता.

वडील अचानक आजारी झाले. डॉक्टरांनी त्यांना टॉयफॉईडचा ताप असल्याचा निर्णय दिला. त्यामुळे त्यांना आर्थररोड हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. ५/६ दिवसांनी लक्ष्मीकांत आजारी पडला. दवाखान्यात आजारी म्हणून नवऱ्याला पोहचविले आणि घरात चार वर्षाचा मुलगा आजारी. त्या माऊलीची काय त्रेधातिरपीट उडाली असेल याची कल्पनाच करवत नाही. रात्री एक वाजता मुलाचा डोळा लागलेला बघून ती माऊली मुलाचे कपडे धुण्यासाठी नळावर गेली. तिला बापडीला झोप कुठली? डोक्यात काळजीचा काहूर आणि कपडे आपटत होती. एक चित्त दवाखान्यात तर एक घरात

आणि हात प्राप्त कर्तव्य करत होते. तितक्यात आतून आवाज आला, "आई, आजोबा कुठे गेले?" चार वर्षाचा लक्ष्मीकांत विचारत होता. माऊलीच्या काळजात चर्र झाले. तिने ओळखले मुलाच्या डोक्यात ताप चढलाय. "देवा आता काय होणार?" नकळत माऊली बोलून गेली. तिने साबणाच्या फेसाचे हात पाण्यात बुडविले व हाताचा साबण गेला की नाही हे न बघताच पदराला हात पुसत ती आत आली.

मुलाच्या कपाळावर हात ठेवला, कपाळ तितकेसे गरम नव्हते. मग स्वप्नात ओरडला काय? माऊलीचे मन विचारात मग्न झाले.

"काय रे काय बडबडत होतास?" तिने पृच्छा केली.

"नाही, आई मी बडबडलो नाही," मुलगा उत्तरला, "मी विचारले, आजोबा कुठे गेले?"

"अरे आता रात्रीचे दोन वाजले आहेत. सगळीकडे सामसूम आहे. आता कोण येणार? तुला की नाही ताप आलाय, म्हणून स्वप्न पडतात" आई समजावू लागली. पण मुलाला ते पटणार कसं? "नाही आई, आजोबा आले होते. तो माझ्या डोक्यावर फोटो आहे ना, त्या फोटोतल्या सारखेच होते ते.

माझ्या बाजूला बसले होते. म्हणाले,"..........."

आईने न राहून विचारले,

"काय म्हणाले?"

"ते म्हणाले, "........", मुलगा सांगू लागला, "तू दोन दिवसात बरा होशील आणि तुझे वडीलसुद्धा बरे होतील आणि तू जावून त्यांना दवाखान्यातून घेवून येशील."

बिकट प्रसंगातही आईला हसू फुटले. मग ती बाळाला थोपटील म्हणाली, "तुझ्या तोंडात साखर पडो. झोप आता." आणि ती त्याला थोपटू लागली. बाळ झोपला. माऊलीने कपडे आत आणून ठेवले व ती सुद्धा कलंडली. दिवसभराच्या श्रमाने ती सुद्धा चांगली झोपली.

माऊलीला जाग आली तेव्हा सूर्य बराच वर आला होता. ती गडबडीने उठली व लगेच सगळं आवरून ती दवाखान्यात गेली. नर्स म्हणाली, "आज काही सांगता येणार नाही, उद्या या." घरातील मुलाच्या ओढीने पुन्हा तिचा प्रवास चालू झाला. घरात येवून पहाते तो बाळ खेळत होते. त्याचा ताप गेला होता. पण त्याला विश्रांतीची फार गरज होती.

आजारी माणसाची शुश्रूषा परवडली पण आजारपणातून उठलेल्या मुलाला सांभाळणे कठीण. त्यात चौथं वर्ष म्हणजे पोरगं द्वाडच असतं. तेव्हा त्याची समजूत घालून त्याला झोपवून ती जेवणाला लागली.

तो दिवस तसाच गडबडीत गेला. दुसऱ्या दिवशी पुन्हा ती दवाखान्यात गेली. डॉक्टर फेरी मारत होते. तिने नमस्कार केला. डॉक्टर म्हणाले, "मिस्टर मांगलेंना उद्या घेवून चला. त्यांची प्रकृती छान आहे. पण लक्षात ठेवा, काही खावू घालू नका. टॉयफॉईड पुन्हा उलटला तर फार वाईट." आणि ते पुढे सरकले. नवऱ्याशी चर्चा करून सुमती घरी आली. तिने ती आनंदाची बातमी घरात शेजाऱ्यापाजाऱ्यांना सांगितली. सर्वांनाच आनंद झाला.

दुसरे दिवशी तिने, टॅक्सी केली व मुलाला बरोबर घेऊन दवाखान्यात गेली. काही सोपस्कार झाल्यावर नवऱ्याला घेऊन ती घरी आली. मुलाला फार आनंद झाला होता म्हणून वडिलांनी त्याला उचलून घेतले व घरात फिरू लागले. तेव्हा बाळ उद्‌गारला, ''बाबा! बाबा!! हे आजोबा की नाही परवा आमच्याकडे आले होते. त्यांनीच मला सांगितले, ''बाळ तू बरा होणार, तुझे वडीलपण बरे होणार व तू त्यांना दवाखान्यातून घेऊन येणार. बाबा, हे आजोबा कुठे असतात हो?''

मुलाच्या या बोबड्या प्रश्नाचे उत्तर देण्यापूर्वी वडिलांनी त्याला गादीवर ठेवले व फोटोला साष्टांग नमस्कार घातला. मुलाला हे काय तेच कळेना. तेवढ्यात सुमती तेथे आली. तिने सांगितले, ''मुलगा स्वप्नात बडबडला म्हणून मी गप्प राहिले पण बाबा आल्याचे मला कळलेच नाही.'' त्यांचे हे बोलणे न कळून मुलाने पुन्हा त्यांना आपल्या प्रश्नाची आठवण करून दिली.

''बाबा, आजोबांकडे कधी जायचे?''

बाळ, वडील गहिवरून सांगू लागले, ''आपण जावू बरं का शिरडीला. त्यांना 'साईबाबा' म्हणतात, ते देव आहेत.''

''अहो पण ते माझ्याकडे आले होते,'' मुलगा आपले मोठेपण सांगू लागला. आता याची समजूत कशी घालायची? वडिलांना प्रश्न पडला. ते म्हणाले, ''ते जगात कुठेही जातात. आपल्या लोकांचे भले करतात. चल, आता आपण चहा घेऊ.''

इतके सांगून झाल्यावर लक्ष्मीकांत मांगलेंनी आपल्या डोळ्यावरचा चष्मा उतरविला व तो हातरूमालाने पुसू लागले. आता श्री. लक्ष्मीकांत मांगले ईलान फारमास्युटीकल मध्ये सिनीयर मेडिकल रिप्रेझेंटेटीव्ह आहेत. मागाहून घडलेल्या अनेक घटना त्यांनी मला सांगितल्या. मध्ये बरेच दिवस ते शिर्डीला मुक्काम करून होते. त्यावेळी त्यांनी एका भोंदू साईबाबाला रंगे हाथ पकडून दिले. आपण साईबाबांची उदी लावल्याशिवाय बाहेर पडत नाही. माझे घराणे साईबाबांचे भक्त आहे, हे सांगण्यास सुद्धा ते विसरले नाहीत, नव्हे त्याचा त्यांना अभिमान होता.

उदी म्हटल्यावर मला आठवण झाल्याने त्यांना मी विचारले, ''आता आपणाकडे आहे काय?''

''घरात अगदी थोडी आहे.....''

त्याचे वाक्य पूर्ण होण्याअगोदर मी माझ्या पूज्यस्थानी गेलो व एक प्लॅस्टीकची कुपी भरून उदी त्यांना दिली.

''संचालक मंडळाने मला भरपूर उदी दिलीय,'' मी म्हणालो, यावर त्यांनी माझे आभार मानले. वेळ बराच झाला होता. दवाखान्यात लोक वाट पहात होते. त्यामुळे मी त्यांना बिदा केले. पण ''आई, आजोबा कुठे गेले गऽऽऽ'' हे शब्द माझे कानात घुमत राहिले. आमच्या विज्ञान शास्त्राला असे न सुटलेले प्रश्न बरेच आहेत.

# कृपा दृष्टीचे फळ

**सौ. नंदिनी माधव नाडकर**
५ 'शकुंत', ९-के, जी.एस. कॉलनी,
सरस्वती बाग, जोगेश्वरी, मुंबई-४०० ०६०.

पाच वर्षापूर्वीची गोष्ट. माझ्या मुलीला एक उत्तम स्थळ आले होते. मुलगी घरी दाखवायला आणा असा निरोप होता. परंतु मुलगी आधुनिक विचारांची. ती म्हणे, ही दाखवण्याची पद्धत मला पसंत नाही, मी जाणार नाही. परंतु आम्ही सर्वांनी खूप समजावले तेव्हा ती जाण्यास तयार झाली व म्हणाली, ही दाखवून घेण्याची पहिली व शेवटची वेळ. ती तिच्या मोठ्या भावाबरोबर जात असताना, मी दारात उभी होते. मनात विचार आला, आता जर ही पसंत पडली नाही तर कठीण आहे

इतक्यात एक रिक्षा दारात थांबली. रिक्षाच्या मागच्या बाजूला श्री बाबांचा आशीर्वादाचा फोटो होता. रिक्षात कोणी बसले नाही किंवा उतरलेही नाही. म्हणजे मला दर्शन देण्याकरताच बाबा आले व शुभ घटना घडेल याचा निर्वाळा दिला.

रात्री मुलगा हातात पेढ्यांचा पुडा घेऊनच आला. पसंतीचा निर्णय ताबडतोब दिला होता. नंतर लग्नाची गडबड घरात सुरू झाली. बाकी सर्व ठीक होते. सुनेचा भाऊ कॅटरींग कॉन्ट्रॅक्टर असल्यामुळे तो प्रश्न नव्हता. परंतु सोने एकदम कसे घ्यावे ही चिंता होती. एके दिवशी दुपारीच दार वाजले, बघते तो माझ्या यजमानांची (यजमानांचा पेशा शिक्षकाचा आहे) एक माजी विद्यार्थी दारात हजर. घरात कसली गडबड असे ती विचारू लागली. मी तिला मुलीच्या लग्नाची बातमी सांगितली. तिने विचारले, खरेदी वगैरे कधी करणार? हे म्हणाले, बाकी खरेदी हातातली आहे, सोन्याचाच जरा प्रश्न आहे. नंतर अवांतर गप्पा मारून ती मुलगी घरी गेली. चार दिवसांनी ती मुलगी परत आली व यजमानांच्या हातात एक बॉक्स दिला. उघडून पाहिले तो आत कंबर पट्ट्यासारखा जुना सोन्याचा दागिना होता. ती म्हणाली, सर हा दागिना तुमच्या कामाला येईल. हे म्हणाले, तुझ्या पतीच्या परवानगीशिवाय कसा घेऊ? ती म्हणाली, हा माहेरचा दागिना आहे. मला ह्याचा उपयोग नाही. मला ह्या दागिन्याची रोख रकम जागेसाठी लागेल. तेव्हा वर्षभराच्या मुदतीत तुम्ही ही रक्कम द्या. म्हणजे तुमचे सध्या काम होईल व माझेही पैसे खुले होतील. तसेच ह्या साड्या माझ्या मामाच्या दुकानातून आणल्या आहेत. बघा पसंत पडल्या तर! साड्या छानच होत्या व भाव पण वाजवी होते. सर्वांना साड्या आवडल्या. मुख्य म्हणजे नवरीला साड्या आवडल्या. त्यामुळे मुलीच्या दागिन्यांचा व साड्यांचा प्रश्न चुटकीसारखा सुटला. लग्न फार उत्तमरितीने पार पडले. सासरी मुलगीही सुखी आहे. ह्या सर्व घटनांमुळे मी मात्र चकीत झाले. काही कारण नसताना ती विद्यार्थी आमच्याकडे येणे व अकल्पित मदत करणे, रिक्षा थांबून मला दिलासा मिळणे ह्या सर्वांचा एकच अर्थ होतो, बाबा भक्तांच्या अडीअडचणीला धावून येतात व अडचणींचा काटेरी मार्ग आपल्या कृपादृष्टीने फुलापानांनी बहरून टाकतात. भक्तांकडून कसलीही अपेक्षा न करता, भक्तांकडून ते अपेक्षित करतात नितांत श्रद्धा.

# अन् मी लेखक-कवि संमेलनात सहभागीही झालो

— डॉ. अनिल एन्. मोरे
साईधाम, धनसार (अल्याळी-आंबेवाडी),
ता.पो. पालघर, जि. ठाणे.

१९७८ सालची गोष्ट आहे. मी बारावी सायन्स वर्गात शिकत असताना उंबरगोठणी-विरार ह्या गावी राहात होतो. याच गावातील साईभक्त श्री. विलास पंडितांशी माझी ओळख झाली. गप्पा मारीत असतानाच त्यांचे चुलतबंधू सतिश पंडित व मी आम्ही दोघांनीही साईबाबांविषयी त्यांना बरेच छेडले. कोण साईबाबा अन् कोण काय? अशाप्रकारे नुकताच आमचा वादविवाद आटोपला होता. अन् एकाएकी माझ्या पोटात दुखू लागले. पंडितांनी मला चिमूटभर उदी दिली, ती मी घेतली व काही मिनिटातच माझी पोटदुखी नाहीशी झाली. मला झाला प्रकार आगळा आणि चमत्कारिकच वाटला. त्यांनी मला "श्री साईलीला" हा अंक वाचवयास दिला. योगायोगाने तो उदी विशेषांकच निघाला.

वाद तर कुठल्या कुठे गायब झाला. अन् मी बाबांकडे आकर्षिला जावू लागलो. मी ही साईलीला अंकाचा वर्गणीदार झालो. श्री साईलीला मासिकात प्रसिद्ध होणाऱ्या भक्तांविषयीच्या अनुभवाने मला बाबांविषयी फारच जवळीक निर्माण झाली. अक्षरशः साईमध्येच रमून जायचं असं मी ठरवलं. दरम्यान "श्री साईलीला" ह्या अंकात कोण्या एका भक्तानं गणपती व श्री साईंच्या एकत्वाचा उल्लेख केलेलाही वाचनात आला होता.

लहानपणापासूनच डॉक्टर व्हावं अशी इच्छा होती. बारावी पास झाल्यानंतर मुंबईतील सर्व मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेशासाठी अर्ज भरले व वैद्यकीय विद्यालयात प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या यादीत माझ्या नावाचा शोध घेऊ लागलो. माझं नाव कुठेच नव्हते. मी थोडाही निराश झालो नाही, विश्वास होता बाबांवर! श्रद्धेवर जगत राहण्याशिवाय गत्यंतर नाही असंच मनाशी ठरवलं. अहो, पण श्रद्धेलाही काही मर्यादा असावी ना? अर्थात तेव्हा बाबांच्या दुसऱ्या मंत्राची म्हणजे 'सबुरीची' मला कुठे कल्पना होती? डॉक्टर होणं आता दूरच राहीलं, मी बी.एस्.सी. साठी प्रवेश घ्यायचंही निश्चित केलं. दिवस गणेशोत्सवाचे होते. मागेच लिहिल्याप्रमाणे श्रीसाई व गणपतीच्या एकत्वामुळे गणेश भक्तीत एक वेगळीच ओढ होती. मला मेडिकलसाठी प्रवेश निश्चित मिळेल ह्याची मला आशा होतीच.

आणि मित्रहो काय सांगू! काय महिमा वर्णू माझ्या साईमाऊलीचा! अहो, दुसऱ्या दिवशी बी.एस्.सी. साठी ॲडमिशन घ्यायला जायचा कार्यक्रम ठरला होता व मी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या ठिकाणी होतो. धावत धावत माझा भाऊ आला म्हणाला, तुला मेडिकलसाठी प्रवेश मिळाला आहे. सर्व सर्टिफिकेटस्च्या ओरिजनल कॉपीज आणि फी घेऊन बोलावलं आहे. आता आपणास प्रश्न पडला असेल की, केव्हा बोलावलं आहे? अहो ज्या दिवशी पत्र मिळालं त्याच दिवशी बोलावलं होतं. पण सर्वच अशक्य! संध्याकाळी आम्हाला हे पत्र मिळालं म्हणजे आलेली संधीही गेलीच. खरी परीक्षा होती

माझ्या बाबांची! आम्ही दुसऱ्या दिवशी मित्तल कॉलेज, चर्नीरोड येथे गेलो. पत्र कालच मिळालं त्यामुळे आम्ही ठरल्या वेळेवर यऊ शकलो नाही. त्यांना पत्रावरचा तारखेचा शिक्काही दाखविला. आमचं म्हणणं कॉलेजच्या कर्मचाऱ्यांनी (ऑफिस स्टाफने) शांतपणे ऐकलं आणि माझा प्रवेश नक्की झाला. अहो, किती भाग्याचा दिवस हा! श्री साईबाबांनी दिलेला महाप्रसाद होता. मी अक्षरशः श्री साईचरणी नतमस्तक झालो. एखाद्या झुळकीप्रमाणे बाबांनी थोड्याशा अवधीतच पोटदुखीनंतरच्या अनुभवानंतर दिलेला हा चमत्कारिक अनुभव होता.

आता व्यवस्थित अभ्यास करून बाबांच्या आशीर्वादाची व कृपादृष्टीची याचना करीत डॉक्टर व्हायचीच इच्छा होती. दरम्यान तीन वेळा शिर्डीत जावून आलो. पंधरा डिसेंबर १९८२ रोजी अंतिम परिक्षेचा शेवटचा पेपर झाला. आता सर्व काही बाबांवर सोपवलं. परीक्षा झाल्यावर शिर्डीला जायचा बेतही आखला, पण ते काही लगेच जमलं नाही. बरं रिझल्टच्या अगोदर तरी जाऊ म्हटलं तर तेही जमेना. रिझल्ट २४ जानेवारी ८३ रोजी येणार असं कळलं पण ह्या अगोदरच मी व माझ्या मित्राने (डॉ. सुदेश म्हात्रे) गुरुवार जोडून २-४ फेब्रु. १९८३ असा शिर्डीचा कार्यक्रम आखला होता. म्हणजे रिझल्टच्या अगोदर जाताच येईना. शेवटी निकाल आलाच. अर्थात फलकावर काही आला नव्हता, परंतु आतल्या गोटातून मला मी पास झाल्याचं कळलं होतं. त्यामुळे मनात कालवाकालव होती. शंकाकुशंका मनात यायच्याच. २७ जानेवारी रोजी फलकावर नंबर व २८ जानेवारी रोजी मार्कलिस्ट पाहिली अन् अगदी आनंदाचा पारा किती जलद गतीने चढू लागला असेल ते फक्त साईंनीच जाणलं असावं. बाबांच्या कृपेपुढे माझं मस्तक पुन्हा त्यांच्या चरणावर झुकलं गेलं. आता २ फेब्रूवारीचा कार्यक्रम होताच. परंतु १ फेब्रूवारी पासून हॉस्पिटल मध्ये ड्यूटी (Internship) सुरू होणार. आता काय करायचं? असं करूया आपण उद्याच जाऊया का मी म्हात्रेला विचारले. तो हो म्हणाला. आमच्या दोघांकडेही पैसे होते. आम्ही मुंबई सेंट्रलला जाऊन शिर्डीची तिकीटं आरक्षित केली. व उद्याच आम्ही शिर्डीस निघतो असं घरी सांगितले. दोन दिवस राहून वेळेवर हजर राहायचं समीकरण बाबांनी सोडवलं होतं.

आम्ही २९ जानेवारीस शिर्डीकडे निघालो. माझ्या हाती जानेवारी महिन्याचा "श्री साईलीला" हा अंक होता. वाचतावाचता ३०-३१ जानेवारी ह्या दिवशी शिर्डीत भरत असलेल्या नवव्या लेखक कवि संमेलनाबाबतची पत्रिका असलेल्या पानावर माझं लक्ष गेलं. अन् पुन्हा माझ्या आनंदाला उकळी फुटली. ठरवलं की, काही झालं तरी हे संमेलन मी पाहणार, ऐकणार. कारण बऱ्याच वेळा वाटे की, मी सुद्धा शिर्डीस जाऊन कवि संमेलनात सहभागी व्हावे. परंतु त्यासाठी आवश्यक अट मी पूर्ण करू शकत नव्हतो कारण माझा लेख किंवा कविता "श्री साईलीला' अंकात प्रसिद्ध झाली नव्हती.

१९७८ पासून मी "श्री साईलीला" हा अंक वाचीत होतो. त्यामुळे बऱ्याच लेखक कवींना त्यांच्या साहित्यामुळे ओळखत होतो. देवपूरकर, सांडभोर व विजय हजारे ह्यांच्याशी नुसतं बोलल्याने मी काही क्षणातच मैत्री जमवली. अगदी नाट्यमय व

आकस्मिक मैत्री जमवली अन् मी लेखक कवी संमेलनात सहभागीही झालो. अहो, इतकच काय पण ३० जानेवारीच्या रात्री 'भक्तनिवास' ह्या इमारतीत झालेल्या कार्यक्रमात (साईबाबांबद्दल काहीही विचारा) मी भागही घेतला. आणि ह्याच संमेलनापासून प्रत्येक संमेलनात उपस्थित राहण्याचा कार्यक्रमही आखला.

अशा पद्धतीने फक्त संमेलन पहायचीच नव्हे तर त्यात मला भाग घ्यायची परवानगी नसतानाही बाबांनी किती सहजतेने मला त्यात सामिल केलं होतं. ह्यावरून बाबांच्या कृपादृष्टीची साक्ष पटते व 'तुम्ही माझ्याकडे पाहा मीही तुमच्याकडे पाहीन' ह्या ओळीची सत्यता पटते.

# काय हा साईंचा चमत्कार!

**कु. राजश्री वामन नाईक**
आदर्श नगर, ४२/१२९२,
वरळी, मुं. नं.-४०००२५.

२७ फेब्रुवारी १९८६ (गुरुवार) हा दिवस आठवला की, अजूनही तो प्रसंग डोळ्यासमोर उभा रहातो. माझी सौ. आई काही महत्वाच्या कामाकरिता चार दिवसासाठीच गोव्याला माझ्या मावशीकडे गेली होती. सोबत माझे वडीलही होते. त्यांचे तिकडचे काम झाले व मुंबईला निघण्याच्या दिवशी सकाळी लवकरच आई उठली. उठून बाहेरच्या खोलीत जाता जाताच चक्कर येऊन कोसळून पडली आणि तिला रक्ताची उलटी झाली. माझ्या मावशीने लगेच तिच्या मिस्टरांना व माझ्या वडिलांना उठवले. त्यांनी लगेच तिच्या तोंडावर पाणी मारुन उठवून बसवले. ती शुध्दीवर आली. तिला पलंगावर बसवण्यासाठी उठवले तर परत रक्ताची उलटी झाली. माझी मावशी गोव्याला खेड्यात रहात असल्याने तिकडून एवढ्या सकाळी हॉस्पिटलला (फोंड्याला आहे) जाण्यासाठी वाहनाची सोय होणे शक्य नव्हते. परंतु श्री साईंच्या कृपेने गावात एक ट्रक आदल्या दिवशी आला होता. त्या ट्रकच्या वाहन चालकाला विनंती करुन आईला कसेबसे ट्रक मध्ये घातले व फोंड्याला हॉस्पिटलला जाण्यासाठी म्हणून ट्रक निघाला. ट्रक सुरु होतो तोच आईला रक्ताची तिसरी उलटी झाली व आई बेशुद्ध पडली. या उलटीतून रक्ताचे घट्ट तुकडे पडले. सर्वजण फारच घाबरुन गेले. हॉस्पिटलला आईला लगेच सलाईन लावण्यात आले व डॉक्टरांनी चोवीस तासांचा अवधी दिला. माझे वडील आईला सारखे उदी लावत होते व साईबाबांचा धावा करत होते. साईबाबा आपल्या भक्ताच्या हाकेला धावून आले. चोवीस तासाच्या आत आईने डोळे उघडले. श्री साईबाबांनी प्रत्यक्ष दाराशी आलेल्या मृत्यूला फिरवून लावले.

# मुलाचा ताप उतरला

**अधिवक्ता श्री. पी. डी. काळे**
**बी.ए.,एल.एल.बी.**
सहाय्यक लोक अभियोक्ता,
द.म. रेल्वे, पूर्णा (जं),
जि. परभणी.

माझा धाकटा मुलगा चि. साईप्रसाद (वय ४ वर्षे) दि. १२-८-८६ रोजी सायंकाळी साधारण तापाने आजारी पडला. दुसऱ्या दिवशी सायंकाळी ७-८ च्या सुमारास ताप १०५ पर्यंत चढला. अल्पवयामुळे व तापाचे प्रमाण अधिक वाढल्याने कु. साईप्रसाद काहीबाही बरळू लागला, माणूस ओळखेनासा झाला. डॉक्टरांना पाचारण केले, औषधोपचार झाला, पण उपयोग काही होत नव्हता. आम्ही पार घाबरून गेलो होतो. साईबाबांच्या प्रतिमे समोर जावून बाबांना भक्तिभावाने हाक मारली, उदी मुलाला लावतच होतो. डॉक्टरने सांगितल्याप्रमाणे मुलाला दोनदा औषध दिले, पण मुलाला उलटी झाल्याने ते बाहेर पडले. तोपर्यंत रात्रीचे ९ वाजले. पुन्हा एकदा साईबाबांना आर्त स्वराने हाक मारली व मुलाला वाचविण्याविषयी विनवणी केली. आणि काय आश्चर्य! जो मुलगा मिनिटापूर्वी काहीबाही बरळत होता, तोच मुलगा ९.१५ वाजता शांत झोपी गेला. रात्री १२.४५ वाजता उठला तो प्रसन्न चेहऱ्याने आणि पूर्ववत बोलू लागला.

# साई तारी त्यास कोण मारी

**— सौ. शुभांगी तुकाराम सावंत**
अे ९/२, पार्क साईट कॉलनी,
विक्रोळी (पश्चिम), मुंबई — ४०० ०७९.

दि. ३० जून १९८६ चा जणू काळ दिवस! माझी बहिण सांताक्रूझला रहाते. ३० जून १९८६ रोजी सकाळी घरातील सर्व कामे आटपून छोट्या मुलाला शाळेत पोहोचवायचे म्हणून ती स्वयंपाकाच्या धांदलीत होती. भात, डाळ कुकरच्या भांड्यात घालून कुकर लावला व छोट्या बंटी बरोबर त्याच्या शाळेच्या तयारीला लागली. नेहमी प्रमाणे तिने कुकर लावला होता. ठरलेल्या वेळात कुकरची शीटी वाजली पाहिजे होती ती वाजलीच नाही. आणि एकाएकी काय होते आहे हे लक्षात येण्यापूर्वीच संपूर्ण कुकर वर उडून स्फोटासारखा आवाज करीत छतावर आदळला. कुकरच्या तळाचा व कुकरच्या झाकणाचा तसेच आतल्या भांड्यांचा चेंदामेंदा झाला व तो चेंदामेंदा झालेला कुकर भांड्यासहित जसा वर उडाला तसाच तो परत खाली आला व परत पेटत्या स्टोव्हवर पडला. स्टोव्ह सुद्धा त्या दणक्याने फुटला. घासलेट सर्वत्र पसरले गेले. तरीही घासलेटने वा स्टोव्हने पेट घेतला नाही. कुकरमधील भांड्यांतील भात व डाळ छतावर आणि खोलीत सर्वत्र सडा

होऊन पडले होते. वीजेचा बल्ब फुटून त्याचे तुकडे सर्वत्र उडाले. पण येवढे होऊनही स्टोव्हपासून व उडालेल्या कुकर पासून अवघ्या तीन फुटावर असलेल्या माझ्या बहिणीस किंवा छोट्या बेटीस जरासुध्दा इजा झाली नाही. पण या सर्व धक्क्याने माझी बहिण पार घाबरुन गेली होती. तिच्या तोंडून शब्दही बाहेर पडत नव्हता. शेजारी आवाजाने धावून आले व पाणी पाजून बहिणीला सावध केले. श्री साईबाबांची कृपा म्हणूनच हा चमत्कार घडला, अन्यतः विचारच करणे नको! माझी बहिण साईभक्त आहे. सकाळी आंघोळ झाल्यावर प्रथम साईनाम स्मरण करील व त्यानंतरच चहा घेईल. तिच्या तोंडी सतत साईनाम असते.

पंधरा दिवसापूर्वीचीच घटना आहे. माझी बहिण सकाळी उठल्यावर दार उघडते तेंव्हा पाहते ते असे, उंबरठ्या जवळच एक पुडी पडलेली होती. कसली पुडी म्हणून तिने उघडून पाहिले तर त्या पुडीत पिंजर, हळद व तांदूळ होते. कोणाची तरी ती करणी असावी. बहिणीने लगेच ती पुडी गटारात फेकून दिली व साईस्मरण करून म्हणाली, "बाबा, मी कोणाचे वाईट केले नाही हे. जे करून कोणी टाकले आहे, ते तुमचे तुम्हीच बघून घ्या. तुम्हीच माझे व माझ्या मुलांचे रक्षणकर्ते! मी विधवा आहे माझे तुमच्या शिवाय मायेचे कोणी नाही." बाबांनी तिची हाक ऐकली असावी. व या गंभीर प्रसंगातून तिला वाचवले. "साई तारी त्यास कोण मारी"

# जशी श्रद्धा तसा अनुभव

**श्री. विजयसिंह शंकरसिंह परदेशी (रजपूत)**
विजय सॉ मिल, ३६७ शनिवार पेठ,
सातारा.

साधारण ४ ते ५ वर्षापूर्वीची घटना. माझा इमारती लाकडाचा व्यापार सातारा येथे आहे. मी अलणावरला लाकूड खरेदीसाठी जात असतो. जाताना माझा एक मुक्काम बेळगाव येथे होतो. (तेथे माझी सासूरवाडीपण आहे.) सदर मुक्कामात मी टिळकवाडी रेल्वेगेट शेजारी असणाऱ्या साईमंदिरात दर्शनास जातो. मंदिर छोटेसे परंतु अति सुंदर, प्रसन्न वातावरण व त्यातील श्री साईची मूर्ती अत्यंत प्रासादिक, पुजारी व मंदिराचे व्यवस्थापक अत्यंत प्रेमळ त्यामुळे माझे मंदिराकडे जाणे वाढून जवळीक निर्माण झाली. असेच एकवेळ गेलो असताना व्यवस्थापकांनी मला आग्रहपूर्वक सांगितले की आमच्या मंदिराच्या स्थापनेचा दिवस उद्या असल्यामुळे साईंना अभिषेक, महापूजा व उत्सव आहे, करिता संध्याकाळी शेवट ८.३० पर्यंत येऊन दर्शन व प्रसाद घेऊन जा. मी त्यांना सांगितले, सकाळीच मी अलणावरला लाकूड खरेदीस जाणार आहे, जास्तीत जास्त प्रयत्न करुन संध्याकाळी येऊन जाईन. दुसऱ्या दिवशी खरेदीसाठी लवकरच अलणावरला गेलो. माझ्या अपेक्षेपेक्षा उत्तम व स्वस्त माल मिळाला. मनास अत्यंत आनंद झाला कारण

की आता ट्रान्सपोर्ट एजंट कडून मालासाठी ट्रक घेणे व मालाचे लोडींग ४ वाजेपर्यंत होऊन आपण ७ वाजेपर्यंत बेळगावला जावून साईचे दर्शन व प्रसाद घेणार. परंतु नियतीला ते कबूल नव्हते. मला ५ वाजेपर्यंत ट्रक मिळाला नाही व त्यानंतर मिळून फायदा नाही करिता मी ठरवले की ट्रक लोडिंग उद्या परत येऊन करु व आता मिळेल त्या वाहनाने बेळगावला जावू. शेवटच्या दोन एस्. टी. त जागा मिळाली नाही. सहानंतर साडेसहा वाजले. माझ्या मनास अत्यंत वाईट वाटले, मन नाराज झाले व मला सोडून केव्हाच बेळगावला निघून गेले. मी शरीराने फक्त विमनस्क वाट चुकलेल्या पाडसा प्रमाणे माऊलीकडे जाण्यासाठी अळणावरच्या रस्त्यावर प्रत्येक वाहनधारकास विनवण्या करु लागलो. अखेर संध्याकाळी ७.४५ वाजता एका ट्रकवाल्याने मला घेतले. मी गाडीत बसलो, आनंद झाला, क्षणात नाराज झालो कारण टिळकवाडी साईमंदिराची शिस्त अत्यंत कडक. मंदिर तर ८.३० ला बंद होणार, अळणावर ते बेळगाव ४० मैल अंतर, आता वाजलेत ७.४५, आपण ८.३० पर्यंत जाणे कसे शक्य आहे? संपूर्ण दिवसभर जेवण नाही, श्रम भरपूर व अंतःकरणात माऊलीची ओढ. त्यामुळे नकळत माझ्या डोळ्यात अश्रू आले. ते पुसले व मनोमन साईमाऊलीस बोललो, खरोखरीच तुझ्या चरणी माझी सेवा रुजू असेल तर तू मला निश्चितच दर्शन व प्रसाद भेट देशील असे म्हणून एकसारखा धावा, जप चालू केला. ट्रक टिळकवाडी रेल्वेगेट जवळ येताच मी ड्रायव्हरला थांबणे विषयी सुचविले. त्यास ५ रुपये देवून खाली उतरलो. व घड्याळात पाहिले तर ९ वाजलेले, मला घड्याळावर विश्वास बसेना कारण १० टन मालवाहू ट्रक ४० मैल अंतर सव्वा तासात आला होता. मंदिर एका फर्लांगावर असले कारणाने मी जवळ जवळ पळतच मंदिराकडे गेलो. पहातो तो काय?

मंदिराच्या प्रवेशद्वाराचे लोखंडी शटर २/३ निम्म्याहून अधिक खाली ओढून घेतलेले होते. पायऱ्या चढून कानोसा घेतला. एक वेडसर इसम मंदिराच्या सभागृहात श्री साईच्याकडे नजर लावून बसला आहे व व्यवस्थापक त्यांच्या जागेवरुनच त्रासलेल्या स्वरात बोलत आहेत, 'अरे अर्धा तास झाला. तुला बाहेर जा म्हणून आम्ही सांगतो सर्व लोक कंटाळून निघून गेले. मी एकटाच राहिलो.' मी स्वतः मंदिरात प्रवेश केला. मला पाहताच ते मला म्हणाले, या, बाबांचे दर्शन घ्या व माझ्याकडे या. मीच प्रसाद देतो कारण पुजारी पण गेले. मी सद्गदीत अंतःकरणाने साईमाऊलीच्या चरणावर मस्तक ठेवले व मला आनंदाश्रू आले. पाच प्रदक्षिणा घातल्या व व्यवस्थापकांकडे प्रसाद घेऊ लागलो, इतक्यात! मंदिरात बसून राहिलेल्या त्या व्यक्तीचा आवाज आला, अहो आम्हाला बराच वेळ बाहेर काढत होता ना आता आम्ही जातो आमचे काम झाले आहे.

नंतर मंदिरास कुलुप लावताना व्यवस्थापकांनी मला सांगितले, पाऊण तास झाला हा वेडसर मंदिरातून हलला नाही बघा व आता स्वतः मनाने निघून गेला. कोठे गेला बरे? त्याच्यामुळे तुम्हाला दर्शन झाले.

ती विभूती वेडसर होती का? कोण ते मी मनोमन जाणले! बाहेरुन पायरीचे दर्शन पुन्हा केले व साईनामाचा जप करीत अतिआनंदाने पाहुण्यांच्या घराकडे मार्गस्थ झालो.

# साईमाऊली हाकेला धावली

— भारती मोहन लवेकर
गुडहोप चेंबर, 'बी' ब्लॉक, खो. नं. ६९,
काळाचौकी,
मुंबई नं. ४०००१२.

१९८४ मध्ये मुंबईत सगळीकडे दंगल चालू होती. सगळीकडे संचारबंदीचा आदेश होता. तेव्हा कोणीही रात्री आठच्या नंतर बाहेर पडत नसत. त्यादिवशी माझा भाऊ आपल्या मित्राकडे जातो म्हणून सांगून गेला होता. रात्रीचे दहा-बारा वाजले तरी तो परत आला नव्हता. आम्ही सर्वजण काळजीने बेजार झालो. आम्हाला चैन पडत नव्हती. त्यावेळी मी माझा उपाय सुरु केला तो म्हणजे साईबाबांचा धावा करायला सुरवात केली. तरी तो परत आला नाही व नंतर साईबाबांना म्हणाले की, बाबा माझा भाऊ जेथे असेल तेथे सुखरुप असू दे, देवाने माझी हाक ऐकलीच म्हणायची. सकाळी वडील देवाजवळ दिवा लावत असताना भाऊ दरवाजात हजर झाला. तो सांगू लागला की, तो ज्या ठिकाणी राहिला होता तेथे मोठी दंगल झाली होती परंतु त्यांना काही इजा झाली नाही. ही साईबाबांचीच कृपा! म्हणून म्हणतात की, 'भगवान के दरबार में देर है अंधेर नही' ते अगदी खरं आहे. माझा भाऊ उशीरा का होईना पण सुखरुप घरी परतला. अशा ह्या कृपाळू, दयावंत बाबांना कोण विसरेल? बाबांची किती स्तुती केली तरी ती कमीच आहे. ते माझ्यासारख्या सामान्य माणसाला जमणार नाही.

# अंतर्ज्ञानी श्री बाबा

— श्री. सूर्यकांत मा. गर्जे
१९८/म-७, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड कॉलनी,
गोखले नगर, पुणे - १६.

श्री साईनाथ महाराज दयावंत आहेत. कृपावंत आहेत. त्यांची कृपा झाली तर अशक्य गोष्टही शक्य होते. श्री बाबांचे कार्य वात्सल्याने ओथंबलेले आहे. अडीअडचणीला धावून येणारे श्रीबाबा आपल्या भक्ताला अन्न-वस्त्र—निवारा इत्यादींपासून वंचित ठेवतीलच कसे? हे सर्व सांगण्याचे प्रयोजन म्हणजे मला आलेला एक रोमहर्षक अनुभव!

आमच्या शिवाजी नगर येथील श्री साईनाथ महाराजांच्या मंदिरात दर गुरुवारी असंख्य भक्त येत असतात. अशाच एका गुरुवारी माझा एक मित्र मंदिरात श्री बाबांच्या दर्शनासाठी आला होता. आरती झाल्यावर तो माझा शोध घेत माझ्याकडे आला आणि म्हणाला — अरे, तुला महाराष्ट्र हाउसिंग बोर्डाचा ओनरशॅटचा फॉर्म पाहिजे का? माझ्याकडे आहे एक.''

स्वतःचे घर हवे असे कोणाला बरे वाटणार नाही? सरकारी क्वार्टर्समध्ये किती काळ रहाणार? व्यावहारीक दृष्टीने या फॉर्मचे महत्त्व मला वाटलेच परंतु तो फॉर्म मंदिरात श्री बाबांच्या साक्षीने मला मिळाला याचा अधिक आनंद झाला. मी तात्काळ होकार देऊन फॉर्म घेतला. दुसऱ्याच दिवशी हाउसिंग बोर्डाच्या ऑफीसात जाऊन फॉर्म देवूनसुद्धा आलो.

काही दिवस गेले. अशाच एका गुरुवारी श्री बाबांची आरती झाल्यावर मी मंदिराचे पुजारी श्री. राम बेलसरे यांना म्हणालो, "गुरुजी, महाराष्ट्र हाउसिंग बोर्डाचा अर्ज मी भरला आहे. मला फ्लॅट मिळेल का? श्री बाबांचा कौल घेता का?" "अवश्य!- हो किंवा नाही ते बाबा सांगतीलच" श्री. बेलसरे उत्तरले. नेहमीच्या त्यांच्या शिरस्त्याप्रमाणे त्यांनी श्री बाबांची मनोभाव प्रार्थना केली. एक झेंडूचे फूल श्री बाबांच्या मूर्तीच्या डाव्या खांद्यावर हारांच्यामध्ये खोचून ठेवले. ते फूल जर श्री बाबांच्या मूर्तीच्या डाव्या बाजूला पडले तर काम होणार नाही. उजव्या बाजूला पडले तर काम होणार व फूल पडलेच नाही तर श्री बाबा आता काहीच निर्णय देऊ इच्छित नाहीत. श्री बाबा काय निर्णय देतात इकडे आमचे लक्ष लागले होते. इतक्यात श्री. बेलसरे उद्गारले, "तुमचे काम होणार, तुम्हाला फ्लॅट मिळणार, फूल उजव्या बाजूला पडले!"

"पण गुरुजी, उजव्या बाजूला फूल पडल्याचे मला दिसलेच नाही" असं मी म्हणतो न म्हणतो तोच श्री बाबांच्या फोटोला लावलेला एक हार अचानक गळून उजव्या बाजूला पडला आणि मला आश्चर्याचा धक्काच बसला. श्री बाबांनी होकार दिला होता.

थोड्याच दिवसांत मला महाराष्ट्र हाउसिंग बोर्डाचे पत्र आले, ओनरशिप फ्लॅटसाठी माझा नंबर लागला होता. अल्पावधीतच आम्ही नवीन फ्लॅटमध्ये रहावयास गेलो सुद्धा!

केवढी ही बाबांची कृपा! श्री बाबा कृपाळू आहेत तसेच अंर्तज्ञानी पण आहेत. फ्लॅट मिळण्याच्या कितीतरी दिवस अगोदर श्री बाबांनी मला होकार दिला होता.

## भाव तेथे देव

— सौ. निर्मला. चिं. राजे
निला भुवन,
राजारामपुरी, ७ वी गल्ली,
कोल्हापूर.

मला ह्या खेपेला शिरडीला कवि-लेखकांचे जे सम्मेलन झाले, त्याचे आमंत्रण आले होते. परंतु यजमानांच्या प्रकृतीच्या कारणास्तव मी जाऊ शकले नाही. मी घरकामात व्यग्र असतानाच माझ्या मनात सारखे येत होते की रामनवमी उत्सव किती उत्साहाने साजरा होईल. जे लोक त्यावेळी शिरडीत जमतील ते किती भाग्यवान असतील. त्यांना प्रसाद वगैरे सर्व मिळेल परंतु मला या सर्व कार्यक्रमांना जाण्याची जरी उत्कट इच्छा असली तरी मी त्यात सहभागी होऊ शकत नाही, ह्याची सारखी खंत वाटत होती.

दर गुरुवारी सायंकाळी आम्ही श्री साईबाबांची व इतर देवतांची आरती करतो. त्यावेळी मनात विचार घोळत होते की, शिरडीला रामनवमी उत्सवात कितीतरी लोक जमतील. शुक्रवारी प्रसाद घेतील व धन्य होतील. आपण मात्र त्यातले एक असणार नाही. ही रुखरुख मनाला लागून राहिली होती. इतक्यात आमची गुरुवारची आरती सुरू करण्यापूर्वी आमचे स्नेही व त्यांच्या सौभाग्यवती दोघे आले. त्यांची बदली नुकतीच कोल्हापूरहून कोळपेवाडीला झाली आहे. त्यांनी आल्याआल्या श्री साईबाबांच्या प्रसादाचे पॅकबंद पाकीट माझ्या हातात दिले. कोल्हापूरला येताना वाटेत ते शिरडीला श्री साईबाबांच्या दर्शनाला चालले असताना त्यांना प्रसाद म्हणून पुजाऱ्यांनी हे पाकिट दिले होते, ते तसेच त्यांनी मला दिले.

सदर घटना गुरुवारी १७.४.८६ म्हणजे रामनवमीच्या आदल्या दिवशी घडली. आरतीस सुरुवात करण्यापूर्वीच श्री साईप्रसादाचे पाकिट हातात पडल्यावर मला किती आनंद झाला हे शब्दात वर्णन करण्यास मी असमर्थ आहे. मी मनात विचार करते काय , प्रसाद घरी येतो काय, हा सर्वच अकल्पित घटना आहेत.

बाबांची लिला अगाध आहे. त्यांचे चरणी मी लीन आहे. आमच्यावर त्यांनी सतत अशीच कृपा ठेवावी ही आमची त्यांच्या चरणी नम्र प्रार्थना!

## ही तर साईंचीच लीला

— श्री. किशोर एम्. शिवलकर
केंद्रीय कर्मचारी वसाहत,
काणे नगर, अँन्टॉप हिल,
मुंबई नं. ३७.

नुकतेच आम्ही अष्टविनायक दर्शनासाठी आराम बसने गेलो होतो. आम्ही आठही गणपतींचे दर्शन मनोभावे घेतल्या नंतर शिवनेरी किल्ला केवळ ऐतिहासिक आठवण म्हणून पहावयास गेलो होतो. गड पाहून उतल्यानंतर सर्वजण बसमध्ये बसले. मी व माझे दोन तीन मित्र आणि एक वृध्द स्त्री असे पाच सहाजण बसच्या बाहेर होतो. गाडी उतारावर उभी होती. तेंव्हा गाडीच्या चाकांना दगड (उटी) लावले होते. दगड काढल्यानंतर गाडी सुरु झाली. लगेचच इंग्रजी 'यु' आकाराचे वळण होते. व पुढे खूप खोल दरी होती. गाडी वळण घेत असतानाच चालकाचा गाडीवरील ताबा सुटला व आमची बस दरीत कोसळली. आम्ही बाहेर असणाऱ्यांनी साईराम, साईराम, साईबाबा वाचवा असा धावा सुरू केला. व पुढे काय होईल याचा विचार न करता गाडीच्या दिशेने दरीत उड्या मारल्या. खरोखरच बाबांनी आमची हाक ऐकली. पहातो तर बस एका छोट्याशा झाडावर जाऊन आदळली व जागच्या जागीच थांबली. आम्ही जवळ जाऊन गाडीच्या खिडक्याच्या काचा फोडल्या. अवघ्या दहा ते पंधरा मिनिटांत गाडीतील सर्वांची सुटका केली. बाबांच्या

कृपेने सर्वजण वाचलो. फक्त किरकोळ जखमा झाल्या एवढेच! ते झाड जर नसते तर खाली १०० ते २०० मीटर खोल दरी होती. आमचे काय झाले असते याची कल्पनाच न केलेली बरी. आता हे पहा, एवढेच नव्हे तर तावडतोब एक टेंपो तेथे आला. त्याच्या मदतीने गाडीतील जखमी व्यक्तींना आम्ही जुन्नरच्या इस्पितळात घेवून गेलो. टेंपो पुण्याचा होता. तो जुन्नरला सिमेंट घेऊन चालला असताना ड्रायव्हरच्या मनात शिवनेरीला जायची इच्छा झाली. व तो गडावर आला. अगदी आमच्या मदतीला आल्या सारखा. शेवटी जुन्नरच्या एस्.टी. डेपोच्या व्यवस्थापकांनी देखील जुन्नर — ठाणे एस्.टी. त जागा करून दिली. व आम्ही सर्वजण सुखरुप घरी परतलो.

त्या झाडाची जाडी केवळ दोन हातांच्या पंज्यात बसावी एवढीच. परंतु आमची गाडी तेवढ्यानेच थांबली. खरोखरच आमच्या हाकेला साईबाबा झाडाच्या रुपाने मदतीला धावून आले. ते झाड आज जरी पाहिले तरी कोणाला विश्वास बसणार नाही, की, याला एखादी बस अडकली असेल व त्यातील सर्व प्रमुख प्रवासी सुखरुप असतील.

बाबांच्या कृपेने आम्हाला पुनर्जन्मच लाभला. आता फक्त बाबांच्या सेवेत या पुढील माझे आयुष्य राहो अशी बाबांना मी प्रार्थना करतो.

## शरण मज आला आणि वाया गेला, दाखवा दाखवा ऐसा कोणी!

**— सौ. सुशिला वामन नानिवडेकर**

मु. पो. चेंबूर,

डी ८७/३, गावठाण, कांबेळकर वाडी,

चेंबूर, मुंबई ७१.

मी २५ वर्षापासून बाबांची माझ्या हातून घडेल तशी सेवा करीत आहे. मला भरपूर अनुभव आले आहेत. परंतु मी ते कधी साईलिलेत दिलेले नाहीत. मी यंदाचे गुरुपौर्णिमे पासून दादरच्या साईनिकेतन मध्ये बाबांचे दर्शन घेऊन साईलीला अंक सुरू केला. त्यात मी इतरांचे साईबाबांविषयीचे अनुभव वाचले व त्यात कित्येक भक्तांनी आपल्याला प्रत्यय आल्यावर लेख दिले आहेत. सध्या घरच्या काही कारणांनी मी निराश आहे. मी वर्षातून एकदा तरी शिर्डीला जाते. तेथे राहून मला जी सेवा करता येते ती मी करते. घरामध्ये मुले पदवीधर झाली अथवा नोकरीला लागली म्हणजे बाबांचे पूजन शिर्डीला जाऊन करायचे ही माझी वहिवाट आहे. कोणतीही चांगली गोष्ट झाली म्हणजे बाबांकडे जायचे, तिकडे जाताना मला पैशांची किंवा कशाचीच अडचण येत नाही. अनेक वर्षे माझे पोट दुखत आहे. परंतु औषध समजून मी बाबांची ऊदी व बाबा माझे सर्वस्व मानते. बाबांच्या भक्तीपासून माझे घरातील आर्थिक, शैक्षणिक सर्व चांगलेच घडत आहे. परंतु आमच्या मोठ्या चिरंजीवाचे बाबतीत मी खूप हताश आहे. त्याची

तब्येत बरी नसल्यास तो कामावर जात नाही. त्याला दोन मुले आहेत. त्याचप्रमाणे माझ्या दुसऱ्या दोन मुलांना लग्न करण्याची बुद्धी नाही. मोठा मुलगा आपला संसार सांभाळण्यास उत्सुक होऊ दे व मुलांना लग्न करण्याची सुबुद्धी होऊ दे हीच साईचरणी प्रार्थना!

माझे भयंकर पोट दुखणे बाबांनी दृष्टांत देऊन कमी केले. त्याचप्रमाणे मागे माझी धाकटी मुलगी नेहमी आजारी असायची त्यावेळी आर्थिक दुर्बलतेमुळे औषधे विकत घेऊन उपचार करण्याची ऐपत नव्हती. तेव्हा मी मुलीला शिरडीला जाऊन बाबांच्या पायावर नेऊन घातली व सांगितले की माझे उपाय आता हरले. तुमच्या पायावर घालण्याचा माझा शेवटचा उपाय केला. तरी तुम्ही तिला बरी करा असे साकडे घालून घरी आले. आश्चर्य असे की तिला शिरडीहून आल्यानंतर चांगले बरे वाटले. आता ती विवाहीत असून तिला एक वर्षाची मुलगी आहे. व ती आपल्या घरी आनंदात आहे.

## ज्याचा मनी जैसा भाव त्यास तैसा अनुभव

सौ. आरती भा. चव्हाण
मालन मॅन्शन, २रा मजला, रुम नं. २४,
बाबुराव पडळकर मार्ग, गोखले रोड (दक्षिण),
दादर, मुंबई-४०० ०२८.

दोन वर्षांपूर्वीची जुलै महिन्यातील गोष्ट! माझा मुलगा कावीळीने आजारी होता. त्याला उठून बसण्याची देखील ताकद नव्हती. दुसरे म्हणजे त्याची चाचणी परिक्षाही जवळ आली होती. त्यावेळी मी बाबांना अगदी मनापासून कळवळून प्रार्थना केली की, बाबा त्याला लवकर बरे वाटू द्या. त्याची परीक्षा जवळ आली आहे. आणि त्याचा अभ्यासही बुडत आहे. तेव्हा तुमची उदी मी त्याला काविळीवरच्या औषधातून देत आहे. त्याप्रमाणे खरोखर ५/६ दिवसात तो बरा झाला. घरातल्या घरात हिंडू फिरु लागला व परिक्षेतही चांगल्या मार्कांनी व नंबराने पास झाला. त्यावेळी मी बाबांना म्हणाले होते की, मुलाला बरे वाटल्यावर मी मला आलेला तुमचा अनुभव साईलीलेत पाठवीन. त्याप्रमाणे आज मी हा अनुभव साईलीलेत देत आहे. खरे म्हणजे यापूर्वीच हा अनुभव द्यायला हवा होता परंतु काही अडचणींमुळे तो राहूनच गेला होता. शेवटी बाबांच्या कृपेने तो आज साईलीलेत देत आहे.

अशारीतीने बाबांच्यावर आपण कोणतीही गोष्ट श्रद्धापूर्वक सोपवली की त्यातून बाबा आपली हळूहळू सुटका करतात. सध्या सुद्धा मी फार मोठ्या संकटात आहे ते देखील मी बाबांवर सोपविले आहे. त्यातून हळूहळू का होईना बाबा माझी सुटका करतील. कारण बाबांचे एकच सांगणे आहे की, श्रद्धा आणि सबूरी धरा. हळूहळू तुम्हाला संकटातून बाहेर पडण्याचा मार्ग सापडेल.

# व्यक्त

— श्री. दत्ता गणपत माने
आनंद बिल्डींग, ब्लॉक नं. ३,
हवा हीरा पार्क, कुरार,
मालाड (पूर्व), मुंबई नं. ९७.

शिर्डीला जाणाऱ्याला अनुभव (प्रचिती) हा येतोच! 'मी नीत्य जिवंत' हे शब्द श्रीसाई सत्य करून दाखवतात व आपली प्रचिती श्रद्धावानांना देतात, श्रद्धावानांना अनुभव आला नाही असे होत नाही. अनुभवातून ईश्वर व्यक्त होतो. हिंदू शास्त्रांनी सांगितलेली गुरुप्रचिती, आत्मप्रचिती व शास्त्रप्रचिती या तिन्ही प्रचित्या अनुभवाने घ्या असे मंत्रद्रष्ट्या (मंत्राचा प्रत्यक्ष अनुभव घेणाऱ्या) ऋषींनी हजारो वर्षांपूर्वी लिहून ठेवलेले आहे. दृष्टी, स्पर्श, गंध, शब्दरूपाने ईश्वर अनुभवास येतो हे ऋषी व संतांनी ऋचा व अभंगातून सांगितलेले आहे. 'अनुभवावीण मान डोलवू नको' असे संत म्हणतात. अर्थात त्यासाठी श्रद्धा, विश्वास व साधना यांची आवश्यकता आहे.

श्रीसाईबाबांनी हयातीत व त्यानंतर आजतागायत अनेकांना अनेक अनुभव दिले आहेत. मला आलेला अनुभव याप्रमाणे, माझे स्नेही श्री. हीर्लेकर, श्री. घुमे व मी शिर्डीला १८ डिसें. ८४ ला पहाटे पोहचलो. स्नान अभिषेकादी सर्व विधी होऊन सायंकाळी मंदिरात बसलो असताना त्यावेळी एक महिनाभर माझ्या मनात एक स्टुडीओ चालू करावा असे वाटत होते, ते बोललो. श्रीसाईबाबांना अनुभव द्यायचा असेल तर आजपासून एक महिन्याच्या आत जागेपासून ते उद्घाटन पर्यंतच्या घटना घडल्या तर त्याला मी अनुभव म्हणेन. त्यानंतर स्टुडीओ झाला तर माझे प्रयत्न समजेन. श्रद्धा सबुरीचा सल्ला न मानता ही केलेली मागणी म्हणजे माझी मोठी चूक होती. माझ्या श्रद्धेमुळे श्रीसाईबाबांनी ती चूक पोटात घातली. या माझ्या बोलण्यावर माझ्यापेक्षाही अत्यंत श्रद्धा असलेले श्री. हीर्लेकर त्यावेळी बोलले, तुम्ही समाधी मंदिरात बसून बोलला आहात तुमचा फोटो स्टुडीओ एक महिन्यात चालू झाला असे समजा.

त्यानंतर घटना भराभर घडल्या त्याही अनपेक्षित. स्टुडीओला लागणारे सर्व सामान एका गरजवंताने स्वस्तात मला विकले, जागाही स्वस्तात मिळाली व या सर्वांसाठी लागणारे पैसे दोघा मित्रांनी दिले. माझ्याकडे या सर्व खर्चाच्या एक पंचमांश एवढेच पैसे होते. १ जाने. ८५ ला म्हणजे समाधी मंदिरात बोलल्यापासून फक्त १५ दिवसांत 'स्टुडीओ प्रथमेश' नावाचा स्टुडीओ मालाडमध्ये उघडला. दोन साक्षीदारांना साक्ष ठेवून व स्टुडीओ हीसुद्धा जीवंत साक्ष ठेवून श्रीसाईबाबांनी हा स्टुडीओचा अनुभव दिला. या घटनेचे आम्ही तिघेही जीवंत साक्षी मालाडमध्ये राहतो. याला अनुभव की योगायोग म्हणायचे हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. आर्थिकदृष्ट्या माझ्या ताकदी पलीकडील गोष्ट व ठराविक वेळेत घडली, हा मला आलेला श्रीसाईबाबांचा जीवंत अनुभव आहे. ईश्वरविभूती अनुभव देत असतात फक्त आपला विश्वास, श्रद्धा हवी.

# थांबा, बाबा मी आलो

— सौ. अस्मिता कमलाकर दांडेकर
बी.ए.बी.एड्.
६९ बी, खाडिलकर रोड,
गिरगांव, मुंबई नं. ४००००४.

"अग आई, कशाला इतकी रडतेस? अग, आपले आजोबा काही वारले नाहीत. ते तर साईबाबांच्याकडे गेलेत. बघ, ते बाबांच्या बरोबर शिर्डीच्या रस्त्यावरून फिरतात."

माझे वडील मागच्या वर्षी गेले तेव्हा मी वारंवार त्यांच्या आठवणीने रडत असे. त्यावेळी माझा सहा वर्षे वयाचा मुलगा चि. वैभव माझी समजूत घालताना वरील वाक्य म्हणत असे. दुःखाच्या भरात माझं काही त्याच्या बोलण्याकडे एवढं लक्ष नसायचं. पण एकदा निवांत बसले असताना माझ्या मनात, अगदी शेवटच्या क्षणी वडिलांच्या तोंडून, "थांबा बाबा आलो" हेच शब्द निघाले. हे मी ऐकले होते. तो विचार आला व लहान मुले जे बोलतात ते खरच असते असे आपण म्हणतो. तेव्हा वैभवचं बोलणं व वडिलांचे शेवटचे शब्द यात खरच संगती जुळते असेच मला वाटले.

१९७८ पासून तसे पाहिले तर माझे वडील श्री. दत्तात्रय ना. हजारे हे अंथरुणाला खिळलेलेच होते. त्यांच्या प्रकृतीच्या नव्यानव्या तक्रारी उद्‌भवतच होत्या. सर्व प्रकारचे वैद्यकीय उपचार, दवाखाने चालूच होते. आम्ही रडू लागलो की ते म्हणायचे, "रडता कशाला? मी काही अजून पाच वर्षे मरत नाही." आणि खरोखरच बरोबर पाच वर्षांनीच ते गेले. शेवटी म्हणजे महाशिवरात्रीच्या दिवशी जेव्हा आम्ही बहिणी त्यांना भेटायला गेलो तेव्हा ते म्हणाले की, "आता ही आपली शेवटचीच भेट." नंतर त्यांनी साईबाबांचा फोटो अगदी आपल्या डोळ्यासमोर माझ्याकडून लावून घेतला व बाबांचे सारखं नामस्मरण करत, "बाबा सर्वांना सुखात ठेवा, थांबा, बाबा मी आलो" असे म्हणतच त्यांनी प्राण सोडला.

**********

# मला श्रद्धा मिळाली

— सौ. अश्विनी अ. चौपकर
न्यु.बी.डी.डी.चाळ १०/४८,
नायगांव, मुंबई - ४०० ०१४.

श्री.साईजवळ मागितले आणि ते मला मिळाले नाही असे कधीच घडले नाही. साध्या क्षुल्लक बाबतीतही त्यानां मी हाक मारली व त्यानी तत्परतेने ओ दिली.

मी दुसऱ्यांदा गरोदर राहीले. दिवस भरता भरता सर्वजण मला म्हणत की तुला आता दुसराही मुलगाच होणार. पण मला खात्री होती की मला मुलगीच होणार. कारण मी श्री साईजवळ रोज हेच मागणे मागत असे की, देवा पहिला मुलगा दिलास आता मात्र मुलगीच हवी. व रोज प्रार्थनेनंतर मी साईंची उदी पाण्यात घालून पित असे. सर्वांना मुलगाच होणार असे वाटत होते. पण मी मात्र त्यांना मनातल्या मनात हसत होते.

होता होता ९ महीने संपले व तो भाग्यशाली दिवस उगवला. पहिल्या वेळेस मला वाटले होते की मी गुरुवारीच प्रसुत होणार पण तसे घडले नव्हते. मला बुधवारी रात्रीच मुलगा झाला म्हणून यावेळेस तशी काही इच्छा धरली नव्हती. गुरुवार गेला व शुक्रवार उगवला. शुक्रवारी रात्री साईंनी माझी प्रार्थना फळाला आणली. रात्री ९च्या नंतर मी प्रसुत होऊन मला मुलगीच झाली.

माझ्या साईवरील श्रद्धेने मला ही मुलगी झाली होती. त्यामुळे तिचे नाव काय ठेवायचे याची चर्चा सुरू झाली. मी यावेळेस हट्टच धरला की नाव मीच ठेवणार कारण आदल्या वेळेस माझे म्हणणे न ऐकता माझ्या यजमानांनी स्वतःच्या पसंतीचे 'अतुल' हे नाव ठेवले. तोही श्री बाबांच्या प्रसादानेच झाला असल्यामुळे माझी इच्छा होती की त्याचे 'आशिष' हे नाव ठेवावे. पण ते बाजूला राहीले होते. पण यावेळेस साईबाबांच्या मूर्तीजवळ चिठ्ठया टाकल्या. त्यात दोन नावे होती 'पूजा' व 'श्रद्धा'. देवाने 'श्रद्धा' नाव ठेवायला सांगितले. श्रद्धा फळाला आल्यामुळेच मला 'श्रद्धा' मिळाली आहे.

तसेच माझा दुसरा मोठा अनुभव म्हणजे बाळंतपणात कानात काडी घालू नये असे बजावतात. पण मी शहाणपणाने एकदा घाण येते म्हणून पिस कानात घातले. तेव्हा जरा बरे वाटले पण मध्यरात्री नंतर मात्र कान ठणकू लागला. साईनामाचा घोष सुरू झाला. नाना उपाय केले पण ठणका थांबेना. सकाळ होताच कानांच्या डॉक्टरांकडे धावले. त्यानी औषध दिले पण कानाचे दुखणे थांबेना. त्यातल्या त्यात एका कानातून पिवळे पाणी व एका कानातून पू यायला सुरवात झाली. मी फारच वैतागले होते. साईंना विनवण्या चालूच होत्या. असे होता होता एक महिना लोटला. कानाचे तसेच चालले होते. मग मात्र दुसरा डॉक्टर केला. त्याने तर कहरच केला. तो म्हणाला की "दोन्ही कानाचे पडदे फाटलेले आहेत. कानांच्या स्पेशालीस्ट डॉक्टरांकडे जावे लागेल. मी चिठ्ठी लिहून देतो." आम्ही घरी आलो. तेव्हा गणपती आले होते. मी यावेळेसही बाळंतपणासाठी माहेरी गेले होते. तिकडेही गणपती येतात.

गणेशचतुर्थी झाली. माझी आई मला म्हणाली की,"गावठी मध तरी कानात घालून बघ. त्याने कान बरे होतील." मी श्री साईंवर हवाला ठेवून शेटचा उपाय म्हणून ते करायचे ठरवले. श्री गणेशाच्या प्रसादात घालण्यासाठी गावठी मध आणलेलाच होता. त्या बाटलीतच साईंची उदी घातली व रोज ३ वेळा तो मध कानात घालू लागले. मध कानात घालताच क्षणी मला असा ठणका लागायचा की, अक्षरशः डोळ्यातून पाणी गळायला लागायचे. त्यावेळी मी काय करायचे तर श्री बाबांचे साईलीला मासीक समोर ठेवून त्यांना हाक मारत रहायचे. तेच मला त्या वेदना सहन करायला शक्ती देत.

हा उदीमिश्रीत मध मी ७-८ दिवस कानात घालताच माझे कान पूर्ववत झाले आहेत. ना कानांच्या पडद्यांना खड्डे राहिले ना कसलाच त्रास. अशाप्रकारे श्री साईमाऊली मला नेहमीच मदत करत असतात.

त्यांचे असे अनंत उपकार लिहावयास बसले तर एक ग्रंथच तयार होईल. त्यामुळे हा लेख आवरता घेते. श्री साईंची अशीच सर्वांवर कृपादृष्टी राहो हीच श्रीसाईचरणी नम्र प्रार्थना.

# जया मनी जैसा भाव तया तैसा अनुभव

**श्री. शिवाजी नारायणराव जाधव**
१६३५, नवी गल्ली, शहापूर.

श्री साईबाबा ही एक अगाध दिव्य शक्ति आहे. त्यांच्या कृपेचा ठेवा ज्याला ज्याला मिळतो तो खूपच भाग्यवान आहे. अशाच एका दिव्य प्रेरणेमुळे मी साईकृपेला पात्र झालो आहे. माझ्या जीवनाचे सार्थक झाले आहे. त्यांच्या कृपेचा मला पदोपदी अनुभव येत आहे. त्यामुळे मी साईबाबांच्या भक्तीत जास्तच रमत आहे. तसं पाहिलं तर मला बाबांविषयी जास्त माहिती नव्हती. परंतु भक्ति होती. त्याची प्रचिती मला हळूहळू होऊ लागली. मी टिळकवाडीमध्ये बेकरी कामाला जात होतो. टिळकवाडी रोडलाच साईमंदिर आहे. मी दररोज कामाला जाताना रोडवरुनच बाबांना नमस्कार करत होतो. दर गुरुवारी साईमंदिरात जाऊन पुजेला हार देऊन थांबून येत होतो. दहा वर्षे अशीच गेली व मला धंदा करायची तीव्र इच्छा झाली. पण घरच्या सामान्य परिस्थितीमुळे मला ३० ते ४० हजार रु. भांडवल मिळू शकत नव्हते. पण साईच्या कृपेने मला जून १९७४ मध्ये रामलिंग खिंड बेळगाव येथे साईबाबा बेकर्स नावाची एक बंद बेकरी चालू करण्यास मिळाली व त्याची भरभराटही झाली. मला त्याच नावाची बेकरी मिळवून देऊन बाबांनी आपल्या भक्तिची प्रचिती दिली. हा माझा पहिला अनुभव!

माझा दुसरा अनुभव म्हणजे, मी दर गुरुवारी टिळकवाडी येथे साईंच्या दर्शनाला जातो. एकदा मार्च १९८३ मधील दुसऱ्या गुरुवारी साईबाबांच्या दर्शनाला माझा ५ वर्षाचा मुलगा दयानंद माझ्याबरोबर आला. आम्ही साईमंदिरांत गेलो. माझ्या हातात एक ताट होते. त्यात नारळ, हार, उदबत्ती, कापूर इत्यादि साहित्य होते. आत गेल्यावर पुजाऱ्यांकडे ताट देणार इतक्यात माझ्या मुलाने त्यातील कापूर घेऊन कापूर पेटवायच्या धुपण्या-मध्ये टाकला. मी साईला नमस्कार करत होतो. इतक्यात माझा मुलगा 'दादा' म्हणून नाचू लागला. पाहतो तर त्याच्या अंगावरचा पोटाजवळील शर्टाचा भाग जळत होता. मी माझा हात त्याच्या पोटावर पेटत्या शर्टावर जोरात दाबून त्याला घेऊन खाली बसलो. तर काय चमत्कार! शर्टाला रुपयाच्या नाण्यापेक्षाही मोठे भोक पडून व दिवा जसा पेटतो तसे पेटून किंचितही जखम झाली नव्हती. माझ्याही हाताला काही इजा झाली नाही. साईंनी दिलेलं हे दर्शन मी आयुष्यात विसरु शकत नाही.

त्यानंतर १९८५ साली मी शिर्डीला गेलो व साईलीला मासिकाचा सभासद झालो. प्रत्येकाचे अनुभव वाचल्यानंतर मीही माझा अनुभव साईलीलेला पाठवित आहे. श्री साईबाबांनी आपल्या सद्‌भक्तांना "श्रध्दा व सबुरी" या दोन शब्दांची सतत स्मृती ठेवायला सांगितले आहे. केलेल्या कोणत्याही कर्माचे फळ ताबडतोब मिळते असे नाही, तर त्यासाठी वाट पाहिली पाहिजे. तरच आपले इच्छित साध्य होईल. अशी अढळ श्रध्दा बाबांवर असण्याची नितांत गरज आहे.

# श्री साईबाबांनी केलेला चमत्कार

— सौ. शोभा देशपांडे
२/११, आगरकर नगर,
अलंकार टॉकीज शेजारी,
पुणे.

ऑक्टोबर १९८५ मधील गोष्ट. माझ्या मुलीला पहिलीच मुलगी झाली. जन्मल्यापासून काही तक्रारी असल्यामुळे आम्ही जरा काळजीतच होतो आणि त्या जन्मलेल्या चौदा दिवसाच्या मुलीचे ऑपरेशन करण्यापर्यंत पाळी आली. डॉक्टरांनी सांगितले, आम्ही प्रयत्न करतो पण तुमचे नशिब. आम्ही घाबरुन गेलो. सर्वजण चिंतेत होतो. मी श्री साईबाबांचे स्मरण केले.

माझ्या मुलीला लग्न झाल्यावर वर्षभरातच मूल झाले. तिचे लग्न वयाच्या ३० व्या वर्षी झाले. मी बाबांना म्हणाले की, इतक्यात मूल झाले नसते तरी चालले असते पण आता इतकी सुंदर मुलगी जन्माला घातली आणि आता केवढे संकट आमच्यापुढे आणले. आता सर्व काही बाबा तुमच्या हातात आहे, काय करताय बघा. आणि त्या मुलीला मांडीवर घेऊन श्री साईबाबांचे स्मरण चालू ठेवले.

त्या मुलीच्या पोटात गाठ आहे असे सोनोग्राफीमध्ये दिसले. ताबडतोब ऑपरेशन करणे जरुरीचे होते. त्वरेने हालचाली सुरू झाल्या. त्या मुलीला के.ई. एम्. हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले व दुसरे दिवशी (गुरुवारी) ऑपरेशन झाले, पण काय आश्चर्य पोटात गाठ वगैरे काही नाही. लघवी बरीच साठल्यामुळे पोट फुगले होते. अशातऱ्हेने श्रीबाबांच्या कृपेने आमच्यावरचे संकट टळले. आता ती मुलगी श्री साईबाबांच्या कृपेने छान आहे. ऑपरेशनच्या वेळी मी बोलले होते की, ही मुलगी तुमच्या पायावर घालीन व काय नाव ठेवायचे ते शिरडीला तुमच्या पायापाशी ठेवीन. बारसे वगैरे करणार नाही. त्याप्रमाणे आम्ही १॥ महिन्याची मुलगी घेऊन शिरडीला जाऊन नवस फेडला. त्या मुलीला प्रवासाचा अजिबात त्रास झाला झाला नाही. असा हा चमत्कार घडला. मला जेव्हा जेव्हा काळजी वाटते व माझ्यावर संकट येते त्या वेळी मी बाबांचे स्मरण करते. माझ्या हाकेस बाबा धावून येतात व मला मदत करतात. माझ्या मुलीच्या लग्नाच्या वेळेस पण असाच अनुभव आला. मी बाबांचे दर्शन घेऊन आले आणि पुढे ७ — ८ महिन्यातच तिचे लग्न ठरले. तिला मंगळ असल्याकारणाने तिचे लग्न ठरत नव्हते. आम्हाला एक मोठी काळजीच वाटत होती. अशी आहे श्रीसाईबाबांची किमया.

## श्रीसाईलीला

**श्री साई काव्य बहार विशेषांक १ फेब्रुवारी १९८७ रोजी प्रसिद्ध होईल. या अंकासाठी कृपया कविता पाठवू नयेत.**

# श्री साईंनी काळाला परतवून लावले

— श्री. नंदू लक्ष्मण पाटील
महेश कृपा चाळ,
लोकमान्य नगर, ठाणे.

माझी बहिण सौ. ज्योत्स्ना बाळंतपणासाठी आमच्या घरी ठाण्याला आली होती. १९ मार्च ८६ रोजी पहाटे पाच वाजता तिच्या पोटात दुखू लागले. त्यामुळे आम्ही तिला बाळंतिणीच्या हॉस्पीटल मध्ये ॲडमीट केले. माझे मेव्हणे (बहिणीचे पती) अलिबाग येथे सरकारी नोकरीत असल्याने ते आले नव्हते. दुपारी ११ वाजेपर्यंत बहिण बाळंत होण्याचे चिन्ह दिसेना. डॉक्टरांनी सर्वकाही प्रयत्न करून पाहिले. ११ वाजता डॉक्टरांनी माझ्या आई-वडिलांना बोलावून सांगितले की, 'आम्हाला हिचे ऑपरेशन करून मूल बाहेर काढावे लागेल. कारण तिचा पिंड पोटात फिरला आहे. आणि ऑपरेशनही फार धोक्याचे आहे. यावर पर्याय म्हणजे, दोघांपैकी एक काहीतरी तुमच्या हाती लागेल'. हे ऐकून आम्हाला अगदी आभाळ कोसळल्यासारखे झाले. फार बाका प्रसंग आमच्यावर आला. आम्हाला काहीच सुचेनासे झाले.

शेवटी नाईलाजास्तव मी डॉक्टरांना सांगितले की, 'डॉक्टर कसेही करून माझ्या बहिणीचे प्राण वाचवा. मूल हाती नाही लागले तरी चालेल. पण डॉक्टर, बहिणीला जीवदान द्या! तिची लहान दोन नंबरची मुलगी आईजवळ होती. व मोठा मुलगा छोट्या बहिणीजवळ घरी होता. (तोही साईकृपेने वाचला आहे.) डॉक्टरांनी ऑपरेशनकरता माझ्या वडिलांच्या सह्या घेतल्या. आणि बहिणीला ऑपरेशन थिएटरमध्ये नेण्यात आले.

श्री साईबाबांशिवाय आम्हाला आता कसलाच आधार उरला नव्हता. मी बाबांना आर्त स्वरात हाक मारली. व भेदरलेल्या स्थितीत ताबडतोब सायकल घेऊन "घंटाळी रोड" येथील साईमंदिरात गेलो. तेथे जाऊन बाबांच्या चरणाला मिठी मारली व बाबांना सर्व प्रकार सांगितला, 'बाबा, माझ्यावर फार मोठा प्रसंग आला आहे. बाबा, माझ्यावर कृपा करा. व बहिणीचे प्राण वाचवा! जर का सुटका झालीच तर मी त्या मुलाला तुमच्या नावाने हाक मारीन व बहिणीला तुमच्या चरणाशी शिरडीला घेऊन येईन.' मी बाबांना गाऱ्हाणे घालून पुन्हा धावत, धावत रुग्णालयात आलो. इतक्यात माझे आई-वडील समोर येऊन म्हणाले की, डॉक्टर ऑपरेशन करावयाचे थांबले आहेत. कारण आत्ताच माईच्या पोटात पुन्हा दुखायला लागले आहे' हे ऐकून माझे हृदय एकदम भरुन आले.

साईबाबा माझ्या हाकेला क्षणात धावून आले होते. मी बाबांचे मनःपूर्वक आभार मानले. काही वेळात नर्स धावत बाहेर येऊन म्हणाल्या की, 'तुमच्या जोत्स्नाला मुलगा झाला आहे.' आमचा आनंद गगनात मावेनासा झाला. माझ्या साईंनी डॉक्टरांनाही असाध्य वाटणारी गोष्ट साध्य करून दाखविली. बाबांचे उपकार मी उभ्या आयुष्यात विसरणार नाही.

पुढे साईकृपेने पाडव्याच्या मुहूर्तावर आम्ही मुलाचे बारसे करून त्याचे 'साई' हे नाव ठेवले. लवकरच आम्ही बहिणीला व मुलाला बाबांच्या चरणी शिरडीला घेऊन जाणार आहोत.

# जया मनी जैसा भाव, तया तैसा अनुभव

— सौ. तारा कोंडविलकर,
न्यू. सुभाष नगर,
डॉ. ई. मोजेस रोड,
वरळी, मुंबई - ४०० ०१८.

चार वर्षापूर्वी माझ्या गळ्यास कंठमण्याच्या खाली एक गाठ आली. दिवसेंदिवस ती वाढतच चालली. त्यामुळे गळा बेढब दिसू लागला, व सुजल्यासारखा वाटू लागला. मला त्यापासून जेवताना किंवा कसलाही त्रास होत नव्हता. तरी मी एका स्पेशालिस्ट डॉक्टरची ट्रिटमेंट सुरू केली. त्यांनी नायर हॉस्पिटलात सर्व तपासण्या करून गोळ्या दिल्या व जर गोळ्यांनी बरे झाले नाही तर गळ्याचे ऑपरेशन करू असे सांगितले. मी ४/५ महिने गोळ्या घेतल्या परंतु ते कमी होईना. ऑपरेशनची मला भिती वाटत असल्यामुळे मी डॉक्टरच बदलला. दुसरे डॉक्टरपण स्पेशालिस्टच होते. त्यांनीही गोळ्या दिल्या परंतु कमी होईना. म्हणून मग आमचे सर्व कुटुंबाबरोबर गेल्यावर्षी शिरडीला गेलो. व त्या दयाघन दयाळू प्रभूला शरण जाऊन गळा बरा करण्याविषयी कळवळून प्रार्थना केली. तशी आमच्या घरी मी रोजच श्री साईबाबांची पूजा करते व उदी कपाळाला लावून पोटात घेऊन मगच इतर कामांना सुरुवात करते. परंतु गळ्यासंबंधाने बाबांच्या ऊदीनेही गुण येत नव्हता, तो शिरडीला जाऊन आल्यानंतर गळा कमी कमी होऊन २ महिन्यात कसलेही बाहेरचे औषध न घेता नुसत्या ऊदीने बरा झाला. तसे बाबांचे अनुभव आम्हाला हरघडी येतच असतात. परंतु हाच अनुभव मला प्रसिद्ध करावा असे वाटू लागले. याचे कारण मी नियमीत साईलीलेत बाबांच्या असंख्य भक्तांना आलेले अनुभव वाचते. त्यामुळे मलाही माझा अनुभव प्रसिद्ध करण्यास पाठविण्याची स्फूर्ती झाली.

पूज्य बाबांना निर्मळ भावनेने मारलेली हाक पोहचते हेच खरे.

# बाबांच्या उदीने मुलगा बरा झाला.

श्री. शाम वि. जावळकर.
७५३, गुरुवार पेठ,
गोरावडे वाडा, पुणे— ४२.

दोन तीन महिन्यापूर्वीची गोष्ट! घरातील आम्ही सर्वजण जेवण करुन झोपलो होतो. रात्रीचे अकरा साडेअकरा वाजले असतील. माझा मुलगा चंद्रशेखर अचानक मोठमोठ्याने ओरडत उठला. त्याच्या पोटात दुखत होते. अचानक त्याचे पोट फुगले होते. आम्ही घरातील सर्वजण घाबरुन गेलो. बरेच घरगुती इलाज केले. परंतु त्याचे पोट दुखायचे काही थांबेना. शेवटी त्याला घेऊन आम्ही डॉक्टरांकडे गेलो. नेहमी रात्री बारा वाजेपर्यंत असणारे आमचे फॅमिली डॉक्टर नेमके त्याच दिवशी दवाखाना लवकर बंद करून गेले

होते. शेवटी आम्ही वैतागून घरी परतलो. मला अचानक श्रीसाईबाबांची आठवण झाली. मी शिर्डीवरुन आणलेली अंगाऱ्याची पुडी काढली. पेलाभर पाणी घेऊन त्यात थोडी बाबांची उदी टाकली व त्याला प्यायला दिली. थोडी उदी त्याच्या पोटावर चोळली. थोडी आम्ही सर्वजणांनी मस्तकी लावली आणि बाबांची प्रार्थना करु लागलो. तोच काय चमत्कार! माझ्या मुलाच्या पोटात दुखायचे थांबले व तो शांत झोपी गेला.

असा आमच्या बाबांच्या उदीचा चमत्कार. अशीच आमच्या बाबांची (श्री साई) कृपा आमच्यावर असावी ही बाबांच्या चरणी नम्र विनंती.

# बाबांच्या कृपेने पुनर्जन्म

**— सौ. अनुराधा श्यामराव पिंपळगावकर**
दत्तवाडी, ६३९१,
पुणे — ४११ ०३०.

मी प्रत्येक उत्सवाला बाबांच्या सेवेसाठी पुण्याहून शिर्डीला जात असते. नेहमीप्रमाणे मी रामनवमी उत्सवासाठी शुक्रवार दि. १८।४।८६ रोजी शिर्डीला ड्युटीसाठी हजर झाले. माझे काम संपल्यावर मी नाशिक येथे चैत्रपौर्णिमेला वणीच्या देवीला जाणार होते. मी गडावर जाण्यासाठी निघाले. परंतु दि. २४।४।८६ रोजी नाशिकला रामाच्या रथाच्या वेळी काही कारणास्तव दंगल व जाळपोळ सुरू झाली. त्यामुळे देवीचे दर्शन न घेता मी शिर्डीला परत आले. २५ ला देवळात परत आले. शनिवार, रविवार देवळात खूप गर्दी असल्यामुळे देवळात मदत केली. सोमवार, मंगळवार विश्रांती घेतली. गुरुवारी देवळात खूप गर्दी असते म्हणून बुधवारी अभिषेक करून पुण्यास जाणार होते. त्याप्रमाणे मी अभिषेकासाठी बाबांचा फोटो घेऊन खोलीबाहेर पडले. दोन-चार पायऱ्या उतरते न उतरते तोच मला कसलातरी आवाज आला. मी इकडे तिकडे पाहून परत चालण्यास सुरवात केली. परंतु मी बाबांच्या फोटोकडे बघितले तर तो उभा फुटला होता. माझे तर हातपाय कापावयास लागले. मी मनात म्हटले माझ्या घरी नक्कीच काहीतरी वाईट घडले असणार. माझे अभिषेकामध्ये लक्षच लागेना. मला रहावेना म्हणून माझे मानलेले भाऊ शिंदेसाहेब व आईस ही गोष्ट सांगितली. त्यांनी माझी समजूत घातली. ते म्हणाले, बाबांनी सर्व विघ्न आपल्या अंगावर घेतले म्हणून फोटो फुटला, तरी तुम्ही अजिबात काळजी करु नका.

मी अभिषेक करून पुण्यास ताबडतोब गेले. घरी पहाते तर माझे धाकटे मेव्हणे श्री. दत्ताराम ठाकूर हे दि. २५।४।८६ रोजी ३५ फुट उंच पोलवरुन शॉक बसून खाली पडलेत. ते दोन दिवस शुध्दीवर नव्हते. त्यांना ३५ टाके पडले. पुण्यातच रामवाडीत ते रहात होते. सर्वांना वाटले मुले पोरकी झाली. माझी बहिण एक वर्षापूर्वीच वारली होती. पण बाबांनी सर्व ठीक केले. डॉक्टरांनी मनाई केल्यावर सुद्धा मी व माझे मेव्हणे गुरुपौर्णिमेला बाबांच्या दर्शनास शिर्डीस गेलो.

# शरण मज आला, आणि वाया गेला
# दाखवा दाखवा ऐसा कोणी

— श्री. भूषण बाळकृष्ण रेखी
बी/१, लक्ष्मी सदन, राम गल्ली,
एस्. व्ही. रोड, कांदीवली (प),
मुंबई नं.— ४०००७६.

साधारण चार महिन्यापूर्वीची गोष्ट आहे. माझी प्रकृती अचानक बिघडली. मी आमच्या ओळखीच्या डॉक्टरांना माझी प्रकृती दाखविली. त्यांनी मला लहान आतड्यावर शस्त्रक्रिया करावी लागेल असे सांगितले. त्याप्रमाणे सोमवारी माझे ऑपरेशन करण्याचे नक्की झाले. सुवातीला मी थोडा घाबरलो होतो. परंतु ऑपरेशन शिवाय पर्याय नव्हता. मी साईबाबांना माझ्या मनाची तयारी करा व माझे ऑपरेशन निर्विघ्नपणे पार पडू द्या अशी विनंती केली. व सर्व भार बाबांच्यावर सोपवून दवाखान्यात दाखल होण्यासाठी निघालो. निघताना माझ्या आईने मला दवाखान्यात जाताना स्टेशनच्या रस्त्यावर असलेल्या साईमंदिरात जावून बाबांचे दर्शन घेण्यास सांगितले. परंतु आम्ही घाईगड़बडीत मंदिरात न जाता रिक्षाने दवाखान्यात पोहचलो.

दुसऱ्या दिवशी मी ऑपरेशन थिएटर मध्ये जाण्यापूर्वी बाबांची प्रार्थना केली व उदी भक्षण करुन निर्धास्तपणे ऑपरेशन थिएटरमध्ये गेलो. साधारण एक तास माझे ऑपरेशन चालू होते. डॉक्टरांनी माझे ऑपरेशन व्यवस्थित झाल्याचे सांगितले. परंतु मी बराच वेळ शुध्दीवर येत नव्हतो. माझी आई सारखा बाबांचा धावा करत होती. मी शुध्दीवर आल्यानंतर डॉक्टरांनी मला थोडे नारळपाणी व चहा घेण्यास सांगितले. संध्याकाळच्या सुमारास मला मळमळू लागले व उलटी होईल असे वाटू लागले. डॉक्टरांना हे सांगताच, त्यांनी उलटी झाल्यास टाक्यांना त्रास होईल म्हणून माझ्या नाकातून घशात व घशातून पोटाच्या आत एक लांब नळी घातली व दर अर्ध्या तासाने त्या नळीद्वारे पोटात साठलेली घाण बाहेर काढण्यास सुरवात केली. मला पाणी पिण्यास देखील मनाई केली. पाण्यावाचून माझ्या तोंडाला कोरड पडत होती व नाकातून घातलेल्या त्या नळीमुळे खूप वेदना होत होत्या. माझा श्री साईबाबांच्या नावाचा जप सतत मनामध्ये चालू होता. मी बाबांना म्हणत होतो, 'मी तुमच्यावर भरोसा ठेऊन ऑपरेशन करण्यास तयार झालो. पण आता हे काय विघ्न माझ्यावर आले. माझ्या उशाला श्री साईलीलेचा अंक होता. मी त्या अंकाच्या मुखपृष्ठावरील बाबांकडे पाहून म्हणालो, 'बाबा, तुम्ही म्हणता माझा भक्त संकटात असल्यावर मी त्याच्या मदतीला धावून येतो, त्याचे संकट दूर करतो. गेले तीन दिवस माझ्या पोटात पाण्याचा थेंब देखील गेला नाही. आता माझी सहनशक्ती संपली आहे. उद्या गुरुवार आहे. माझ्या घशातील ही नळी उद्याच्या आत निघू द्या व मला पूर्ववत खातापिता येऊ द्या. साईलीलेच्या मुखपृष्ठावरील बाबांच्या फोटोकडे पाहताच, मला माझ्या आईने दवाखान्यात जाण्यापूर्वी स्टेशनवरील श्री साईबाबांच्या

मंदिरात जावून दर्शन घेण्यास सांगितले होते. परंतु आपण तिकडे जाण्यास विसरल्याचे मला आठवले. विशेष म्हणजे साईलीलेच्या अंकावरील फोटो व त्या देवळातील फोटोत बरेचसे साम्य होते. जणू बाबांनी मला माझ्या चुकीची जाणीव करुन दिली होती. मी बरा झाल्यानंतर आपल्या दर्शनाला येण्याचे बाबांना कबूल केले व माझ्या वडिलांना त्या देवळातून प्रसाद व उदी आणण्यास सांगितले. त्यांनी आणलेली उदी व प्रसाद मी सेवन केला.

दुसरा दिवस गुरुवारचा होता. डॉक्टरांनी मला तपासले व माझ्या नाकातून घातलेली नळी काढून टाकण्यास सांगितले व मला खाण्यापिण्याची परवानगी दिली. हा सारा चमत्कार श्री साईमाऊलीचा होता. बाबांनी मला दाखवून दिले की, ते आपल्या भक्तांच्या संकटसमयी कसे त्यांच्या मदतीला धावून येतात व संकटातून त्याला मुक्त करतात. साधारण एक आठवड्यात माझी प्रकृती पूर्ववत चांगली झाली. ही सारी कृपा श्री साईबाबांचीच. साईबाबांनी म्हटले आहे, शरण मजला आला आणि वाया गेला, दाखवा दाखवा ऐसा कोणी। या वचनाची प्रचिती मला या अनुभवातून आली.

# श्रीसाईनाथांचे अजूनही शिरडीत वास्तव्य

**सौ. अरुणा भा. कर्णिक**
शिवालय अपार्टमेंटस्,
ब्लॉक नं. जी-५-९,
एस्. व्ही. पटेल रोड,
बोरीवली (प), मु. नं. ९२.

आमचे शिर्डीला नेहमीच जाणं होतं. त्यात आमच्या मुलाचे लग्न झाले. अर्थात तो बाबांच्या नवसाचाच! म्हणजे शिर्डीला जाणार हे नक्कीच!

अगदी पहिल्यांदा बाबा भक्तांना प्रसाद म्हणून खडीसाखर देत व आशीर्वाद देत. पण नंतर बाबांचा भक्तगण दिवसेंदिवस फारच वाढला. म्हणून बाबांनी धुनी पेटवली. कारण लांडी, लबाडी, खोटेपणा, धर्मभेद, जातीभेद काढून टाका हे तत्व शिकवण्याकरिताच ती धुनी पेटवली असावी व त्याची राख (उदी) बाबा सर्वांना निरोप देताना लावीत व आशीर्वाद देत.

आम्ही एप्रिल ८६ ला शिर्डीला निघालो. मी माझ्या पतीला सांगितले की, "आपण प्रत्येक वेळेस प्रसादाला पेढे घेतोच पण ह्यावेळेस मीही द्वारकामाईत सव्वा किलो खडीसाखर प्रसाद म्हणून वाटणार आहे." माझे पती पण कट्टर साईभक्त म्हणून त्यांचा विरोध नाहीच. ते म्हणाले, 'हो घे, पण तिथे गेल्यावर घे. इथून मुंबईहून न्यायला नको'.



त्याप्रमाणे आम्ही शिर्डीला गेलो. दोन दिवस पूजा, आरत्या, पोथ्या यात वेळ गेला. मला त्यामुळे खडीसाखरेचा विसरच पडला होता. संध्याकाळी माझी मुलगी द्वारकामाईत साईचरित्र वाचायला बसली व मला म्हणाली,'आई, कोणता अध्याय वाचू.' मी पटकन बोलून गेले, '१५ वा अध्याय वाच'. त्या अध्यायात ठाण्याचे चोळकर यांच्या खडीसाखरेच्या नवसाची कथा निघाली. नवस फिटेपर्यंत श्री. चोळकर चहा सुध्दा पीत नव्हते. जेव्हा त्यांचे शिर्डीला जाणे झाले, तेव्हा ते जोगांकडे पाहुणे म्हणून उतरले व जोगांबरोबर दरबारात गेले. तेव्हा दर्शन घेताना बाबा म्हणाले, 'अरे याला चहाचे पेले भरुन पाजा.' हे ऐकताच चोळकर मनात चरकले. त्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले. कारण त्यांना वाटले एव्हढ्या दूरवर मी घेतलेला नवस बाबांना कसा समजला. पण त्यावेळेस बाबा सतत मशिदीत बसलेले असत. पण आता समाधिस्त असून सुध्दा त्यांनी मला माझ्या नवसाची आठवण करुन दिली. म्हणजेच बाबांचे अजून शिर्डीला वास्तव्य आहे हे सिध्द होते की नाही? मलाही आश्चर्यच वाटले की, मी तोच अध्याय व त्याच नवसाचा माझ्या मुलीला कसा वाचायला सांगितला?

मी लगेच दुकानावर जाऊन १। किलो खडीसाखर आणली व बोलल्याप्रमाणे द्वारकामाईत वाटली. त्यावेळेस मी माझ्या मुलीला सांगितले की, 'तुझ्या लग्नाची पण मी अशीच खडीसाखर वाटणार आहे.

नंतर दुसऱ्या दिवशी आम्ही मुंबईला आलो. व आठ दिवसाच्या आतच माझ्या मुलीचेही लग्न जमले. खरोखर केव्हढी मोठी ही बाबांची प्रचीती!

अशा या संत चुडामणी साईबाबांना सर्व साईभक्तांकडून माझे कोटी कोटी प्रणाम."

# साई कृपेचा अनुभव

— श्री. एस्. जी. सावंत
९/८६, गोखले नगर,
पुणे— ४११०१६.

आमच्या घरी आमचे सर्व कुटुंब साईबाबांचे निस्सीम भक्त आहे. साईबाबा हे परमेश्वराचे अवतार आहेत हे नक्कीच, कारण त्यांच्या कृपेने माझ्या संसारातील सर्व अडीअडचणी दूर झाल्या. मनातील सर्व इच्छा जणूकाही बाबाच पुरवू लागले. सर्व मुलांचे शिक्षण, त्यांची लग्ने, कार्ये, नोकऱ्या, नातवंडे, अगदी सर्वकाही मनासारखे झाले. मी अगदी समाधानी होतो. सोमवार दि. २८.५.१९८४ रोजी माझा तीन नंबरचा मुलगा चि. प्रकाश याचे लग्न, मुंबईत मोठ्या थाटात झाले. व गेल्यावर्षी म्हणजे सोमवार दि. २६.८.१९८५ ला त्याची सुविद्य पत्नी चि. सौ. कविता ही डॉ.नार्वेकर, चर्नीरोड, मुंबई यांच्या दवाखान्यात सकाळी १०.४५ वाजता सुखरुप बाळंत झाली. (तो वार पण

सोमवार होता) मुलगा झाला, त्यामुळे आम्ही सर्व अतिशय आनंदात होतो. सर्व नातेवाईकांना व मित्रांना पेढे वाटले व बारसे वगैरे सर्व मोठ्या थाटाने करावयाचे ठरविले. आणि कसे कोण जाणे, आमच्या आनंदाला ग्रहण लागले. दि. २९.८.८५ रोजी माझा मुलगा चि. प्रकाश हा सायंकाळी ऑफिस मधून सुटल्यानंतर नेहमीप्रमाणे त्याच्या पत्नीला व मुलाला पहाण्यासाठी सायंकाळी ७ वाजता डॉ. नार्वेकर यांच्या दवाखान्यात गेला, परंतु तिथे गेल्यानंतर व बाळाला पाहिल्यावर, त्याच्या लक्षात आलं की, मुलाचा रंग थोडा पिवळा दिसत आहे. लगेच त्याने ते डॉक्टरांच्या निदर्शनास आणून दिले. तेंव्हा डॉक्टरांच्या तपासणीनंतर, मुलाला डीप काविळ झाल्याचे समजले. त्यांनी लगेचच बाळाला वाडीया हॉस्पिटल, परळ, मुंबई येथे ॲडमिट करण्यास सांगितले. तेंव्हा माझा मुलगा चि. प्रकाश हा फारच घाबरुन गेला. त्याला मोठा धक्काच बसला. काही सुचेना. तरी त्याने संयम सोडला नाही. त्यावेळी आम्ही सर्व आमच्या बोरीवलीच्या घरी मजेत होतो. आम्हाला त्याची काहीच कल्पना नव्हती. रात्रौ १०॥ वाजता, चि. प्रकाश याचा दवाखान्यातून आम्हाला बोरीवलीला फोन आला व त्याने फोनवर सांगितले की, बाळाला काविळ झालेली आहे व आत्ताच त्याला वाडीया हॉस्पिटलमध्ये ॲडमीट करण्यासाठी नेत आहे. हे ऐकले मात्र त्यावेळी आमच्या सर्व कुटुंबियांची जी अवस्था झाली होती, त्याचे वर्णन मी इथे शब्दाने करु शकत नाही. आम्ही सर्व घाबरुन गेलो होतो. रात्री अजिबात झोप आली नाही. मी सारखा बाबांचा धावा करत होतो की, बाबा, या संकटातून आम्हाला वाचवा. दुसऱ्या दिवशी म्हणजे शुक्रवार दि. ३०.८.८५ रोजी सकाळी ६ वाजता आम्ही दोघं पती-पत्नी वाडीया हॉस्पिटलमध्ये गेलो. व बाळाला पाहिले. त्यावेळी तो फारच सिरियस होता. त्याला काचेच्या पेटीत लाईटवर ठेवले होते. मुलाची आई चर्नीरोडला व मूल वाडीया हॉस्पिटलमध्ये! अशा मोठ्या संकटात आम्ही होतो. मी बाबांची मनोभावे प्रार्थना केली की, बाबा याच्यातून आम्हाला वाचवा. मी माझा अनुभव साईलीला मासिकात देईन.

योगायोगाची गोष्ट म्हणजे, ज्या हॉस्पिटलात बाळाला ठेविले होते त्याच हॉस्पिटलच्या दरवाजात एक लहानसे गणपती मंदिर आहे. त्या मंदिरात साईबाबांचा एक लहानसा फोटो आहे. ज्यावेळी मी दवाखान्यात प्रवेश केला, तेंव्हा अचानक माझे त्या फोटोकडे लक्ष गेले व मी मनोमन त्या फोटोला वंदन केले व म्हटले की, बाबा, माझ्या बाळाला बरं वाटू दे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, दुसऱ्या दिवसापासून बाळाला बरे वाटावयास सुरवात झाली. व पाचव्या दिवशी तो संपूर्ण बरा झाला. व डॉक्टरांनी त्याला घरी जाण्यास परवानगी दिली. आता तो मजेत आहे.

# असाही एक अनुभव

— सौ. सुनंदा आनंद गोसावी
बी.ए. (ऑनर्स)
द्वारा श्री. दत्तात्रय ल. सोळांकुरकर,
ए वॉर्ड, घ.नं. ३२०८, उपाध्ये बोळ,
बाबूजमाल समोर, कोल्हापूर.

मी आयुष्याला कंटाळलेली एक दुर्दैवी स्त्री आहे. ३ वर्षापूर्वी मी माझ्या मैत्रिणीकडे सांगलीला गेले होते. नोकरीच्या इंटरव्ह्यूसाठी निघाले होते. 'बाबांना नमस्कार कर. उदी लाव. तुला नोकरी हमखास मिळणार.' मैत्रिणीने आश्वासन दिले. इतक्यात पोस्टमन रजिस्टर्ड पार्सल घेऊन आला. मैत्रिणीने पार्सल फोडले. त्यात उदी, प्रसाद आणि साईनाथ चरित्र पोथी होती. उदी, प्रसाद नेहमी येतो पण पोथी कशी आली? तिला समजेना. कारण तिने पोथी मागविली नव्हती. तिला आश्चर्य वाटले. शेवटी भावाने किंवा मुलाने नकळत पोथी मागविली असेल अशी मनाची समज करून, तिने मला प्रसाद व उदी दिली. असल्या गोष्टीपेक्षा कष्ट आणि कर्तबगारीवर माझी जास्त श्रद्धा आहे. कारण 'यत्न तो देव जाणावा' ही वृत्ती असलेली मी! तरीही मैत्रिणीच्या समाधानासाठी उदी लावली. प्रसाद घेतला. बाबांच्या फोटोला नमस्कार केला आणि इंटरव्ह्यूसाठी निघाले. तिथे साहेबाने काहीही खळखळ न करता त्याच दिवशी नोकरीवर रुजू होण्यास सांगितले. आणि माझी तात्पुरती का होईना पोटापाण्याची सोय झाली. बाबांनी मैत्रिणीच्या मनात सद्भावना जागृत केली. आणि तिच्याच घरी माझी रहाण्याची सोय झाली.

तीन वर्षाचा काळ गेला. सुखदुःखाचा फेरा चालूच होता. मे १९८६ ला सातारा सोडण्याचा प्रसंग आला. गाव सोडताना दिशाहीन होते. अंधःकारमय भविष्यकाळ सोबत घेऊन सांगलीस परत त्याच मैत्रिणीकडे आले. आणि मैत्रिणीच्या रुपाने बाबांनी दिशा दाखविली. कोल्हापूरात तिच्याच माहेरी रहाण्याची, तिच्याच घरातील एक व्यक्ती म्हणून सोय झाली. या घरात साईबाबांचे वास्तव्य अणूरेणूत भरलेले आहे.

आता दररोज पहाटे उठले की, साईबाबांची खोली स्वच्छ करून, रांगोळी घालून दररोज साईनाथ चरित्र पारायण सुरू आहे. थोडावेळ ध्यानधारणा करते. साईनाथच उर्वरीत आयुष्याला वळण लावणार ही दृढश्रध्दा मनी दाटली आहे. खर म्हणजे, 'एक पत्नी, एक बाणी, एक वचनी जी सदा' अशा कोदंडधारी श्रीरामाची मी पहिल्यापासून वेडी भक्त आहे. लहानपणापासून आदर्श श्रीरामाचा. राममय झालेली मी, साईबाबांच्या चरित्राने आकर्षित झाले. आणि माझ्या या अंधःकारमय भवसागरात दीपस्तंभाचे काम तेच करणार अशी दृढश्रध्दा निर्माण झालेली मी एक सामान्य अबला आता साईमय झाले आहे.

# असे पुन्हा एकदा साई धावून आले

— श्री. प्रकाश अनंतराव सामंत,
प्रगति, टिळक नगर,
आरे रोड, गोरेगांव (पूर्व),
मुंबई क्र. ४०० ०६३.

भारतीय कामगारसेनाध्यक्ष माननीय शिवसेना नेते श्री. दत्ताजी साळवी साहेब व कार्यालय प्रमुख श्री. दिनानाथ गद्रे यांचे माझ्यावर अनंत उपकार आहेत. तसेच दोघांचेही मजवर प्रेम व माझ्याबरोबर जिव्हाळ्याचे संबंध आहेत.

गेल्या वर्षी जून महिन्यात मला आतड्याचा विकार झाला होता, त्यात मला जीवदान देण्यामध्ये या दोन साईभक्तांचा मोठा सिंहाचा वाटा आहे. त्याबद्दल मी आजन्म त्यांचा ऋणी राहीन. प्राणावर आलेल्या संकटातून बचावल्यावर शिरडीला साईंना प्रत्यक्ष भेटावयाचे होते. तो योग देखील वर उल्लेख केलेल्या दोन साईभक्तांच्या कृपेने दिनांक ६ जून १९८६ रोजी घडला. एक प्रवासी बस भारतीय कामगार संघटनेने ठरविली. माझे कुटुंब (मी, सौ., दोन मुले व मेव्हणी) व बरोबर कार्यालयात हिशेबाचे काम पहाणारे ज्येष्ठ कर्मचारी श्री. सुधीर प्रधान व त्यांचे कुटुंब (श्री., श्रीमती प्रधान व त्यांची तीन मुले) रात्री ११.३० वाजता गोरेगावहून शिरडीला साईदर्शनासाठी व दोन दिवस लोणावळा येथे भारतीय कामगार सेनेचे कामगार भवन आहे, तेथे आराम करण्यासाठी निघालो. त्याची कहाणी पुढील प्रमाणे —

शिरडीला पोचल्यावर श्री साईदर्शन व्यवस्थित झाले. दुपारी भोजन घेतल्यावर थोडावेळ आम्ही विश्रांती घेतली, दुपारी तीन वाजता शिरडी सोडली व लोणावळ्यास जाण्यास निघालो. परंतु आम्ही त्या दिवशी शिरडीहून निघणे साईंना मंजूर नसावे. तो अमावास्येचा दिवस होता. अमावास्या वगैरे न बघता लोणावळ्यास जायचेच या उद्देशाने आम्ही मार्गस्थ झालो आणि थोड्या अंतरावर गेल्यावर बसचा टायर फाटला. मग दुसरा टायर बसविण्यात आला. तो देखील थोड्याच वेळात पंक्चर झाला. त्या दिवशी शिरडी संगमनेर मार्गावरील संपूर्ण वीज पुरवठा खंडीत झाला होता. जवळपास पेट्रोलपंप सुद्धा नाही, मग आमचे हाल काय विचारता? पहिलाच फाटलेला टायर तात्पुरता दुरूस्त करून बस चालू झाली. ती धीमेधीमेच जात होती.

आणि दुसरे दुर्दैव आड आले. संगमनेर मार्गावर आळेफाट्यावर बस आल्यावर तिथे तीन फाटे फुटतात, एक मार्ग पुण्याला जातो, दुसरा लोणावळ्याला व तिसरा कल्याणला जातो. बसचालकाने चौकशी न करता बस पुढे नेली व मार्ग चुकला. आळेफाटा ते लोणावळा फक्त ७२ किलोमीटर असताना आळेफाटा ते कल्याण १४० कि.मि. अंतरावर आम्ही मार्ग क्रमू लागलो होतो. हे आम्हाला जवळ जवळ निम्मे अंतर गेल्यावर कळले. तोपर्यंत रात्रीचे आठ वाजले होते. परत मागे फिरणे अशक्य होते. कारण टायरचा भरवसा नव्हता. कामचलावू दुरूस्त केलेला टायर कधी दगा देईल व आम्ही कुठे

अडकून पडू याचा नेम नव्हता. रस्ता घाटाचा होता. घाटातील रस्त्यात सर्वत्र अंधार. रस्त्यावर वर्दळ नाही. एका बाजूला खोल दरी व किर्र रान. रातकिड्यांचा आवाज व सर्वत्र चमचमणारे काजवे. झाडेसुद्धा चांदीसारखी काजव्यांमुळे चमकत होती. अशा प्रसंगी आमची काय स्थिती झाली असेल ते साईंच जाणे. एखादे श्वापद जरी आले असते तरी आमची गय नव्हती, किंवा पाऊस जर आडवा आला असता तर?

अशा प्रसंगी साई नामस्मरणाशिवाय मार्गच नव्हता. त्यातच तीन माणसे हातात कंदील घेवून व हत्यारे घेऊन आमच्या बसच्या रोखाने येत होती. आता ते आम्हास लुटणार या विचारात असताना साईबाबांनीच आम्हाला वाचविले. बसचालकाने, साईकृपेने बसचा वेग इतका वाढविला की, आम्ही कधी त्या माणसांना मागे टाकले ते कळलेच नाही व कधी एकदा कल्याण येते याची वाट बघत राहिलो. अजून ४५ किलो.मि. अंतर बाकी होते.

मध्ये एका गावी लाईट व घरे दिसल्यामुळे बस चौकशीसाठी थांबली. तेव्हढ्यात एक गृहस्थ बसजवळ आला व सांगू लागला की, मला बसमध्ये घ्या. माझी बस चुकल्यामुळे मी येथे अडकून पडलो आहे. मला पुण्याला जायचे आहे, मला कृपया कल्याणपर्यंत पोचवा. या माणसाला बसमध्ये घ्यावे की न घ्यावे हा विचार पडला. परंतु माणुसकीसाठी त्याला बसमध्ये घेतले व बस चालू झाली.

एव्हाना रात्र बरीच झाली होती. रात्रीचा १२.३० चा सुमार. एव्हढ्या अंधाऱ्या रात्री आमची बस पुढे पुढे जात होती. एव्हढ्यात काय झाले कळलेच नाही. फक्त बसच्या टपावर धडाधड काहीतरी वस्तू फेकल्याचा आवाज झाला. आम्हाला वाटले की बहुधा बसचा टायरच फुटला असावा. म्हणून बसचालक खाली उतरून पाहू लागला. तेव्हा बसमध्ये मघाशी चढलेला तो गृहस्थ म्हणाला, बसचा टायर फुटला नाही, हा वेगळाच प्रकार आहे. तुम्ही बस थांबवू नका, जोरात चालू करा. त्याच्या ह्या बोलण्याने आमच्या लक्षात आले की, हा भुताटकीचा तर प्रकार नसावा? आम्ही सर्वजण घाबरून गेलो. एव्हाना बसचालकाचा सुद्धा धीर खचला होता. परंतु तो गृहस्थ न घाबरता सर्वांना धीर देत होता, व सांगत होता, आता थोडेच अंतर बाकी आहे. साईबाबांनी त्या गृहस्थाला धाडून आम्हाला पुन्हा वाचविले.

साईबाबांचा चमत्कार येथेच दिसून आला. साईनामस्मरण करीत आम्ही प्रवास करीत होतो. नंतर कल्याण कधी आले हे कळलेच नाही. तेथून थोड्याच अंतरावर डोंबिवली येथे आमच्यात असणाऱ्या श्री. प्रधान यांच्याकडे रात्र काढण्याचे ठरविले व बस डोंबिवलीकडे वळविली.

ज्या टायरची क्षमता १० कि.मि. जाण्याचीसुद्धा नव्हती, त्या टायरवर आम्ही १४० कि.मि. आळेफाटा ते कल्याण हा प्रवास टायरने न दगा देता केला. भयाण रात्री व जंगलात आम्ही अडकून न राहता साईकृपेने घरी आलो. तसेच जो गृहस्थ कल्याणला उतरणार होता, तो कल्याणला न उतरता आमच्या बरोबर डोंबिवलीपर्यंत आला. आम्हाला सुखरूप घरी सोडले व नंतर कोठे गेला हे कळलेच नाही. आलेल्या संकटातून आम्हाला

साईबाबांनी चमत्कार दाखवून वाचविले. त्या साईबाबांजवळ शिरडीला आम्ही एक दिवस देखील वास्तव्य करू नये याची आम्हाला राहून राहून खंत वाटू लागली. त्यांची मनोमन क्षमा मागून ही कहाणी संपवित आहे.

# श्री साईंची नित्य माझ्या पाठी छाया!

**कु. छाया आ. सापळे**
आयुर्वेद महाविद्यालय,
खासकील वाडा, सावंतवाडी,
सिंधुदुर्ग.

आम्हाला सर्वांनाच साई नित्य तारुन नेत असतात. मी यंदा एस्.वाय.बी.ए.एम्.एस्. ला आहे. गेल्यावर्षी आम्हाला हॉस्टेल कॉलेजचेच होते, यंदा जरा अडचणीमुळे खोली घेऊन रहावे लागत आहे. माझे बाबा जरा सनातनी विचारांचे. त्यांना मी खोली घेऊन रहाण्यापेक्षा पाहुण्यांकडे रहावे असे वाटत होते. पण मला पाहुण्यांकडे रहाणे आवडत नाही. मी साईबाबांना सांगितले की, बाबा तुम्हीच आता माझ्या बाबांचे मन वळवा व मला मैत्रिणींसमवेत रहाण्याची परवानगी द्या. आश्चर्य म्हणजे माझे वडील सावंतवाडीला जाऊन खोली पाहून आले. मला तर फारच आनंद झाला. असे आहेत माझे साई इच्छापूर्ती करणारे.

काही दिवसांपूर्वी रात्रीच्या वेळी मी कॉटवर झोपले होते, मला काहीतरी वाटू लागले म्हणून मी दुसऱ्या कॉटवर झोपले. सकाळी उठून माझ्या कॉटवर पहाते तर दुतोंडा नावाचा प्राणी होता. जर रात्री साईबाबांनी मला माझ्या कॉटवरून उठण्याची आज्ञा दिली नसती तर...

माझ्या चेहऱ्यावर कसल्यातरी औषधाच्या ॲलर्जीने अनेक पुळ्या आल्या होत्या. पुळ्या गेल्या पण त्याचे डाग राहिले होते. साईबाबांची उदी मी रोज लावत आहे. आता हे डाग गेल्यात जमा आहेत.

आठ दिवसांपूर्वीचीच गोष्ट. आमच्या घरी कणकवली येथील गोपुरीतून केळीचा मोना गेल्यावर्षी आणला होता. यंदा केळ चांगली मोठी झाली पण हल्लीच ती कुसली व खालील कंद पूर्णपणे नाहीसा झाला. सौ. आईने वरुन ती केळ तोडली व टाकली. बाबांना म्हणाली, 'साईबाबा, ही केळ देवस्थानातील आहे. बाबा तुमची जर आमच्यावर कृपादृष्टी असेल तर यालाच दुसरं झाड येऊ द्या.' आठ दिवसात पहातो तर त्या तोडून टाकलेल्या कांडातूनच कोंब बाहेर पडला होता. ज्या केळीला कीड लागली होती त्या केळीला नवे रोपटे! बाबांची करणीच अगाध आहे. विषालासुध्दा अमृत बनविण्याचे सामर्थ्य माझ्या बाबांकडे आहे.

होती असे वाटते. दि. १८.७.८६ रोजी शुक्रवारी मला कार्यालयात दिवसभर थंडी वाजत होती. तरी कर्तव्य हाच परमेश्वर ह्या नियमामुळे कितीही थंडी वाजली तरी मी माझे काम करतच होतो. कार्यालयीन वेळ संपली, नंतर नेहमी प्रमाणे गोडोली, येथे मी बांधलेल्या श्रीसाईबाबा मंदिरात संध्याकाळी आरतीस जाऊ शकलो नाही. फारच थंडी वाजत होती, म्हणून पट्कन बसने कसाबसा घरी गेलो, गेल्याबरोबर कपडे काढले व धाडकन अंग कॉटवर टाकले व स्वेटर घालून तीन चादरी अंगावर घेतल्या तरी थंडी थांबेना सारख्या उलट्या होवून उचकी लागत होती. मी शांतपणे हरिः ॐ बाबा हा जप करीत पडून होतो. घरातले लोक पळत आले. पहातात तर मी थंडीने उडत होतो. दात वाजत होते. लगेच रात्री ८ वाजता डॉक्टरांना बोलावले व त्यांनी माझी तब्येत तपासली तर अंगात १०४ डिग्री ताप होता. एवढा ताप माझे आयुष्यात मला प्रथमच आला होता. रात्रभर बडबड चालली होती. कोणीही माणूस ओळखत नव्हते. घरात काय गडबड चालली तेही समजत नव्हते. माझी मात्र बडबड म्हणजे, "बाबा मला माफ करा, मी तुमचे आरतीस येऊ शकलो नाही." व इतर काही असंबंधित बडबडत होतो. व सारखा हरिः ॐ बाबा हा जप चालूच होता. ओकाऱ्या व उचक्या चालूच होत्या. घरातले सर्व घाबरले व हे असे का होते हेच त्यांना समजेना. रात्रभर ओकाऱ्या व उचकी चालूच होती. सकाळी पुन्हा ताप पाहिला तर तो १०२ डिग्री होता. तो शनिवारचा दिवस!. दिवसभर १०२ डिग्री ताप, ओकाऱ्या व उचकी चालूच होती. संध्याकाळी ७.३० वाजता माझ्या पत्नीने दहीभाताचा उतारा केला आणि रात्रभर भरपूर घाम येऊन गेला. सकाळी उठलो तर आता शिर्डीस जाण्यास जमणारच नाही. म्हणून रात्रीच सौ. इंगळेबाईंना उद्या सकाळी येऊन शाल, लाडू, दक्षणा, नारळ वगैरे घेऊन जा व श्रीसाईबाबांना अर्पण करा असे सांगितले. मी बरोबर येत नाही, म्हणून त्या नाराज झाल्या व जड अंतःकरणाने बरं म्हणून घरी गेल्या. सकाळी उठल्यावर आपोआपच दाढी केली. आंघोळ केली व कपडे बदलून गादीवर पडून होतो. मी पत्नीला म्हणालो मला पूजा करण्याची अजिबात ताकद नाही. तेव्हा तिने स्नान करून लगेच श्रीसाईबाबांची पूजा चालू केली. पूजा झाली व लगेच आरती चालू केली. आरती चालू असतानाच मला श्रीसाईबाबांनी, "शिर्डीस ये," "शिर्डीस ये" अशी प्रेरणा दिली. मलाही उत्साह वाटला व आरती संपली की मी ताबडतोब पत्नीस सांगितले की, मी शिर्डीस जाणार, तू गाडी येईपर्यंत तयारी कर. घरात सर्वांनीच विरोध केला पण मी श्रीसाईबाबांचा आदेश आजपर्यंत कधीच डावलला नाही. तेव्हा मी सर्वांना निर्वाणीचे सांगितले की, मी शिर्डीस जाणार, जाणार, जाणार. हे ऐकताच मी जिद्दीचा माणूस कधीच मागे हटणार नाही, हे माहित असल्यामुळे मी तिला व घरातल्या सर्वांना सांगितले की, काही वाटेल ते होवो मी बाबांचे चरणाजवळ जावून मरणार पण मी जाणार. असे असल्यामुळे अंगात एक प्रकारचा संचार झाल्यामुळे सकाळी ११ वाजता सौ. इंगळेबाईंचे गाडीने निघून रात्री ८.३० वाजता शिर्डीस गेलो. श्रीसाईबाबांचे मनसोक्त दर्शन घेतले. अशाप्रकारे माझी अशी गंभीर तब्येत असतानाही श्रीसाईबाबांनी माझी

इच्छा पूर्ण तर केलीच व माझी कसोटीही पाहिली. माझी परीक्षा घेतली व मीही त्यात त्यांच्या कृपेने उत्तीर्ण झालो. ताप, थंडी श्रीसाईबाबांनी कोठे पळवून लावली ते समजले नाही. असा हा महान साक्षात्कार झाला.

दि. २०.७.८६ रात्री शेजारती झाल्यानंतर मी व पत्नी श्री. पराडकर यांच्या सेवाधाम खोली नं. १६५ मध्ये झोपलो असताना रात्रीच मला श्रीसाईबाबांनी दृष्टांत दिला तो खालील प्रमाणे सादर करीत आहे.

सातारला दर गुरुपौर्णिमेस उत्सव श्रीसाईबाबा मंदीरात करावयाचा असल्यामुळे मला समाधीवर जाणे व अभिषेक करणे हे शक्य होत नाही. कारण मला गुरुपौर्णिमे दिवशीच दुपारी उत्सवाकरिता सातारला येणे भागच असते. ही सत्य व प्रामाणिक नड पाहून श्रीसाईबाबांनी मला गेल्या गुरुपौर्णिमेस सांगितले की, तू हे वस्त्र समाधीस लावून मंदिराबाहेर जो कोणी योग्य वाटेल त्याला पांघर व प्रसाद, दक्षिणा दे त्याप्रमाणे मी गेल्या गुरुपौर्णिमेस एका आंधळ्याची पूजा केली व नवी कोरी शाल पांघरली व लाडूचा प्रसाद त्याच्या तोंडात घातला व रुपया दक्षिणा देऊन त्याच्या पायावर श्रीसाईबाबा समजून डोके ठेवले व परत सातारला आलो. त्यावेळी श्रीसाईबाबांनी त्या आंधळ्याचे रुपात येऊन त्यांनी मला भरघोस आशीर्वाद दिला. सर्व शिर्डी जनता आश्चर्याने पहात होती. त्यावेळी हे सर्व चालू असताना चि. जयंतराव कौलवकर, रा. कागल, तसेच श्री. जयवंत कुलकर्णी गायक, रा. मुंबई व त्यांचे सर्व सहकारी हजर होते. ह्यालाच ईश्वरपूजा व श्रीसाईपूजा म्हणतात असे मी मानतो. त्याच धर्तीवर रात्री झोपलो असताना दि. २०.७.८६ रोजी रात्री १२.३० चे दरम्यान आवाज आला की, "महारोगी भेटेल". असा तीन वेळा आवाज आला. मी फारसा विचार केला नाही. सकाळी उठल्यावर मी व पत्नीने द्वारकामाईत श्रीसाईबाबांच्या पादुकांची पूजा पहाटे ४.३० वाजता केली. त्यांना प्रसाद, नारळ, दक्षिणा अर्पण केली. पूर्वीच श्रीसाईबाबांनी आदेश दिल्याप्रमाणे मी नारळ व लाडू धुनीची पूजा करून धुनीत नेहमीच टाकतो, त्याप्रमाणे याही वेळेस ते अर्पण केले. ह्यालाच खरे समर्पण म्हणतात. नंतर बाहेर गेलो तर द्वारकामाई ते समाधी मंदिर याचे दरम्यान एका कट्ट्यावर एक वृध्द माणूस गुढगे छातीशी घेऊन कुडकुडत बसला होता. मला एकदम प्रेरणा झाली, मी तडक त्याचेकडे झेप घेतली. ताबडतोब नवी कोरी शाल श्रीसाईबाबांचे पुतळ्यास घालतात तशी पांघरली, लगेच लाडू तोंडात घातला व १ रुपया दक्षणा हातात दिली तर त्यावेळी मला एकदम संवेदना झाली की, ही बोटे महारोग्याची आहेत. ताबडतोब रात्रीच्या दृष्टांताची आठवण झाली. लगेच चिखल असतानाही डोके टेकून त्यांना श्रीसाईबाबा समजून नमस्कार केला व मोठ्याने हरिः ॐ बाबा हा घोष केला. यावेळी पत्नी व समाधी मंदिरात जाण्यासाठी लोकांची रांग लागली होती. ते सर्व, हे काय चालले आहे हे आश्चर्याने पहात होते. त्या वृध्दाने मला मोठ्या उदार अंतःकरणाने दोन हात वर करून भरघोस आशीर्वाद दिला. त्याच्या तोंडावर समाधानाचे हास्य होते. असे हे सर्व श्रीसाईंनी सांगितले त्याप्रमाणे मी केले. व श्रीसाईबाबांनी संतुष्ट व समाधानी केले. असा हा महान साक्षात्कार घडल्यानंतर मी व

पत्नीने समाधानाने श्रीसाईबाबांची पहाटे ५.०० वाजताची आरती झाल्यानंतर ६.३० वाजता निघून दुपारी सातारला ३.३० वा. शिर्डी कोल्हापूर गाडीने मंदीरातील उत्सवासाठी आलो.

असे हे दोन महान साक्षात्कार घडले. वाचकहो, विचार करा की, श्रीसाईबाबांनी आपले वचन पूर्ण करून दाखविले. त्यांचे वचन म्हणजे, "जया मनी जैसा भाव तया तैसा अनुभव" हे त्यांचे तत्व त्यांनी मला साक्षात्कार देऊन खरे करून दाखविले. धन्य ते श्रीसाईबाबा. अशा त्या श्रीसाईबाबांना कोटी कोटी प्रणाम करून मी माझी लेखणी त्यांचे चरणी स्थिरावतो.

# उदीचा प्रताप

**सौ. उषा दत्तात्रय महाजन**
७/६३, पौंड गावठण,
विलेपार्ले (पश्चिम),
मुंबई-४०००५६.

सन १९८३ मध्ये मी कंबरेने अतिशय हैराण झाले होते. मी घरची सगळी औषधे केली. पण काही गुण येईना. मग मी डॉक्टरकडे गेले. त्यांनी मला तपासले व औषधे दिली . ती मी घेतली. पण त्या औषधाने मला गॅस झाला. तो इतका की मला चालता येईना. म्हणून मी दुसऱ्या डॉक्टरकडे गेले. त्यांनी मला तपासले, एक्सरे काढला, कार्डीओग्राम काढला व सांगितले की अटॅक येण्याचा संभव आहे. तेव्हा हिला हॉस्पिटल मध्ये ॲडमिट करा. त्याप्रमाणे मला दुसऱ्या दिवशी नानावटी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. पण मी खोलीतून बाहेर पडतेवेळी बाबांची उदी घेतली व बाबांच्या फोटोसमोर उभे राहून प्रार्थना केली की, माझे सगळे रिपोर्ट चांगले असू देत म्हणून बाबांना सांगितले व हॉस्पिटलमध्ये गेले. डॉक्टरनी मला तपासले (त्यातच बाबांचा धावा चालू होता.) व माझा फोटो काढला. कार्डीओग्राम काढला. रक्त तपासले. रिपोर्ट चांगला आहे पण तुम्हाला हॉस्पिटलमध्ये रहावे लागेल, असे डॉक्टरने सांगितले.त्याप्रमाणे मी सहा दिवस राहिले व सातव्या दिवशी घरी आले. पण त्या दिवसांत मला कमरेपासून त्रास व्हावयास लागला म्हणून माझा कमरेचा फोटो काढला. (त्यावेळीही बाबांचा धावा चालू होता.) रिपोर्ट चांगला आला. घरी आल्यावर १-२ दिवस चांगले गेले. मग एकाएकी कापरी यावयास सुरवात झाली. ती सन १९८५ डिसेंबर पर्यंत चालू होती. तेवढ्या अवधीत सारखी बाबांची उदी व डॉक्टर चालू होता. आता ९०% आराम आहे. पण बाबांची उदी सारखी चालू आहे. पोटात घेणे व अंगाला सारखी लावणे. अजून १०% बाकी आहे. ती बाबांच्या आशीर्वादाने साफ व्हावी अशी मी बाबांकडे प्रार्थना करत आहे. घरातील सर्व माणसांवर बाबांची सतत सावली रहावी अशी मी बाबांना मनोभावे प्रार्थना करीत आहे.

# बाबांच्या कृपेने मुलाचा पुनर्जन्म

— श्री डब्ल्यू. के. शेलार
मुळे गल्ली, हतवळणेचा वाडा,
वैजापूर - ४२३ ७०१,
जि. औरंगाबाद.

माझ्या मुलाला जन्मतःच हृदयविकार झाला. बाळ दिड महिन्याचे असताना, या आजाराचे निदान झाले. परंतु अशा कोवळ्या वयात शस्त्रक्रिया करणे धोक्याचे होते. औषधोपचार चालू होता. एक दिवस अचानक बाळाची तब्येत बिघडली. सर्वांना वाटले की, आता मुलगा वाचणे शक्य नाही. मी त्याच दिवशी शिर्डीला जावून बाबांचे दर्शन, उदी व प्रसाद घेऊन घरी आलो. बाळाला उदी मिश्रित पाणी पाजले व ठरविले की, बाबांचे नाव सतत तोंडी रहावे म्हणून बाळाला 'साई' म्हणून हाक द्यायची व मी बाबांकडे मुलाच्या प्राणाची भीक मागू लागलो.

बाबांच्या कृपेने दुसऱ्याच दिवशी मुलाला बरे वाटू लागले. पुढे बाळ साई पाच वर्षाचा झाला. मी त्याचे हृदयाचे ऑपरेशन करण्याचा निर्णय घेतला. दिनांक २८ मे ८६ रोजी मी पत्नीसह बाळ साईला शिर्डीला घेवून गेलो. बाबांचे दर्शन, उदी, प्रसाद व आशीर्वाद घेवून पुढे मुंबईला रवाना झालो. मुंबईला कोणीही नातेवाईक किंवा ओळखीचे नसताना देखील बाबांच्या कृपेने एका संस्थानात आमची राहण्याची व जेवणाची मोफत सोय् झाली. एका प्रख्यात रुग्णालयामध्ये बाबांच्या कृपेने त्याच दिवशी ॲडमिशन मिळाले, तिथे फक्त ॲडमिशनसाठी एक एक महिना वाट पहावी लागते.

दिनांक ९।६।८६ रोजी 'ओपन हार्ट सर्जरी' ह्या शस्त्रक्रियेसाठी बाळाला नेण्यात आले. बाळाला त्यासाठी अगोदर १२ तासापासून अन्न-पाणी बंद केले होते. मी बाबांची उदी बाळाच्या अंगाला लावली व थोडी त्याच्या जिभेला लावली. आम्ही ऑपरेशन थिएटर बाहेर साश्रु नयनांनी बाबांचा धावा करीत होतो. मी बाबांना साक्षी ठेवून ज्या गोष्टी मला सोडून द्यायला पाहिजे होत्या त्या सोडल्या. बाबांच्या कृपेने ऑपरेशन यशस्वी झाले. आम्हाला बाबांच्या लीलांचे कौतुक वाटले व आम्ही धन्य धन्य झालो.

परंतु आपल्या नशिबी काही भोग असतील तर ते भोगावेच लागतात आणि ते फक्त बाबांच्या कृपेनेच टळू शकतात. याप्रमाणे आठ दिवसानंतर ऑपरेशनच्या टाक्यांच्या जागी सूज येवून रक्तप्रवाह सुरू झाला. डॉक्टरांनी आम्हाला धीर दिला. परंतु बाळाला प्राणांतिक वेदना होऊ लागल्या होत्या. पुढे चार-पाच दिवसांपर्यंत रक्तप्रवाह बंद न झाल्यामुळे डॉक्टरांनी परत रिओपन करून रक्तप्रवाह बंद करावा लागेल म्हणून सांगितले. आम्ही दोघे खूप दुःखी झालो. मुंबईसारख्या ठिकाणी अशा परिस्थितीत बाबांशिवाय आमचं कोणी नव्हतं.

डॉक्टरांनी 'रिओपन'ची तारीख दिली. नंतर मी गावी तार करण्यासाठी रात्री ११.३० वाजता भर पावसात फाऊंटन येथील कार्यालयात गेलो. परत येताना पावसामुळे रस्त्यावरची पादचाऱ्याची संख्या एकदमच रोडावल्यामुळे वातावरण भयाण वाटत होते. मी रस्त्याने

अक्षरशः रडून बाबांकडे रिओपन शस्त्रक्रिया न होता बाळ साईच्या प्राणाची भीक मागत होतो. त्यावेळेस केवळ बाबांची प्रतिमा डोळ्यासमोर होती. मी म्हणत होतो, बाबा, तुम्ही तुमची निंदा करणाऱ्या कुळकर्णी सारख्यांचे (बाबांच्या हयातीत कुळकर्णी हा गृहस्थ नेहमी बाबांची निंदा करीत असे.) प्राण वाचविले. आम्ही तर तुमचे भक्त आहोत. माझ्या मुलाला तुम्ही जीवदान देऊ शकता व ते मिळायलाच पाहिजे. याउपर उलट जर काही होणार असेल तर असो. तरीही बाबा, मी तुमची भक्ती करणार. पण तेव्हा माझ्या मनात सतत एक बोचणी लागून राहिलेली असेल की, आपण बाबांचा धावा करूनही मुलगा वाचला नाही. माझी ती मनःस्थिती नंतर तुमच्या दरबाराला शोभणार नाही. कारण तुमच्याकडे येणारा प्रत्येकजण हा काही ना काही मिळवून जातो. संतुष्ट होतो मग मीच कसा दुःखी?

आणि काय चमत्कार! दुसऱ्याच दिवशी बाळ साईचा रक्तप्रवाह थांबला. डॉक्टरांनी नंतर एक्स-रे काढून रक्तप्रवाह पूर्णपणे आतून बंद झाल्याची खात्री करून घेतली. रक्तप्रवाह बंद झाल्यामुळे पुढील रिओपनचे ऑपरेशन रद्द झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. हे ऐकून आम्ही अगदी धन्य धन्य झालो व बाबांच्या अगाध लीलांची आम्हाला खात्री झाली. बाबांच्या या लीलांचे कौतुक करण्यास माझे शब्द अपुरे पडत आहेत.

पुढे दिवसेंदिवस बाळ साईची प्रकृती सुधारत गेली व आम्हाला ३१।७।८६ रोजी डॉक्टरांनी दवाखान्यातून सुट्टी दिली. आम्ही ठरल्याप्रमाणे त्याच दिवशी रात्रीच्या गाडीने बाळ साईला घेऊन प्रथम शिर्डीला गेलो. बाबांचे दर्शन घेऊन सुखरूप घरी परत आलो.

# बाबांचे घडता स्मरण, दुःखास मिळे विराम

— श्री. भालचंद्र के. गंद्रे
सुख निवास, चेंदणी, ठाणे.

श्रीसाईलीलेतील भक्तांचे एकेक अनुभव वाचून मन थक्क होऊन जाई. इतक्या क्षुल्लक व छोट्याशा वाटणाऱ्या घटनांतही बाबा लक्ष घालून भक्तांची अडचण कशी दूर करतात हे वाचल्यावर खरच अचंबा वाटला. इतरेजनांना चमत्कार दाखविणारे बाबा आपणासही चमत्कार दाखवतील का? ह्या विचाराने मनाला घेरले. नि त्याची प्रचिति आपणासही सहज येते का? हे पाहण्यासाठी मीही संकल्प केला की जर मला अनुभव आला तर साईलीलेत देईन. नि काय अद्‌भूत लीला पहा -

निवडणुकीच्यावेळी माझी फार दूरवरच्या व खराब ठिकाणी नेमणूक झाली होती. बाबांचे स्मरण करून माझी ही व्यथा मी तेथील अधिकाऱ्यांना सांगितली. नि त्यांनी मजकडे पाहून लागलीच माझी मागणी मंजूर केली व माझ्या मनावर असलेले भितीचे दडपण क्षणात नाहीसे झाले.

बाबा भक्तांच्या क्षुल्लक घटनेवरही लक्ष ठेवतात नि श्रद्धा ठेवली तर कुणाचीही अडचण क्षणात दूर होते याचा हा जिवंत अनुभव !

# शांतीचा अमोल ठेवा — साईप्रसाद

**सौ. स्मिता सावंत**
'धनकुंज', तानाजी नगर,
चिंचवड गाव, पुणे— ३३.

माझ्या मोठ्या दोन बहिणींना पहिल्या ३।३ मुलीच आहेत. आणि आम्हालाही पहिली मुलगीच आहे. आता तिच्यानंतर आम्हालाही मुलगीच होणार की काय? ही घोर चिंता नेहमीच मनाला सतावत होती. तशातच मोठ्या मुलीनंतर ४/४।। वर्षानंतर मला दिवस गेले होते. पण तीन महिन्यांनी माझे ॲबोर्शन झाले.( त्यावेळी साईनाम स्मरणाबद्दल मला काहीच माहीत नव्हते. ) त्यानंतर बरेच महिने मला गर्भधारणा रहात नव्हती. आम्ही दोघे फारच निराश झालो होतो. तशातच घरातही शुल्लक कारणांनी क्लेशही होऊ लागले. त्यामुळे घरात शांती तर नव्हतीच परंतु मनही उदास, बेचैन होत होते. अशावेळी माझी बहीण व मेव्हणे यांच्या सल्ल्याप्रमाणे आम्ही दोघांनी श्री साईचरणी लीन होऊन साईमातेला हाक मारुन, 'साईनाथा, आमचा अधिक अंत न पहाता घरात शांती येवून आम्हाला तुझ्या आशीर्वादाने मुलगा होऊ दे. तुझ्या चरणी बारा महिने येऊन बारा फेऱ्या पूर्ण करेन.' असे नवस माझ्या पतीने केले आणि खरेच, साईमाता आपल्या वचनांना जागून आमच्या हाकेला धाऊन आली. दोन महिन्यातच मला गर्भधारणा राहून आम्हाला श्री साईमातेने आपला कृपा प्रसाद आम्हाला माझ्या पुत्राच्या रुपात दिला आणि म्हणूनच आम्हीही आमच्या मुलाचे नाव 'प्रसाद' ठेवले आहे. बोलल्याप्रमाणे माझ्या पतीने साईचरणी बारा महिने जावून बारा फेऱ्या पूर्ण केल्या. त्यानंतर बाळ प्रसाद व मुलीसह आम्ही वर्षातून १/२ वेळा तरी पवित्रक्षेत्री शिर्डीस जावून साईचरणी नतमस्तक होवून समाधानाने घरी येतो. आज साईकृपेमुळेच आम्हाला आमच्या संसारी शांतीसमाधानाचा उपभोग घेता येत आहे.

आमच्या घरी गुरुवार हा दिवस फारच मंगल दिवस वाटतो. त्यादिवशी पूजा — पोथीवाचन — सर्व आरत्या — उदीप्राशन करुनच दिवसाचा प्रारंभ आम्ही करतो. आरत्या करताना आम्ही सर्व तल्लीन होवून जातो. त्यावेळेस घरातील वातावरणच मुळी साईमय होवून जाते. (आमची दोन्ही मुले आमच्यासारखीच धार्मिक वृत्तीची आहेत.) माझ्या घरातील देव्हाऱ्यात श्रीसाईसमाधीचा फोटो लावल्यापासून मला वाटत. असलेले भय पारच पळून गेले आहे. (तसा माझा स्वभाव फारच भित्रा होता.) परंतु आता बाबांची सावलीच माझ्या पाठीशी वावरत आहे असे मला वाटते. त्यामुळे आता मी बरीच धीट बनले आहे. साईंच्या पवित्र नामस्मरणानेही मनाला केवढा उत्साह व शांती लाभते हे सर्व भाविक अनुभवतच आहेत.

या ३/४ वर्षात आम्हाला आलेल्या सुखानुभवांनी मन आनंदाने उचंबळून येते तर नयन प्रेमाश्रूंनी दाटून येतात. हे साईनाथा, अशीच तुझी कृपादृष्टी सर्व भक्तजनांवर सदैव राहो हीच आमची सदिच्छा!

# एक अनुभव

— श्री. तुकाराम गणपत पोयरेकर
६१६-ए/२६, लक्ष्मी बिल्डींग,
ना.म.जोशी मार्ग,
भायखळा, मुंबई - ४०००२७.

जरी हे शरीर गेलो मी टाकून। तरी मी धावेन भक्तांसाठी।।

ह्या श्री साईबाबांच्या वचनाची पूर्ती मला झाली. मी आणि माझे मित्र श्री. केरावाला आम्ही दि. ३-१२-८५ रोजी सकाळी ११ वा. च्या एस्.टी.ने शिर्डीस जाण्यास निघालो. गाडीचे चालक व वाहक चांगले होते व गाडी व्यवस्थित आणि चांगल्या वेगाने शिर्डीस आगेकूच करीत होती. आम्ही दुपारी ४ वाजता नाशिक एस्.टी. स्थानकावर पोहोचलो.

गाडीच्या वाहकाने सांगितले की, गाडी १० मिनिटे येथे उभी राहणार तेव्हा आम्ही लगेच उपहारगृहात चहा पिण्यास गेलो. आमच्या समोरच गाडीचे चालक व वाहक चहा पिण्यास बसले होते. चहा पिऊन आम्ही पैसे देत असताना आमच्या गाडीचे चालक व वाहक उठले. तेव्हा आम्ही लगेच गाडीकडे निघालो परंतु गाडी निघून गेली होती. आम्ही नाशिक स्थानकाच्या डेपो मॅनेजरला भेटलो व त्याला सांगितले की, आम्ही शिर्डी गाडीचे प्रवासी आहोत व गाडी निघून गेली. आमच्या बॅग्ज व त्यामध्ये पैसे, कपडे आणि साईसच्चरित वगैरे होते. परंतु डेपो मॅनेजरने सांगितले की, आम्ही तुम्हास शिर्डीपर्यंत पोहचण्याची व्यवस्था करू. आम्ही त्यांना पुढील स्थानकावर टेलीफोन करून गाडी थांबविण्यास सांगितले. नंतर आम्ही नाशिक रोड स्थानकावर गेलो परंतु तेथे आम्हाला सांगण्यात आले की, गाडी येथे आलीच नाही. तेव्हा आम्हाला काहीच सुचेनासे झाले. मी श्री साईबाबांस प्रार्थना केली आणि सांगितले की, जर बॅग्ज आणि साईसच्चरित परत मिळाले नाही तर मी शिर्डीस आपल्या दर्शनाला येणार नाही आणि साईसच्चरित जर मिळाले नाही तर परत विकत घेणार नाही आणि वाचणारसुध्दा नाही.

नंतर आम्ही डेपो मॅनेजरला सांगून सिन्नरला गाडी अडविण्यास सांगितले परंतु तेथेही कोणी दखल घेतली नाही. शेवटी गाडीने शिर्डीस आलो. शिर्डीला उतरुन डेपो मॅनेजरला भेटलो व त्यांना झालेल्या सर्व गोष्टी सांगितल्या. तेव्हा त्यांनी सांगितले की, येथे तुमचे सामान उतरले गेले नाही आणि गाडी कोपरगांव स्थानकाला गेली. तेव्हा तुम्ही तिकडे जाऊन चौकशी करा. त्यांच्या ऑफिस मधून बाहेर पडलो तेव्हा आमच्या गाडीचे चालक व वाहक दिसले. त्यांच्याकडे चौकशी केली तेव्हा त्यांनी सांगितले की, तुमचे सामान कोपरगाव स्थानकावर जमा करण्यात आले आहे. तेव्हा तुम्ही तिकडे जाऊन ते तुमच्या ताब्यात घ्या. तसे केल्यानंतर आम्ही श्री साईबाबांचे दर्शन घेतले.

# बाबा मला द्यावी सोबत

सौ. लिलावती तु. बिनसाळे
२२, शालीमार, नवयुग नगर,
एस्. व्ही. रोड, दहिसर ( पूर्व ),
मुंबई नं.— ४०००६८.

मी दरवर्षी माझ्या गावी जात असते, परंतु सोबतीविना व तेथे होणाऱ्या गैरसोयीमुळे मला निराशेने मुंबईला येणे भाग पडते. माझी मुले देखील मला एकटीला गावी पाठवत नाहीत. मला तर निसर्गात रहाणे फार आवडते. आणि गावी तर मी एकटी राहू शकत नाही. मला साईबाबांचे अनेक अनुभव आले आहेत. आणि माझी त्यांच्यावर श्रध्दा देखील असल्याने मला सोबत मिळावी म्हणून मी बाबांचा धावा केला. एक दिवस माझी एक मैत्रीण घरी आली होती. बोलता बोलता मला गावी जायचे आहे, परंतु त्यात येणारी अडचण मी तिला सांगितली. तेव्हा ती म्हणाली, 'माझ्या लहान बहिणीची मुलगी आहे. तू तिला घेऊन जा. बघ तुला ती कशी वाटते. तुला दाखविण्याकरिता मी तिला मंगळवारी घेऊन येते'. बोलल्याप्रमाणे ती मुलीला घेऊन माझ्या घरी आली. पाहाताक्षणी मला मुलगी आवडली. मुलगी ८-९ वर्षाची चुणचुणीत, चटपटीत होती. तिला पहाताच मी साईबाबांचे मनोमन आभार मानले व मुलाला आमच्या दोघींचे गावी जाण्याचे तिकीट काढण्यास सांगितले. गावी ह्या मुलीने मला कोणताही त्रास दिला नाही.

तसेच एकदा गावी असताना माझे घरचे काम अर्धवट राहिले होते. ते पूर्ण करण्यासाठी मला माणूस मिळत नव्हता. तेव्हा साईंना माझी अडचण सांगितली, नि काय आश्चर्य! दुसऱ्या दिवशी ४ वाजता एक अपरिचीत व्यक्तीने येऊन माझ्या घराचे काम पूर्ण करुन दिले. एवढेच नव्हे तर, एप्रिल महिन्यात नातवंडांना शाळेच्या सुट्टीत गावी घेऊन येतो, असे पत्र मला पाठविले. म्हणून मी हापूस आंबे काढून पिकत ठेवले. पण तिकीट न मिळाल्याने नातवंडे येऊ शकली नाहीत. व येथे माझे आंबे खराब होऊ लागले. काय करावे सुचत नव्हते. १ मे १९८६ च्या सकाळी ७ वाजता साईंना दिवा लावला नी मुलांची वाट पहात बसले. इतक्यात आमचे स्नेही आप्पा आले. ते दोन दिवसांनी मुंबईला जाणार होते. म्हणून मी त्यांच्याकडे चांगलेसे आंबे निवडून करंडा भरुन दिला. ते आपल्या घरी गेल्यावर मला माझ्या मुलाचे १ तारखेला येणार असल्याचे पत्र मिळाले. आंबे जरी मुंबईच्या प्रवासाला गेले असले तरी उरलेले काही अर्धेकच्चे, पिके आंबे खाऊन २० दिवसांनी मुले मुंबईला गेली. मी मात्र त्यांच्या मागून ७ दिवसांनी मुंबईला आले. आतापर्यंत मला साईबाबांचे अनेक अनुभव आले आहेत. आमच्या घरातील सर्वजण साईंचे भक्त आहेत. माझा मोठा मुलगा तर अधुनमधून साईदर्शनाला जातच असतो.



# साई कृपेने पास झालो

— श्री. मुकुंद द. मोरे
सी. एम्. पटेल हाऊस,
चारपुल, मु. पो. नवसारी,
जि. बलसाड, गुजराथ.

श्री साईबाबांच्या लीला अगाध आहेत. त्यांचे प्रत्यंतर सर्वच साईभक्तांना येत असते. मलाही असाच अनुभव आला. तो पुढे उद्धृत करीत आहे.

माझी वाणिज्य शाखेची शेवटची परिक्षा चालू होती. मी पूर्ण तयारीनिशी परिक्षेला समोर गेलो होतो. पण पेपर कठीण जात होते. अशाप्रकारे पेपर कठीण गेले तर आपली धडगत नाही. हे सतत जाणवत राहिल्याने मनाला हुरहूर लागून राहिली होती. माझी व्यथा मी आईसमोर मांडली. आई साईभक्त असल्याने; तिने बाबांना साकडे घातले की, मुलास उतीर्ण केलेस तर त्याला शिरडीस घेऊन येईन.

परिक्षेला जात असताना आई मला बाबांची विभूती पाण्यातून पिण्यास व उत्तर पत्रिकेस लावण्यासाठी देत असे. परिक्षा दिली होती. परंतु दोन पेपर कठिण गेल्याने पास होईन की नाही, याबाबत शाश्वती नव्हती. मी पेपर कसे लिहिले हे केवळ मला व पेपर तपासणीकालाच माहित! आणखीही एका दिव्य विभूतीला हे ठाऊक होते. जी संकटकाळी आपल्या भक्ताला तारुन नेते. त्याच दयाघनाने 'न भुतो न भविष्यती' घडवून दाखविले आणि मला उत्तीर्ण केले. ही महाशक्ती कोण, हे साईभक्तांनी ओळखले असेलच. अर्थात ते होते श्री साईनाथ महाराज. ज्यांची कृपादृष्टी आपल्या सर्व भक्तांवर सदोदित असते.

# एक अनुभव.... अनेक अनुभव

— श्री. गुरुदास कामत बाबोळकर
महालक्ष्मी बांदिवडे, फोंडा,
गोवा - ४०३ ४०१.

अचानक सहज गाठ पडावी, तशीच श्री बाबांची आणि आमची गाठ पडली.

देव्हाऱ्यात बाबांचा फोटो तसा पहिल्यापासूनच होता. अन्य देवादिकांचेही फोटो देव्हाऱ्यात होते. पण खर सांगायच म्हणजे, बाबांची ओळख झाली ती तब्बल बावीस वर्षानंतर. म्हणजे १९५८ ते १९८० ह्या कालखंडानंतरच!

तेव्हापासून 'श्रीबाबा' आमचं आराध्य दैवत बनलं आणि त्या क्षणापासून —

—.बाबांवर आमच प्रेम जडलं!

— ध्यानी-मनी-स्वप्नी बाबा दिसू लागले!!

— प्रत्येक खोलीत छबीच्या रूपाने 'बाबा' वावरू लागले!!!

कुणी नूतन वर्षाची भेट म्हणून कॅलेंडर्स, कुणी शिर्डीहून आणलेली छबी, लॉकेट, तर कुणी....

तात्पर्य, 'श्रीबाबा' ह्या ना त्या रूपाने आमच्या वास्तूत ये-जा करू लागले. म्हणता म्हणता दर महिन्याला 'साईलीला' अंक नियमितपणे येवू लागला. मनिऑर्डर पाठवली म्हणजे उदी प्रसाद घरपोच लाभण्याचा मार्ग मिळाला. एकापेक्षा दोन 'श्री साई सच्चरित्' ग्रंथ आले. लागोपाठ आरतीच्या कॅसेटपण आल्या.

बाबांची नित्यनेमाने मनोभावे पूजन सेवा, श्रीसाई सच्चरिताचे वाचन- मनन-आचरण, दर सोमवारी व गुरुवारी कॅसेटवरल्या आरती श्रवण, सुगंधीत उदबत्ती व धूप-उद जळणं....

....हळूहळू आमची वास्तूच साईमय होऊन गेली. पहाटे जाग आल्यापासून तो रात्री झोपेपर्यंत लहानांपासून थोरांपर्यंत, अजाणांपासून सूजाणांपर्यंत एकच नाम, एकच ध्यास, एकच जप — हरी ॐ बाबाऽऽ

मग जीवनात कशाची उणीव? कसले त्रास? कसली चिंता?

जीवनातील एकेक गुंता अलगद सुटू लागला. मनातील अनेक मनोकामना एकामागोमाग एक सफल होवू लागल्या.

व्यवहारातील अनेक बिकट व कठिण कार्य विनाअडचणी निर्विघ्नपणे चुटकी सरशी पार पडू लागले.

तरीही, काही गुंते बऱ्याच्च मनोकामना तशाच्च पडून राहिल्या.

बाबांच्या ह्या करणीनं मन खिन्न झालं. दुःख झालं. हे गुंते मनोकामना सफल झाल्या असत्या तर, जीवनाचा, आयुष्याचा कायापालट होवून अगदी सुखात लोळलो असतो....

तर मग का म्हणून बाबांनी हा मनस्ताप आम्हा भक्तांना घडवावा? अधून मधून बाबा असे कठोर का बर वागतात? तोंडचा घास का म्हणून हिरावून घेतात?

अनेक शंका! अनेक अनुत्तरीत प्रश्न!!

पण खरोखरीच बाबा आपल्या भक्तांना अशी शिक्षा देतील काय?

अर्थातच्च नाही. कारण, त्यावेळचा गुंता तेव्हाच सुटला असता तर....?

पुढे एका कठिण अवस्थेतून जावं लागलं असतं.

त्यावेळची मनोकामना त्याचवेळी सफल झाली असती तर...? — आगीतून निसटून फोफाट्यात पडल्यासारखच झालं असतं.

आणि कार्य? — सफल न झाल्यामुळेच आज सुखात, समाधानात लोळत आहोत.

असे अनेक अनुभव.... अनेक प्रचिती!....

कितीही लिहिल्या तरीही न संपणाऱ्या... कथिल्या तरीही पूर्ण न होणाऱ्या... ऐकल्या तरी ऐकत रहावं असं वाटणाऱ्या...

# साईराजा, तुम्हीच माझे कल्पतरू

सौ. निलिमा (इंदुमती) ज. नाईक
११ ॐ, विवेकानंद,
शिवसृष्टी, कुर्ला-२४.

अगाध तुझा महिमा। अकल्पित तुझी चमत्कृती। तुझ्या चरणाशी नम्र ही इंदुमति। काय करु देवा, कसे लिहू सांगा? लिहावे असे जरि मनात, तरी लेखणीत ऊतरेना। टोचणी लागे जिवाला, विचार झोंबे मनाला। विलंब जरी फार जाहला, तरी बुद्धीस उजाळा द्यावा। कृपासिंधु असता दयाघना, का आटला स्फूर्तीचा झरा। शरणागतीचा मार्ग आखला, स्फूर्तीलहरी उचंबळूनी आल्या। आनंदाचा पाऊस पडला, शब्दांचा सडा पाडला। शब्द होता दिला साईला, साईलीला मासिकाद्वारे सांगेन जगाला। सद्गुरु साईनाथांच्या प्रेरणेने म्हणूनी, अनुभव हा मांडिला। आनंद नाम सुपुत्र माझा, छोटा नाईक म्हणती बाबा त्याला। दहावीत असूनही अभ्यासाचा विचार, न शिवे त्याच्या मनाला। परि महत्‌घोर माझ्या जिवाला, पहिली चाचणी परिक्षा। उत्तीर्ण झाला, गर्वाने, अभिमानाने फुलून गेला। सहामाहीतच नक्षा ऊतरला, सर्व विषयांतचि नापासच झाला। घर हे, पितापुत्राचे रणमैदान होऊनी, माझाही रडून आकांतचि झाला। नऊमाहीला साईमाऊलीने मार्ग सुधारिला, चार विषयांत चिरंजीव पासचि झाला। बोर्डाच्या परिक्षेपर्यंत ओंजारुन गोंजारुन अभ्यास करुन घेतला, परिक्षेच्या दिवशी साईचा धावा केला। दयावन्त, कृपावन्त तुम्हीच त्याचा पाठिराखा, परिक्षामंडपि पोचविताना, पायचि लचकला। द्वारापाशी जाताच क्षणीं साष्टांगचि घातला, माझा जरि पाय घसरला। तरी तारा लेकराला, हेचि मागणे देवा, साईनाथा तुजला।

खेळण्यात, हिंडण्यात, मौजेत तीन महिन्यांचा काळ संपला, परि साईसाधनेत खंड न पाडिला। कालचक्र कुणी न हे थांबवू शकला, रवि कार्याचा रथ चालूनी निकालाचा दिवस उजाडला। साईश्यामला वंदन करुनि, आनंदासि शुभेच्छा चिंतूनि, कर्मभूमीत प्रवेश केला। हात काम करता करता, मन धावे सैरावैरा। सूर्योदय हा झाला मंगल, परि सूर्यास्तचि कैसा? आपलेच नाणे खोटे असता, प्रभूशीच का कष्टी करता? तरीही साईमाऊली, दयेचीच साऊली, क्षमा करी बालका। धाव, पाव ब्रह्मांडनायका, दूर करी चिंता।

सायंकाळी नसतेच झंझट, युनियन सभेचा प्रस्ताव झाला। जीव काळजात धडकला, साईपदी विश्वास ठेऊनि, साईनाम जपूनी ओठी। गृहद्वाराशी पाय ठेविला, साईबाबांचे नाव घेऊनि दरवाजा ठोठावला। चिंतातूर परि मनी समाधानी, पुत्रमुख देखिता। मनाची वाढली चंचलता, काय जाहले? सांग एकदा, प्राण कंठी आला। घाबरु नकोस माते, बहुगुण न मिळता फक्त पासचि जाहलो, इति आनंदचि वदला। धावत सुटले, साईबाबांचे पायचि धरले, आनंदाश्रूंनी साईनाथा न्हाऊ घातले। माथा उचलूनी कृतज्ञतेने दयाघना पाहिले, साईवचन ते स्मृतीतच भिनले।

जो जो मज भजे। जैसा जैसा भावे। तैसा तैसा पावे। मीही त्यासी।

# श्री दत्तसाई

**श्री. यशवंत गो. भंडारी**
कांदिवली, मुंबई- ४०००६७.

अकरा वर्षांपूर्वीची ती घटना, अजूनही स्मृतीपटलावर अथ पासून इती पर्यंत जशीच्या तशी ताजी आहे. दत्तजयंती निमित्त गाणगापूरला जाऊन दत्ताचे दर्शन घ्यायची योजना आखली. गुरुवारी दत्तजयंतीला गाणगापूरला पोचता यावे म्हणून आदल्या दिवशी म्हणजेच बुधवारच्या 'मद्रास मेल' मध्ये आरक्षण केले. परंतु का कुणास ठाऊक? त्यादिवशी रेल्वेस्थानकावर पोचावयाला मला उशीर झाला. दहा मिनिटापूर्वीच गाडी सुटून गेली होती. मन खिन्न झाले. द्विधा मनःस्थितीमुळे काय करावे तेच उमजेना. थोडा वेळ शांत चित्ताने विचार केला. गाणगापूरी जाता आले नाही म्हणून काय झाले, शिरडीस दत्ताचे दर्शन घडेल असे अंर्तमन सांगू लागले. आणि तात्काळ शिरडी गाठण्याचा निर्णय मी घेतला. मुंबई सेंट्रलला एस्. टी. पकडून सायंकाळी शिरडीला पोहचलो. इतरत्र कुठेही वेळ न दवडता तडक साईमंदिरात जाऊन बाबांचे ओझरते दर्शन घेतले. दुसऱ्या दिवशी गुरुवार व दत्तजयंती असल्याने, मंदिरात भाविकांची अलोट गर्दी लोटली होती. साईबाबांचे दर्शन घेतांना, मी त्यांच्या चरणकमलावर मस्तक ठेवले. आराधना करण्यासाठी डोळे मिटले आणि काय आश्चर्य! साक्षात श्री दत्तमहाराज समोर उभे ठाकल्याचा भास मला झाला. आणि तत्क्षणी शिरडी हेच गाणगापूर, माझ्या दत्तगुरुंचे हेच स्थान. ही खूणगाठ मी मनाशी बांधली. आतापर्यंत शिरडीच्या साईबाबांबद्दल मला कोणतीच आत्मियता नव्हती, हे विशेष. मात्र वर निर्देशित केलेल्या घटने नंतर माझ्यात परिवर्तन झाले. साईबाबांशी असलेल्या ऋणानुबंधामुळे कळत न कळत मी बाबांकडे आकर्षित झालो. आणि साईभक्तीत तल्लीन होऊ लागलो. माझा एकही क्षण दत्तसाईनामा शिवाय पुढे जातच नाही. इतका मी साईमहात्मेने भारावून गेलो आहे. वर्षातून ५-६ वेळा तरी माझ्या शिरडी वाऱ्या होतातच. भक्ती करण्याचे मार्ग भिन्न असले तरी ती एकाच परमेश्वराप्रत पोहचते. म्हणूनच, 'सबका मालिक एक' हे घोषवाक्य अर्थपूर्ण आहे.

श्री साई वरदहस्ताचा आणखी एक अनुभव मला माझ्या मुलाच्या आजारपणात आला. सन १९८५ मध्ये माझा मोठा मुलगा 'अॅपेंडिक्सच्या' आजाराने अगदीच जर्जर झाला होता. त्यामुळे त्याला रुग्णालयात दाखल करणे भाग पडले. डॉक्टरांनी यशस्वीरित्या शस्त्रक्रिया पार पाडली. परंतु शुध्दीत आल्यानंतर तासाभरात मुलाची दातखिळ बसून त्याचे डोळे गरागरा फिरु लागले. डॉक्टरांची एकच तारांबळ उडाली. प्रमुख डॉक्टरांना पाचारण करण्यात आले. परंतु यश काही पदरी पडत नव्हते. सर्वजण हवालदील झाले. मी मात्र साईचा धावा करीत होतो. मनोमनी त्यांच्या पायाशी गडगडत होतो. त्यांच्याकडे करुणा भाकत होतो. असे मी करीत असतानाच जादूची कांडी फिरल्यागत मुलाने डोळे उघडले. काही क्षणापूर्वी निश्चेष्ट पडलेला माझा मुलगा यथास्थित शुध्दीवर आला. एवढेच नव्हे तर आठ दिवसात पूर्ण बरा होऊन तो शाळेतही जाऊ लागला. असा हा साईचा महिमा वर्णावा तरी किती?

# श्री साई पोस्टमन

— सौ. प्रमिला रामदास पगारे
मु. पो. उमराण,
ता. नवापूर, जि. धुळे.

श्री साईलीला मासिकाचे माझे पती वाचक आहेत. तसेच वर्गणीदार आहेत. आम्ही दोघेही साईभक्त आहोत. साई भक्तांना संकटात साथ देतात, याचा ज्वलंत अनुभव ता. १६.६.८६ ला मला आला. पंधरा दिवस झाले तरी अंक येत नाही, म्हणून मी वाट पहात होते. माझे पती कवी आहेत. त्यांच्या कविता साईलीला मासिकात येत असतात. तारीख १६.६.८६ ला मला स्वप्न पडले, स्वप्नात पोस्टमन येऊन मागच्या दारात श्री साईलीला पुस्तक टाकून गेले व जाता जाता पोस्टमन म्हणाला, तुमच्या पतीची कविता काही या अंकात आली नाही, व निघून गेला. ती साखर झोपेची वेळ होती. त्यामुळे मला स्वप्नाची पूर्ण आठवण राहिली. मी त्यांना जाग आल्याक्षणी स्वप्न सांगितले. बघा हो, मागच्या दारी पोस्टमन श्री साईलीला मासिक टाकून गेले. परंतु तुमची कविता आली नाही असे सांगितले. त्यांनी माझ्या स्वप्नाकडे लक्ष दिले नाही. मी मागचे दार झाडून साफ करण्यास दरवाजा उघडला तर मागच्यादारी मोठा नाग होता. दरवाजाचा आवाज ऐकून तो पळ काढू लागला. मी त्यांना सागितले, अहो मागच्यादारी साप आहे. मी घाबरुन गेले होते. अंगाला घाम फुटला. बोलणे सुचत नव्हते. ते मात्र घरातून मोठी काठी घेऊन आले व त्याला त्यांनी मारून टाकले. शेजाऱ्यापाजाऱ्यांनी पाहिले परंतु त्यांनी स्वप्नाचा अर्थ समजून न घेता सापाला मारून टाकले, ती हुरहूर मनाला लागून आहे. एवढे मात्र खरे की, संकटाची सूचना पोस्टमन रुपाने साईंनी मला दिली नसती तर नजर चुकून माझा पाय सापावर पडला असता; तर काय झाले असते? त्याच दिवशी दुपारी साईलीला मासिक मिळाले व खरोखर त्यात माझ्या पतीची कविता नव्हती.

धन्य ती साई माऊली
संकट समयी झाली सावली

# बाबांनी कायम नोकरी दिली.

श्री.देविदास बनारस शिंदे,
बी. एस्. सी. (मायक्रो), डी. एम्. एल्. टी.,
सहाय्यक अणुजीव शास्त्रज्ञ, जिल्हा आरोग्य प्रयोग शाळा, रत्नागिरी.

साईलीला अंकाचे सभासद व्हावे व ज्ञानार्जन करावे अशी बऱ्याच दिवसापासूनची माझी इच्छा होती. तशी १९८३ पासून भगवान शंभूमहादेव व साईंची उपासना मी करीत आहे. 'ओम् नमः शिवाय' व 'श्रध्दा सबूरी' हे दोन शब्द माझ्या मुखी नित्य

असतात. अणूजीव सहाय्यक म्हणून जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, रत्नागिरी येथे आठ महिन्यांच्या तात्पुरत्या सेवेत असताना; मी कायम नोकरी मिळविण्यासाठी अहोरात्र धडपड करीत होतो. कायम नोकरी मिळावी म्हणून मी साईबाबांकडे मनोमनी इच्छा प्रदर्शित केली. साईलीला मासिकाचा सभासद होण्यासाठी मनीऑर्डरही पाठविली. आणि सुखद धक्का बसावा अशी मला प्रचिती आली. जे काम आठ महिने धावपळ करुनही होत नव्हते ते अवघ्या आठ दिवसात झाले.

कायम नोकरीच्या शोधार्थ मला पुण्यास जावे लागले. रत्नागिरी-पुणे प्रवासात नाना अडचणी उद्‌भवल्या परंतु त्यातून बाबांनी मला तारले. पुण्याला जाण्यासाठी ११ जून १९८६ ला सकाळी आरक्षण करण्याच्या निमित्ताने रांगेत उभा राहिलो. दोन तास ताटकळत उभ राहूनही मला आरक्षण काही मिळाले नाही. बाबांवर विश्वास ठेऊन मी कार्यालयात परतलो. कार्यालयीन वेळ संपल्यानंतर साई नित्यपाठ व शिवपाठ यांचे वाचन केले. साईची प्रतिमा सोबत घेतली व पुन्हा प्रवासास निघालो. एस्. टी. स्थानकावर आलो. रात्री ८.१५ ची रत्नागिरी-पुणे एस्. टी. होती. ती सुटावयास अर्धा तास वेळ होता. उद्याचे काय होईल ह्या चिंतेने मी ग्रासलो होतो. त्याचबरोबर बाबांचे स्मरणही करीत होतो. तेव्हढ्यात एक अनोळखी व्यक्ती माझ्याकडे आली. व तिने आपण पुण्यास जात आहात का? अशी मला विचारणा केली. मी होकार देताच त्या व्यक्तीने 'माझा भाऊ पुण्यास जाणार होता परंतु काही कारणास्तव त्याचे जाणे रद्द झाले' असे सांगून मला रत्नागिरी-पुणे गाडीतील आरक्षण घेण्यास विनंती केली. मी त्वरीत त्याच्याकडील आरक्षण घेतले. कारण मला रत्नागिरी-पुणे गाडीत जागा मिळण्याची आवश्यकता होतीच. आरक्षण देणारी व्यक्ती दुसरी तिसरी कोणी नसून प्रत्यक्ष साईबाबा होते हे मी ताडले. पुढील प्रवास सुखकर होऊन मी दुसऱ्या दिवशी पुण्यात पोहोचलो. त्या दिवशी तारीख होती १२ जून १९८६ व वार होता गुरुवार! साईंचे दर्शन व नामस्मरण करुन मी पुणे येथील डेप्युटी डायरेक्टरांच्या कार्यालयात गेलो. अवघ्या पाच मिनिटातच कायम स्वरुपाच्या नोकरीची मला ऑर्डर मिळाली. डेप्युटी डायरेक्टरांना मी मागे दैनिक रत्नभूमीमध्ये लिहिलेला लेख दाखविला. तो वाचून त्यांनी माझे मनःपूर्वक अभिनंदन केले. खरोखरच बाबांनी माझ्या हाकेला 'ओ' दिली होती. आणखी किती म्हणून बाबांवर भार घालावा? बाबांनी रत्नागिरी एस्.टी. स्थानकावर प्रत्यक्षात दर्शन दिलेच पण आता बाबांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी; शिरडीस जाऊन बाबांचे दर्शन घ्यावे एवढीच इच्छा! अशाच प्रकारे बाबांच्या कृपेची सावली सर्व साईभक्तांवर राहो हीच साईचरणी प्रार्थना.

# शिरडीचे श्रीसाईबाबा नवसाला पावले

**— श्री. अनिल नारायण रिसबूड**
व्दारा श्री.मुकुंद ना.रिसबूड,
४७/सी, बिल्डिंग नं २, ४ था माळा,
दत्तानी नगर, एस.व्हि. रोड,
बोरिवली (पश्चिम), मुंबई - ४०० ०९२.

*शिर्डी क्षेत्राची वारी करा।*
*पाय बाबांचे चित्ती धरा॥*
*जो अनाथांचा सोयरा।*
*भक्तकाम कल्पद्रुम॥ १५७॥*

प.पू.श्रीदासगणू महाराजांनी स्तवनमंजिरीमध्ये वरील श्लोकांत जे उद्धृत केले आहे ते किती शंभर टक्के खरे आहे याची प्रचिती आजही साईभक्तांना येत आहे. श्री साईमहाराजांनी समाधी घेतली त्याला आज ६७/६८ वर्षे पूर्ण झाली तरी श्रीसाईबाबांची समाधी आजही भक्तांच्या नवसाला पावत आहे. याची प्रचिती आम्हाला नुकतीच आली. 'न भुतो न भविष्यती' असे यश श्रीसाईबाबांच्या कृपेने आम्हाला कसे मिळाले त्याची ही थोडक्यात हकिगत अशी :-

आमच्या गिरगावमधील 'श्रीसाईधाम' या संस्थेच्या व्यवस्थापक मंडळाची त्रैवार्षिक निवडणूक दि. २७ एप्रिल १९८६ रोजी घेण्याचे जाहीर झाले. 'श्रीसाईधाम' ह्या संस्थेची १९५२ साली स्थापना झाल्यापासून गेली २५ ते ३० वर्षे काही ठराविकच मंडळी संस्थेचा कारभार पहात असत. त्यावेळी निवडणूक ही नाममात्रच होत असे. परंतु गेल्या दोन निवडणुकीपासून खरी निवडणूक कशी असते ते संस्थेच्या जुन्या मंडळींना कळून चुकले होते. यावेळीही आम्ही काही तरुण उत्साही मंडळींनी ही निवडणूक लढविण्याचे ठरविले. आम्ही आमच्या पंधराजणांचा एक संयुक्त गट निवडून निवडणुकीचे अर्ज भरले. ते पाहून आमच्या विरोधी बाजूचे, जुन्या-जाणत्या मंडळींचे धाबे दणाणले. कारण त्यांचा पंधरा जणांचा ओढून ताणून जो गट तयार करण्यात आला होता त्यात संयुक्तपणा असा नव्हता. प्रत्येकजण आपला स्वतःचाच प्रचार करीत होता. आम्ही एक पत्रक काढून 'श्रीसाईधाम' या संस्थेच्या भरभराटीसाठी, समृध्दिसाठी काही ठराविक योजना पत्रकात नमुद केल्या होत्या. त्यास 'श्रीसाईलीला' या इंग्रजी आवृत्ती मासिकाचे माजी का. संपादक श्री. डॉ. परचुरे यांचे आशीर्वादही आम्हाला लाभले होते.

दि. १८ एप्रिल १९८६ रोजी श्रीरामनवमी निमित्त आम्ही आमच्या श्रीसाईनाथ मित्रमंडळातर्फे शिर्डीला गेलो होतो. त्यावेळेस आमचे पत्रक छापून तयार नव्हते. परंतु श्रीरामनवमीच्या दिवशीच आमच्या एका मित्राबरोबर ते पत्रक आम्हाला शिर्डीला मिळाले. श्रीरामनवमीसारख्या पवित्र दिवशीच हे पत्रक आम्हाला शिरडी येथे मिळणे म्हणजे ही एक शुभघटनाच होती, नव्हे ती तर पुढील गोष्टींची नांदीच होती. श्रीरामनवमीच्या दिवशी

आम्ही सर्वजण गुरुस्थान व समाधीमंदीरात १०८ प्रदक्षिणा घालतो. त्यावेळी मी स्वतः व आमचे सहकारी श्री. शाहुराम भोसले आम्ही दोघांनी ते पत्रक श्रीसाईबाबांच्या चरणापाशी व समाधीवर ठेवले व पुढीलप्रमाणे प्रार्थना केली.

"बाबा, आम्ही श्रीसाईधामची ही निवडणूक लढवित आहोत ती काही अधिकार गाजविण्यासाठी अगर मोठेपणा प्राप्त होण्यासाठी लढवत नसून ही संस्था अधिकाअधिक समृध्दिस, भरभराटीस कशी येईल ह्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू. आम्ही साईभक्तांना ह्या पत्रकात जो कार्यक्रम दिला आहे तो कार्यक्रम प्रत्यक्ष कृतीत उतरविण्यासाठी बाबा, आम्हा सर्व पंधराजणांना ह्या निवडणूकीत प्रचंड मतांनी विजयी करावे. त्यासाठी आपला आशीर्वाद आमच्या पाठीशी असू दे. शेवटी, हे तुमचेच कार्य आहे. गिरगावचे 'श्रीसाईधाम' हे मुंबईतील शिरडीच आहे असे सर्व साईभक्त मानतात. आम्ही सर्व पंधराजण निवडून आलो की तुमच्या पाया पडायला व तुमच्या दर्शनासाठी शिरडीला येऊ." अशी प्रार्थना करून आमचे पत्रक समाधीवर व बाबांच्या चरणावर ठेवले. हे पत्रक बाबांना स्नान घालण्याच्या वेळेपर्यंत तेथेच होते. ह्याचाच अर्थ श्रीसाईबाबांनी आमची प्रार्थना ऐकली होती, बाबांनी आम्हाला जवळ केले होते, ह्यातच आमचा विजय निश्चित झाल्याचे आम्हाला कळून चुकले. कारण शिर्डी येथे समाधीवर अथवा बाबांच्या चरणांजवळ काहीही ठेवले तरी ते जास्त वेळ तेथे ठेवत नाहीत. आमचे पत्रक तर रात्रभर बाबांच्या चरणांपाशीच होते.

शिरडीहून परतल्यानंतर आम्ही आमच्या प्रचाराला लागलो. अनेक साईभक्तांचा आम्हाला पाठींबा मिळत होता. आमचा प्रचार जोरात चाललेला पाहून व आम्हाला प्रचंड प्रतिसाद मिळत असल्याचे पाहून आमचे विरोधक आमच्या विरूध्द खोटा व अपप्रचार करू लागले. परंतु त्यांचा साईभक्तांवर काहीही परिणाम झाला नाही.

शेवटी रविवार दि. २७ एप्रिल १९८६ रोजी मतदानाचा दिवस उजाडला. अनेक साईभक्तांनी प्रचंड उत्साहात मतदान केले. एकूण मतदान ४६५ च्या आसपास झाले. श्रीसाईधामची स्थापना झाल्यापासून यावेळी प्रथमच एवढे मतदान झाले. संध्याकाळी साडेसात वाजता मतमोजणीस प्रारंभ झाला. आम्हा सर्वांनाच विजयाची खात्री वाटत होती.

रात्रौ अकरा साडेअकराच्या सुमारास निवडणूक अधिकाऱ्यांनी निकाल जाहीर केला व प्रत्येक उमेदवाराला किती मते पडली ते जाहीर केले. आणि सर्वांनाच मोठा धक्का बसला. कारण आमच्या तरुण उत्साही गटाचे पंधरापैकी चौदाजण प्रचंड मतांनी निवडून आले होते.

एकाच गटाचे जास्तीत जास्त उमेदवार निवडून येण्याचा हा पहिलाच प्रसंग! श्रीसाईबाबांच्या कृपेने आम्हाला हे 'न भूतो न भविष्यति' असे यश लाभले. ही सर्व श्रीसाईबाबांचीच कृपा होय. आमच्या विजयाला श्रीसाईनाथांचेच आशिर्वाद कारणीभूत आहेत. आम्ही दृढ श्रध्दने केलेल्या नवसाला श्रीसाईबाबा पावले व आम्हाला प्रचंड यश दिले. आम्ही कबुल केल्याप्रमाणे निवडून आलेल्या चौदाही जणांनी शिर्डीला जाऊन श्रीसाईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले आणि सर्वांनी अभिषेक करून कृतज्ञता प्रगट

केली. आमच्या विजयात आम्ही सर्व जरी निमित्तमात्र असलो तरी कर्ता करविता श्रीसाईनाथच आहे. त्यांच्याच कृपेने आमचे हे स्वप्न साकार झाले.

# श्री बाबांनी मुलाला सुयश दिले

— श्री. मधुसूदन गोपाळ सावंत
एम्.ए.बी.एड्.
असोसिएट कॉटेजेस्,
खो.नं. ४७, पडवळ कंपाऊंड,
सरदार प्रतापसिंग मार्ग,
भांडुप, मुंबई नं. - ४०० ०७८.

आमचे तिघेही मुलगे आम्हा उभयतांप्रमाणे साईभक्त आहेत. आमचा थोरला चिरंजीव विद्याधर मागील वर्षी १० वीत होता. तो बुद्धिमान असला तरी परिश्रमपूर्वक अभ्यास करण्याची त्याची वृत्ती नव्हती. शाळेच्या परिक्षेत त्याला ७० टक्क्यांच्या आसपास गुण मिळायचे. तशात त्याला टी.व्ही. व व्हि.डि.ओ. कार्यक्रमांचे फार आकर्षण!

१० वी (एस्.एस्.सी.) सारख्या आयुष्यातील महत्त्वाच्या परिक्षेत त्याने उत्तम यश संपादन करण्यासाठी मनापासून व चिकाटीने अभ्यास केला पाहिजे याचे मी त्याला वारंवार स्मरण देत असे, तरी देखील तितकेसे मनावर घेऊन तो अभ्यास करीत नसे. मात्र, "मी ८० टक्के गुण खात्रीने मिळवणार" असे आत्मविश्वासाने मला म्हणायचा, परंतु त्याने तितके गुण मिळवावेत अशी माझी मनीषा असली तरी एकंदरीत त्याच्या अभ्यासावरून त्याला एवढे यश मिळेल का याबद्दल मी साशंक झालो होतो.

फेब्रुवारी महिना उजाडला आणि शाळेचे वर्ग अभ्यासक्रम संपवून बंद झाले. आता बोर्डाची (एस्.एस्.सी.) परीक्षा चार आठवड्यावर येऊन ठेपली. चि. विद्याधरने दोन मित्रांच्या सोबतीने परिक्षेची तयारी सुरू केली. मधूनमधून अभ्यासाबद्दल विचारणा व त्याच्यासाठी श्रीसाईंकडे प्रार्थना हे काम मी नेमाने करत होतो. शक्य तेव्हा अभ्यासात मार्गदर्शन करत होतो.

परिक्षेची तारीख अगदी जवळ आली.. चि. विद्याधरला परिक्षेत चांगले यश मिळावे या भावनेने मी साईसत्चरिताचे पारायण केले. दरम्यान, श्रीसाईकृपेने आमच्या खोलीपासून पाच मिनिटांच्या अंतरावर त्याला परिक्षाकेंद्र मिळाले. परिक्षेचे पेपर्सदेखील त्याला मनाप्रमाणे गेले. अपेक्षित असे बरेच प्रश्न आले. तरीदेखील भाषा विषयाच्या गुणांची खात्री देता येत नव्हती.

अखेर जून सुरू झाला. परिक्षेच्या निकालाबद्दल आमची अधीरता वाढू लागली. निकालाचा दिवस उजाडला, आणि चि. विद्याधरला प्रत्यक्षात ८० टक्के गुण मिळाले! श्रीसाईंनी आमचे मनोरथ पूर्ण केले! आमची लाज राखली. केवढी ही पाठराखण! श्रीसाईंच्या चरणी अनंत लोटांगणे असोत.

# साई तारी त्याला कोण मारी

— श्री. दिलीप शंकर लांडे,
बी.ए.डी.एड.,
सः शिक्षक, महान,
ता-बार्शीटाकळी, जि - अकोला.

कृपाळू साईमाऊली भक्तांच्या हाकेला 'ओ' देऊन त्यांचे रक्षण करते, ही निर्विवाद सत्य आहे. आम्ही साईमाऊलीचे भक्त आहोत. अनेक प्रसंगांतून साईंनी आम्हाला तारले. अश्याच एका गंभीर. प्रसंगातून बाबांनी आम्हाला वाचवले तो प्रसंग आठवला की, अजूनही अंगावर शहारे येतात.

मी तऱ्हाळा येथे शिक्षक होतो. काही दिवसातच म्हणजे जुलै ८५ मध्ये माझी बदली महान, ता. बार्शीटाकळी येथे झाली. त्या वेळेस अशी परिस्थिती होती की, फारच गंभीर कारण सांगून इज्युकेशन-ऑफिसरची मंजूरी मिळविण्यास २/३ महिने सहज लागत. त्यातच आर्थिक टंचाई. शिवाय नवीन गावात ओळख नसल्या कारणे उधारीत व्यवहार चालणे कठीण. आणखी पत्नी सौ. विजयाचे ऑक्टोबर ८५ मध्ये बाळंतपण. दवाखान्यात नेण्यावाचून गत्यंतर नव्हते.

आक्टोंबरच्या १ तारखेपासून तिला कारंजा लाड येथील नगरपालिका रुग्णालयात दाखल केले. ५ ऑक्टोबर ८५ पर्यंत सर्व व्यवस्थित होते. ६ तारखेला सकाळी ९ च्या दरम्यान प्रसुती वेदना सुरू झाल्या. परंतु बाळ जन्मास येईना. फक्त बाळाचा हातच बाहेर आला. डॉक्टर प्रयत्नांची शिकस्त करून थकले. त्यांनी सांगितले की, बाळ व बाळंतीण वाचवणे आता आम्हाला तरी शक्य नाही. तुम्ही 'मुर्तिजापूरला' यांना घेऊन जा. मुर्तिजापूरला नेणे कसे शक्य होईल. कारण स्पेशल गाडी करणे व तेथून जर पुढे अकोल्याला नेण्याचे काम पडले तर? मी विचारत पडलो. कारण जवळ पैशांची सोय नाही. पगार नाही. पैसे कोठून मिळवावेत? मी मनोमन बाबांचा धावा केला, "बाबा प्रसंग बाका आहे, काय करावे?" तितक्यात तऱ्हाळा येथे असणारे शिक्षक श्री. एस्. एस्. ठाकरे तेथे आले. (वास्तविक त्या गृहस्थांशी माझे कधीच पटले नाही) व माझ्या जवळ येऊन म्हणाले, "यार क्यों नाराज हों, मैं अचानक इधर से आया, कभी तो नहीं आता. पुरानी बाते छोडो. क्यों क्या मुसिबत हैं?" मी त्याला सर्व सांगितले. त्यावर ते म्हणाले, बस इतनी बात. त्यांचे व माझे बोलणे ऐकून तेथील एक सिस्टर (त्यांचा व माझा मुळीच परिचय नव्हता) म्हणाल्या, माझ्या जवळून सुद्धा पैसे घेऊन जा. ताबडतोब 'Minibus' द्वारे आम्ही सौ.ला घेऊन मुर्तिजापूरला गेलो. बाबांच्या कृपेने तिथेही झटपट 'ॲडमिट' वगैरे केल्यानंतर डॉ. सौ. सप्रे मला म्हणाल्या, 'मी प्रयत्न करून बघते. पण मामला गंभीर आहे." तिथे कोणीच परिचयाचे नाही. त्यात डॉक्टरीणबाई अशा म्हणतात. त्यामुळे काय विचार सुचेना. परंतु आमची सर्व काळजी बाबांना. दूरच्या नात्यातला एक ड्रायव्हर दवाखान्यात आला व मी दिसल्याबरोबर त्याने माझी विचारपूस केली व सर्व घटना सांगितली. त्यानेही धीर दिला, "बाबा सब बराबर करेंगे." परंतु

माझे सर्व लक्ष वॉर्डात. दुपारी तीन वाजता डॉक्टरीणबाई बाहेर आल्या, त्या म्हणाल्या, "बाळ आतच मेले होते व त्याचे सर्व पॉयझन बाईच्या अंगात भिनले असते. परंतु इतक्या तासात सुद्धा विष भिनले नाही व बाई वाचल्या. कारण असा पेशंट कधी वाचलेला आम्ही पाहिला नाही. खरोखर तुम्ही लकी आहात कारण बाळ हिरवे निळे झाले आहे." बाळ हिरवे निळे झाले होते. जर त्याचे विष सौ.च्या अंगात भिनले असते तर? परंतु बाबांनी माझी हाक ऐकली होती व सौ.चे प्राण वाचले होते. सर्व दिवसभर रुग्णालयात आमचाच विषय होता. नंतर मुर्तिजापूरला ४/५ दिवस रहावे लागले. आमच्या त्या दुसऱ्या नातेवाईकाने आमची सोय केली. तेथेच आम्हाला 'परमहंस पुंडलिक बाबांचे' शेवटचे दर्शन झाले. त्यांच्या त्या पुण्यभूमीत व साईंच्या आशीवार्दाने आम्हाला संकटातून मार्ग सापडला व आम्ही सुखरूप वाचलो. बाबाकृपे नंतर सौ. विजयाची प्रकृती आता व्यवस्थित आहे. नंतर बाबांच्या कृपेने थोड्याच दिवसात पगार मिळाल्यानंतर मदत करणाऱ्या साईभक्तांचे कर्ज फेडले.

बाबांची कृपा आमच्यावर आहे त्यामुळेच हे शक्य आहे. बाबांच्या कृपेने मी नुकताच जुलै ८६ मध्ये B.A. ची परीक्षा पास झालो आहे. कारण परीक्षेच्या दिवसात प्रकृती ठीक नव्हती. परंतु बाबांची मनोमन प्रार्थना केली व सर्व सुरळीत पार पडले. आज बाबांच्या कृपेने एक कन्यारत्न कु. रेणुका (ह्या बाळंतपणाचे अगोदरचे) आहे. तिला आम्ही बाबांचा प्रसाद समजतो आहे व शेवटी बाबांच्या इच्छेपुढे कोणाचे काय? **"बाबा ठेवतील तैसेची** राहावे **चित्त** असू द्यावे **समाधानी." त्या माझ्या लाडक्या साईमाऊलीस माझे कोटीकोटी दंडवत.**

# साईबाबांच्या कृपेने टाळेबंदी उठली

**श्री. राजीव मुकुंद नारकर**
१२ ब/१७८, न्यु सिध्दार्थ नगर,
संक्रमण शिबिर, रोड नं. ९,
गोरेगांव (प).

श्रीसाईबाबांचे माझ्यावर व आमच्या कुटुंबावर अनंत उपकार आहेत. श्रीबाबांनी आमची अनेक संकटांतून मुक्तता केली आहे. जेंव्हा जेंव्हा आम्ही त्यांची याचना केली व धावा केला त्याप्रसंगी त्यांनी आम्हाला फारच मदत करुन आमची इच्छा पूर्ण केली आहे. असाच एक अनुभव मला नुकताच आला.

आमच्या कुटुंबावरील एक मोठेच संकट श्री बाबांनी दूर केले. मी मुंबईत एका नामांकित व चांगल्या कंपनीत नोकरी करतो. अचानक काही कारणांमुळे व्यवस्थापन व कामगार संघटना यांच्यात वाद सुरु झाले व त्यांचे परिणाम कंपनी बंद होण्यापर्यंत

गेले. कंपनीत व्यवस्थापनाने टाळेबंदीची नोटीस लावली. त्या अगोदर पंधरा दिवस कंपनीकडून सूचना मिळाल्यापासून मी श्री साईबाबांचा धावा सुरू केला. सतत त्यांना कंपनीत काही विपरीत घडू नये व कंपनी कधीच बंद न होता तशीच चालू रहावी अशी प्रार्थना करत राहिलो. तेंव्हापासून गुरुवारचा उपवास चालू केला. त्यानंतर टाळेबंदीच्या आदल्या दिवशी आमच्या मुख्य कार्यालयावर व्यवस्थापन व कामगार पुढारी यांची सभा होती. आम्ही त्यावेळी दुसऱ्या पाळीत कंपनीत कामावर होतो. कंपनीने टाळेबंदीची संपूर्ण तयारी केली होती. मी कंपनीत जाताना श्री बाबांचाच धावा करत होतो व सतत नामस्मरण करत होतो. संध्याकाळी ६.०० वाजता बोलणी सफल झाल्याची व टाळेबंदी रद्द झाल्याची खबर कंपनीत आली. आणि सर्व वातावरण आनंदमय झाले. मला श्री बाबांचे कधी दर्शन घेतो असे झाले व एका डिपार्टमेंट मध्ये श्री बाबांचा फोटो आहे तेथे जाऊन मनातल्या मनात आभार मानले व नमस्कार केला. ह्यापुढे अशीच कृपा रहावी अशी विनंती केली. त्याचवेळी आम्ही सर्वांनी वर्गणी करून पेढे, हार व नारळ आणून देवाची पूजा केली व पेढे वाटले.

अशाप्रकारे श्री साईबाबांनी माझ्यावरील संकट दूर केले व मला अभय दिले. तसेच आमच्यावर व सर्व साईभक्तांवर श्री बाबांची अशीच कृपा रहावी ही त्यांच्या चरणी प्रार्थना.

# नित्य मी जिवंत, जाणा हेची सत्य नित्य घ्या प्रचीत अनुभवे

— श्री. प्रमोद गजानन कोरगांवकर
१/१, विजय निवास, शिवाजी नगर,
टेंबापाडा रोड, भांडुप (प),
मुंबई नं — ४०० ०७८.

मी एक बाबांचा छोटासा भक्त असून पॉलीटेक्निकमध्ये केमिकल इंजिनियरींगच्या प्रथम वर्षात शिकणारा विद्यार्थी आहे. माझी पॉलीटेक्निकला जायची फार इच्छा होती. परंतु दहावी पास झाल्यानंतर पॉलीटेक्निकला ॲडमिशन मिळविण्यासाठी खूप प्रयत्न केले, तरीही मला ॲडमिशन मिळाले नाही. म्हणून मी सायन्स कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. व बारावीला चांगल्या तऱ्हेने पास झालो. परंतु इंजिनियरींगच्या पदवीसाठी बारावी सायन्सचे मार्क अपूरे होते.

मी निश्चयच केला होता की, बी.एस्.सी. (B.S.C.) न होता कोणत्याही पदवीकेचा इंजिनियर व्हायचे, त्याप्रमाणे मी, माझा मोठा भाऊ व त्याचा मित्र मिळून आम्ही ॲडमिशनसाठी जोराचे प्रयत्न सुरू केले. जवळपास मुंबई ठाण्यामध्ये प्रवेश न मिळाल्यास बाहेरगावी जाण्याचीही माझी तयारी होती. परंतु बाहेरगावी जाणे म्हणजे तिकडचा हॉस्टेलचा खर्च,

खाण्यापिण्याचा खर्च, त्याशिवाय 'फी' म्हणजे आपल्या सारख्या 'मध्यमवर्गियांची' डोकेदुखीच, म्हणून मी ठाणे येथील विद्याप्रसारक मंडळाच्या पॉलीटेक्निक मध्ये ॲडमिशनसाठी प्रयत्न सुरू केले.

याच दरम्यान माझ्या वाचनामध्ये 'साईलीला' हे पुस्तक आले. त्यामध्ये आलेले साईभक्तांचे अनुभव वाचून मी सुध्दा बाबांकडे साकडे घातले, 'बाबा, माझ्याही मनात एक इच्छा आहे. ठाणे येथील विद्याप्रसारक मंडळाच्या पॉलीटेक्निक मध्ये देणगी शिवाय ॲडमिशन मिळू दे. जर मला ॲडमिशन मिळाले तर माझा अनुभव मी तुमच्या 'साईलीला' या मासिकात देईन'. आणि खरोखरच ही माझी हाक साईबाबांनी ऐकली. आणि त्याचवेळी साईबाबांच्या रुपाने त्याच कॉलेजातील प्रोफेसर भेटले. त्यांनीही माझ्यासाठी पुष्कळ प्रयत्न केले. आणि अखेर, बाबांच्या कृपेने कॉलेजच्या गुणवत्ता यादीत माझे नाव लागले व मला देणगी शिवाय चांगल्या तऱ्हेने ॲडमिशन मिळाले. मला 'केमीकल इंजिनियरींगच्या' अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळाला. खरोखरच ते प्रोफेसर म्हणजे साईबाबाच जणू! त्यांच्याच रुपाने आमच्या प्रयत्नांना यश आले. हल्ली मुंबई मध्ये किंवा मुंबईच्या आसपासच्या भागात पॉलिटेक्निक मध्ये ॲडमिशन मिळणे म्हणजे फारच कठीण गोष्ट. पण साईबाबांच्या कृपेने अशक्य कोटीतील गोष्ट सहज शक्य झाली.

मी बाबांना सांगितल्याप्रमाणे हा अनुभव 'साईलीलेत' देत आहे. बाबांना मी एक छोटीशी विनंती करत आहे की, बाबा, आजपर्यंत जशी आमच्यावर कृपा केलीत, तुमचे कृपाछत्र जसे आजपर्यंत या अजाण लेकरावर सदैव ठेवलेत तसेच शेवटपर्यंत तुमच्या कृपाछत्राची छाया आमच्यावर पडत राहो व या छायेतच प्रत्येक कामात यश येवो व भरभराट होत जावो. हे छोटेसे मागणे मागून मी त्या 'जगत्पित्या' साईबाबांना नम्र अभिवादन करतो.

# मला आलेले साईकृपेचे दोन अनुभव

**श्री. वाय. एस्. जोशी**
संत गाडगे महाराज कॉलनी,
प्लॉट नं. १७,
विद्यानगर, धुळे.

माझे वडील साईबाबांची बऱ्याच वर्षांपासून भक्ती करीत आहेत. त्यामुळे मलापण लहानपणापासून साईबाबांची आवड निर्माण झाली व सध्या रोज मी नित्यनियमाने साईबाबांची भक्ती करीत आहे.

मागच्या वर्षी मी व्यायाम करीत असताना माझा उजवा हात अचानक सुजला व मला तिथल्या तिथे चक्कर आल्यासारखे झाले. दुसऱ्या दिवसापासून हातामध्ये चमक

निघायची व भयंकर यातना व्हायच्या. हाताला प्लॅस्टर करावे लागेल की काय अशी भिती वाटू लागली. तेव्हा मी साईबाबांजवळ विनवणी केली की, मी दररोज हाताला तुमची उदी लावीन पण प्लॅस्टर नको. त्याप्रमाणे मी दररोज हाताला साईबाबांची उदी लावू लागलो. थोड्याच दिवसात नुसत्या उदीने व औषधाने माझा हात संपूर्ण बरा झाला. त्यावेळेस मी बाबांना विनंती केली होती की, जर माझा हात उदीने चांगला झाला तर मी माझा अनुभव 'साईलीला' मध्ये प्रसिध्द करण्यासाठी देईन.

मला साईकृपेचा दुसरा अनुभव आला तो असा की, पावसाळ्याच्या एका दिवशी पहाटे तीन वाजता आमच्या घराच्या पायरीवर एक मोठा साप बसलेला होता. पण साईबाबांच्या कृपेने तो साप गुरख्याला दिसला. व त्याने आम्हाला जागे करुन तो साप मारुन जाळला. पुन्हा एका महिन्याच्या अंतराने पहाटे तीन वाजता त्याच पायरीवर त्याच गुरख्याने दुसरा एक साप मारुन जाळला. अशा प्रकारे दोन्ही वेळेला साईकृपेने आम्ही त्या संकटातून वाचलो. म्हणून प्रत्येक वेळेला साईबाबांच्या पुढील पदांची आठवण येते.

जरी हे शरीर गेलो मी टाकून
तरी मी धावेन भक्तांसाठी

माझ्याप्रमाणे कित्येक साईभक्तांना साईकृपेचे अनुभव येत आहेत. हे दर महिन्याच्या 'साईलीला' अंकावरुन कळून येते. त्यासाठी फक्त साईबाबांवर 'श्रध्दा' असणे आवश्यक आहे आणि बरोबरीला 'सबूरी' पण!

★★★★★

# साईकृपेने केदारनाथ बद्रीनाथ यात्रा झाली

**— श्री. प्रभाकर वासुदेव भालेराव**
आम्रकुट १।६, गणेश मंदिर पथ,
डोंबिवली (पूर्व), जिल्हा - ठाणे.

शरण मज आला आणि वाया गेला।
दाखवा दाखवा ऐसा कोणी।

श्री साईबाबांचे हे बोल जेव्हा प्रत्यक्षात अनुभवास येतात तेव्हा त्यांच्यावरील श्रद्धा अधिकाधिक दृढ होते. असाच एक अनुभव मला नुकताच आला.

मी सपत्निक केदारनाथ-बद्रीनाथ यात्रेला भारतदर्शन यात्रा कंपनीबरोबर ७ जून १९८६ रोजी ऋषिकेशपासून जाण्यासाठी पैसे भरून नावे नोंदविली आणि मी रेल्वे पासधारक असल्यामुळे मुंबई येथून ४-६-८६ चे पंजाब मेलचे आरक्षण करण्यासाठी पास माझ्या पुतणीजवळ २०-३-८६ ला दिला. तिने पाच सहा दिवस टंगळ मंगळ करून सातवे दिवशी आरक्षण मिळत नाही असे सांगितले. मी फार बेचैन झालो. रात्रभर श्रीसाईबाबांचा धावा करून मला आरक्षण मिळाले पाहिजे असे प्रार्थित राहिलो आणि २६-३-८६ ला धुळवडीचे दिवशी सकाळी ७.२० च्या जलद लोकलने बोरीबंदर गाठले.

आणि काय आश्चर्य! मला पाच मिनिटांत आरक्षण मिळाले आणि त्या क्लार्कने मला दिल्ली ते हरिद्वारचे आरक्षणास मदत केली. असे श्री बाबा भक्तांसाठी धाव घेतात. तसेच परतीच्या प्रवासाचे वेळेस आम्हाला आरक्षण मिळाले नाही. परंतु दिवसाची वेळ असल्याने आम्ही पहिल्या वर्गाच्या डब्यातून प्रवास केला. ट्रेन कंडक्टर आम्हाला आरक्षण न देता येणाऱ्या दुसऱ्यांना देत होता. तो झाशीला उतरल्यावर दुसरा ट्रेन कंडक्टर आला. त्याने स्वतःहून मला सांगितले की बाजूच्या डब्यातील उतारू भोपाळला उतरतील तर तुम्ही त्या डब्यात जाऊन आरामशीर झोपा.

एकदा शामराव देशपांडे नागपूर व ग्वाल्हेर येथे मुंज आणि लग्नाला जाण्यासाठी श्री बाबांची आज्ञा घ्यायला गेले असताना त्यांनी काशी यात्रा करून येतो असे म्हटले तर बाबांनी म्हटले, तू काय वावगे विचारतोस आणि परवानगी देवून म्हणाले, मी शामच्या आधी जाऊन येतो आणि खरोखरच शामराव देशपांड्यांना श्रीबाबांची प्रतिमा गयावळाचे घरी दिसली. आम्ही प्रवासभर बाबांचे नामस्मरण करीत आमचा प्रवास सुखरूप होण्याची प्रार्थना करीत होतो. आम्ही बद्रीनाथाचे दर्शन घेण्यासाठी जात असताना पूजेचे सामान दुकानातून घेत होतो, तर त्या दुकानाच्या कोपऱ्यात मला श्री साईबाबांचा आशीर्वाद देणारा फोटो दिसला आणि आम्ही त्याला हात जोडले आणि म्हटले, श्री साईबाबांचा आपल्याला आशीर्वाद आहे. आपण सुखरूप घरी परतू.

# साईकृपेने रेडिओ सापडला

— श्री. नारायण पुरुषोत्तम मेहता
राधाबाई करवा चाळ,
शिवाजी चौकाजवळ,
मु. पो. ता. महाड (रायगड).

मी गेली २० वर्षे सातत्याने श्रीसाईबाबांची नित्यनेमाने भक्ती करीत आहे व नेहमीच मला श्रीसाईनाथांच्या कृपादृष्टीने आश्रय मिळाला आहे. माझ्यावर गेल्या २० वर्षात उद्‌भवलेल्या अनेकविध कठीण प्रसंगातून श्रीसाईनाथाने मला तसेच माझ्या कुटुंबियांना तारुन नेले आहे.

आजही मला पूर्वी इतकाच श्रीसाईनाथांच्या कृपेचा वारंवार लाभ होत आहे. त्यामुळे मला श्रीसाईदयेचा एक महिमा आपणास निवेदन करावासा वाटतो.

गेल्या महिन्यातलीच गोष्ट. आम्ही घरातील सर्व माणसे २ दिवस बाहेरगावी गेलो होतो. गावाहून परत आल्यावर दृष्टीस आले की, घरातील रेडिओ (ट्रांझिस्टर) कुठे दिसत नाही. घरात सर्वांनी खूप शोधाशोध केली पण त्याचा काही उपयोग झाला नाही. असेच ३ दिवस गेले. आम्ही सर्वजण अगदी हताश झालो होतो. मी श्रीसाईबाबांना नवस ठेवला आणि काही वेळातच रेडिओ घरातच मिळाला.

श्रीसाईनाथांच्या भक्तांवरील अगाध प्रेमाने मी तर अक्षरशः भारावून गेलो आहे.

# शिरडीस ज्याचे लागतील पाय।
# टळती अपाय सर्व त्याचे ।।

— श्री. रघुनाथ का. लाड
कुलकर्णी बिल्डींग,
घंटाळी रोड, नौपाडा,
ठाणे - ४०० ६०२.

गेल्या वर्षी मार्च महिन्यात माझ्या मामाचे लग्न झाले. त्या लग्नात माझ्या वडिलांनी जातीने लक्ष देऊन मदत केली. लग्न झाल्यावर दुसऱ्याच दिवशी वडिलांना जरा अस्वस्थ वाटू लागले. त्यांचा अस्वस्थपणा कदाचित जागरणाच्या त्रासामुळे असेल असे वाटून मी आई—वडिलांना चार-पाच दिवसांच्या विश्रांतीसाठी म्हणून पुण्याला पाठविण्याचे ठरविले. तो बेत रद्द झाला आणि आई—वडील माथेरानला जाण्याचा घाट घालू लागले. सरतेशेवटी शिरडीला जायचे ठरले. दुसऱ्याच दिवशी आई— वडील शिरडीला गेले. पण बाबांची लीला काही निराळीच होती. ज्यादिवशी ते शिरडीला गेले त्याच्या दुसऱ्याच दिवशी ते परत आले. आम्ही सर्व ऑफीसमध्ये होतो आणि मला ऑफीसमध्ये आईचा फोन आला. आईचा फोन म्हटल्यावर प्रथम मला आश्चर्यच वाटले. आईने मला लवकर मामाच्या घरी बोलावले, मी मामाच्या घरी जावून पहातो तर वडिलांच चेहरा पार बदलून गेला होता. एकसारखं तेच तेच असंबद्ध बोलणं आणि मध्ये मध्ये विचित्र स्वरात साई बाबांचं नाव घेणं चालूच होतं. हा प्रकार पाहून मी आईला विचारले की, अचानक हे काय झाले? आईने सविस्तर सांगितले की, आई व वडील दादरहून निघाल्यापासूनच त्यांचं वागणं नेहमीसारखं वाटत नव्हतं. दुसऱ्या दिवशी आईवडील साईचरणी समाधी मंदिरात गेले तेव्हा बाबांचे स्नान चालू होते. वडिलांचे लक्ष बाबांच्या मूर्तीकडे केंद्रीत झाले आणि त्यांना नकळत रडू कोसळले. मंदिराच्या बाहेर येऊन आई—वडिलांनी हार, पेढे व इतर पूजेचे सामान घेतले आणि बाबांची समग्र पूजा करण्यासाठी ते मंदिराकडे येऊ लागले. पण वडिलांनी आईला मंदिराच्या दारातूनच परत यायला भाग पाडले. त्यांच्या तोंडून एवढेच येत होते की, 'मला बाबांनी आज्ञा केली आहे की इथून नीघ. त्या हार पेढ्यांच्या थाळीसहीत आईचे न ऐकता वडील निघाले. रस्त्यातील भिकाऱ्यांना ते वाटेल तसे रूपये वाटत सुटले. त्यामुळे त्या पैशांसाठी भिकाऱ्यांतच भांडणे लागली. एरवी पैसे जपून खर्च करणारे वडील असे पैसे वाटताना पाहून आईला फार आश्चर्य वाटले. हा प्रकार काहीतरी निराळाच आहे म्हणून आई तडक त्यांना घेवून मुंबईला निघाली. अशा परिस्थितीत आमच्या भित्र्या आईने त्यांना आणण्याचे धाडस केलेच कसे ही एक नवलाची गोष्ट होती. शिरडीहून ते एस्.टी. ने निघाले परंतु वाटेतच वडिलांनी एस्.टी. सोडण्याचा हट्ट धरला. तेव्हा एस्.टी. नाशिकच्या जवळपास होती. नाशिकहून आईने टॅक्सी केली. टॅक्सीतसुद्धा वडिलांचे असंबद्ध बोलणे चालूच होते. टॅक्सीत त्यांच्याबरोबर आणखी एक मुलगा होता, तो जळगावहून आला होता व

त्यालासुद्धा मुंबईला यायचे होते. त्याने आपले नाव अनिल आहे असे सांगितले. ठाण्याला आल्यावर तो निघून गेला. कशावरून ही सोबत बाबांनीच दिली नसावी. कारण जळगावचा तो मुलगा नाशिकला येतो काय आणि आईबाबांना ठाण्यापर्यंत सोबत देतो काय हेही एक आश्चर्यच आहे. त्या मुलाने आपले नाव अनिल सांगितले हे लक्षात येऊन आई ठाण्याला अनिल मामाकडे उतरली. दारात जाताच वडिलांनी साईबाबांचे पाय म्हणून मामाच्या मुलाचेच पाय धरले. आणि मग मात्र आम्ही त्यांच्यावर डॉक्टरी उपाय चालू केले. त्यांना दादरच्या एका नामांकित डॉक्टरला दाखविले. डॉक्टरांनी त्यांना झोपेच्या गोळ्या देऊन झोपवून ठेवण्यास सांगितले. कारण जागेपणी त्यांची सारखी बडबड चालू होती. त्यामुळे वडील फारच कृश झाले. डॉक्टरी उपाय करून दोन महिने लोटले परंतु त्यांच्या प्रकृतीत काही फरक आढळेना. आमच्या शेजारच्या काकूंच्या सल्ल्यावरून आम्ही हा काही बाहेरचा प्रकार आहे की काय? याची चौकशी केली. तेव्हा कळलं की, त्यांच्यावर कोणीतरी करणी केली आहे. आम्ही कळून चुकलो की शिरडीला गेल्यामुळेच हा प्रकार बाबांनी उघडकीला आणला व त्यांच्यावर लवकरात लवकर उपचार होण्यासाठी 'इथून निघ' अशी त्यांनाच आज्ञा केली. आमच्यावर साईबाबांची अखंड कृपा असल्यामुळे आम्हाला जे भेटले तेही एक साईभक्तच होते. त्यांचे नाव श्री. मोघे. त्यांना सर्व मोघेमास्तर म्हणून ओळखतात. त्यांनी आम्हाला या सर्व गोष्टी खुलासा करून सांगितल्या आणि उदी पाण्यातून घेण्यास सांगितले. काही दैवी उपाय करण्यासही त्यांनी आम्हाला सुचविले. त्याप्रमाणे करताच हळूहळू वडिलांच्यात सुधारणा होऊ लागली. आणि साईमाऊलीच्या कृपेने बरोबर चार महिन्यांनी वडील कामावर पुन्हा जाऊ लागले. खरोखरच बाबांची कीमया अगाध आहे.

# विसाव्या शतकातील दिव्य शक्ती

**— श्री. विश्वनाथ सदाशिव चव्हाण**
कमल निवास, क्वारी रोड,
भांडूप (पश्चिम),
मुंबई - ४०० ०७८.

एकोणीसावं शतक संपून ८५ वर्षे लोटली आणि विसावं शतक संपायला आलं. या कालावधीत अनेक थोर मोठमोठ्या दैवी शक्ती होऊन गेल्या. पण त्या सगळ्यात न भूतो न भविष्यती अशी एक थोर दिव्य शक्ती या विसाव्या शतकात निरनिराळ्या रूपात आपल्या भक्तांना दर्शन देऊन वास्तव्य करीत आहे. त्या दिव्य शक्तीने आपल्या भक्तांना सांगितले आहे, माझ्यावर जर तुमची अढळ श्रद्धा असेल तर माझ्या समाधीतून माझी हाडेसुद्धा तुमच्याशी बोलू लागतील. खरोखरच धन्य ती दिव्य शक्ती आणि खरच सत्य तिचे बोल! बाळ ध्रुवाप्रमाणे तुमची अढळ श्रध्दा असेल आणि भक्त प्रल्हादाप्रमाणे

निस्सीम भक्ती असेल तर त्यांचे ते बोल कधीही सत्य झाल्याशिवाय रहाणार नाहीत. अशी ही विसाव्या शतकातील दिव्य शक्ती म्हणजेच शिरडीचे संत चुडामणी सद्गुरु साईबाबा होय असं मी म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

साईलीलामधून बाबांच्या भक्तांचे अनुभव रोज तुम्ही वाचत असता. बाबांच्या दिव्य शक्तीचा साक्षात्कार, त्यांच्या दिव्य उदीचा चमत्कार याचा एक वेगळा अनुभव या जगातील लोकांना विसाव्या शतकात येत आहे. आणि म्हणूनच मी साईबाबांना विसाव्या शतकातील दिव्य शक्ती असे संबोधलं आहे. तर मी कलेले हे विधान माझ्या सर्व साईभक्तांना नक्कीच पटेल अशी माझी खात्री आहे. बाबांनी आपल्या भक्तांना दिलेला दृष्टांत, त्यांना निरनिराळ्या रूपात दिलेले दर्शन आणि ईश्वर हा एकच आहे असं पटवून दिलेली समज, भक्तांनी संकटाच्यावेळी बाबांना आर्त हाक मारली तर बाबा त्यांच्या मदतीला धावून गेले नाहीत असं एकतरी उदाहरण माझ्या साईभक्तांनी दाखवावे. भक्तांच्या संकटाच्यावेळी धावून जातो तोच खरा देव! तिच खरी दिव्य शक्ती!!

दिव्यत्वाची जेथे प्रचिती। तेथे कर माझे जुळती। या ओळीचा प्रत्यय माझ्या साईभक्तांना आला आहे. साईबाबांचा साधा फोटो जरी भक्तगणांना दिसला तरी त्यांचे हात बाबांच्या फोटोकडे पाहून नकळत, आपोआप जोडले जातात. इतकं वास्तव्य, इतकं प्रेम बाबांनी आपल्या भक्तांच्या शरीरात करून ठेवलेलं आहे. मग तो फोटो दुकानात असो, हॉटेलात असो, फुटपाथवरच्या देवळात असो अगर रस्त्याच्या भिंतीवर काढलेला असो. म्हणजेच काय तर या विसाव्या शतकात बाबांनी आपल्या दिव्य शक्तीने सगळ्या लोकांच्या अणूरेणूत वास्तव्य केलेले आहे.

माझी कंपनी "बुश इंडिया लि." बंद होऊन तब्बल तेवीस महिने लोटले, पण म्हणून बाबांच्यावरची श्रद्धा तसूभरही कमी झाली नाही. मी फेब्रुवारी महिन्यात १९८६ मध्ये शिरडीला कवी सम्मेलनाला गेलो होतो. बाबांच्या समाधीवर नतमस्तक होऊन बाबांना सांगितलं, "बाबा काय चाललं आहे हे तुम्ही जाणता. तुम्ही अंर्तज्ञानी आहात. तुम्हाला सांगायची काही गरजच भासत नाही. आमचा सांभाळ करणं हे तुमच्याच हातात आहे." असं सांगून शिर्डीवरून परत आलो. नवसास माझी पावेल समाधी। धरा दृढ बुद्धी माझ्या ठायी। ह्या बाबांच्या वचनाची सत्यता पटली. एक महिन्याच्या आत दुसऱ्या कंपनीत कामाला राहिलो. पहिल्या दिवशी कंपनीत गेलो तर तिथे सुद्धा बाबांचं दर्शन! आशिर्वादाचा बाबांचा फोटो पाहून नकळत गालावर दोन अश्रूंचे थेंब ओघळले, गळा दाटून आला. नकळत फोटोला हात जोडले गेले व तोंडातून अस्पष्ट असे "साई" एवढेच उद्गार निघाले. जणू बाबांनी सांगितलं घाबरू नकोस, मी तुझ्या पाठीशी उभा आहे. त्याचवेळी मला बाबांच्या वचनाची आठवण झाली. बाबांनी सांगितलं आहे, जरी हे शरीर गेलो मी टाकून। तरी मी धावेन भक्तांसाठी। मग मी जर म्हटलं की, या विसाव्या शतकातील दिव्य शक्ती साईबाबाच आहेत तर माझं चुकलं कुठं?

आजवर अनेक लहान मोठी संकटे आली पण बाबांच्या नामस्मरणाने त्यातूनसुद्धा मार्ग निघत आहे. फक्त बाबांचा 'श्रध्दा आणि सबुरी'चा मंत्र लक्षात ठेवला. बाबांच्या

आशिर्वादाने वाईट दिवससुद्धा निघून जातील आणि चांगले दिवस येतील. कदाचित माझा हा लेख छापून येईपर्यंत 'बुश इंडिया लि.' चालू झाली असेल, बाबांच्या दिव्य शक्तीने! दैवी चमत्काराने!!

माझ्याप्रमाणेच अनेक साईभक्तांना बाबांच्या दिव्य शक्तीची प्रचिती रोज येत आहे. बाबांची अकरा वचनं वाचली की, त्यातून एका तरी वचनाची आठवण आल्याशिवाय रहात नाही. १५ ऑक्टोबर १९१८ साली विजयादशमीच्या शुभदिनी बाबांनी आपलं अवतार कार्य संपवून समाधी घेतली आणि सगळ्यांसाठी दिव्य उदी सोडून गेले. त्यांच्या जिवंतपणाचं कार्य ती उदी करीत आहे. म्हणूनच मी प्रथम म्हटले आहे, या विसाव्या शतकातील दिव्य शक्ती म्हणजेच शिरडीचे सद्गुरु साईबाबा!

# जया मनी जैसा भाव तया तैसा अनुभव

— श्री. पी.के. साळवी
१०३, नीलांबर हाऊस,
वाकोला, सांताक्रूझ.

१९८५ एप्रिलमध्ये आम्ही प्रथमच शिरडीला जाणार होतो. अचानक २—४ दिवसाअगोदर आमची नात विदुला हिला ताप येऊ लागला. त्यामुळे आमचे जाणे रहित होणार की काय असे वाटले. पण सगळ्यांनी ठरविले की जायचेच. तिला आम्ही पाण्यातून उदी देत होतोच. जाण्याच्या दिवशी तिचा ताप बराच कमी झाला होता. तिथे गेल्यावर सुद्धा ती अगदी व्यवस्थित होती. प्रवासात सुद्धा त्रास दिला नाही.

एकदा आमचा टी.व्ही. बिघडला होता. आम्हाला बहुतेकांनी सांगितले की पिक्चर ट्यूब गेली आहे. आवाज व चित्र येत नसल्याने आम्हालाही ते खरे वाटले व आम्ही घाबरलो. शेवटी साईबाबांना प्रार्थना केली की, असे नसावे. व तसेच झाले. मेकॅनिकने सांगितले की, फक्त फ्यूज गेला आहे. अशारितीने साईबाबा आमच्या पाठीशी उभे राहिले.

तसेच विदुलाचे वडिल प्रथम खेपेस शिर्डीला जायला तयार नव्हते. पण १९८६ मध्ये ते आजारी पडले. त्यांच्या अंगावर पुरळ आले. बरीच औषधे केली पण बरे वाटेना. शेवटी त्यांनी पाण्यातून उदी घेण्यास सुरवात केली. आणि खरोखरच त्यांच्या अंगावरील पुरळ कमी झाले. एकदा तेच आपण होऊन म्हणाले की, आपण शिर्डीला जाऊया व ह्या जूनमध्ये आम्ही शिर्डीला जावून आलो. आता परत जाऊया असे म्हणतात. आता ते पुष्कळ बरे आहेत.

शिरडीस ज्याचे लागतील पाय। टळती अपाय सर्व त्याचे॥ ह्या वचनाचा आम्हाला असा अनेक वेळा अनुभव आला.

# प्रपंचा घोर पण साईचा आशीर्वाद थोर

— श्री. गणपत स. परब.
मु. पो. वायंगवडे, कसाल मार्गे,
ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग.

श्री सद्‌गुरु साई नित्य जो स्मरेल। आपत्ति त्याच्या सहजीं विरेल ॥
श्रद्धा सबुरी मंत्र जया उमजेल। भवसागर तो खचित तरेल ॥

आज काल जावे तेथे बुवाबाजी करून व फसवाफसवी करून स्वतःची तुंबडी भरण्याची जणूकाही चढाओढच लागली आहे आणि ही चढाओढ खेड्यापाड्यात तर शिगेला पोचली आहे. चमत्कार तेथे नमस्कार, ही म्हण प्रचारात आहे, कारण अद्‌भुत चमत्काराने आपली बुध्दी चक्रावून जाते व काही कळेनासे होते. म्हणजेच मंत्रमुग्ध होतो व सहजी चमत्कार करणाऱ्याचा बकरा बनतो. पण ही फसवाफसवी साईबाबांच्या दरबारात चालत नाही. कारण त्यांच्याच शब्दात लिहावयाचे म्हणजे, "तुम्ही ज्या दृष्टीने माझ्याकडे पहाल, त्या दृष्टीने मी तुमच्याकडे पाहीन." प्रथम शुद्ध अंतःकरणाने त्यांचे स्मरण करा व मग पहा 'नमस्कार तेथे चमत्कार' बाबा आपल्या शरणार्थीस दाखवितात.

गेल्या ऑक्टोबर १९८५ च्या मध्यास माझे वडील बंधु ( वय ८२ वर्षे) आमच्या गावी (वायंगवडे मु.) आजारी झाल्याने मी माझ्या मोठ्या मुलास तीन दिवसांच्या रजेने त्यांना पाहून येण्यास पाठविले. पण तो ५/६ दिवस मुंबईस परतला नाही, तेव्हा भावाचे आजारीपण वाढले असावे असे समजून ताबडतोब आम्ही उभयता गावी जाण्यास निघालो. निघतेवेळी माझ्या पत्नीने श्रीबाबांच्या प्रतिमेस नमस्कार केला व म्हटले बाबा आता तुम्हास काळजी, आम्ही तुमच्या भरंवशावर चाललो, अशी विनवणी करून महालक्ष्मी एक्सप्रेसने कोल्हापूर मार्गे आमच्या गावी गेलो. पहातो तो भावाची प्रकृती एकदम ढासळून सर्व नैसर्गिक विधीही अंथरुणावरच करावे लागत, बोलताना शब्दही अडखळे, अशा अवस्थेत ८२ वर्षे वयाच्या माणसास कसले उपचार करणार? खेड्यात तर डॉक्टर मिळणे शक्य नाही. तेव्हा बाबांवर सर्व काही सोपवून बाजारात मिळणाऱ्या (पेटंट ) औषधांचा वापर चालू ठेवला व मुलास त्याच्या नोकरीवर हजर होण्यासाठी मुंबईस पाठविला. त्या औषधांनी भावाच्या प्रकृतीस आराम पडल्यावर, त्यांनी सहज -इच्छा प्रगट केली की, माझ्या मामांचे घर एकदम मोडकळीस आले आहे ते बांध. कारण एकदा घर पडल्यावर त्या जागेवर पुन्हा घर बांधता येत नाही अशी खेडेगावात समजूत आहे, म्हणून मी त्यांना होय म्हणालो; पण आयत्यावेळी घराचे सामान जमविणे व लागणारा पैसा उभा करणे खेड्यात शक्य नसताही मी बाबांच्या विश्वासावर कामाला सुरवात केली. पहिला प्रश्न वहातूकीचा, म्हणून रस्त्यालगत जमिन असलेल्या मालकास त्याच्या शेतातून रस्ता काढण्यास परवानगी मागताच त्याने कबुली दिली व रस्त्याचे काम सुरू केले. पण परवानगी देणाऱ्या मालकाच्या मुलाने त्याच्या शेताचे बंधारे फोडण्यास मनाई करून शेतातून रस्ता काढण्यास हरकत घेतली असता, नम्रपणे त्यास सांगितले

की, तुमच्या शब्दावर विश्वास ठेऊन मी रस्त्यासाठी खर्च केला तेव्हा तुमची मर्जी. तो घरी जाण्यास निघाला तेव्हाच साईलीला मासिकाचा अंक पोष्टमनने हाती ठेवला. मी मनात समजलो, बाबांचा आशीर्वाद आहे, कसलेच काम अडणार नाही. दुसऱ्या दिवशी गावातील एका सद्‌गृहस्थास बरोबर घेऊन त्या जमिन मालकास भेटण्यास माझ्या पुतण्यास सांगितले व त्याने बाबांच्या आदेशाप्रमाणे शेतातून रस्ता नेण्यास परवानगी दिली. अशा-तऱ्हेने घर बांधण्याच्या कामास सुरवात केली. पायाभरणीच्या वेळी सोन्याच्या लाण्याऐवजी बाबांची उदी ठेवून व पासीट ठेवतेवेळी उदीने पूजा करून सुरवात केली. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे कसलीही अडचण न येता साईंच्या आशिर्वादाने सहा महिन्यात नवे घर उभे राहिले व आम्हास कायमचा साईप्रसाद मिळाला. आता वडिलभावाची प्रकृती चांगली होऊन काठीच्या आधाराने फिरू लागले आहेत. आहे की नाही बाबांचा आशीर्वाद? प्रथम नमस्कार नंतर चमत्कार दाखवून , 'अल्ला मालिक, म्हणून नामानिराळा रहाणारा साई. त्या महा — आत्म्यास त्रिवार वंदन करून म्हणावेसे वाटते,

बुवाबाजीला देऊ नको थारा। सद्‌गुरु साईचा घेई तु सहारा॥
सुक्ष्म रुपे साईबाबा रक्षिती। मग नुरे कळीकळाची भिती॥

# साई कृपेने माझ्या नातवंडास जीवदान मिळाले

— **श्री. लक्ष्मण बापूराव रापतवार**
रिटायर्ड ड्राफ्टस्मन, किल्ला नांदेड.

माझी नात (मुलीची मुलगी) सौ. जयश्री दि. १८.४.८६ रोजी अर्जापूर ह्या खेडेगावात आठव्या महिन्यातच बाळंतीण झाली. माझे नातजावई गंगाधरराव तुंगनवार त्या गावात कोणी नर्स भेटेल का म्हणून पहावयास गेले. तोपर्यंत आपोआपच मुलगा जन्माला आला. परंतु तो इतका क्षीण होता की, त्याचा तास दोन तासही वाचण्याची शक्यता तेथील लोकांना वाटत नव्हती. म्हणून ते बाळास घेऊन नांदेडास आले. तेथे बाल रोगतज्ञ डॉक्टरास दाखविले, तेव्हा बाळाचे वजन फक्त १$^{१}/_{४}$ किलो होते. त्यांनी वाचण्याची शक्यता कमी आहे म्हणून बोलून दाखविले. तरी डॉक्टरचे कर्तव्य म्हणून त्यांनी एक टॉनिकची बाटली लिहून दिली व दररोज फक्त दोन थेंब मुलाच्या तोंडात टाकीत जा म्हणून सांगितले.

मुलगा झाला म्हणून जो आनंद झाला होता त्यावर निराशेचे सावट पडले व आनंदी वातावरण मावळले. मी माझ्या नातीस बाळाच्या मनगटीस बांधण्यासाठी छोटेसे साईबाबांचे लॉकेट नेऊन दिले. तशी माझी नात व नातजावई दोघेही साईभक्त आहेतच. त्यांनी ताबडतोब लॉकेट मनगटीस बांधले, परंतु मनगट इतके बारीक होते की, ते गळून पडू लागले. मग त्यांनी लॉकेट बाळाच्या उश्याखाली ठेवले. साईबाबांच्या द्वारकामाईतील

उदी माझ्याजवळ होती, तीही कपाळी लावण्यास सांगितले. माझी नात म्हणाली की, विटाळात उदीस स्पर्श कसा करावा? तेव्हा मी तिला समजावले की, देवाजवळ आपल्या लेकराकरता विटाळ वगैरे काही नसतो. साईबाबा म्हणजे परमेश्वरच!

फक्त दोन थेंब औषधाने मुलाची प्रकृती सुधारत गेली. आता त्याचे वजन ४॥ किलो आहे. डॉक्टर म्हणाले की, "आता काळजी नाही. मुलगा सुधारेल म्हणून मला आशा नव्हती." त्यांना काय माहित की, हा औषधाचा प्रभाव नसून उदी व लॉकेटचा प्रताप आहे. बाबा आपल्या भक्तास काळाच्याही दाढेतून ओढून आणतात. हे त्यांचे शब्द खोटे कसे होणार?

आता माझी नात व नातजावई मुलास थोड्या दिवसानंतर शिर्डीस नेऊन साईबाबांच्या चरणाचा स्पर्श करून व समाधीवर ठेऊन आणणार आहेत.

# तुमचा मी भार वाहिन सर्वथा।
# नव्हे हे अन्यथा वचन माझे॥

— श्री. शूरसेन शिवशंकर पोवळे
छाया इलेक्ट्रॉनिक्स,
मु.पो.ता. उरण,
जि. रायगड.

मला माझ्या वयाच्या अकराव्या वर्षापासून श्री साईभक्तीची ओढ लागली. आमच्या आजीच्या संस्कारामुळे भक्तिमार्गाचे बाळकडू बालवयातच लाभले. गुजरात प्रांतात दोहद या गावी माझे शालेय शिक्षण झाले. तेथे आमचे तिर्थरुप रेल्वेत नोकरीला होते. त्यांच्या सेवानिवृत्ती नंतर आम्हास मुंबईस येणे भाग पडले. त्यावेळेस जागेच्या टंचाईमुळे आमच्या एका आप्तेष्टाने आम्हाला उरण मुक्कामी जागा मिळवून दिली.

माझ्या सुदैवाने एम्प्लॉयमेंट तर्फे मला एक वर्षात पेण या गावी सरकारी नोकरीत कारकून या जागेसाठी हजर राहण्याकरिता/ बोलावणे आले. नोकरी फिरतीची, रोज कमीत कमी दहा ते पंधरा मैल चालावे लागे. बरोबर चार सहकारी असत. नेमून दिलेल्या ठिकाणी त्यांना कामाला लावून आपण देखरेख करायची. माझ्या आयुष्यातली पहिलीच नोकरी! वय अवघे १६ ते १७ वर्षांचे. कधी कुठे मुक्काम करण्याचा प्रसंग नाही. या नोकरीत सांगतील त्या खेड्यात मुक्काम करायचा खेडे लहान असेल तर देवळात मुक्काम करावा लागे.

तीन वर्षात तीन हजार खेडी (रायगड) जिल्ह्यात फिरून काढली. प्रत्येक प्रसंगाला तोंड द्यावे लागले. अशावेळी माझे सहकारी व इतर मंडळी म्हणायची की, तुम्ही चांगले शिकलेले पांढरपेशा वर्गातले, येथे जंगलात कुठे नोकरीला आलात? जेवणाचा व

झोपण्याचा पत्ता नाही, चाल तर खूप करावी लागे. एक दिवस आपल्या सहकाऱ्यांबरोबर १५ ते २० मैल अंतरावर ड्यूटीवर निघालो, चालता चालता मनात श्री सद्‌गुरु साईंचे स्मरण केले, त्यांना प्रार्थना केली, बाबा, ह्या लहान वयात, ह्या अशा नोकरीत कसे दिवस निघणार? पुढचे भवितव्य काय? त्यावेळी मी अक्षरशः रडलो व प्रार्थना केली की, बाबा मला अशी काय कला द्या की, कुठेही नोकरीची गुलामगिरी न करता स्वतःच्या कलेवर आयुष्याच्या अखेर पर्यंत मी आपल्या धंद्यावर काम करून पोट भरीन. श्री सद्‌गुरु साईंनी हाक ऐकली व मला एक वर्षात रेडीओ कंपनीत नोकरी मिळाली.

दहा वर्षाच्या नोकरीच्या काळात मी बाहेरून रेडीओ सर्व्हिसींग क्लास केला, कला आत्मसात केली. मुंबईतील राहण्याच्या प्रश्नामुळे नोकरीला राम राम ठोकला व उरण मुक्कामी 'छाया इलेक्ट्रॉनीक्स' या माझ्या धाकट्या मुलीच्या नावे रेडिओ रिपेरींगचा धंदा घरातच सुरू केला. त्याच धंद्यावर आज माझी व माझ्या कुटुंबातील पत्नी व दोन मुलींची उपजिवीका चालते. माझ्या दोन्ही मुली श्री साईकृपेने बी.कॉम. करीत आहेत. माझी श्री साईबाबांवर नितांत श्रद्धा आहे. 'ओम् श्री साई समर्थ' म्हणजे मी काही करत नसून माझ्या प्रत्येक बाबतीत श्री साई समर्थ आहेत.

## ही कृपा श्री साईबाबांचीच

**— श्री. सुनील शांताराम कुलकर्णी**
नविन भगवान नगर, प्लॉट नं. ३७,
जळगाव

मी कधीही देवाला मानत नव्हतो, कधीही त्याच्या फोटोकडे पहात नव्हतो पण......

एकदा माझ्या वडिलांना त्यांच्या मित्राने 'साईलीला' हे पुस्तक सहज टाईमपास म्हणून वाचायला दिले, ते वडिलांनी घरी आणले आणि मी पण ते टाईमपास म्हणून वाचले. त्याच्या वाचनामुळे माझ्या मनात साईबाबांविषयी श्रद्धा निर्माण झाली, तरीपण मी सहज म्हटले 'जोपर्यंत मी काही अनुभव घेणार नाही तो पर्यंत तुम्हाला मनापासून मानणार नाही.' आणि काही दिवसातच मला अनुभव आला तो असा —

मला मावशीचे पत्र आले की, आजी १५ दिवसापासून विना अन्नपाण्याची अंथरुणावर पडून आहे व तुला भेटण्याची तिची इच्छा आहे. माझे आजीवर फार प्रेम असल्यामुळे मी लगेच गावाला जाण्याची तयारी केली व जाताना घरातील भिंतीसमोर हात जोडले व बाबांना हाक मारून सांगितले, बाबा हिच वेळ आहे अनुभव घेण्याची. आता माझी एक इच्छा पूर्ण करा, ती अशी की, मी गावाला गेल्यावर आजी जेवण करताना दिसली पाहिजे. असे दिसले तर मी परस्पर शिरडीला येईन, असे बोलून मी निघालो.

गावाला घरी जावून बघतो तर काय नवल! आजी खरोखरच जेवण करत होती. घरात मावशीला विचारले, आजी जेवण केव्हापासून करते. तर मावशीने सांगितले की, १५ दिवसातून आजच आणि तू येण्याच्या फक्त २ ते ३ मिनिट आगोदरच आजीने जेवणाचा पहिला घास घेतला. लगेच जेवण संपल्यावर स्वतःचे ताट धुण्यासाठी आजी घराबाहेर गेली हे बघून माझ्या डोळ्यात अश्रू दाटून आले व बाबांनी माझी हाक किती त्वरेने ऐकली त्याबद्दल बाबांवरचे प्रेम व श्रद्धा फार वाढली व मीपण बोलल्याप्रमाणे लगेच दुसऱ्या दिवशी शिरडीला गेलो. शिरडीला जाण्याची ही माझी पहिलीच वेळ होती. ३ ते ४ दिवस शिरडीला राहिलो.

अशाप्रकारे माझ्यासारख्या नास्तिक माणसाला श्री साईबाबांनी भक्ती मार्गाला लावले. कधी परमेश्वराला न मानणारा मी आज श्री साईबाबांची पूजा व आरती केल्याशिवाय घराबाहेर पडत नाही. ही कृपा साईबाबांचीच ना?

# अघोर प्रसंगातून तूच वाचविलेस

**— श्री. प्रमोद बी. रायसोनी,**
१६४ समर्थ नगर, औरंगाबाद.

आम्ही बाबांच्याच कृपेने औरंगाबादसारख्या आम्हाला नवीन असलेल्या मुलखात कोणाचीच ओळख नसलेल्या शहरात वसलो ते केवळ साईकृपेनेच. तो दिवस आठवला की अजूनही भिती वाटते. तो दिवस म्हणजे मी नेमका त्यादिवशी शिर्डीत होतो. नेहमी मी गेलो की शिर्डीत दोन दिवस तरी राहतो. घरी सौ. व दोन लहान मुले. एक मुलगी सपना व दुसरा मुलगा सफल. येता जाता आईवडील व लहान भाऊ आमच्या घरी चक्कर टाकतात. क्रम झाले, मी शिर्डीला गेलो, दर्शन वगैरे झाले, आराम करण्याचा विचार होता परंतु माझा जीवलग दोस्त म्हणाला, "आपली औरंगाबाद गाडी लागली आहे." मी ताबडतोब स्टॅंडवर गेलो. गाडीत बसताच गाडी निघाली. पाच मिनीट उशीर झाला असता तर गाडी निघाली असती......?

आलो. साडेसहा वाजले होते. घरात प्रवेश केला. रात्र झाली होती. लहान मुलगा सफल बाबांच्याच कृपेने झालेला होता. त्याची प्रकृती ठीक नाही, असे समजले. मी थोडा घाबरलोच. काय करावे समजेना. त्यास सारख्या उलट्या व जुलाब सुरू झाले. रात्री एक वाजता तो पूर्ण गळून गेला होता. मी अक्षरशः रडू लागलो. बाबांची उदी दोन तीन वेळा त्यास लावली. बाबांचा धावा सुरू झाला. पहाटे एकदम तो अत्यावस्थ झाला. आकडी आल्यासारखा करून, तो मोठ्याने बरळू लागला. साडेसहा वाजले. मी डॉक्टरकडे नेऊ असे म्हणून माझा भाऊ आमच्या घरापासून थोड्याच अंतरावर राहतो,

तिकडे आईवडील देखील रहातात. मी घाबरलेल्या अवस्थेत आईकडे पळत सुटलो. आई, तू लवकर चल, सफल एकदम अत्यावस्थ झाला आहे. आई नुकतीच झोपेतून जागी झाली होती. आमची आई तशीच आमच्याकडे निघाली. मी रोडवर रिक्षा पहात होतो. बाबांच्या कृपेने एक रिक्षा माझ्याकडे आली. मी रिक्षात बसून घरी आलो. रिक्षा दरवाजावर थांबवली. मी, सौ. व आई, सफल, सपना रिक्षात बसलो. जवळपास कोण डॉक्टर असेल म्हणून पाहिले पण तेथे लहान मुलांचा चिकित्सक डॉक्टर नव्हता. रिक्षा तेथेच असलेल्या डॉ. कंधारकरकडे नेली. ते दोघे डॉक्टर आहेत. बाबांचा धावा चालू होता. दोघे डॉक्टर घरी होते. त्यांनी लगेच त्यांच्याच घरच्या सोफ्यावर सफलला झोपवले. इंजेक्शनस् चालू केली. लहान भाऊ डॉक्टर असल्याने त्यांनी स्कुटरवर जावून इंजेक्शन आणले. सलाईन तेथेच चालू केले. तो एकदम बेशुद्ध होता. सर्वजण भयभीत झाले होते. मी बाबांना तेथेच म्हणालो, "साई काय हा अवघड प्रसंग आम्हा लेकरांवर. ह्याला तू आत्ताच बरे कर. आम्ही त्याला घेऊन तुझ्या दर्शनास शिर्डीस येतो". ध्वनी आला, "घाबरू नको सब ठीक होगा".

बस! काय चमत्कार म्हणावा, सलाईन चालू होताच तो हळूहळू शुद्धीवर आला. डॉक्टर फारच चांगले भेटले. इंजेक्शनही वेळेवर मिळाले. मी शिर्डीहून त्याच रात्री आलो, हे सर्व घडले बाबांच्या कृपेने! आम्ही आठ दिवसात सर्व शिर्डीस जावून दर्शन करून आलो.

## बाबा प्रसन्न असले तर......

— श्री. के.पी. पहाडे
२४, एम्.आय.जी. फ्लॅटस्,
कांचीपुरा रामदास पेठ,
नागपूर.

आराध्य दैवत असलेले श्री साईबाबा भक्तांच्या हाकेला धावून जातात याबद्दल त्यांच्या भक्तांमध्ये तिळमात्र देखील शंका नसते. बाबांच्या समाधीची पायरी चढणाऱ्याचे दुःख हमखास कमी होते. भारतातीलच नव्हे तर जगातील वेगवेगळ्या जाती धर्मांचे लोक, ज्यांनी बाबांची किर्ती ऐकली आहे ते शिरडीला आल्यानंतर काही ना काही समाधान मिळवून जातातच.

"शरण मज आला आणि वाया गेला दाखवा दाखवा ऐसा कोणी" या [illegible] अनेकांना प्रत्यय आले आहेत. बाबा आपल्या भक्तांकडून ज्या गोष्टी [illegible] नकळत करवून घेत असतात. त्यांचे चिंतन, स्मरण सदैव करणाऱ्याला तर [illegible] येणाऱ्या त्यांच्या अडचणींचे निरसन चुटकीसरशी होते. माझ्या घराचा प्रश्न, पैशाची [illegible], [illegible] अपघात व इतर लहान मोठ्या प्रसंगावर मात करण्याचे धैर्य बाबांनी [illegible] वाचकांना मागील साईलीला मासिकात प्रकाशित केलेल्या माझ्या अनुभवावरून [illegible] असेलच. असाच एक अनुभव मी देत आहे.

हावेला मर्यादा नसते ही गोष्ट खरी! त्यातही योग्य वाटली [illegible] स्विकृती त्याला मिळते अन्यथा नाही. सबूरीने बऱ्याच अडचणी दूर होतात. घरदार [illegible] झाल्यानंतर, घरातील सजावट, करमणूकीची साधने वगैरे गोष्टी ओघाओघानेच पुढे [illegible] घरोघरी, शेजारी टी.व्ही. आहेत, अनेक वस्तूंनी त्यांची घरे सजली आहेत पण [illegible] घरी त्यापैकी काहीच नाही याची खंत किंवा न्यूनगंड मनाला चैन पडू देत [illegible] आपल्याकडे टी.व्ही. घ्यावा अशी इच्छा होवूनही पैशा अभावी ती शक्य होत नव्हती.

छत्तिसाव्या अध्यायात वर्णिल्याप्रमाणे बाबांची आनंदी वृत्ती (mood) पाहून [illegible] देशपांडे यांनी, पुत्रप्राप्तीकरिता औरंगाबादकरांच्या पत्नीच्या ओटीत नारळ [illegible] लावला होता. तोच प्रसंग नजरेसमोर ठेवून मी देखील सहज दोन महिन्यांपूर्वी [illegible] बाबांच्या फोटोसमोर आपले मनोगत व्यक्त केले. चिठ्ठया टाकून त्यांची संमती [illegible] मिळविली, पण पैशांचे काय? प्रश्न नऊ हजाराचा होता. ओळखीच्या टी.व्ही. [illegible] जावून नुसती विचारणा तरी करावी! या उद्देशाने मी घराबाहेर पडलो. थोडी गुजराथी भाषा अवगत असल्याने शहरातील एका विक्रेत्याशी झालेला संवाद देत आहे.

मी म्हणालो — बाबूभाई मने टी.व्ही. लेवानुं छे। त्यावर विक्रेता म्हणाला, लई जावो ने। मै तो तमने पहेलाज लई जवा माटे कहूं हतुं, तमेज ना पाडी हती! मी म्हणालो, मारी पासे ते वखते पैसाज नही हता। विक्रेता म्हणाला, मै पैसा माटे कोई बात नही करी हती। बोलो क्युं आप दऊँ। ब्लेक अँड व्हाईट अथवा कलर? मी म्हणालो, मारी पासे आटला पैसा नथी। त्यावर विक्रेता म्हणाला, पहाडे साहाब तमे मात्र बोलो क्युं आपूं पैसा माटे पाछळ थी विचारी शुं।

आश्चर्य हे की इतक्या भारी किंमतीची वस्तु कोणताही करार न करता मला देण्याची बुद्धी त्याला का व्हावी? नुसत्या किंमती विचारायला गेलो तर टी.व्ही.च घेवून परतलो. या व्यवहाराच्या पडद्यामागील शक्ती श्रीसाईबाबा खेरीच दुसरी कोण असणार? बाबांचे नितांत स्मरण, श्रद्धा असेल तर कोणत्याही गोष्टी अशक्य नसतात. घरात टी.व्ही. आला पैशांचाही प्रश्न कळतनकळत सुटला देखील आणि त्याचे बरेचसे देणे सुद्धा झाले. पण त्यानंतर पुन्हा विचारात पडलो की हे झालेच कसे? आणि त्याला उत्तर मिळाले, बाबा प्रसन्न असले तर...

असे आमुची ही पुण्याई। म्हणोनी भेटे ही माऊली साई
अगाध अगम्य त्यांच्या लीला। सीमा नाही उपकाराला.



# उभा पाठीशी असता साई......

— श्री. अंकुश रामचंद्र दळवी
म.रा. वीज मंडळ,
धारावी, मुंबई - १९.

मी तृतीय वर्ष कला वाणिज्य परिक्षेस बसण्यासाठी म्हणून २/३ वेळा विद्यापिठाचा अर्ज भरला, परंतु प्रत्येकवेळी अभ्यास होवूनही ऐन परिक्षेच्या समयी काही ना काही अडचणी येत व त्यामुळे मी परिक्षेला बसू शकत नसे. प्रत्येकवेळी ऑफिसची रजा व श्रम वाया जात. त्यामुळे बी.कॉम. पास होणे आपल्या नशिबी नाही असे वाटे. शेवटचा प्रयत्न म्हणून मी फॉर्म भरला व त्याच दरम्यान शिरडीस जाण्याचा योग आला. मी शिरडीस साईबाबांना म्हणालो की, बाबा ४ थ्या वेळेस परिक्षेला बसत आहे तरी यावेळी काही अडचण न येता परिक्षा पार पडू दे व त्याचप्रमाणे घडले. मी चांगल्या गुणांनी बी.कॉम. परिक्षा पास झालो. तेव्हापासून माझी साईबाबांवर नितांत श्रद्धा बसली.

एकदा मी शिरडीहून मुंबईस येत असताना, असाच अनुभव आला. मी शिरडीहून मनमाड रेल्वे स्टेशनला येण्यासाठी एस्.टी.त बसलो. सोबत बहिण व पत्नी होती. प्रवास दूरचा असल्याने मला एस्.टी.त झोप लागली आणि मनमाड स्टेशन कधी आले ते कळलेच नाही. पत्नी व बहिण प्रथमच शिरडीस जात असल्याने त्यांना काही समजण्याची शक्यता नव्हती. एस्.टी. मनमाड स्थानकावरून सुटणार इतक्यात मला जाग आली, झटपट एस्.टी.तून खाली उतरून पाहिले तर पंचवटी एक्सप्रेसची वेळ होऊन १ ते १॥ तास झाला होता, त्यामुळे आता संपूर्ण रात्र रेल्वे स्टेशनवर घालवावी लागणार असे वाटू लागले. स्टेशनवर येताच पंचवटी एक्सप्रेस दोन तास उशिरा सुटणार अशी सूचना देण्यात आली. त्यामुळे सर्व काळजी मिटली. मी झटपट तिकीटे घेतली इतक्यात पंचवटी एक्सप्रेस लागली. ही सर्व किमया केवळ साईबाबांमुळेच घडू शकली अशी आम्हा सर्वांची खात्री पटली.

दि. ७ जुलैच्या रात्री माझ्या पत्नीस डिलिव्हरीसाठी मॅटरनिटी होम मध्ये ॲडमिट केले. दुसऱ्या दिवशी ११ वाजेपर्यंत डिलीव्हरी झाली नाही म्हणून आम्ही सर्व घाबरून गेलो. इतक्यात डॉक्टर म्हणाले की, सिझरिंग करावे लागणार. हे ऐकताच उरले सुरले अवसानही गळाले. मी साईबाबांची मनात आराधना केली व डॉक्टरांच्या म्हणण्याप्रमाणे मी त्यांना माझी सही दिली, मनातून साईबाबांचे स्मरण चालूच होते. मी साईबाबांना म्हणालो, "बाबा आपणच मला आजवर सर्व संकटांतून वाचविलेत तसेच यावेळी माझ्या पत्नीचे प्राण वाचवा" म्हणजे मी हा अनुभव साईलीला मासिकात देईन. त्याप्रमाणे जवळ जवळ १ तासात सिझरिंग यशस्वी होवून मुलगी झाल्याची बातमी नर्सने सांगितली. मी साईबाबांचे मनोमन आभार मानले. अशीच साईकृपेची सावली आमच्यावर रहावी हीच साईचरणी प्रार्थना.

# नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य, नित्य घ्या प्रचीत अनुभवे

— श्री. पी.जी. कोरगावकर
कोंडाजी चाळ नं. ४,
रुम नं. २६, जेरबाई वाडिया रोड,
परेल, मुंबई नं. - १२.

मी बाबांचा एक भक्त असून काही अडचण किंवा संकट आले की, आमच्या घरी बाबांची जी छबी आहे तिला आम्ही सांगणे करतो. वेळोवेळी अशा बऱ्याच अडचणींतून बाबांनी आमची सुटका केली आहे. घरातील मंडळींचा आजार किंवा अशा बारीक सारीक बाबी तर नित्याच्याच होऊन बसल्या आहेत. माझा मोठा मुलगा हा लहान असताना त्याने चुकून पन्नास पैशाचे नाणे गिळले. आमची सर्वांची घाबरगुंडी उडाली. बाबांना आम्ही साकडे घातले. नंतर त्याला हॉस्पिटलमध्ये नेले. परंतु फोटो वगैरे काढून पाहिला. पण नाणे मिळालेच नाही. कारण बाबांच्या कृपेने ते केव्हाच अदृश्य झाले होते. त्यामुळे त्याला त्रास वगैरे असा काहीच झाला नाही. अशा एक ना दोन अनेक आठवणी बाबांच्या आहेत.

हल्लीचीच गोष्ट. आमच्या घरात उंदरांचा फारच सुळसुळाट झाला होता. उंदीरसुद्धा लहानसहान नाही तर मोठे मोठे! रात्रीची झोप नाही. माझ्या एका मुलाचा तर त्याने कानच चावला. आम्ही फार घाबरून गेलो. शेवटी पिंजरा आणून लावला व बाबांना सांगणे केले की, सर्व उंदरांचा नाश करा व आम्हाला या त्रासातून सोडवा आणि आश्चर्याची गोष्ट अशी की, खरे पाहिले तर पिंजऱ्यात उंदीर मिळत नाहीत असा अनुभव असताना उंदीर मिळू लागले व एक एक करून सर्व उंदीर नष्ट झाले व आम्ही समाधानाचा सुस्कारा सोडला.

अशीच दुसरी गोष्ट. माझी लहान मुलगी ही फारच आजारी होती. ताप काही हटत नव्हता. आम्ही करुणा भाकून बाबांची आळवणी केली व बाबांच्या कृपेने तिचा ताप दूर होऊन ती बरी झाली. तसेच तिने एकदा चुकून नाकात पेन्सिल घातली व नाकात आतवर जाऊन अडकली. आम्ही घाबरलो. पण आमचे बाबा होतेच. नेहमीप्रमाणे त्यांची आळवणी केली व नंतर हॉस्पिटलमध्ये तिला घेऊन गेलो. फोटो वगैरे सर्व झाले. डॉक्टरांनी तपासले. पण पेन्सिलीचा ठावठिकाणा नव्हता. तर असे हे अनुभव व अशा ह्या प्रचिती माझ्या जीवनात आणून देऊन बाबांनी आपले वचन सत्य केले आहे. यापुढेही त्या सद्गुरुच्या चरणी हीच विनंती की, त्यांनी वेळोवेळी आमच्या हाकेला उभे राहून माझे व माझ्या कुटुंबाचे संरक्षण करावे.



# साई तारी त्याला कोण मारी

— श्री. चंद्रशेखर ल. तारू
सातारा.

साईलीला मासिकात साईबाबांविषयी आलेला अनुभव लिहिताना मला होत असलेला आनंद ओसंडून वहात आहे. कारण पदव्युत्तर अभ्यास संपवून मी जवळ जवळ एक वर्ष नोकरीच्या शोधात होतो. परंतु यश काही मिळत नव्हते. खिन्न अवस्थेतच मी वावरत होतो. मला माझं अस्तित्वच हरवल्यासारखं वाटत होतं. कालांतराने वाचनालयात-जावून वाचन करण्याची मी आवड निर्माण केली. तेथे मला साईलीला मासिकातील साईभक्तांनी लिहिलेले अनुभव वाचावयास मिळू लागले. त्यामुळे नकळत माझ्यात धीर, आत्मविश्वास व प्रयत्नांवर श्रद्धा निर्माण झाली. सहज माझ्या मनात विचार आला की, 'मला नोकरी मिळाली तर मी साईलीलेत मला आलेला अनुभव लिहिन' त्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या मुंबई कार्यालयात मला मुलाखतीसाठी बोलाविण्यात आले व एकदोन महिन्यातच कामावर रूजू होण्यासंबंधी पत्रही आले. हे सर्व साईकृपेनेच घडले. म्हणूनच माझ्या मनी विचार येतो, 'साई तारी त्याला कोण मारी.'

# बाबांची अद्भुत लिला

— सौ. आर जी. जाधव
गोवर्धन घाट, नांदेड.

सुमारे तीन वर्षापूर्वी घडलेली ही सत्य घटना! १९८३ साली आमच्या नांदेड शहरात सतत तीन दिवस दि. ७, ८, व ९ ऑगस्ट या दिवशी मुसळधार पाऊस कोसळत होता. आमचे घर गंगेच्या काठी असल्याने पुराची सारखी भिती वाटत होती. आणि ती भीती अखेर खरी ठरली. घरात देवाच्या पोथ्या, बारावीच्या मुलाच्या नोट्स व इतर महत्त्वाची कागदपत्रे होती. हे सर्व सुरक्षित राहावे म्हणून मी बाबांचा धावा करीत होते.

अखेर बाबांनी माझा धावा ऐकला. पाणी ओसरले. घराची अवस्था अतिशय वाईट झाली होती. तीन दिवस बाहेर नातलगाकडे राहून, मी घरी आले. घरात येताच प्रथम देव्हाऱ्याकडे बघितले. आणि आश्चर्य! देव्हाऱ्यातील सर्व देव एकाच ठिकाणी होते. घरात लाईट नसल्यामुळे कंदिलाच्या प्रकाशात मी बाबांची पोथी, आरतीचे पुस्तक शोधत होते. कारण सर्व पोथ्या पिशवीत होत्या व गडबडीत बाबांची पोथीच वर राहीली होती. पोथीचा शोध घेत असतानाच मातीच्या ढिगाऱ्यावर माझे लक्ष गेले. घरातील पाणी ओसरून सर्व चिखल झाला होता. त्या चिखलाच्या ढिगाऱ्यावर बाबांची पोथी व आरतीचे पुस्तक सुरक्षित होते. तीन दिवसाच्या पुराच्या पाण्यातही दोन पुस्तके मात्र कोरडी होती. पाण्याचा लवलेशही त्यास लागला नव्हता. मी शेजारच्या लोकांना हे दृश्य दाखविले. त्यांना देखील आश्चर्य वाटले. हे सर्व पाहून माझ्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले. खरोखरच बाबांची लिला अगाध आहे.

# श्रद्धा असता साईवरी, फळे मिळती रसाळ गोमटी

— श्री. मोहन रावजी केळुस्कर
बि.न. ८५ कन्नमवार नगर,
विक्रोळी (पूर्व).
मुंबई - ४०० ०८३.

मला पहिल्या दोन मुली आहेत. आपल्याला एक मुलगा असावा ही प्रत्येकाची इच्छा असते, तशीच माझ्याही मनात पुत्रप्राप्तीची इच्छा घर करून बसली होती. परंतु फक्त इच्छा करून कार्य होत नसतं. त्यासाठी प्रयत्न करावे लागतात व त्या केलेल्या प्रयत्नांना यश यावं, म्हणून ईश्वरी कृपा असावी लागते. माझी श्रीसाईबाबांवर निस्सीम श्रद्धा होती. माझी इच्छा पूर्ण व्हावी म्हणून मी त्यांना अनन्यपणे शरण गेलो. कळकळून प्रार्थना केली.

त्यानंतर पत्नीला दिवस गेले. होणारं तिसरं अपत्य मुलगाच असेल का? हा प्रश्न तिच्या मनाला सतावू लागला. पण श्री साईंनी ती काळजी दूर केली. योगायोगाने माझे बालपणीचे मित्र डॉ. मंगेश सु. मालवणकर यांची एके दिवशी भेट झाली. ते निस्सिम साईभक्त असून मुलगा होण्यासाठी खास आयुर्वेदिक ट्रीटमेंट देतात. आतापर्यंत त्यांच्या यशस्वी झालेल्या केसेस लक्षात घेऊन मी त्यांच्याकडे (२३६/९२२४, कन्नमवार नगर, विक्रोळी) ट्रीटमेंटसाठी पत्नीला घेवून गेलो. तेथील त्यांच्या दवाखान्यात साईंची मूर्ती व प्रसन्न वातावरण पाहून माझ्या पत्नीला बराच धीर आला. आपल्या यशाचे प्रेरक श्री साईबाबा आहेत, असा डॉ. मंगेश यांचा विश्वास आहे. त्यांची ७ दिवसांची ट्रीटमेंट धार्मिक विधीने युक्त व आयुर्वेदिक आहे.

आणि खरोखर श्री साईंनी माझ्या प्रार्थनेला सुयश प्राप्त करून दिले. मला मुलगा झाला.

# श्री साईबाबांचे अश्रू

— श्रीमती सिताबाई शांताराम नाडकर्णी
सी/१४११, लक्ष्मीपूरी,
कोल्हापूर - ४१६ ००२.

जानेवारी-फेब्रुवारी १९८५ च्या श्री साईलीलेच्या अकराव्या लेखक कवी स्नेह-संमेलनासाठी आम्ही शिर्डीला गेलो होतो. संमेलनाच्या पहिल्या दिवसाचे पहिले सत्र झाल्यानंतर दुपारी बारा वाजता श्री साईबाबांच्या आरतीसाठी मी मंदिरात गेले. आरती सुरू झाली होती. माझी नजर श्री साईबाबांच्या मूर्तिवर स्थिर झाली तसे मला श्री बाबांच्या नयनांमधून गालापर्यंत अश्रूंचे ओघळ आलेले दिसले. माझ्या डोळ्यांना त्रास होतो, चश्माही लागला आहे, परंतु मी लावत नाही. मी हातांनी डोळे चोळून परत श्री बाबांच्या मूर्तिकडे टक

लावून पाहू लागले. परत पहिले आहे तेच. गालापर्यंत नयनधारा लागलेले श्री बाबांचे दृष्य माझे मन आरती मधून लागलीच खिन्न अवस्थेत गेले. आरती नंतर मी माझ्या चि. बाळाबरोबर ह्या विषयी खल केला. एक दुःखदायक घटना घडणार असल्याचे श्री बाबा आपल्याला सूचित करत आहेत हे आम्ही जाणले. आपापल्यापरीने आम्ही श्री बाबांना ह्या बद्दल करुणाही भाकत होतो.

त्या रात्री आम्हाला लवकर झोपही ह्यामुळे लागेना. दुसऱ्या दिवशी वर्तमान पत्रात बातमी वाचावयास मिळाली की, 'पिंगुळी गावचे श्री समर्थ सद्गुरु राऊळ महाराजांनी माहीमला देह ठेवला. ताजुद्दीन बाबा वारले त्यावेळी श्री साईबाबांनी द्वारकामाई मशिद मधील धुनीमध्ये पाणी ओतून सदर दुःखद घटना आपल्या जवळच्या भक्तांना पूर्व सूचित केली होती. तसेच आम्हाला श्री राऊळ महाराजांची दुःखदवार्ता स्वतःच्या नयनधारांनी सूचित केली. ह्या श्री राऊळ महाराजांनी मला प्रत्यक्ष दर्शन देण्यापूर्वीच माझ्या अति आवडीचा वाचनीय श्री रामदास स्वामींचा दासबोध हा ग्रंथ माझ्या चि. अशोककडून पाठवून दिला होता. शिर्डीच्या स्नेहसंमेलनाचा सोहळा आनंदात पार पडला परंतु जाता जाता श्री साईबाबांनी श्री राऊळ महाराजांचे विषयी आपले दुःख आपल्याच अश्रूंनी आम्हाला सदर दुःखाची झळ पोहचण्यापूर्वी असे दाखवून दिले.

# वात्सल्यमूर्ती आई म्हणजेच श्री साई

— श्री. बाळा अनाजी नाईक
मु.पो. भडगांव,
तालुका - सिंधुदुर्ग.

सन १९८४ पासून श्री. बाबांशी आमचा परिचय आला. त्यावेळेपासून आम्ही बाबांचे भक्त झालो. माझ्या मेहुण्याने दिलेले साईलीलेचे अंक वाचून, आम्हा उभयंतांच्या मनात साईभक्ती विषयी आदर निर्माण झाला व त्याच वेळेपासून आम्ही साईभक्तीला सुरवात केली. आजपर्यंत आम्हाला बरेच अनुभव आले. त्यातील काही अनुभव —

माझे वडील कामावरून कमी केलेल्यास सहा वर्षे झाली तरी त्याना कामावर घेतले नव्हते. तेव्हा साईबाबांजवळ नवस केला की, त्यांना जर या दोन महिन्यात कामावर घेतले तर मी शिरडीला तुमच्या दर्शनाला येईन. नवस बोलल्याला १५ दिवस झाले असतील. वडिलांचे पत्र आले की, मला कामावर घेतले. त्याचवेळी पुन्हा अनुभव पहाण्यासाठी दुसरा नवस केला की, मला मुलगी नाही, दोन मुलगे आहेत तेव्हा यावेळी मला मुलगी व्हावी. आणि काय आश्चर्य! मला मुलगी झाली. त्यानंतर मी शिरडी येथे जावून श्रींचे दर्शन घेऊन आलो. अशा अनेक इच्छा बाबांच्या कृपेने पूर्ण झाल्या आहेत. व याच्या पुढेही व्हाव्यात हीच त्या माऊलीपाशी प्रार्थना.

# असता साई पाठीराखा...

— सौ. नीता उल्हास जाधव
६२९, सरेकर आळी, महाड,
रायगड.

गेल्या मार्च मधील गोष्ट. आमच्या शाळेतील सर्व शिक्षकांनी श्री हरिहरेश्वरची सहल करण्याचे ठरविले. भारताची दक्षिण काशी म्हणून समजले जाणारे हरीहरेश्वर मी अद्याप पाहिले नव्हते. त्यामुळे मला खूप आनंद झाला. काशीला कधी जावू तेव्हा जावू पण आता हरेश्वरला तर भेटू. मी जाण्याची सर्व तयारी केली.

दुपारच्या गाडीने आम्ही प्रथम म्हाप्रळला गेलो. म्हाप्रळ हे बाणकोटच्या खाडीवरील छोटेसे बंदर आहे. आमची लाँच दोन वाजता सुटली. लाँचमधून प्रवास करण्याची माझी पहिलीच वेळ. त्यामुळ मला सारखी भिती वाटू लागली. मी बसल्या बसल्या साईनामाचा जप करू लागले. आणि काय आश्चर्य! लाँचच्या समोरच्या खांबावर मोरपिशी निळसर शेडमध्ये श्री साईबाबांची भली मोठी प्रतिमा, सुहास्य वदन आणि उंचावलेला तो वरद हस्त, तेव्हा मला जो आनंद झाला त्याचे वर्णन मी कसे करू? जणूकाही मिस्किलतेने हसत साई मला सांगत होते, "काही घाबरू नकोस. बघ, मी सुद्धा तुझ्याबरोबर आलो आहे ना! माझे मन भरून आले. मी सारे काही विसरून गेले. अवती भोवतीची माणसे, निळ्या आकाशाने प्रतिबिंबित झालेले निळसर हिरवट पाणी, दूरवर दिसणारे हिरवे डोंगर, झाडे, लाटांबरोबर हलणारी अनेक प्रतिबिंबे. सारे सारे विसरून मी साईनामात रंगून गेले.

संध्याकाळी साडेसहा-सातच्या सुमारास आम्ही बाग मांडल्यास पोहचलो. तेथून आठला हरिहरेश्वर येथे आलो. पूर्व नियोजित कळविल्याप्रमाणे आमच्या रहाण्याची वगैरे उत्तम सोय झाली. चांदणी रात्र होती त्यामुळे आम्ही मंदिराच्या परिसरात फिरावयास गेलो. मंदिर बंद होते. समोरून सागराची शोभा फारच छान दिसत होती. अंधारात फेसाळ लाटा तेवढ्या चमकून जात होत्या. निरव शांततेत सागराचा धनगंभीर आवाज घुमत होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही काळभैरवाचे व हरिहरेश्वराचे दर्शन घेतले. पूजा केली. सोमसूत्री प्रदक्षिणा भटजीने सांगितल्याप्रमाणे घातली. समोर अथांग अरबी समुद्र पसरला होता. उंच उंच लाटा आदळत होत्या. मनात भिती आणि कौतुकही होते. निसर्गाची कलाकुसर पहाताना स्वतःचे अस्तित्वही विरून जात होते. सभोवती खारट पाणी असूनसुद्धा तेथील खडकातील गायकुंडात अगदी गोड असे पाणी होते. हरिहरेश्वराचे रूप डोळ्यात साठवूनच आम्ही तेथून जवळ असलेल्या एका वाडीत श्री गजानन महाराजांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली होती, तिचे दर्शन घेतले. साई आणि गजानन दोघेही संतच. "संत दिसती वेगळाले परि स्वरूपी मिळाले" मला स्वामी अमलानंदाच्या शब्दांची आठवण झाली.



नंतर आम्ही मंडनगडला आलो. तेथील एका ओळखीच्या गृहस्थांकडे विश्रांतीसाठी उतरलो आणि जेवणासाठी एका खाणावळीत गेलो. घास घेता घेता माझे लक्ष सहज वर गेले. तो तेथील भिंतीवर एक साईंची जुनी पुराणी तसबिर होती. मला मनात हसू आले. साई काही आपली पाठ सोडायला तयार नाहीत. कारण घरातून निघतानाच मी त्यांना हात जोडून विनंती केली होती की, आम्हा सर्वांना सुखरूप घरी येऊ दे. साई भेटल्याच्या आनंदात मी पुन्हा सारं काही विसरून गेले. अगदी माझी पैशांची पर्स सुद्धा! मी खाणावळीत जेवले एवढेच मला आठवले. पुढे पर्स तेथेच राहिली का आणखी कोठे? पण परक्या ठिकाणी पर्स कशाला ठेवा म्हणून सर्वांनीच आपल्या पर्स बरोबर घेतल्या होत्या हेही तितकेच खरे होते. माझे सहकारीही घाबरले. येथे पैशाचा प्रश्न नव्हता. पण पर्स हरविणे म्हणजे सहलीला गालबोट. सर्वांनी पुन्हा पुन्हा चौकशी केली. क्षणभर मीही घाबरलेच. पैशासकट पर्स हरवली होती. मला वाईट वाटले. मी मनात म्हटले, "प्रत्येक ठिकाणी बाबा माझ्या पाठीवर होते. मग माझी पर्स हरवलीच कशी?" आम्ही ज्या घरी उतरलो तेथेही सर्वत्र शोध घेतला. समजा चुकून पडली असेल तर! त्या घरातील यजमानांनाही या गोष्टीचे फार वाईट वाटले. ते म्हणाले, "घरात राहिली असती तर गेली नसती. खानावळीत जाताना उगाच बरोबर घेतलीत. हात धुण्यास बाहेर गेलात तेव्हाच कोणी तरी उचलली पाहिजे." खाणावळीच्या मालकानेही नोकरांना विचारून शोधाशोध केली. ते म्हणाले, "आमच्याकडून गेली नसती. कोणी तरी बाहेरच्या माणसाने जाता जाता नेली असली पाहिजे."

सर्वांनाच खूप वाईट वाटले. मी त्यांना म्हटले, "हा विषय येथेच संपवून टाका. पुन्हा कधीही कुठेही या विषयाचे नाव नको." तरीही मन हुरहुरत होते. एक दोन नव्हे जवळ जवळ दिडशे रुपयांचा प्रश्न होता.

घरी आल्यावर प्रथम मी बाबांना हात जोडले. म्हणाले, "बाबा पैसे गेले याचे दुःख नाही. देणारे घेणारे तुम्हीच आहात. पण आपण सतत माझ्या पाठीशी असताना पर्स गेली कशी? मला सांभाळलीत मग माझी पर्स का सांभाळली नाहीत? तुम्ही सतत जवळ असताना असे व्हायला नको होते. कदाचित ती हरवावी अशी तुमचीच इच्छा असेल. तुम्हाला पाहिले की, मी स्वतःला सुद्धा विसरून जाते. सारं लक्ष तुमच्याकडे लागते. मग पर्सवर लक्ष ठेवणार कसं? तुम्ही माझ्या बरोबर आहात या आनंदात मी पर्स विसरले. ही माझी चूकच झाली. मला तुमच्याशिवाय क्षमा कोण करणार? जशी तुमची इच्छा तसे घडले."

घरात कोणाला काही समजले नाही. म्हणजे मीच सांगितले नाही. सांगायचे ते सारे साईंना सांगितले होते. मग उगीचच बाजार कशाला?

जवळ जवळ आठवडा निघून गेला. आणि आमच्या शाळेतील एका शिक्षकाच्या पत्त्यावर एक पत्र आले; त्या पत्रात लिहिले होते, पर्स घरातच सापडली. त्यात एक शंभर व एक पन्नासची नोट व इतर सुट्टे पैसे, जपाची माळ, पेन व रुमाल आहे.

मला प्रथम विश्वासच बसेना. खूप आनंद झाला पण तो पर्स मिळाली यापेक्षा

साई माझा खरच पाठीराखा आहे या जाणिवेमुळे. साईने आपल्यावरील विश्वासाला जरासुद्धा तडा जावू दिला नाही. पण मला पुन्हा पुन्हा एकच नवल वाटते. सारे घर व्यस्थितपणे पुन्हा पुन्हा शोधून सुद्धा त्या तीन चार दिवसांनी पर्स त्यांच्या पलंगाखाली कशी सापडली. हे फक्त ते साईच जाणे. त्यांची लिलाच अगाध. ती आपल्यासारख्या सामान्य माणसांना कशी काय उमजणार? त्याचा तोच जाणे. तरीही एक मात्र खरेच.

असता साई पाठीराखा। नाही घोर काळजी कशाची।
साई साई वाचे जपता। साई उभा पायथ्याशी॥

# साईनाथांची अगाध लिला

— श्री. मधुसूदन आबाजी चव्हाण
साई-विहार, साईनाथ को. हौ. सोसायटी,
चाळ नं. ३, रु. नं. १, टेम्बेवाडा रोड,
भांडुप, मुंबई नं. ४०० ०७८.

मी साईलीला लेखक-कवी स्नेहसंमेलनास जाताना, माझे मित्र श्री. नेमाडे ह्यांनी माझ्याकडे शंका उपस्थित केली की, एवढे अखिल भारतीय स्नेहसंमेलन असताना तुम्ही पत्रकारांना का आमंत्रण करीत नाही? त्यावर मी त्यांना म्हणालो की, साईनाथांची लिला अगाध आहे. त्यातून काय होतेय ते पाहू या? असे सांगून मी स्नेहसंमेलनासाठी शिर्डीत गेलो.

११ व्या लेखक-कवी स्नेहसंमेलनापर्यंत प्रत्यक्षात साईनाथांना पाहिलेल्या भक्तांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केलेले होते. परंतु प्रत्यक्षात साईनाथांच्या अगाध लिलेमुळे १२ व्या लेखक-कवी स्नेहसंमेलनास प्रथमच नवशक्तीचे संपादक श्री. पु. रा. बेहरे ह्यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले. अशाप्रकारे साईनाथांच्या अगाध लिलेतून श्री. नेमाडे ह्यांची साईनाथांनी शंका दूर केली.

नंतर श्री. पु. रा. बेहरे ह्यांना भेटून माझे मनोगत सांगितले व आपण आपल्या वर्तमानपत्रातून उत्तम प्रकारे साईनाथांबद्दल माहिती लिहावी, अशी त्यांना अगत्यपूर्वक विनंती केली. आणि श्री. पु. रा. बेहरे ह्यानी दि. १०।२।८६ व ११।२।८६ रोजी 'नवशक्ती' मधून "शिरडीचे साईसंस्थान" असे दोन प्रशंसनीय अग्रलेख लिहून महाराष्ट्राच्या असंख्य जनतेस साईनाथांचे प्रत्यक्ष दर्शन घडविले.

अशा प्रकारे साईनाथांच्या कृपेने माझी बऱ्याच दिवसांची इच्छा पूर्ण झाली.

# साईनाथांनी राहण्याची खोली बदलून दिली

— सौ. उषा काशिनाथ जठार
'पंचशील', बि. नं. १२३,
खो.नं. ४०७९, ४ था मजला,
नेहरू नगर, कुर्ला (पूर्व),
मुंबई नं.-४०० ०२४.

नऊ वर्षांपूर्वी साईनाथांनी केलेल्या चमत्काराचा स्वानुभाव मी येथे देत आहे. आम्ही पंतनगर, घाटकोपर पूर्व येथे राहात होतो. परंतु तेथे शेजारी राहाणारे भाडेकरू चांगल्या वर्तनाचे नव्हते. त्यांना दुसऱ्याचे चांगलेपण पहावत नसे. ते आम्हाला फार त्रास देत असत, रोज भांडणे करीत असत, त्यामुळे आमच्या मनाला फार त्रास होत असे. पण करणार काय? दुसरीकडे कुठे जागा घेण्याची आमची ऐपत नव्हती. तेथील इतर काही लोक म्हणायचे की, अशा लोकांच्या संगतीत का रहाता, तुमच्या मुलांवर त्याचा वाईट परिणाम होईल. आम्ही तुमच्याबद्दल ऑफीसमध्ये सांगून बघतो की, त्यांना दुसरीकडे बदली करून द्या. आणि त्याप्रमाणे बऱ्याच लोकांनी आमच्यासाठी प्रयत्नही केले. पण कोणाचेच काही चालत नव्हते. मुले तर तेथे राहायला फार कंटाळली होती. तेव्हा माझा मोठा मुलगा चि. अनिल हा म्हणाला की, मी साईबाबांना साकडे घालतो की, मी साई सतचरिताचे पारायण करतो की, आम्हाला आमची खोली बदलून मिळू दे. साईबाबा फार कृपाळू आहेत, सच्चा दिलाने कोणी हाक मारल्यास ते भक्तांच्या हाकेला जरूर धाऊन येणार ही आम्हाला खात्री होती.

आणि माझ्या मुलाने श्रावणातील पहिल्या गुरुवारी पारायणास सुरुवात केली. ऑफीसमध्ये जाऊन प्रयत्न करणे चालूच होते परंतु यश येत नव्हते. शेवटी पारायणाला सहा दिवस झाले व चमत्कार झाला. आजपर्यंत ऑफीसमध्ये कोण आमचे ऐकून घेत नव्हते, आमचे काम होणारच नाही अशी सर्व परिस्थिती होती परंतु त्या दिवशी मला ऑफीसमध्ये श्री. हरीचरण नागेश खोत नावाचे साहेब भेटले. त्यांनी आमची सर्व परिस्थिती समजावून घेतली व सांगितले, तुम्ही काही काळजी करू नका, मी तुमची बदली करून देतो, खरोखरच साईबाबांनी त्यांच्या अंतःकरणात प्रेरणा केली असणार कारण ते पण फार देव भक्त आहेत. त्यांच्या घरात सर्व देवादिकांचेच फोटो आहेत. खरेच साईबाबांनी आम्हाला हरिचरणाजवळ पोहोचते केले. काय अगाध लिला आहे पहा! न होणारे कोणतेही काम साई माऊली अगदी सहज करून टाकतात. अशा तऱ्हेने आम्ही आता राहातो ती खोली आम्हाला ६ सप्टेंबर १९७७ रोजी बदलून मिळाली व आमच्या मागचा त्रास संपला.

●●

# माझा पहिला अनुभव

**— श्री. सोमकांत जयराम गांवकर**
मुख्याध्यापक,
मु. नानिवडे, ता. वैभववाडी,
जिल्हा - सिंधुदुर्ग
व्हाया - राजापूर.

माझे वडील भक्तीपंथातले असल्यामुळे लहानपणापासूनच ईश्वरभक्तीकडे माझा ओढा होता. वडिलांच्याबरोबर मी एकवेळ पंढरपूरला पांडुरंगाच्या दर्शनालाही जावून आलो आहे. वडिलांच्या मार्गदर्शनाखाली कित्येक श्रावण महिन्यात मी हरीविजय, भक्तीविजय, संतलीलामृत इत्यादी ग्रंथ वाचले आहेत. गीतेच्या वाचनामुळे मला सात्विक भक्ती फार आवडते. काही काळापूर्वी "शिरडीवाले साईबाबा, शिरडी पंढरपूर माझे" यासारखी गाणी ऐकून व कोणीतरी सांगितल्यावरून शिरडीला साईबाबा नावाचे कोणी एक थोर पुरुष होऊन गेले, एवढीच साईबाबांबद्दल मला माहिती होती. त्यानंतर रत्नागिरी जिल्ह्यात खेड तालुक्यातील तिसंगी गावच्या शाळेवर काम करीत असताना, मी ज्या घरात राहात होतो ते मुंबईला नोकरीवर असलेले माझे घरमालक श्री. भोसले हे नुकतेच शिरडीला जावून गावी आले होते. येताना त्यांनी श्री. साईबाबांचा फ्रेम केलेला एक आशीर्वाद फोटो घरी आणला. पूर्वीपासूनच त्यांचे शिरडीला जाणे-येणे होत असल्याने, त्यांच्या घरी साईबाबांचे पूर्वीचे दोन-तीन फोटो होते. त्याचप्रमाणे दत्तात्रय, श्रीकृष्ण, गणपती, लक्ष्मी इत्यादी देवदेवतांचे फोटो त्यांचे घरी लावलेले होते. परंतु घरमालकांनी आणलेला तो साईबाबांचा नवीन फोटो मला फार आवडला. तो फोटो मी इतर सर्व फोटोंच्या मधोमध लावला. इतर फोटोंप्रमाणे मी त्याची नित्यनेमाने पूजा करू लागलो. त्या दिवसापासून सायंप्रार्थनेच्यावेळी आम्ही घरातील सर्व मंडळी 'आधी हे नमन माझे साईनाथा" हे साईस्तोत्र पुस्तकात पाहून म्हणू लागलो. त्या फोटोकडे अनेक वेळा मी एकटक पाहात असे. पांडुरंग, राम, कृष्ण हे त्या फोटोतच सामावलेले मला दिसू लागले. आणि त्यामुळेच साईभक्तीपेक्षा साईमूर्तीचाच मला ध्यास लागला.

एक वर्षानंतर आमच्या घरमालकांनी जुन्या घराला लागूनच नवीन घर बांधण्यास सुरुवात केली. घर बांधून झाल्यावर नव्या घरात भोसल्यांचे कुटुंब राहायला जावयाचे व त्या जुन्या घरात हायस्कूलला जाणाऱ्या माझ्या मुलीसह आम्ही राहावयाचे असे ठरले होते. भोसल्यांच्या पत्नीला एकवेळ मी सहज विनंती केली, "काकू, आता तुम्ही नवीन घरात जाणार व आम्ही येथे राहाणार. नवीन घरात जाताना हे देवदेवतांचे सर्व फोटो तुम्ही तिकडे नेणार; तरीपण साईबाबांचा हा आशीर्वाद फोटो तेवढा इथे आमच्याकडे ठेवा. रोज तिन्हीसांजला उघड्या भिंतीवर अगरबत्ती लावण्यापेक्षा या फोटोसमोर मी अगरबत्ती लावीन व बाबांना नमस्कार करीन." काकूने अधिक काहीच न बोलता नुसते "चालेल" या शब्दात होकार दिला.

गृहप्रवेशाचा दिवस जवळ आला. घरमालक आदल्या दिवशीच मुंबईहून घरी आले. कार्यक्रमाच्या तयारीला जोरदारपणे सुरुवात झाली. निमंत्रणाप्रमाणे पाहुणेमंडळी जमा होऊ लागली. कार्यक्रमासाठी मी शाळेत रजा नोंदली. रात्री आम्ही सारी मंडळी एकत्र बसून दुसऱ्या दिवसाच्या कामांचा व साहित्याचा विचार करू लागलो. कार्यक्रमाला स्पीकर न मिळाल्यामुळे दुसऱ्या दिवशी सकाळच्या पहिल्या गाडीने खेडला जावून मिळेल तो स्पीकर लवकरात लवकर आणण्याचे काम माझ्याकडे सोपविण्यात आले. ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी पहाटे उठून पहिल्या गाडीने मी खेडला गेलो. इकडे सुमुहूर्तावर गृहप्रवेशाला सुरुवात करण्यात आली. ब्राह्मणांच्या सांगण्याप्रमाणे जुन्या घरातील एक एक वस्तू नव्या घरात नेण्यात येऊ लागली. जमलेले शेजारी व पाहुणे मंडळी कामाला मदत करीत होती. एक एक म्हणताना जुन्या-घरातील देवतांचे फोटो नव्या घरात नेऊन लावण्यात येऊ लागले. मी नेऊ नका म्हटलेला तो साईबाबांचा आशीर्वाद फोटो काढून नव्या घरात नेला. पण काय? स्टुलावर उभे राहून भिंतीवर लावत असताना नेमका तोच फोटो लावणाराच्या हातातून खाली पडला. खळ्कन आवाज झाला व काचेचे तुकडे तुकडे झाले. थोडावेळ गोंधळ झाला. इतरांना काही कळले नाही, पण आमच्या घरमालकिणीला काहीतरी जाणवले. घरमालकांवर ती थोडीशी रागवली व त्यांना बाजूला घेऊन, "तुम्हाला सांगत होते ना?" असे काहीतरी बोलली. पडलेले काचेचे तुकडे जमा करून टाकण्यात आले. बीन काचेचा तो फोटो घरमालकांनी गुपचूप जुन्या घरात नेऊन माझ्या टेबलावर भिंतीला टेकून ठेवला व फोटोसमोर एक नारळ ठेवला. इतरांना हे कळलेले नसले तरी घरमालक काय ते समजले.

दुपारी ११च्या सुमारास मी खेडवरून स्पीकर घेऊन आलो. गाडी तिसंगी स्टॉपवर थांबताच तिथे जमलेल्या शाळकरी-मुलांनी ओरड केली, "अरे, गुरुजी आले. स्पीकर आणला." मुलांसमवेत सर्व सामान घेऊन घरी आलो. ताबडतोब कर्णेवगैरे बांधून स्पीकर सुरू करण्याबद्दल अगोदरच स्पीकरमालकाला सांगितले होते. आल्याबरोबर त्या कामाला सुरुवात केली. एवढ्यात घरमालक भोसले पुढे आले व मला म्हणाले "गुरुजी अगोदर जरा इकडे या." परंतु मी त्यांचे काहीच न ऐकता एका माणसाकडून दोन्ही कर्णे शेजारच्या झाडावर बांधून घेतले. स्पीकर सुरू झाला. त्यानंतर घरमालकांना बोलावण्याचे कारण मी विचारले. त्यांनी मला जुन्या घरात नेले व तो फोटो दाखविला. प्रथम मला काहीच कळेना. पाहातो तर फोटोची काच फुटलेली. चौकशीनंतर सर्व काही समजले. त्याक्षणी मनाची काय स्थिती झाली हे मात्र मला लिहिता येत नाही. "जेथे माझ्यांचा गांव तेथे धाव जाय माझी" या वाक्याची आठवण झाली. दोन्ही डोळ्यांतून अश्रू खाली पडले. मी बाबांना हात जोडले.

त्या संबंध दिवसात गृहप्रवेशाचे कार्यक्रम थाटांत चालू होते. रात्री भजने होती. पण माझे कशातच लक्ष लागत नव्हते. दुसऱ्या दिवशी मी सकाळीच खेडला गेलो. त्या फोटोला काच बसवून घेतली व फोटो आणून जुन्या घरात लावला. त्यावर्षी मे महिन्याच्या सुट्टीत भोसले यांचेबरोबर मी शिरडीला गेलो व त्या भक्तवत्सल साईबाबांचे मनोभावे

दर्शन घेतले. सध्या मी सिंधुदुर्ग जिल्ह्यात नाणिवडे गावी बदलून आलो आहे. येताना तो बाबांचा फोटो मी बरोबर आणला आहे. संकटप्रसंगी फोटोसमोर हात जोडून मी बाबांची प्रार्थना करतो आणि बाबा ती सर्व संकटे दूर करतात. श्री. साईबाबा हे भक्तांचे मनोगत जाणून भक्तांशी वात्सल्याने वागणारे आहेत याचा मला आलेला हा पहिलाच अनुभव आहे. यानंतर असेच एक-दोन अनुभव आले ते पुन्हा केव्हातरी साईलीला अंकात देण्याची माझी इच्छा आहे. तोवर साईचरणी लीन होऊन हे माझे लिखाण संपवितो.

सर्वव्यापी, सर्वसाक्षी सर्वेश्वर श्री साई महाराज की जय.

# देव तारी त्याला कोण मारी

— श्रीमती मनोरमा श्रीधर परूळेकर
७/२२४, मिलींद भुवन को-ऑप .हाऊसिंग
सोसायटी, महात्मा गांधी रोड,
गोरेगाव (पश्चिम), मुंबई नं. - ४०० ०६२.

दिनांक ६.४.८५ रोजी वांद्रा येथे रात्री दहा वाजता आम्ही सहलीला जाणाऱ्या आमच्या गाडीत बसलो. दुसऱ्या दिवशी दुपारी एक-दीडच्या सुमारास श्री. पूर्णानंद स्वामींच्या मठात पोहचलो. तेथे अंघोळी वगैरे करून भोजन केले व थोडा आराम केला. पुण्यतिथीनिमित्त तेथे बरीच मंडळी आली होती.

सोमवारी श्री. स्वामींची पुण्यतिथी असल्यामुळे भजन, आरत्या वगैरेत दिवस आनंदात गेला.

मंगळवारी सकाळी उठून प्रातःविधी आटपून श्री स्वामींचे दर्शन घेतले. न्याहरी झाल्यावर आमची बस दाभोळीहून सुटली. पाठपरुळे, आदि नारायणं, श्री पुरुषोत्तम वालावली-इत्यादि ठिकाणी जाऊन रात्री मठात परतलो.

बुधवारी सकाळी उठून नित्यक्रम आटपून मठातून निघालो ते दुपारी बारा-साडेबाराच्या दरम्यान गोव्यास पोहचलो. तेथे दोन दिवस मुक्काम करून व सर्व देवालये, प्रेक्षणीय स्थळे पाहून १२ तारखेस सकाळी निघालो. तेथून आमची गाडी 'म्हापसे' येथे आली इकडे तर गम्मतच झाली, माझ्या सौ. वहिनी बरे वाटत नाही म्हणून बसमध्येच बसल्या व आम्ही सर्व मंडळी खरेदीसाठी निघालो. माझी व माझ्या गटातील मंडळींची चुकामूक झाली. मार्केटभर मी त्यांना दोन-तीनदा शोधले पण कोणीच दिसेना! आता काय करावे? या गावात पहिल्यांदाच आले होते. तेव्हा मी बाबांचा मनातल्या मनात धावा करू लागले की, माझी माणसे मला मिळू द्या. बाबांनी माझी हाक ऐकली. २-३ मिनिटातच मला माझा भाऊ अण्णा दिसला. मग मी त्याच्याबरोबर निघाले. त्यानंतर आमची तीनवेळा चुकामूक झाली व बाबा माझ्या हाकेला प्रत्येक वेळी धावून आले. मग मात्र आमची चुकामूक झाली नाही. त्या दिवशी आमची गाडी मुंबईच्या मार्गाला लागली व शनिवारी सकाळी आम्ही 'वांद्रा' येथे सुखरूप पोहोचलो. असे आपले सर्वांचे बाबा चुकेल त्याला वाट दाखवतात व आपल्या लेकरासाठी धावून येतात.

# मृत्यूच्या दारातून परतले बसप्रवासी

— संजय केशव परळकर
नाना निवास, तिसरा मजला,
गोखले रोड (द.)
दादर, मुंबई नं. - ४०० ०२८.

"साई-साई" म्हणोनी कोणी भक्त हाकारती
नच भार तयांचा साई वाहती।
तर जे जे तयांचे लागे-बांधे तयांसीही
सदैव-सत्वर-तत्पर साई तारिती॥

वरील काव्यपंक्तिंना साजेसाच असा हा दुर्मिळ अनुभव आहे. २१ जुलै १९८६ ला गुरुपौर्णिमा उत्सव, शिर्डी येथे मोठ्या उत्साहाने पार पडल्यानंतर आम्ही परतीच्या प्रवासास निघालो. दुपारी १२ वाजता दहीकाला आटोपल्यावर आमच्या निघण्याच्या हालचाली शीघ्रगतीने होऊन आम्ही त्वरीत दुपारी ३ वाजता आरक्षित जादा बस पकडण्यासाठी बस स्थानकावर धावलो. वेळेपूर्वी स्थानापन्न झालो. प्रवास सुरू झाला. आदल्या रात्रीचे जागरण व प्रवासातील आयती संधी म्हणून बहुतेक प्रवासी झोपी गेले. त्यात माझाही समावेश होताच. बसने नाशिक गाठले. तोवर पावसाचा थांगपत्ता नव्हता. परंतु लक्षण दिसत होते. नाशिक ओलांडल्यावर मात्र त्याने आम्हाला गाठलेच. अचानक आमची बस थांबली. प्रकार काय आहे म्हणून आम्ही चालकाकडे विचारणा केली असता, गाडीचे वायपर (बसच्या दर्शनी भागाकडील काच पुसणारे यंत्र) अकार्यरत असल्याचे त्याने सांगितले. दक्षता म्हणून गाडी सांभाळून चालविण्याचा सल्ला आम्ही त्याला दिला. परंतु पावसाचा जोर काही कमी होत नव्हता. अखेर वायपरविना बसने घाटापूर्वीच्या चेकपोष्टपर्यंत मजल मारलीच. तोपर्यंत संध्याकाळचे ६ वाजले होते. पुढील प्रवास चढ-उताराचा व नागमोडी वळणाचा होता. त्यातच सूर्यप्रकाश अंधुक-सा झाला होता म्हणून चालकाने बसचे पुढील दिवे (हेडलाईटस्, डिपर्स इत्यादी) तपासून पाहिले. परंतु बॅटरी कमजोर झाल्यामुळे त्याचा प्रकाशदेखील कमजोर झाला होता. पुढील प्रसंग आणीबाणीचा होता पण आमचा बसचालक संयमी, धीट आणि जबर आत्मविश्वासी होता. वायपर नीट नसल्यामुळे आमच्यापैकी एकाकडून त्याने सिगारेट मागून त्यातील तंबाखू पुढील काचेवर चोळला. जेणेकरून पर्जन्य तुषारांचे पतन काचेवरून सरळ खाली होईल. एक समस्या काही अंशी मिटली, पण दुसरीचे काय? आमच्यापैकी काही प्रवाशांनी बसचालकाला बसच्या अशा अवस्थेत तुम्ही ताबा का घेतला? म्हणून दम भरला. तेव्हा चालकाने सांगितले की, "ही बस व इतर (यात्रा स्पेशल्स) बस ह्या कल्याण डेपोमार्फत पाठविल्या असून त्या शिर्डीहून मुंबईस गेल्यावर दुरूस्त करणार. तुर्तास, मी जेव्हा बसमध्ये बसलो तेव्हाच लक्षात आले होते की, ही बस जुन्या मॉडेलची आहे" हे त्याचे सांगणे आम्हास पटले. त्यानंतर आम्ही सर्वांनी घाट उतरून झाल्यावर येणाऱ्या डेपोमधून नवीन बस

मिळविण्याचा विचार केला. त्यामध्ये तास दीड तासाचा खोळंबा होणार हे कळत असून सुद्धा! परंतु आता बस पुढे नेणे आवश्यक होते. बसने घाट चढण्यास सुरुवात केली असता, पहिल्याच वळणावर समोरून ट्रक येत असलेला पहाताच चालकाने गती मंद केली. समोरून दिव्याचा इशारा न मिळाल्याने आमच्या चालकास ट्रक चालकाकडून अपशब्द खावे लागले. पुढे पुढे तर त्याची सरबत्तीच सुरू झाली. आमची बस ही येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येक वाहनास धोकादायक ठरू लागली. एकदा तर रस्ता सोडून ती अगदी कडेला आली तेव्हा मात्र आमचे सर्वांचे धाबे दणाणले. मी म्हणालो, आपले काही एक वावगे होणार नाही, ही बस श्री साईनाथांच्या पुण्यभूमीतून निघाली आहे. त्यानंतर मी साईबाबांचा जयजयकार सुरू केला, त्यामध्ये सर्वजण सामील झाले. अशारितीने श्री साईकृपेने आणि चालकाच्या कौशल्यावर, जबर आत्मविश्वासाच्या सामर्थ्यावर हेडलाईटस् वायपर विरहीत बस, घाट उतरून द्रुतमार्गावर आली. धोका टळला नव्हता तर प्रमाण कमी झाले होते. पुढे काही मैल अंतर कापल्यावर समोर एक ट्रक नादुरूस्त अवस्थेत उभा असल्याचे बसचालकाच्या उशीरा लक्षात आल्याने त्याने मागे पुढे न पहाता बस सरळ उजवीकडे वळविली, अचानक वळविल्याने मागून येणाऱ्या वाहनापैकी एक ॲम्बेसेडर कशीबशी निसटून गेली परंतु मागच्या फियाटगाडीला रस्ता सोडावा लागला व कडेने वाट काढावी लागली. वास्तविक जेमतेम दोन वितांचे अंतर ठेवून भरधाव वेगाने पार गेलेल्या फियाट गाडीला आमच्या बसगाडीचा नुसता हळुवार जरी स्पर्श झाला असता तरी जिवित व वित्त हानीचे केवढे नुकसान झाले असते. हे सांगणे न लगे! परंतु नाही. आमची बस शिर्डीहून आली होती. **'आमचे बाबा हाक मारणाऱ्यांनाच तारीत नाहीत** तर त्यांवर विसंबून रहाणाऱ्यांचेही रक्षण करीत असतात,' हा अनुभव मला प्रत्ययान्ती प्राप्त झाला होता. आणि पुढे मी सुटकेचा दिर्घ निःश्वास सोडून पुढील प्रवास निर्धास्तपणे अनुभवला. सांगावयाचे म्हणजे माझी सीट ही चालकामागीलच सीट होती. त्यामुळे प्रत्येक क्षण मला व्यवस्थित टिपता आला. त्याचबरोबर आमच्या बसमध्ये असलेले श्री. शंकर खोपकर (ज्यांचे छायाचित्र प्रदर्शन संस्थानने शिर्डीमध्ये आयोजिले होते.) तसेच श्रीराम सातार्डेकर (साईभक्त गायक) तसेच माईआत्या इत्यादी साईच्या परमभक्तांच्या अलौकिक पुण्याईच्या जोरावर आमचा अविस्मरणीय प्रवास सुखकर झाला होता असे म्हणता येईल. सर्वात महत्वाचे म्हणजे, दादर स्थानकावर मी चालकास प्रवासासंबंधी मत विचारले तेव्हा त्याने सांगितले की, माझ्या व्यावसायिक जीवनातील हे एक आव्हान होते व आपण सर्व साईभक्त असल्यामुळेच माझ्या आव्हानाला सोबत मिळाली. अन्यथा.... ह्या त्याच्या उद्गाराने माझे मन भरून आले, मी मुक झालो होतो.

# उदी प्राशनामुळे आईला होणारा त्रास संपला

— सौ. ज्योती प्रकाश कारेकर
सोमवार पेठ, मालवण,
जिल्हा- सिंधुदुर्ग.

माझ्या आईला मासिक पाळीचा त्रास २-३ वर्षांपासून होत होता. बऱ्याच डॉक्टरांना दाखविले. औषध वगैरे चालूच होते. तरी काही उपयोग न होता अशक्तपणा वाढतच होता. नंतर कोपरगावातील लेडीज स्पेशालीस्टना दाखविले. त्यांनी सांगितले की, "गर्भाशयाला गाठ होऊन सूज आलेली आहे. ती १५-२० दिवसांतच ऑपरेशन करून काढून टाकायला हवी." आम्ही घरी आलो. घरातील सर्वजण चिंतेत होतो.

मी गुरुवारी साईबाबांच्या फोटोसमोर उभे राहिले. आणि साईबाबांना मनोभावे प्रार्थना केली की, "बाबा मी तुमची उदी आईला पाण्यातून पाच दिवस देते. माझ्या आईचे ऑपरेशन टळू दे. या अनुभवाचा लेख मी साईलीलामध्ये देईन." त्याप्रमाणे आईला मी उदी दिली. आणि काय आश्चर्य! सहाव्या दिवसापासून आईचा त्रास बंद झाला. आईची तब्येत आता पूर्ण बरी आहे.

★★★★★★★

# अकल्पित अभिषेक

— श्री. अनिल केशवराव रसाळ
२१/३८२, बी.पी.टी. स्टाफ क्वॉर्टर्स,
रेनॉल्डस् रोड, वडाळा (पूर्व),
मुंबई नं. - ४०० ०३७.

गुरुपौर्णिमेच्या उत्सवासाठी मी व इतर पाच गुरुबंधू १९.७.८६ ला मुंबईहून निघालो. उत्सव २०.७.८६ ते २२.७.८६ असा तीन दिवसांसाठी होता. २०.७.८६ रोजी रात्रीचा प्रवास करून अतिशय थकलेल्या अवस्थेत आम्ही सर्वजण पहाटे पोहोचलो. अर्थात त्यादिवशी विश्रांती घेण्यासाठी आम्ही सर्वजण उत्सुक होतो. त्यामुळे त्यादिवशी अभिषेक करण्याचा विचारही मनात येणं शक्य नव्हते. २१.७.८६ चा दिवस हा उत्सवाचा मुख्य दिवस असल्याने त्यादिवशी अभिषेक मिळावा या तीव्र इच्छेने भक्तगण आदल्या रात्रीपासूनच रांग लावतात. म्हणून त्यादिवशी अभिषेकासाठी अतिशय गर्दी नेहमीच असते व अशावेळी आम्ही अभिषेकाचा विचारही करीत नाही.

माझा स्वतःचा दृष्टीकोन असा आहे की, 'आपलं स्वतःचं जीवन हेच श्रींच्या उपदेशाप्रमाणे असलं की तो त्यांना आपण केलेला नित्य अभिषेक होय. शिवाय घरी पंचधातूची मूर्ति व पादूका आहेत. तिथे आठवड्यातून एकदा पंचामृतस्नान व अभिषेक असतो. असं असताना आपण अगदी अटीतटीने शिर्डीत अभिषेक केलाच पाहिजे अशी

आग्रही भूमिका माझी नसते. व यामुळे गुरुपौर्णिमेच्या उत्सवात गेले अनेक वर्षे जाऊनही मी कधीही .गर्दीमुळे अभिषेक केला नाही. यावर्षी पण तसा विचार होता पण बाबांचा संकल्प वेगळा होता.

नेहमी उत्सवासाठी आमच्या बरोबर साईभक्त स्नेही श्री. बाबुराव नागवेकर असतात. ते गुरुपौर्णिमेच्या दिवशी पहाटे उठले व म्हणाले, "आज अभिषेकासाठी प्रयत्न करू या." मी म्हटले की, "आज तुम्हीं गर्दी पहा व ठरवा काय करायचं ते!" ते गेले व थोड्यावेळाने परत आले व म्हणाले, "आज शक्यच नाही." मी म्हटलं ठीक आहे. बाबांची इच्छा असेल तर मिळेल उद्या अभिषेक व नाही जरी मिळाला तरी गुरुपौर्णिमेच्या उत्सवात ते आपली इतकी वर्षं सेवा करून घेतात हे काय थोडं भाग्य आहे?"

२१.७.८६ रोजी म्हणजे उत्सवाच्या मुख्य दिवशी आम्ही सर्वजणांनी सकाळी द्वारकामाईत गुरुपूजन आटोपलं व साधारण दुपारी गर्दी नाही असे पाहून समाधिमंदीरात दर्शनाला गेलो. मंदीरात जसा मी पादुकांजवळ गेलो व श्रींच्याकडे पाहिले तर ते चक्क हसत म्हणाले, "उद्या अभिषेक कर. उद्या मिळेल." मी हे कोणालाही सांगितले नाही.

२२.७.८६ रोजी अगदी आरामात आम्ही सर्व गोष्टी आटोपल्या. चहा घेतला व मग मात्र मी माझे स्नेही श्री. दिक्षित यांना सांगितले की, "आता आपण अभिषेकाच्या रांगेत उभं राहूया." त्यावेळी सकाळचे ९.४५ वाजलेले. उत्सवाचा शेवटचा दिवस. रांगेच्या इथे संस्थानचा वॉचमन दंडुका हातात घेऊन उभा! शिवाय आमचं स्वागत करायला नोटीस बोर्डवर आज केवळ ६०० तिकीटे देण्यात येतील अशी सूचना पण होती. बाकीचे ४ भक्त हे सर्व पाहून आम्हाला सोडून गेले. मी मात्र बाबांच्या शब्दांवर पूर्ण विश्वास ठेवून त्या वॉचमनला सांगितले की, "तुम्ही ६०० तिकीटे झाल्यानंतर आमचा नंबर आला तर तिकीट देऊ नका पण आम्हाला रांगेत उभे राहू द्या" त्याने सांगितले, "तुम्ही श्री. बागवेंना भेटा व रीतसर परवानगी घ्या." आली पंचाइत! कारण माझे व श्री. बागवेंचे अतिशय जिव्हाळ्याचे संबंध, पण मला कधीही त्याचा उपयोग करावा असे वाटले नाही. मग मी श्री. दिक्षितांना सांगितले की, "आपण दोघेही श्री. बागवेंकडे जाऊ या. पण बोलायचं तुम्ही. मला वशिला लावायला आवडत नाही." श्री. दिक्षित व मी श्री. बागवेंना भेटलो. सर्व बोलणं श्री. दिक्षितांनी केलं. श्री. बागवेंनी अतिशय व्यवस्थितपणे त्यांची अडचण समजावून दिली. आम्हाला त्यांचं म्हणणं पूर्णपणे पटले. श्री. दिक्षितांनी त्यांचा हेका सोडला व आम्ही बाहेर पडलो. माझ्या मनात श्रींचे शब्द मात्र तेव्हासुद्धा सतत घोळत होते. त्यामुळे मला मात्र ठामपणे वाटत होते की, अभिषेक होणारच. म्हणून मी श्री. दिक्षितांना सांगितले की, "आपण पुन्हा रांगेच्या जागी जाऊ या." तिथे गेलो तर ज्या व्यक्तिला आम्ही शेवटच्या नंबरवर पाहिले होते त्याच्यापाठी अजून ६ जण नविन आले होते. मग मात्र मी थांबलो नाही व सिक्युरिटीच्या वॉचमनला म्हणालो की, "आता मात्र तुम्ही आम्हाला रांगेत घेतलेच पाहिजे. ६०० तिकीटं नियमाप्रमाणं द्या, त्यात नंबर लागला तर ठीक, नाही लागला तर आम्ही कोणतीही तक्रार करणार नाही." सिक्युरिटी वॉचमन म्हणाला, "त्यांनी रीतसर परवानगी काढली

आहे." कोणाची ते मात्र त्याने सांगितले नाही. पण त्याला स्वतःला आमचे म्हणणे पटलेले दिसले. त्याने आम्हाला रांगेत उभे राहू दिले, व रीतसर कोणताही वशिला न लावता त्या दिवशी श्री बाबांनी आम्हा सर्वजणांना रांगेत जास्तवेळ उभे न ठेवता विनासायास अकल्पितपणे स्वतः सांगितल्याप्रमाणे अभिषेक दिला.

# श्रीसाईबाबा आणि वचनें

— **श्रीमती उषा रायरीकर,**
५, सावित्री कृपा, २०० शिवाजी पार्क,
गोपी टँक रोड, मुंबई नं. - ४०० ०१६.

गेली तीस वर्षे मी साईबाबांची भक्ती करते. माझ्यामुळे व त्यानंतर आम्हाला भेटलेले गुरुवर्य कै. आप्पा माने यांच्या सान्निध्यात राहिल्यामुळे माझे दिवंगत पती व माझी दोन मुलेही बाबांची भक्ती, नामस्मरण लहानपणापासून आस्थेने करीत असत. साईबाबांची भजने, आरत्या वगैरे आमचे परिचित कै. अण्णा कोरगांवकर यांनी लाविलेल्या सुश्राव्य चालींमुळे दर गुरुवारी म्हणताना मन प्रसन्न होऊन जात असे. इतके सर्व असूनही मी श्री साईलीला मासिकाची वर्गणीदार एप्रिल ८५ पासून अकल्पित योगायोगाने झाले असेच म्हणावे लागेल.

त्याचे असे झाले की, माझ्या जावयाने अमेरिकेत नोकरी धरल्यामुळे माझी मुलगी आपल्या छोट्या मुलासह मुंबईला माझ्या घरी आली. व स्वेच्छेने आपल्याला साईबाबांचा लहान फोटो अमेरिकेला जाताना दे असे म्हणू लागली. मलाही ऐकून बरे वाटले. म्हणजे आपली भक्ती अगदीच वाया गेली असे नाही. मी प्रभादेवी, दादर याठिकाणी साईबाबांच्या फोटोची बरीचशी दुकाने पालथी घातली. पण मनासारखा बाबांचा फोटो काहीकेल्या मिळेना. दोन दिवसांनी ती अमेरिकेला जाण्यासाठी दिल्लीला जाणार. तेव्हा साईबाबांचा फोटो बरोबर असावा अशी माझी तीव्र इच्छा होती. इतक्यात फुटपाथवर फोटो विकणारा एक वयस्कर फेरीवाला मला म्हणाला, "ताई तुम्ही दादर टी.टी.ला साईनिकेतन इमारतीत श्रीसाईबाबा संस्थानच्या कार्यालयात जा. तिथे तुम्हाला हवा तसा बाबांचा फोटो मिळेल." दुसऱ्या दिवशी मी साईनिकेतनमध्ये गेले. समोरच बाबांची संगमरवरी मूर्ती पाहिल्यावर इथेच माझी शिरडी असे समजून साश्रूनयनांनी नमस्कार केला. इच्छा होती त्याप्रमाणे बाबांचा फोटो मिळाला. शिवाय साईलीला मासिकाची मी वर्गणीदार झाले. इतके दिवस दादर भागात रहात व वावरत असूनही हा अकल्पित योग माझ्या मुलीमुळेच आला असेच म्हणावे लागेल. व "जाणा येथें आहे सहाय्य सर्वांस मागे जें जें त्यास तें तें लाभे" ह्या साईबाबांच्या वचनाचे प्रत्यंतर आले.

# साईकृपेने घर मिळाले

**— एक साईभक्त महिला**

मी एक निराधार स्त्री आहे. निराधार तरी कशी म्हणू? श्री साईबाबांच्या आधारानेच जगत आहे. मला एक मुलगा आहे. साईबाबांच्याच कृपेने! माझे स्वतःचे घर नव्हते. गेली बारा वर्षे मी घर मिळविण्यासाठी वणवण फिरत होते. शेवटी १९७९ साली आमच्या ऑफिसच्या सहकारी सोसायटीमध्ये मला प्रवेश मिळाला. पैसे भरले. ऑफिसच्या बँकेकडून कर्ज घेतले. ऑफिसने सुद्धा कर्ज दिले.

पण... पुढे सोसायटी काम सुरू न करता, नुसतीच किंमत वाढवत राहिली. मी अशा संकटात सापडले की, ना मी अधिक पैसे भरू शकत होते, ना भरलेले पैसे काढू शकत होते कारण मागची वणवण आठवत होती.

मी प्रत्येक वेळेला चिडायची, रडायची. मी एकदा अशी मुलाजवळ बोलले की, "बघ रे! एवढे बाबांचे (साई) करतो तर ते सुद्धा आपले ऐकत नाहीत. गरीब माणसा जवळ तेवढेसुद्धा नाही." साईबाबाच मुलाच्या तोंडून वदले, "पण आई, आजपर्यंत तुला एवढा पैसा कुणी दिला? साईबाबांनीच ना! मी म्हटले, "होय रे बाबा, होय." आणि मी स्वतःच माझ्या थोबाडीत मारून घेतले.

यावर्षी (१९८६) आमचे घर तयार झाले. साईबाबांचीच कृपा! लगेच आम्ही शिरडीला जाऊन आलो. नाही तर एक स्त्री, जवळ काहीही नसताना कसे काय करू शकली असती?

रोजच्या व्यवहारातसुद्धा कितीतरी अनुभव येतात. अगदी, "नित्य मी जाणा हेचि सत्य। नित्य घ्या प्रचित अनुभवे॥ याप्रमाणे साईबाबांचा धावा केला की, लगेच ते धावून येतात आणि मदत करतात. मी कधीही उदी लावल्याशिवाय घराबाहेर पडतच नाही. मुलगासुद्धा साईभक्तच. खेळताना पडला किंवा कधी कुठे काही लागले तर प्रथम साईबाबांची उदी लावतो.

एखादे वेळेस मोठी अडचण आली किंवा एखाद्या कामात (अर्थात महत्त्वाच्या) अडथळे निर्माण होत असतील तर मी "श्री साई सच्चरित्राचा" सप्ताह करते. माझी अडचण दूर होते. अगदी साईबाबांच्या वचनाप्रमाणेच,

शरण मज आला आणि वाया गेला।
दाखवा दाखवा ऐसा कोणी॥

याची मला तरी नेहमी प्रचिती येत आहे. म्हणूनच हा अनुभव साईलीला मध्ये देत आहे. तसेच तुम्हा सर्वांना येवो ही साईचरणी प्रार्थना.



# साईनामाचा महिमा

— श्री रामचंद्र गोविंद कोंयडे
अ/५ सबर्बन सोसायटी,
शिवसृष्टी, कुर्ला (पूर्व),
मुंबई नं. - ४०० ०२४.

सोडुनियां लाख चतुराई, स्मरा निरंतर ''सांई सांई''।
'बेडापार' होईल पाही। संदेह कांही न धरावा॥

साईबाबांनी आपल्या भक्तांना वरीलप्रमाणे श्री साईसत्चरितातील अध्याय १० वा, श्लोक १३६, अन्वये आदेश दिलेला आहे. जर प्रत्येक भक्त 'साई साई' म्हणून वरील आदेशाचे पालन करील तर नक्कीच तो भव-सागर तरून जाईल आणि ह्याची उदाहरणे म्हणजे भक्तांचे प्रत्यक्ष अनुभव! हे साईलीलातून प्रसिद्ध झालेले आहेतच.

काही आकस्मिक कारणामुळे सन १९८१ पासून मी 'जास्त रक्तदाबाचा' शिकारी बनलो आणि त्यावेळेपासून डॉक्टर आणि औषधोपचार चालू झाले.

दिनांक १८ मार्च १९८५ रोजी रात्रौ ९ वाजता जेवणावर बसलो असता, नाकात पाणी आल्यासारखे वाटले म्हणून हाताने चाचपले. तेव्हा हाताला रक्त लागले. लगोलग रक्ताची धार नाकावाटे सुरू झाली. जवळ जवळ अर्ध्या कपापेक्षा जास्त रक्त गेले. बर्फ नाकावर ठेवला, रक्तदाबाची गोळी घेतली, परंतु काहीच इलाज चालेना, ताबडतोब साईबाबांचे नाव घेण्यास सुरुवात केली. थोड्या वेळात रक्तप्रवाह बंद झाला. पुन्हा रात्रौ १२ वाजता रक्तप्रवाह चालू झाला तो पहिल्याप्रमाणेच. त्वरित डॉ. शाह (कुर्ला) यांच्याकडे जाऊन औषध व इंजेक्शन घेतले. त्यांनी 'रक्तदाब' जास्त असल्याचे सांगितले व रुग्णालयात दाखल होण्याची सूचना दिली. परंतु बरे वाटल्यामुळे मी घरी आलो. मात्र 'साई साई' नाममंत्र तोंडाने चालूच होता. पुन्हा पहाटे ३ वाजता तीच अवस्था. आता मात्र धीर खचला. बाबांसमोर उभा राहिलो, प्रार्थना केली व विभुती तोंडात टाकून सरळ लोकमान्य टिळक रुग्णालयाचा रस्ता धरला. तेथे डॉक्टरांनी तपासले. 'जास्त रक्तदाब' असल्याचे सांगितले व भिन्याचे कार नाही, फक्त तपासणीसाठी दाखल होण्याची सूचना केली. त्याप्रमाणे केस पेपर्स तयार करण्यात आले. माझ्या सोबत माझी पत्नी आणि शेजारी श्री. नासीकक्कर होते. मला वॉर्डमध्ये नेण्यात आले. परंतु कॉटच रिकामी नव्हती. पाऊल ठेवण्याइतकीही तेथे जागा नव्हती. जवळ-जवळ दिड तास गेला तरी, वॉर्ड डॉक्टर आले नाहीत. रुग्णालयातील परिचारिकेला पुन्हा पुन्हा विचारले तरी कॉट मिळण्याची किंवा खाली बसण्यास सुद्धा जागा देण्यात आलेली नव्हती. अशा परिस्थितीत तेथे राहाण्यापेक्षा घरी गेलेलेच बरे आणि सर्व भार बाबांवर ठेवावा ह्या विचाराने 'केस पेपर्सवर' मला दाखल व्हावयाचे नाही म्हणून स्वाक्षरी करून परत घरी आलो. 'साई-साई' नाममंत्र चालूच होता.

घरी आल्यावर, सपाटून भूक लागली. भाताची पेज (निवळी) करून प्राशन केल्यावर ज़रा बरे वाटले व झोपही छान लागली. सकाळी १० वाजल्यानंतर डॉक्टर परीहार, (चेंबूर स्टेशन) हृदयविकार तज्ञ यांजकडे जाऊन औषधोपचार केला. रक्ततपासणी, क्ष किरण तपासणी इ. सर्व तपासण्या झाल्या, परंतु कुठेच दोष आढळला नाही.

साईनामाचा जप आणि ऊदी घेतल्यापासून सर्व व्यथा दूर झाल्या आणि रक्त वाहण्याचे सुद्धा बंद झाले.

# साईबाबांच्या ऊदीचा प्रभाव

— श्री. लक्ष्मण बापूराव रापतवार
किल्ला वाटर वर्क्स, नांदेड.

माझ्या मुलीचे (सौ. ममता) लग्न दि. ३ मे १९८४ रोजी झाले. एका वर्षातच ती गर्भवती राहिली. माझ्या जावयास इतक्या लवकर संतती नको होती. त्यांनी औरंगाबाद मुक्कामी ऑपरेशन करून पाच महिन्याचा गर्भ काढून टाकला. तेथील डॉक्टरीन बाईने माझ्या जावयास खूप समजावण्याचा प्रयत्न केला की, पहिल्यांदा ऑपरेशन करून गर्भ काढल्यास दुसऱ्यांदा गर्भ टिकत नसतो व पुढे संतती होणे कठीण जाते. परंतु त्यांनी ऐकले नाही.

पुन्हा दुसऱ्यांदा ती गर्भवती राहिली तेव्हा डॉक्टरीन बाईने म्हटल्याप्रमाणे, केवळ पाण्याचे मोठे बकेट उचलण्याचेच निमित्त झाले व तिचा तीन महिन्याचा गर्भ गळून पडला.

आता मात्र माझ्या जावयास व मुलीस पुढे संतती होणार नाही व असाच गर्भपात होत राहील म्हणून चिंता वाटू लागली. मला व माझ्या पत्नीसही दुःख वाटू लागले. आपल्या मुलीचे भविष्य कसे होणार? याचीच काळजी आम्हाला लागून राहिली. सौ. ममता ही आमची सर्वात धाकटी व लाडकी कन्या म्हणून तिच्या आईस अन्न गोड लागेना.

तिसऱ्यांदा पुन्हा ती गर्भवती राहिली. चौथ्या महिन्यापासूनच तिचे पोट दुखणे वगैरे चालू झाले. पत्रावर पत्रे येऊ लागली. नेहमी दवाखान्यात ॲडमीट व्हावयाची व थोडे बरे वाटल्यास घरी (औरंगाबादेत) परत यायची. असा तिचा नित्यक्रम झाला होता. माझ्या पत्नीस वाटले की, ह्या वेळीही पूर्वी प्रमाणेच गर्भपात होईल व अशक्तपणामुळे कदाचित मुलीचीही प्रकृती बिघडेल म्हणून ती स्वतः औरंगाबादेस जाऊन राहिली.

माझ्या वडील मुलाचे घर औरंगाबादेत आहे व पुतण्या (डॉ. विजय) स्त्री रोग तज्ञ आहे म्हणून सर्व काही सोयी उपलब्ध होत्या. परंतु दैवगतीस कोण काय करणार? सुरवातीसच पहिला गर्भ माझ्या जावयाने ऑपरेशन करवून काढला नसता तर हा प्रसंगच आला नसता.

मी माझ्या पत्नीसोबत साईबाबांची 'ऊदी' दिली व दररोज सौ. ममतास खाऊ घालण्यास सांगितले. त्याप्रमाणे दररोज ऊदी हेच औषध म्हणून प्रयोग सुरू झाला. गर्भ स्थिरावला व दि. १३ फेब्रुवारी १९८६ रोजी सौ. ममता सुखरूप बाळंतीण होऊन तिने मुलीस जन्म दिला. आता माझी नात पाच महिन्याची झाली आहे व आनंदात आहे.

# फुलांचा सुवास दिसत नसतो

— श्री. कृ.व्य. हवालदार
लक्ष्मी वैभव अपार्टमेन्टस्,
लक्ष्मीनगर चौक,
बजाजनगर, नागपूर- ४४० ०१०.

बाबांची लीला अगाध आहे. एखाद्या घटनेची प्रचीती आली की आपल्याला सत्य पटू लागते. जे दृश्य आहे ते विश्वासार्ह आहे. पण बऱ्याच गोष्टी दृश्य नसतात तरीसुद्धा अशा अदृश्य गोष्टींवर आपण मनापासून लुब्ध होऊन जातो. उदाहरणच द्यायचे झाले तर फुलांचा सुवास. आपल्याला फुलाचे दृश्य-रूप दिसते पण त्यातला सुवास अदृश्य असतो. तो सुवास आपण अनुभवू शकतो. त्याकरिता फुलांतील आणि आपल्यातील अंतर जवळ असायला हवे.

थोर पुरुषांचे असेच आहे. श्रद्धेने महापुरुषांमधील, आणि परमेश्वरांमधील आपले असलेले अंतर कमी व्हायला हवे असते. त्या अदृश्य शक्तीच्या समीप जसजसे आपण जाऊ तसतसे सत्य आपल्याला पटू लागते.

मी हुबळीला असताना एके दिवशी मध्यरात्री मला असा सारखा भास होत होता की, माझ्या शेजारी कोणीतरी बसलेले आहे आणि माझा हात पकडू पहात आहे. मी जागा होतो तसाच सावध होतो. शेवटी भासमान होणाऱ्या त्या व्यक्तीने माझा हात पकडला आणि मी मोठ्यांदा किंचाळून उठलो. माझी पत्नी आणि मुले घाबरून जागी झाली. त्यांनी मला काय झालं म्हणून विचारता मी म्हणालो की, कुणीतरी माझा हात पकडला. अर्थातच भुताखेताचा संशय मनी जागला. मी म्हणालो, साऱ्या वेळा सारख्या नसतात. दुपारी भर उन्हात देशपांडे नगरच्या पलीकडील रेल्वे लाईनवरून मी आलो, कदाचित ती जागा चांगली नसावी. थोड्या वेळानंतर पुन्हा आम्ही सारे निद्राधिन झालो.

सकाळी माझ्या मुलाने मी रात्री पांघरलेली चादर घडी करून ठेवण्यासाठी घेतली. वास्तविक चौकड्यांच्या व दाट रंगाच्या या चादरीवरचे सहजपणे काही दिसणार नाही. पण त्या चादरीवर बाबांची छबी उमटलेली होती. सारेच अतर्क्य! माझ्या मुलाने आम्हा सर्वांना हाक मारून ते दाखवले. आणि माझ्या ध्यानात आले की, रात्री जेव्हा मी किंचाळलो तेव्हा बाबा माझ्या संरक्षणासाठी माझ्या शेजारी होते. हाच याचा अर्थ आहे. ज्या भुतसंबंधाने माझा हात पकडण्याचे साहस केले त्याच्यांपासून मला सावरण्यासाठी बाबा माझ्यापाशी होते याची खात्री पटली. यालाच प्रचीती म्हणतात. मला बाबा प्रत्यक्ष दिसले नाहीत पण बाबांनी आपल्या आगमनाची खूण चादरीवरील उमटलेल्या त्यांच्या छबीच्या रूपाने ठेवली होती.

डिसेंबर ८५ मध्ये माझे सासरे रामभाऊ कोकीळ आजारी पडले. बाबांच्या वरील श्रद्धेमुळे माझ्या पत्नीने आणि सासूबाईंनी बाबांच्या तसबिरीपुढे बसून बाबांना श्रद्धेने प्रार्थना केली. माझ्या मुलांच्या तोंडून बाबांनी ठामपणे सांगितले की, मी काही सांगितले

तरी तुम्ही काहीही करू शकणार नाही. याचा स्पष्ट अर्थ असा होता की, सासरे वाचणार नाहीत. तथापि ते आजारी आहेत तर त्यांना काय द्यावे असा प्रश्न माझ्या पत्नीने बाबांना केला. तेव्हा त्यांनी पालेभाज्यांचा रस देण्याचा सल्ला दिला, आम्ही रस देणे सुरू केले. सासरे जगणार नाहीत हे बाबांनी अगोदरच सूचित केलेले होतेच. हळूहळू सासऱ्यांचा आजार वाढत गेला. शेवटी त्यांना आम्ही मिरज मिशन हॉस्पिटलमध्ये दाखल केले. डॉक्टरांनी त्यांची संपूर्ण तपासणी केली आणि पालेभाज्यांचा रस हाच आहार द्यायला सुरुवात केली. बाबांच्या अगाध लीलेचा आणखी एक सुखद धक्का मला बसला. बाबांनी सुचविलेलेच नेमके डॉक्टरांनी सुचविले. यात बाबांच्या प्रचीतीचा हा प्रत्ययच होता. सासरे शेवटी डिसेंबर ८५ मध्ये निधन पावले.

या व अशा कितीतरी अनुभवांना मी एक साक्षी आहे. लोक नेहमी श्रद्धा आणि अश्रद्धा यांची गफलत करतात. विज्ञानाची महती गाता गाता श्रद्धास्थानांची टिंगल करतात. देवासमोर हात जोडले की, विनाविलंब देवाने आपल्याकडे धाव घ्यावी अशी स्वार्थी कृती मनात जोपासतात. अशांना सत्य कसे पटणार? आणि प्रचीती कशी येणार? बाबांचा अदृश्य सहवास मी माझे कुटुंबीय आजही अनुभवीत आहोत. या अनुभवांतील आनंद आणि 'अल्ला तेरा भला करेगा' हा बाबांचा आशीर्वाद दोन्हीही आमच्या जीवनाचा भाग बनली आहेत.

# बहिणीचे लग्न जुळले

— राजश्री रा. कुळकर्णी
९/२९, आर. के. वैद्य रोड,
खांडके बिल्डिंग, दादर,
मुंबई - ४०० ०२८.

कोणतीही असाध्य गोष्ट साध्य होईपर्यंत आपण परमेश्वराचा धावा करतो. मात्र फलश्रुती झाल्यावर परमेश्वराचे नामस्मरण करण्याचे आपण विसरून जातो. बरेच दिवसांपासून माझ्या मनात मला आलेला अनुभव साईलीला मासिकात लिहावा असे राहून राहून वाटत होते. परंतु योग काही जुळत नव्हता.

हा अनुभव मला माझ्या मोठ्या बहिणीच्या विवाहाच्या वेळी आला. अनेक वरस्थळ येऊनही या ना त्या कारणाने लग्न जुळत नव्हते. ह्यामुळे घरातील मंडळी त्रस्त झाली होती.

डिसेंबर महिन्यात आणखी एक वरस्थळ आले. हे स्थळ बहिणीला अनुरूप व योग्य असेच होते. ह्या स्थळाशी बहिणीचे लग्न जुळले तर हा माझा अनुभव मी साईलीला मासिकात लिहिन अशी मी साईचरणी याचना केली. ही माझी प्रार्थना श्री साईनाथांनी ऐकली. व सारे काही यथास्थित पार पडले. १३ फेब्रुवारीला वसंत पंचमीच्या दिवशी अनेक दिवसांपासून रखडलेले माझ्या बहिणीचे लग्न यावेळी मात्र कोणताही अडथळा न येता निर्विघ्नपणे पार पडले. हे सर्व केवळ साईबाबांच्या आशिर्वादामुळेच शक्य झाले.

# रेल्वेचा प्रथम वर्ग, बाबा आणि मी

— श्री. आशिष अनिल कालेवार
कालेवार सदन, गणेश चौक,
मांजर्ली, बदलापूर (ठाणे).

परमपूज्य साईबाबांवर श्रद्धा असली म्हणजे ते संकटकाळी भक्तांच्या पाठीशी कसे उभे राहतात व भक्ताला कसे संकटमुक्त करतात याचा अनुभव मला २४-७-१९८४ रोजी आला. योगायोग असा की, तो दिवसही गुरुवारचा व संकष्टी चतुर्थीचा. मी आणि माझे दोन मित्र कॉलेजातून उल्हासनगर स्टेशनवर आलो तेव्हा कर्जतची लोकल सुरू होत असतानाच घाईघाईतच समोर दिसलेला डबा पकडला. आम्ही धावत्या गाडीत चढलो, कारण ही लोकल चुकली असती तर जवळजवळ २ तास आम्हाला बदलापूरला जावयास दुसरी गाडी नव्हती. डब्यात चढल्यानंतर कळले की, आम्ही पकडलेला डबा पहिल्या वर्गाचा होता व डब्यात तिकीट तपासणीसही तिकिटे तपासत होता. ते बघून आम्ही अतिशय घाबरलो. कारण आम्हाजवळ दुसऱ्या वर्गाचा पास व सर्वांच्याच खिशात ४/५ रुपयांपेक्षा जास्त पैसे नव्हते. तिकिट तपासणीस आमच्या जवळ आला व त्याने आम्हास पास दाखवण्यास सांगितले. आम्ही घाबरतच चेकरला सांगितले की, "घाईघाईत चुकून चालू गाडीत आम्ही चढल्याने या पहिल्या वर्गाच्या डब्यात आलो. आमच्याजवळ दुसऱ्या वर्गाचा पास आहे." तो पास व ओळखपत्र त्यांना आम्ही दाखवले. परंतु त्यांनी ते बघून दंड भरण्यास सांगितला व आमच्या जवळ ८४ रुपये मागितले. आमच्याजवळ तर सर्वांचे मिळून फक्त १५ रुपये होते. आता काय करायचे? या विचाराने मी तर सुन्न झालो. त्याच पहिल्या वर्गाच्या डब्यात आमच्या कॉलेजचाच एक मुलगा (पहिल्या वर्गाचा पास धारक) प्रवास करीत होता, तो आमच्या मदतीला धावून आला. त्याच्या खिशात ४० रुपये होते. ते घेऊन आम्हाला सोडून देण्याबद्दल त्या विद्यार्थ्याने सांगितले. परंतु टी.सी. ने ते ऐकले नाहीच उलट आम्हाला आमचे बदलापूरला स्टेशन आले तरी देखील सोडले नाही. आम्ही सर्वच हवालदील झालो. इतक्यात त्याच पहिल्या वर्गाच्या डब्यात कोपऱ्यात बसलेल्या एका साधारण वेषातील वयस्कर गृहस्थाने मला बोलावले व तुझे पैसे मी भरतो. तुला किती पैसे हवेत ते घे व घरी जा असे सांगितले. परंतु मला एकट्यालाच सोडवून घेणे बरे वाटले नाही. कारण माझ्या शेजारीच राहाणारे हे मित्र अडकून पडले असते व त्यांना अडकवून ठेवलेले असतांना मी एकटा घरी जाणे मला योग्य वाटले नाही. बदलापूर स्टेशन गेले आणि आमच्या तोंडाला कोरड पडली. ब्रम्हाण्डच आठवले. आता कर्जतला नेऊन आम्हाला लॉकअपमध्ये अडकवून ठेवतात की काय असे वाटून अंगाला कंप सुटला. तिकिट चेकरकडे खूप गयावया केली पण ते काही ऐकेनात. दरम्यान त्या कोपऱ्यातील अज्ञात इसमाने त्या तिकिट चेकरला काय सांगितले कुणास ठाऊक? टी.सी. ने प्रथम ४० रुपये घेऊन सोडण्याचे नाकरले असताना त्याच तपासनिसाने आम्हा तिघांकडून प्रत्येकी ४ रुपये घेऊन १२ रुपयाची पावती केली

व वांगणी स्टेशनवर उतरवून दिले. तो अज्ञात गृहस्थही वांगणी स्टेशनवरच उतरला. सुटका झाल्याच्या आनंदात आम्ही प्लॅटफॉर्मवरून चालत असतानाच त्या अज्ञात गृहस्थाचे आभार मानायचे मी विसरलो याची जाणीव झाली. आभार मानण्यासाठी मी लगेच मागे वळलो तर तो अज्ञात इसम कुठे गायब झाला ते कळलेच नाही. घरी गेल्यानंतर आईवडिलांना ही हकिगत सांगितली व त्या अज्ञात इसमाचे आभार मानले नाही ही रूखरूख मी व्यक्त केली. हा प्रसंग घडत असताना माझी आई 'श्री साई सच्चरित्र' वाचीत होती. आम्ही सर्वच कुटुंबिय साईभक्त. हा प्रसंग सांगितल्यावर आई म्हणाली, तो अज्ञात कनवाळू इसम दुसरा कुणी नसून प्रत्यक्ष साईबाबाच होते. आणि मलाही साईलीला मासिकातील अनुभव वाचून याची खात्री पटली. ज्या इसमास मी कधीही पाहिले नाही. साधारण कपड्यातील तो इसम पहिल्या वर्गात कसा आला. त्याने टी.सी.ला काय सांगितले. त्याच्या सांगण्यावरून फक्त १२ रुपयात टी.सी.ने कसे सोडले याची उत्तरे आपोआप मिळत गेली. व बाबा प्रत्यक्ष भेटूनसुद्धा आपणास त्यांचे आभार मानता आले नाहीत, याचे दुःख मला झाले व बाबांचे दर्शन गुरुवारीच झाले याचा आनंदही मला झाला.

# विस्कळीत झालेली वर्कशॉपची घडी साईकृपेने सुरळीत

— सौ. विमल केरुसिंग परदेशी
१११ प्रतापगंज पेठ,
सातारा.

माझ्या मुलांचा 'साईप्रसाद फ्रेब्रिकेशन ॲन्ड इंजिनिअर्स' या नावाने लोखंडी कामाचा वर्कशॉप आहे. सदर वर्कशॉपमध्ये कामाची अचानक मंदी आल्याने मुले अगदी नाराज झाली. पुष्कळ प्रयत्न करूनही काम मिळेना. अशा अवस्थेत मी बाबांच्या मूर्तीसमोर गेले व अगदी काकुळतीला येऊन, बाबांचा धावा केला. म्हणाले, माझ्या लेकरांना साह्य करा, मदत करा, दया करा, त्यांची फजिती करू नका, त्यांना बँकेचे कर्ज फेडावयाचे आहे, तुमच्या शिवाय सहारा नाही, वर्कशॉपचे काम जोरात चालू होऊ द्या, फारच तंगी आली आहे, सर्व आनंदी आनंद, भरभराट व काम भरपूर मिळू द्या मी तुमचे गुणगान, लिला, अमृतानुभव, 'साईलिला' अंकात प्रसिद्धीस पाठविन. अशाप्रकारे दोन दिवस धावा केला व तिसऱ्या दिवशी मी 'गुरुपौर्णिमा' उत्सवासाठी शिर्डीला जाण्याकरिता तयारी करीत असताना एक ऑफिसर आले व कोणतीही घासाघीस न करता संपूर्ण बंगल्याच्या ग्रिल्स (लोखंडी जाळ्या)ची तीनचार हजाराची ऑर्डर व ॲडव्हान्सही देवून गेले. तेथून पुढे छोट्या मोठ्या ऑर्डर्स सतत येवून विस्कळीत झालेली कारखान्याची घडी श्री साईबाबांनी व्यवस्थित सुरळीत बसविली.

# बाबांनी जिवित व वित्त हानीपासून वाचविले

— श्री. ललित वि. शृंगारपुरे
लालहवेली, १८/अे, गुरुनानक पथ,
वांद्रा तलावासमोर, वांद्रे (पश्चिम),
मुंबई नं. - ४०० ०५०.

सन् १९५८-५९ साली मी सरकारी कामानिमित्ताने विषाखापट्टणम् येथे जाण्यास निघालो, त्या बाजूला जाण्याची माझी पहिलीच वेळ असल्याने कसे जावयाचे वगैरे काहीच माहीत नव्हते. चौकशी करता समजले की, बोरीबंदरहून रात्री मद्रास मेलने हैद्राबादपर्यंत जाऊन मग सिकंदराबादला जाणे, तेथून वॉल्टेरसाठी गाडी मिळेल. वॉल्टेरहून विषाखापट्टणम जवळच आहे.

त्याप्रमाणे रात्रीची मद्रास मेल पकडली. दुसरे दिवशी दुपारी हैद्राबादला पोहचलो. तेथे एका गृहस्थाशी ओळख झाली. त्याला सिकंदराबादला जायचे होते. म्हटले चला, तेथपर्यंत सोबत झाली. पुढे तो मला रस्ता दाखवणार होता, तसे तो म्हणाला होता. "साब सिकंदराबाद उतरके मै आप को वॉल्टेर जानेवाली गड्डी में बिठा दूँगा." मी म्हटले ठिक आहे. यथावकाश गाडी सिकंदराबादला पोहचली. (येथून वॉल्टेरसाठी मिटरगेज लाईन जात असे) गाडीतून उतरताना ह्या सद्‌गृहस्थांनी माझे सर्व सामान उचलले व मला म्हणाले, चलो साहब आपकू छोड आता हूँ. मी नको म्हणत असतानाही सर्व सामान त्यांनी हातात घेवून ठेवले होते. पुढे तो मागे मी असे रेल्वे पुलावरून चाललो होतो. तो लांबलचक पूल सर्व फलाट ओलांडून कोठे जात होता? याची मला काहीच कल्पना नव्हती. फलाट संपले. पुढे काळोख तरी हा चालतोच आहे. आणि तेवढ्यात आमच्या पायांचा आवाज ऐकून त्या काळोखात झोपलेला एक इसम उठून उभा राहिला, त्याची उंची जवळजवळ सहा साडे सहा फुट, धिप्पाड, काळा कुट्ट. त्याने आपल्या भरदार आवाजात कौन है? कहाँ जा रहे हो, असे दरडावून विचारले. का कोणास ठावूक, मला अजिबात भिती वाटली नाही व मी वॉल्टेरला जायचे आहे असे म्हणालो. त्याबरोबर, फिर इधर कहाँ जा रहे हो? अशी त्याने पृच्छा करताच मी म्हणालो, मुझे तो रस्ता मालूम नही, यह साथ चल रहे आदमी मुझे यहाँ ले आ रहा है, असे म्हणताच त्या महाकाय माणसाने माझ्याबरोबर आलेल्या गृहस्थाकडून माझे सामान हिसकाऊन घेतले. त्याबरोबर आतापर्यंत येणारे सद्‌गृहस्थ जे पळत सुटले, म्हणता सोय नाही. तरी ही वस्तुस्थिती काही मला आकलन होईना. अहो, अवघा २३-२४ वर्षाचा मी, काय करावे काही कळतच नव्हते. मनात भितीचा लवलेशही नाही तेव्हा देवाचा धावा करणे दूरच.

अशी एक दोन मिनिटे गेली ह्या नविन माणसाने माझे सामान आधीच घेतले होते. म्हणाला, चलो बेटा मैं तुम्हें गाडी में बिठाता हूँ, मी त्याच्या बरोबर निघालो. जेवढे पुढे आलो होतो, जवळ जवळ तेवढेच मागे आलो. त्याने मला गाडीत बसवले, सामान

गाडीत ठेवले व गाडीने शिट्टी दिली, जणू ती माझ्यासाठीच थांबली होती. गाडीत चढलो होतोच. ह्या भल्या गृहस्थाला काही द्यावे म्हणून खिशातून पाकीट काढले. हाती आलेले पैसे बाहेर काढून हात बाहेर काढला. साईभक्तांनो, संपूर्ण फलाट रिकामा होता. अक्षरशः चिट पाखरूही तेथे नव्हते."

आणि मग प्रसंगाचे गांभिर्य लक्षात आले. शरीरातील त्राण (शक्ती) संपल्यासारखे वाटले. मट्कन खाली बसलो. आणि बघता बघता डोळे भरून आले, हात आपोआप जोडले गेले. कोण होते ते? एवढी वर्षे झाली ह्या घटकेला, पण हा प्रसंग आठवला की, अंगावर काटा उभा रहातो. बाबांच्या आठवणीने उर भरून येतो.

# मला आलेले साईकृपेचे अनुभव

— सौ. नलिनी ना. डांगे
मु.पो. भोसे, ता. मिरज,
जि. सांगली - ४१६४२२.

नित्य मी जिवंत, जाणा हेंचि सत्य ॥
नित्य घ्या प्रचित अनुभवे ॥

या बाबांच्या ओवीप्रमाणेच मला अनेक अनुभव आले. त्यातील काही अनुभव खाली देत आहे.

माझा मुलगा बारावीच्या परिक्षेला बसला होता. निकाल जवळ आला होता. त्याला पास होण्याची शाश्वती नव्हती. मी त्याला 'हरि ॐ बाबा' हा जप करावयास सांगितला व मी पण बाबांचा धावा सुरू केला. निकाल लागला तर काय आश्चर्य? तो चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाला. शिवाय त्याला डिप्लोमाला चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला. सध्या तो बाबांच्या कृपेने तिसऱ्या वर्षात शिकत आहे.

मे महिन्यात माझे वडील भयंकर आजारी पडले. त्यांना सारख्या उलट्या होत होत्या. डॉक्टरांजवळ नेल्यावर त्यांनी ताबडतोब शस्त्रक्रिया करावयास घेतली. कॅन्सर, आहे म्हणून सांगितले. तशातच वडिलांना हृदयाचा विकार होता. त्यामुळे ऑपरेशनची जबाबदारी डॉक्टर स्विकारत नव्हते. मी मनात सारखा बाबांचा धावा सुरू केला. ऑपरेशन व्यवस्थित झाले. पण ते शुद्धीवर न आल्याने त्यांना अतिदक्षता विभागात ठेवले. मी श्रद्धा-सबुरी न सोडता बाबांचा धावा सुरू केला. तसेच मी बाबांजवळ प्रार्थना केली, मी तुमच्या मासिकांत लेख देईन पण माझ्या वडिलांना सांभाळा. व वडिलांना बाबांची उदी लावली. लगेच चारच दिवसांत त्यांना बाहेर आणले. त्यात त्यांचे दुसरे ऑपरेशन झाले. आता ते बरे आहेत. एवढेच नव्हे तर ते हिंडू-फिरू लागले आहेत.



# 'त्या' दिवशी मी सायकल प्रवासास निघालो असतो तर....

— श्री. सोमनाथ गंगाधर कारखानीस
डी/६, 'अंजली' सोसायटी,
पांचपाखाडी, ठाणे - ४०० ६०२.

२१ डिसेंबर १९८४ रोजी माझ्या मित्रांनी सायकलवरून शिरडी येथे साईबाबांच्या दर्शनासाठी जाण्याचे ठरविले. त्या अगोदर १५-२० वेळा मी बाबांच्या दर्शनासाठी जाऊन आलो होतो पण मित्रांच्या आग्रहाखातर आम्ही सर्वजण २२ डिसेंबर रोजी ठाण्याहून सकाळी ५ वाजता सायकलवरून शिरडी येथे जाण्याचे ठरविले. सहजच समोरच लावलेल्या कालनिर्णय दिनदर्शिकेकडे माझे लक्ष गेले तर २२ डिसेंबर रोजी अमावास्या होती. मी सहसा अमावास्येला प्रवासास निघत नाही, त्यातच ता. २४ डिसेंबरला लोकसभेची निवडणूक होती. तेव्हा मतदान करूनच प्रवासास निघावे असे मी ठरविले. परंतु मित्रमंडळी ऐकेनात तेव्हा त्यांना तुम्ही २२ तारखेला निघा मी २४ तारखेला तुम्हाला शिरडीला कार्यालयाजवळ भेटतो असे सांगितले व माझी सायकल एका मित्राला वापरण्यास दिली. मार्ग कसा आहे, मुक्काम कोठे कराल ते सांगून मी त्यांना निरोप दिला. सहज श्री साईबाबांच्या फोटोकडे माझे लक्ष गेले, नेहमी हसरा दिसणारा फोटोतील त्यांचा चेहरा मला जरा गंभीर वाटला. मी प्रवासाला निघालो नाही हे फार बरे केले, असे सौभाग्यवतीने सांगितले. आणि ती २४ डिसेंबरची काळरात्र उजाडली की, ज्या श्री साईबाबांनी मला कालनिर्णय दिनदर्शिका दाखवून अमावास्येला न निघण्याची प्रचिती दिली, त्याच २४ डिसेंबर रोजी माझ्या वडिलांचे वयाच्या ८१ व्या वर्षी सकाळी ७ वाजता हृदयविकाराने निधन झाले. जर मी २२ तारखेस मित्रमंडळींबरोबर प्रवासास निघालो असतो तर कोठेतरी देवळात अथवा लॉजमध्ये असतो अन् माझ्या नातेवाईकांना मी शोधूनसुद्धा सापडलो नसतो. मला ही दुःखद बातमी शिरडीस पोहचल्यावर किंवा घरी परतल्यावर कळलेली असती. मी माझ्या वडिलांच्या शेवटच्या दर्शनास मुकलो असतो व घरी सर्व नातेवाईकांनी मला टोचून खाल्ले असते. मला आयुष्यभर शेवटच्या क्षणी वडिलांचे दर्शन न झाल्याचे दुःख कायम उराशी बाळगावे लागले असते. हे सर्व असे कसे घडले याचा विचार करताना दिसून आले की, बाबांचा चेहरा गंभीर का होता? मला कालनिर्णय दिनदर्शिका पाहण्याचे का मनात आले? तर हा प्रसंग माझ्यावर येणार होता म्हणूनच श्री साईबाबांनी मला घरी राहण्याची आज्ञा केली. त्याच कारणाने मी त्यांचे दर्शन घेण्यासाठी दर २१ दिवसांनी २१ वेळा जाण्याचा संकल्प सोडला व १९ जून १९८६ पासून २१ वेळा पालखीला हात लावण्यासाठी व आरतीसाठी नेहमी जात आहे. हा संकल्प पार पडेल अशी इच्छा मनात ठेवून बाबांच्या समाधीची पायरी चढत आहे. कारण ''माझ्या समाधीची पायरी जे जो चढेल, दुःख हे हरेल सर्व त्याचे'' या वचनाची आठवण मला झाली.

# भक्तनिष्ठ श्री संतश्रेष्ठ साईबाबा

— श्री. मधुकर वखारे
४४, जाधव कॉलनी,
बेलवली, बदलापूर.

गेल्या १४ जुलैस मी पुतण्याच्या लग्नास येवल्यास गेलो होतो. तो सोमवारचा दिवस. येवला गाव कुठे आहे याची मला तिथे जाईपर्यंत कल्पना नव्हती. १४ जुलैस सकाळी लग्न व जेवण आटोपून सर्व नातेवाईक जाण्यास निघाले. माझे मेव्हणे साईभक्त असल्याने ते म्हणाले, "मी आता शिरडीला जातो आहे, तुला यायचे असेल तर चल. इथून शिरडी फक्त ४० मिनिटांवर आहे." मला अतिशय आनंद झाला. म्हणजे मला बाबांनी बोलावले होते. एस्.टी. येवल्याला पकडली व संध्याकाळी ५॥ वाजता आम्ही शिरडीला आरतीच्या वेळी गेलो. रात्रभर मुक्काम केला. निवांतपणे बाबांचे दर्शन घेतले. सकाळी ९ ची एस्.टी. पकडून मुंबईला परत आलो. ही माझी शिरडीभेट अगदी अचानक झालेली. माझ्या मनातले ओळखून बाबांनी मला लगेच सहकुटुंब सहपरिवार गेल्या ४ ऑगस्टला सोमवारीच पुन्हा बोलावले. अगदी अचानकच ३ ऑगस्टला रविवारी एक श्रेष्ठ साईभक्त श्री. मांजरेकर मला म्हणाले की, "उद्या ४ तारखेलाच सकाळी ६ वाजता आपण शिरडीला जाणार आहोत आणि तुम्हाला आलेच पाहिजे." 'गुरुकृपा' नावाचा टेम्पो त्यांनी आधीच पैसे देऊन बुक केला होता. विचार करायला सवड मिळालीच नाही. रविवारी सगळी तयारी केली आणि सोमवारी सकाळी ६ वाजता आम्ही निवडक साईभक्त बदलापुरहून निघालो. तोपर्यंत खर्च किती येणार, परत कधी यायचे याबद्दल चौकशीही कुणी केली नाही. आमचे खजिनदार श्री. दिक्षित. त्यांनी बरोबर सकाळी ६॥ वाजता टेम्पो आमच्या घराजवळ आणला. आम्ही मंडळी त्यात बसलो. बाबांचा जयजयकार करीत आमचा शिरडी प्रवास सुरू झाला.

ही शिरडीची वारी लगेच ३ आठवड्यांनी झाली याचा आनंद मला झाला. शिवाय सर्व कुटुंबास मला नेता आले याचाही आनंद होता. कारण असा योग क्वचितच जमून येतो. माझ्या मनात सौ.सह शिरडीला श्री. सत्यनारायणाची पूजा करण्याची इच्छा होतीच, ती सफल झाली. शिरडीला आम्ही सर्वांनी बाबांना अभिषेक केला. सर्व जोडपी श्री सत्यनारायणाच्या पूजेला बसली. सोमवारी संध्याकाळची आरती, शेजारती, मंगळवारी काकड आरतीला आम्ही सर्व उपस्थित होतो. गर्दी कमी असल्यामुळे अगदी व्यवस्थित दर्शन झाले आणि दुपारचा महाप्रसाद घेऊन आम्ही मंगळवारी १२॥ वाजता (दुपारी) शिरडीहून परतीच्या प्रवासाला निघालो. श्री. मांजरेकरांनी टेम्पोत माणसे मोजायला सांगितली. आम्ही सर्व २१ जण होतो. १४ जुलैला मी शिरडीहून येताना त्यांच्यासाठी बाबांचे २१ फोटो भक्तांना वाटण्यासाठी आणून दिले होते. तेव्हा श्री. मांजरेकर म्हणाले की, मागे तुम्ही मला २१ फोटो आणले होते, आणि ही बाबांची किमया बघा, आता आपण सर्व २१ जण बाबांच्या दर्शनाला आलो आहोत. अन् तेव्हा त्या २१ फोटोंची तर्कसंगती मला लागली व बाबांच्या या अलौकिक चमत्काराचा साक्षात्कार झाला.

परमपूज्य बाबांनी आम्हा २१ भक्तांना शिरडीला ओढूनच आणले होते. परतीचा दिवस म्हणजे दीप अमावास्येचा होता. माळशेज घाटात चोर दरोडेखोर लुटमार करतात असे ऐकले होते. परंतु बाबा पाठीशी असताना आम्हाला भिती अशी वाटलीच नाही. टेम्पोचे नाव 'गुरुकृपा' त्या गुरुकृपेत आम्ही कोंबडी जशी आपल्या पिल्लांना मायेची उब देऊन संरक्षण करते त्या प्रमाणेच आमचे संरक्षण या भक्तांच्या माऊलीने केले व आम्ही सुखरूप परत आलो. हा विलक्षण अनुभव बाबांनी आम्हा भक्तांना देऊन दर्शन सुख दिले. खरोखरच बाबांची किमया अगाध आहे यात तिळमात्र संशय नाही.

# श्री साई चमत्कार

**— सौ. सुमित्रा आत्माराम धुरी**
३३/८, वास्तू उद्योग कॉलनी,
सोसायटी नं. ६,
पिंपरी, पुणे - १८.

दि. १६-१-१९८६, गुरुवार रोजी मी माझा संक्रांतीचा हळदीकुंकू करण्याचे योजिले आणि आदल्या दिवशी सर्व सुहासिनींना आमंत्रण देऊन मोकळी झाले. दुसरा दिवस उजाडला. सकाळपासून माझ्या मुलीच्या मदतीने मी घरातील सामानसुमान टापटीप लावले. नंतर दुपारची जेवणे आटोपून हळदीकुंकू समारंभाच्या तयारीस लागले. त्यासाठी लागणारे साहित्य ट्रंकात ठेवलेले होते. मी इतर कामात गुंतलेली असल्यामुळे ट्रंकाच्या कुलूपाची चावी मी माझी मुलगी चि. सेवाकडे दिली व कुलूप उघडून ट्रंकातील टेबल क्लॉथ, ठेवणीच्या साड्या, चांदीची भांडी (तबक, अत्तरदाणी, कुंकवाचा करंडा, तिळगूळ पात्र वगैरे) काढण्यास सांगितले. तिने चावी घेऊन कुलूप उघडण्याचा प्रयत्न केला, तिला यश आले नाही. तिने चावी शेवटी आपल्या वडिलांकडे दिली आणि त्यांना उघडण्यास सांगितले. ते सेवानिवृत्त असल्याने घरीच असतात. त्यांनी कुलूप व चावीचा नंबर पाहिला. ते बरोबर होते. त्यांनी पण बराच वेळ कुलूप उघडण्याचा खटाटोप केला पण व्यर्थ! "आपण हरलो बुवा" असे म्हणत त्यांनी चावी माझ्या अंगावर फेकली. मी नेहमीप्रमाणे बाबांची कळकळीने प्रार्थना केली, "बाबा, मला यावेळी संकटातून सोडवा." मनातल्या मनात नमस्कार केला आणि कुलूपास चावी लावून फिरवली. काय चमत्कार! कुलूप उघडले! आवश्यक त्या सर्व वस्तू काढल्या. ठरल्याप्रमाणे पुढील सर्व कार्यक्रम सुरळीत पार पडला. सर्वांना मोठे आश्चर्यच वाटले.

दुसरा एक अनुभव — माझे यजमान दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात 'महाराष्ट्र बँकेत' आपले निवृत्ति वेतन आणायला जातात. त्यांना परत येण्यास थोडाफार उशीर झाला तर माझ्या मनात नको नको ते विचार येतात आणि मी अस्वस्थ होते. अशा वेळी मी बाबांना कळकळीने सांगते, यांना लवकर सुखरूप घरी आणून सोडा. एवढ्यात दरवाजावरील बेल वाजते. दरवाजा उघडते तर ते हजर!

# आईचा दुसरा जन्म

— श्री. सुनिल सीताराम महाजन
भवानी सदन, १०/९६७ (१),
संग्राम चौक, चंदुर रोड,
इचलकरंजी

ही घटना जवळ जवळ ९ वर्षापूर्वीची आहे. एक दिवस माझे आई, वडील, भाऊ, बहिण व मी असे आम्ही सगळेजण गप्पा मारत बसलो होतो. त्या वेळेस माझी आई गरोदर होती. तिला नववा महिना चालू होता. बोलता बोलता आमच्या वडिलांच्या तोंडून आईला उद्देशून उद्‌गार निघाले की, "जरी तुला मेलेले मूल झाले तरीही तू अजिबात काळजी करू नकोस, बाबा सगळे काही व्यवस्थित करतील. त्या दिवसापासून आमचे वडील आईला दररोज रात्री बाबांची उदी व तिर्थ मिसळून प्यायला देत असत.

बरोबर आठ दिवसानंतर गुरुवारी रात्री आमच्या आईचे पोट फार दुखू लागले, हे पाहून वडिलांनी बाबांची उदी तिला खायला दिली व दवाखान्यात घेऊन गेले. लेडी डॉक्टरांनी पूर्णपणे तपासणी केली. त्यांनी सांगितले की, अजून मूल होण्यास कमीत कमी ३ ते ४ तास लागतील. हे सांगत असताना, डॉक्टरांचा चेहरा थोडा उतरलेला होता. परंतु वडिलांनी काही तिकडे लक्ष दिले नाही. ते तिकडेच बाबांचे नामस्मरण करत बसले.

अर्धाच तासानंतर आमच्या आईला जास्तच त्रास होऊ लागला. डॉक्टर व नर्स यांची धावपळ चालू झाली. आमच्या वडिलांना कळले की काहीतरी गडबड आहे. वडिलांनी ताबडतोब बाबांची उदी आमच्या काकूकडून आईला डोक्याला लावायला व खायला दिली. उदी पोटात गेल्याबरोबर दोन मिनिटातच मुलगी काही त्रास न होता आपोआप बाहेर आली. ती मुलगी मेलेली होती. डॉक्टरांनी आमच्या आईला घाबरत घाबरत सांगितले की, तुला माहित आहे काय, तुला मुलगी कसली झाली आहे ते. तेव्हा आमच्या आईने न घाबरता सांगितले की, काय झाले असेल, जास्तीत जास्त मेलेली झाली असेल. आमच्या आईच्या तोंडातून हे ऐकून डॉक्टरांना फारच आश्चर्य वाटले, मेलेल्या मुलीचे हीला काहीही दुःख वाटले नाही. ह्यांना काय माहीत की, एवढे धैर्य तिला बाबांच्या कृपेमुळेच आले आहे. आमची आई बाबांचे नामस्मरण करू लागली.

डॉक्टरांना इतके आश्चर्य वाटत होते की, ही मेलेली मुलगी ऑपरेशन शिवाय कशी बाहेर आली. कारण असल्या परिस्थितीत ऑपरेशन शिवाय मूल होतच नाही. नंतर डॉक्टरांनी आमच्या वडिलांना वेगळ्या खोलीमध्ये बोलवून सांगितले की, ह्या मुलीला मरून आठ दिवस झाले आहेत. तिच्या चेहऱ्यावर सुरकुत्या व अंगावर काळे डाग पडलेले आहेत. तुमचे नशीब फार चांगले आहे की ही मुलगी पिशवीसह बाहेर आली. जर पिशवी पोटातच फाटली असती तर तुमच्या बायकोचा जीव धोक्यात आला असता. हा तुमच्या बायकोचा दुसराच जन्म समजा.

# हा रिक्षा ड्रायव्हर कोण?

— श्री. कृ.भा. देशमुख
३८३, शुक्रवार पेठ, पुणे-२.

दहा वर्षापूर्वीची गोष्ट, माझा मुलगा चि. उमेश आजारी होता. तो नेहमीच आजारी पडायचा म्हणून त्याला घेवून मी के.ई.एम. हॉस्पीटलमध्ये गेलो. डॉक्टरांनी त्याला तपासले व मला म्हणाले, ह्याच्या टॉन्सील्स वाढल्या आहेत. त्याला डॉ. टेपन, टॉन्सील्सचे स्पेशालिस्ट यांना दाखवा. ज्या दिवशी डॉ. टेपनचा वार होता, त्यादिवशी मी चि. उमेशला डॉक्टरांना दाखविले. त्यांनी त्याला तपासले व मला म्हणाले, ह्याच्या टॉन्सील्स वाढल्या आहेत. ऑपरेशन करावे लागेल. त्यांनी मला ऑपरेशनची तारीख पण सांगितली. ऑपरेशन म्हटल्यावर माझे धाबे दणाणले. मी मुळातच घाबरट असल्यामुळे निरनिराळे विचार मनात येवू लागले. आपला एकुलता एक मुलगा तो बरा होईल ना? क्लोरोफॉर्म दिल्यावर तो शुद्धीवर येईल ना? एक ना दोन हजारो शंका! पण माझ्या मित्रांनी व बंधुंनी धीर दिल्यामुळे मी ऑपरेशन करून घेण्यास तयार झालो. ऑपरेशनचा दिवस उजाडला. सकाळी आम्ही तयारी केली व रस्त्यावर येवून रिक्षावाल्याची वाट पहात उभे राहिलो. छाती धडधडत होती. मनात बाबांचा धावा सुरू होता. मधुनच एकदा उदबत्तीचा सुगंधी वास आला. थोडा धीर वाटला. आपले बाबा आपल्या पाठीशी आहेत, असे वाटले. इतक्यात एक रिक्षावाला आला. आम्ही त्याला थांबवले व रिक्षात बसलो. के.ई.एम. हॉस्पीटल आले. मी चि. उमेशला घेऊन उतरलो. मी खिशातील पाच रुपयाची नोट रिक्षावाल्याला दिली. तो मला म्हणाला, मोड नाही. मी समोरच्या हॉटेलात जाऊन मोड मागितली पण मोड मिळाली नाही. मी रिक्षावाल्याला सांगितले, मोड मिळत नाही. तो म्हणाला, माझे जवळ पण पैसे नाहीत. पैसे राहू द्या. मी तुम्हाला ओळखतो. मी तुमच्या घरी येऊन पैसे नेईन. चि. उमेशचे ऑपरेशन बाबांच्या कृपेमुळे यशस्वी पार पडले. तो पूर्ण बरा झाला. पुढे तो मॅट्रीक झाला. बी.कॉम झाला. नोकरीही लागली पण काय नवल! जो रिक्षावाला मला म्हणाला होता की, तुमचे घरी येऊन पैसे घेऊन जाईन, मी तुम्हाला ओळखतो. (मी तर त्याला कधीच पाहिले नव्हते) आज दहा वर्ष झाली, तो अजूनही आलेला नाही. मी तर त्याची वाट पहात आहे. पैसे सहसा कुणी सोडत नाही. मग तुम्हीच मला सांगा भक्तहो, हा रिक्षावाला कोण असावा? आपल्या भक्तांच्या संकटात धावत येणारा, त्यांना धीर देणारा हा पैसे न घेणारा रिक्षावाला कोण बरे असावा? मी तर बाबांची सेवा करणारा एक अगदी साधा भक्त आहे. मग हा रिक्षावाला कोण? मलाही हे कोडे पडलेले आहे. मी मनात काय समजावयाचे ते समजलो. वाईट एवढच वाटते की, मी त्याला बारकाईने पाहू शकलो नाही.

# साई माझा पाठीराखा

— श्री. शं.ग. सारंगधर
अ/८, डहाणूकरवाडी, 'साईकुटीर',
पां. साळुंके मार्ग, दत्तमंदिर रस्ता,
कांदिवली (पश्चिम),
मुंबई नं. - ४०० ०६७

उपनगरांतील डहाणूकर वाडीचा वेगाने विकास होत होता. पण प्राथमिक शिक्षणासारख्या सोयीही येथे उपलब्ध नव्हत्या. वाडीतील एका सामाजिक संस्थेने पुढाकार घेऊन प्राथमिक शाळा सुरू केली. माझ्या वास्तुच्या तळमजल्यात (अंदाजे १५०० स्के.फू. च्या जागेत) त्यांचे वर्ग शीफ्ट पद्धतीने सकाळ-दुपार भरत. ही जागा शाळेला देताना (का कुणास ठाऊक) महानगरपालिकेने माझ्याकडून एक लेखी हमी घेतली होती की, ही जागा फक्त लहान बालकांच्या संस्थेसाठीच वापरली जाईल. पण अवघ्या दोन वर्षांनंतर संस्था चालकांनी शाळा वाडीतच आपल्या स्वतःच्या जागेत नेऊन माझ्यापुढे समस्या निर्माण करून ठेवल्या. जागा रिकामी पडून भाडे आले नाही तरी महानगरपालिका कर चालूच. शिवाय अंडरटेकींगप्रमाणे जागा फक्त लहान बालकांच्या संस्थेसाठीच वापरण्याचे बंधन.

या जागेत राहण्याकरिता कुठल्याच सुविधा नव्हत्या. ते एक मोकळे सभागृह होते. ही वाडी फक्त रहिवासी निवासाची असल्यामुळे येथील जागा धंदा-व्यवसायासाठी वापरता येत नाही. ही वस्तुस्थिती माहीत असलेल्या वाडीतीलच एका दलालाने मला अनेक भुलथापा मारून ही जागा लबाडीने एका व्यक्तिला देवविली. एक दिवस दोन-अडीच डझन शिलाई मशिन्स ट्रकमधून त्या जागेत आल्या. हा काय प्रकार आहे म्हणून विचारता, उत्तर न आल्याने, ही जागा धंद्यासाठी वापरता येणार नाही असे मी त्याला बजाविले. पण एकदा जागा बळकावल्यावर माझा विरोध डावलून त्याने त्या जागेत चक्क तयार कपड्यांचा धंदा सुरू केला. मी फसवला गेलो आहे हे मला समजून चुकले. तोपर्यंत फार उशीर झाला होता.

त्यातच त्याच्याकडून डिपॉझिट वा अन्य कुठल्याही प्रकारे — उदाहरणार्थ ॲडव्हान्स रेण्ट-पैसा न घेता मी सवतःच माझ्या पायावर धोंडा पाडून घेण्याचा कमालीचा अव्यवहारीपणा केला होता. मग अर्थातच महानगरपालिकेत तक्रारी करून, नोटीस देऊन व आवश्यक ती कारवाई करून त्याला धंदा बंद करायला भाग पाडले. त्याने तेथून धंदा हलविला. पण जागा मात्र स्वतःच्या ताब्यात ठेवून भाडे देणे बंद केले. आता जागेचा कब्जा मिळविण्यासाठी व भाडे वसूलीकरिता कोर्ट-कचेऱ्या सुरू झाल्या. दिवाणी कोर्टातले दावे! कधी सुनावणीस येतील याची वाट पाहत बसणे एवढेच आपल्या हाती! आयुष्यभरची कमाई अशी खर्ची घालून निवृत्तीनंतर हात चोळत बसण्याची पाळी आली. मूर्ख घर बांधतात व धूर्त त्यात येऊन राहतात, याचाच त्याने मला प्रत्यय आणून दिला.

ताब्यात असलेल्या जागेचा धंद्यासाठी उपयोग (की दुरुपयोग!) करता येत नाही

म्हणून व मला त्रास द्यावा या उद्देशाने त्याने त्या जागेत लॉजिंग हाऊस (माझ्या दृष्टीने धर्मशाळाच) सुरू केले. म्हणजे कोठेतरी रात्रपाळी करणारे १०/१२ जण दिवसा, तर दिवसपाळी करणारे १०/१२ जण रात्री त्या जागेत मुक्कामाला येत. नुसताच मुक्काम नसे, तर आंघोळी, धुणी-पाणी पासून स्वयंपाकापर्यंत त्यांचे सर्व व्यवहार तिथेच चालत. परिणामी दोन दोन तासांनी गच्चीवरील टाकी रिकामी होई. याशिवाय बाहेरील नळाचा-पाणी जाईपर्यंत वापर करीत तो वेगळाच! त्यांच्याकडून होणाऱ्या पाण्याच्या या बेसुमार वापरामुळे आम्हाला पाणी अपूरे पडू लागले. भाडेकरूंची ओरड सुरू झाली. खेरीज दिवस-रात्र रेडिओ-ट्रान्झीस्टरचा गोंगाट चाले तो निराळाच!

त्यांचा आतला सर्व व्यवहार दार बंद करूनच चाले. योगायोगाने एकदा दार उघडे असताना, संतापलेल्या माझ्या पत्नीने आत शिरून त्यांचे बाडबिस्तार, भांडी-कुंडी, स्टोव्ह, ट्रान्झीस्टर्स वगैरे सर्व सामान बाहेर काढून दाराला आमचे कुलूप लावले.

बाहेर काढलेल्या त्या मंडळींनी ही सर्व हकीगत माझ्या भाडेकऱ्याला (जागा त्याच्या ताब्यात असल्याने भाडेकरू) जाऊन सांगितली. त्याने पोलीस स्टेशनला तक्रार केली. अशा एखाद्या संधीची तो वाटच पहात होता. रात्री ७-७॥ च्या सुमाराला त्याचा एक माणूस हवालदाराला घेऊन माझ्या घरी आला. मला पोलीस स्टेशनवर बोलावून नेले. जाण्यापूर्वी श्री बाबांच्या मूर्तीसमोर डोके टेकून यातून निभावून नेण्यासाठी प्रार्थना केली व बाहेर पडलो.

पोलीस स्टेशनला पोहचताच तिथल्या एका सहाय्यक पोलीस अधिकाऱ्याने प्रश्नांची सरबत्ती सुरू केली. माझे म्हणणे पूर्ण ऐकून घेण्याऐवजी ते सद्गृहस्थ मलाच दटावू लागले. माझ्या वृद्धत्वाचा आणि पांढऱ्या केसांचा उद्धार करून मी कायदा का हातात घेतला याचाच ते मला जाब विचारू लागले. आयुष्यात त्या वेळेपर्यंत पोलीस स्टेशनची पायरी चढण्याचा प्रसंग माझ्यावर कधीही गुदरला नव्हता. पण त्या दिवशीच्या अनुभवाने मी अगदी अवाक् झालो. वास्तविक निवासी विभागात अनधिकृत धंदे करणारा माझा भाडेकरू त्यांच्या समोर उभा असताना, त्याला जाब विचारण्याऐवजी ते मलाच दटावत होते. जागा खाली करून घेण्यासाठी कोर्टात केस भरल्याचेही त्यांना मी सांगितले तरी!

अशी ही दटावणी चालू असताना त्या पोलीस स्टेशनचे कुठेतरी बाहेर गेलेले स्टेशन प्रमुखही आरडा ओरड ऐकून तिथे आले. आम्हा दोघांना त्यांनी आपल्या केबीनमध्ये नेले. सर्व केस ऐकून घेतल्यावर माझ्या भाडेकरूला उद्देशून ते म्हणाले, "तुझ्या विरुद्ध माझ्याकडे वाडीकऱ्यांच्या बऱ्याच तक्रारी आल्या आहेत. निवासी भागात तू सुरू केलेला धंदा बंद करणं आम्हास भाग पडलं तोच हे कसलं लॉजिंग हाऊस सुरू केलस? जागेबद्दलची केस कोर्टात चालू आहे. कोर्टाचा निकाल येईपर्यंत थांबवण्याऐवजी जागेचा वापर तुझ्या मर्जीप्रमाणे तू बदलू पहातोस? या जागेत आता जे काय लॉजिंग हाऊस तू सुरू केले आहेस त्याला तरी महानगरपालिकेची परवानगी घेतली आहेस का?"

भाडेकरूकडे यावर काहीच उत्तर नसल्याने तो गप्पच होता. नंतर एका हवालदाराला बरोबर देऊन साहेबांनी माझ्या त्या भाडेकरूला जागेत कोणी आत असतील तर त्यांना

बाहेर काढण्यास सांगितले. नंतर माझ्याकडे वळून ते म्हणाले की, "त्याने सर्वांना बाहेर काढल्यावर तुम्ही तुमचे कुलूप काढून जागा परत त्याच्या ताब्यात द्या आणि दोघेही येथे परत येऊन सांगितल्याप्रमाणे केल्याचा रिपोर्ट द्या.

कोर्टातील केसचा निकाल लागेपर्यंत जागा त्याच्या ताब्यात ठेवून वाट पाहण्याखेरीज माझ्या हाती तरी दुसरे काय होते? आधी जाते अक्कल आणि मग जाते भांडवल!

पण स्टेशन-प्रमुख वेळेवर पोलीस स्टेशनला आले नसते तर? तर त्या दिवशी माझी धडगत नव्हती. म्हणूनच वाटते की, श्रीबाबांनीच त्यांना वेळेवर पाठवून माझे पुढील मनस्तापापासून रक्षण केले. स्टेशन-प्रमुखांच्या रूपाने श्रीबाबाच माझ्या पाठीशी येऊन उभे राहिले असेच मी मानतो. शेवटी — श्रद्धा सबूरी सदैव राखा, साई आपुला पाठीराखा हेच खरे।

# मागें जें जें त्यास तें तें लाभे

— श्री. सदानंद ल. वाईरकर,
२०/१५३५, श्रीगणेश नटेश्वर सोसायटी,
गोराई कॉलनी, बोरीवली (प.), मुंबई.

श्री क्षेत्र शिर्डीस जाण्यासाठी या वर्षीच्या रामनवमी उत्सवाला बोरीवली-शिर्डी या एस्.टी. बसची आगाऊ तिकीटे नसताही व बसमध्ये बरेच प्रवासी उभे असूनही नऊ-दहा तास उभ्याने जायच्या तयारीने गेलेला मी दहा मिनिटेही उभा न राहता, एका बसलेल्या प्रवाशाच्या व कंडक्टरच्या मेहरबानीमुळे शिर्डीपर्यंत अत्यंत आरामात बसून प्रवास केला.

शिर्डीस उत्सवाच्या मुख्यदिनी जिलेबीचा साईप्रसाद मिळण्यासाठी जेवणाच्या रांगेत गेलो, परंतु मला दोन रात्रींचे जागरण वरून कडक ऊन व घशाला कोरड त्यामुळे फार वेळ उभे राहायला जमले नाही. मोठ्या नाराजीनेच रांग सोडली व जिलेबीचा प्रसाद चुकविला याबद्दल श्रींची क्षमा मागून उपाशीच राहिलो. जिलेबीचा प्रसाद चुकविला ही फार मोठी चूक केली असे वाटले व ती रात्र मी बेचैनीत घालविली. शनिवार १९ एप्रिलला दुपारी मला शांतिनिवासमध्ये ११३ नंबरचे लॉकर मिळाले आणि काय आश्चर्य! त्या लॉकरमध्ये मी अपेक्षिलेल्या प्रमाणापेक्षा जास्त जिलेबीचा प्रसाद मला एका प्लॅस्टिकच्या पिशवीत मिळताच मी तो अत्यानंदाने घेतला. मला आश्चर्य एकाच गोष्टीचे वाटते की, कोणीही साईभक्त लॉकर सोडतेवेळी एखादी लहान वस्तूही लॉकर मध्ये चुकून राहिली का याबद्दल खात्री करूनच लॉकर सोडतो. याची कल्पना लॉकर मिळालेल्या भक्तांना असेलच. तरीही अशाप्रकारे श्रीसाईबाबांनी माझी मनिषा जाणून, मला एक दिवस उशिरा का होईना मी अपेक्षिलेल्या प्रमाणापेक्षा जास्तच जिलेबीचा प्रसाद दिला. त्या सुखद साईलिलेने मी अक्षरशः आनंदून गेलो आणि 'मागें जें जें त्यास तें तें लाभे' या साईवचनाची प्रचिती येताच बाबांचे आभार मानून त्यांची क्षमाही मागितली.

# मला आलेले साईबाबांचे दोन अनुभव

— श्री लक्ष्मण देऊ धुरी
सेंट्रल लेबर इन्स्टिट्यूट, सायन,
मुंबई नं. ४०० ०२२.

ओम श्री साई समर्थ महा मंत्र जपत जावा अहो रात्र
त्यानेची आपुले चरीत्र परम पवित्र होईल.

मला तारीख १ ऑगस्ट १९८६ पासून बरे नाही, माझी एक डावी बाजू फारच दुखते. डॉक्टरांना दाखवून व इ.सी.जी. काढून औषधे वगैरे सुरू केली परंतु गुण यायला थोडा उशीर झाला. चार ऑगस्टच्या रात्री दोन वाजता मी फार सिरीयस झालो. मी माझ्या पत्नीला म्हणालो, "तू मदतीला काही बाजूच्या चाळीतील मंडळींना उठवून आण व मला रुग्णालयात घेऊन चला." पत्नी उर्मिला फार घाबरून गेली. तिला दुसरे काही सुचेना. तिने माझ्या डोक्यावर एक हात ठेवून साईबाबांचे स्तोत्र वाचायला सुरुवात केली. ती रात्री साडेतीन वाजेपर्यंत स्तोत्र व साईबाबांचा जप करीत होती. तोपर्यंत मला झोप लागली होती. व थंडी ताप दोन्ही कमी होऊन, पाय व छाती दुखायचे बंद झाले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वाजता मी डॉक्टर जवळ गेलो. दवाखान्यातील गर्दी पाहून मी पत्नीला म्हणालो, "मला इथे थांबायला होणार नाही. आपण खाजगी डॉक्टरजवळ जाऊ" आम्ही तिथून जायला निघालो. जाताना वाटेत सी.जी.एच.एस. कॉलनीमध्ये एक साईबाबांचे मंदिर आहे, त्या मंदिरामध्ये दोन मिनिटे बसून प्रार्थना केली. नंतर आम्ही घरी जायला निघालो. पण चालताना फार त्रास व्हायला लागला. मी पत्नीला म्हणालो, "आपण परत त्या सी.जी.एस.च्याच डॉक्टरजवळ जाऊया. गर्दी असली व मला जास्त काही वाटले तर डॉक्टर मध्येच उठून मला तपासतील, पण इथे वाटेत जास्त काही वाटल्यास मला अधिक त्रास होईल." म्हणून आम्ही परत त्या सी.जी.एस. डॉक्टरजवळ गेलो. डॉक्टरने तपासणी करून दुसरा इ.सी.जी. बघितला व सांगितले की, "तुम्हाला काही घाबरण्याचे कारण नाही. हे सर्व फक्त अशक्तपणामुळे होत आहे. मी ही औषधे देत आहे, ती घ्या व तुम्हाला चार/आठ दिवसामध्ये बरे वाटेल." त्याप्रमाणे आता मला फारच बरे वाटत आहे. मजवर आलेले हे संकट बाबांनी परत त्याच डॉक्टर जवळ पाठवून निवारण केले. अशा एक नाही, दोन नाही बाबांनी याहीपेक्षा मोठ्या संकटातून मला वाचविले आहे. याच्याही अगोदर मी एकदा गणपतीला गावी गेलो होतो. गणपतीच्या एक दिवस अगोदर दुपारी माझा धाकटा भाऊ आणि मी शहाळी आणण्यासाठी बागेत गेलो. नारळ काढते वेळी एक नारळ त्याच्या हातातून सुटून तो एका रतांबीच्या फांदीवर येऊन आदळला व तिथून तो माझ्या डाव्या कुशीवर पडला. मी त्या ठिकाणी बेशुद्ध होऊन पडलो माझा भाऊ झटकन् झाडावरून खाली आला व त्याने मला नारळाचे पाणी पाजले मी थोडा शुद्धीवर आल्यावर, साईबाबांचा धावा केला. त्याबरोबर जणुकाही मला काही लागलेच नाही असे मला वाटू लागले. अशा तऱ्हेने मी उठून बसलो व

घरी चालत गेलो. नंतर संध्याकाळी डॉक्टरजवळ जाऊन तपासून घेतले. डाक्टरने दिलेले औषध घेऊन दोन दिवसामध्ये आराम वाटला. अशा अनेक प्रसंगांतून बाबानी मला वाचविले आहे. अशा या शिर्डीच्या साईबाबांची लिला कोणत्या शब्दाने वर्णावी हेच समजत नाही.

# साईकृपेमुळे नोकरी मिळाली

**— श्री. मधुकर उद्धवराव कावळे**
६८/६९ साईकृपा
निवास, ओझरमिग, जि. नाशिक.

मी आय.टी.आय. झालेला सुशिक्षित तरुण आहे. मी १९७६ मध्ये सेवा योजन कार्यालयात नाव नोंदवले होते. मला सेवायोजन कार्यालयाकडून दोन कॉल लेटर आले होते. परंतु मला नोकरी मिळाली नाही. मी एका खाजगी ठिकाणी काम करीत असे परंतु घरातील सर्व जबाबदारी माझ्यावर होती व पगार खूप कमी होता त्यामुळे फार हाल होत असत.

मी श्री साईबाबांना श्रद्धापूर्वक नवस केला, मनात म्हटले की, कोठेही कॉल येवून मला नोकरी मिळू द्या. त्याप्रमाणे भक्तीने मी गुरुवारचा कडक उपवास करू लागलो. माझी पूजा आरती नियमित चालते. मी कोठेही बाहेर अथवा कामावर जायचे असल्यास प्रथम उदी लावल्याशिवाय बाहेर जात नाही. अशी दोन वर्षे गेली. आणि काय चमत्कार! मला एका गुरुवारी इंटरव्हयुसाठी कॉल लेटर आले. त्याप्रमाणे मी इंटरव्हयु व लेखी परीक्षा दिली. श्री साईबाबांनी एक दिवस अक्षरशः माझी परीक्षा पाहिली. दोन वर्षात कधीही उपवास मोडला नाही. परंतु एका गुरुवारी माझा उपवास विस्मरणाने मोडला. त्यावेळेस मला खूप वाईट वाटले. पण त्याच्या चारच दिवसांनी म्हणजे गुरुवारीच मला नोकरीची ऑर्डर मिळाली आणि माझ्या डोळ्यांतून आनंदाश्रू आले.

आज बाबांच्या कृपेमुळे मला नोकरी मिळाली. बाबांचे 'श्रद्धा' आणि 'सबुरी' हे दोन मंत्र मानवाने लक्षात ठेवून सेवा केली तर त्यास बरोबर फलप्राप्ती मिळते. आज श्रीसाईबाबांच्या कृपेमुळे मी खूप सुखी आहे.

आणि दुसरा एक विशेष अनुभव म्हणजे माझे वडील दिड वर्षापासून सेवानिवृत्त झाले परंतु त्यांचे पेन्शनचे व इतर पैसे मिळाले नव्हते. एकदा आमचे घरातील सर्व कुटुंब शिर्डीस बाबांचे दर्शनास गेले होते. वडिलांनी समाधीचे दर्शन घेऊन बाबांची विनवणी केली. माझे पेन्शनचे पैसे मिळू दे. या पैशाच्या भरवशावर बहिणीचे लग्न ठरविले होते. आणि काय चमत्कार सुमारे एक वर्ष इरिगेशन, जिल्हाधिकारी मंत्रालय ठिकाणी निवेदन विनंती, पत्रव्यवहार करून सुद्धा पैसे मिळाले नाहीत आणि त्या दिवशी आम्ही घरी गेल्यावर पैशाचा धनादेश आलेला तेव्हापासून वडिलांची सुद्धा बाबांवर श्रद्धा बसली. आता आम्ही घरातील सर्व बाबाचे परमभक्त झालो आहोत.

# "शिरडीवाले साईबाबा" (हिंदी नाटक)



*शिरडीवाले श्री साईबाबा या हिंदी नाटकातील एक विलोभनीय प्रसंग.*

साईभक्त कुमारसेन गुप्ते यांनी त्यांच्या 'आरती थिएटर्स' या नाट्य संस्थेतर्फे श्री बाबांच्या तेजस्वी जीवनावर मराठी भाषेत "शिरडीचे श्री साईबाबा" हे नाटक रंगभूमीवर आणून आजपर्यंत तीनशेच्या वर प्रयोग संपूर्ण महाराष्ट्रात करून साई महिमेचा प्रसार केला. महाराष्ट्रातून साईभक्तांनी दिलेल्या प्रतिसादाने व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांनी प्रोत्साहन दिल्याने कुमारसेन गुप्ते यांनी महाराष्ट्राबाहेरील 'हिंदी' भाषिक साईभक्तांसाठी 'शिरडीवाले साईबाबा' या नावाने हे नाटक दि. १० ऑक्टोबरला मुंबईत बाबांच्या ६८ व्या पुण्यतिथीच्या निमित्ताने रंगभूमीवर आणले.

हिंदी भाषेतील या 'शुभारंभाच्या' प्रयोगास डॉ. अण्णासाहेब दाभोळकर, साईलिला इंग्रजी आवृत्तीच्या संपादिका सौ. इंदिराबाई खेर, श्री. खेर, श्री. दानंद चेंदवणकर, रेखाताई दिघे इत्यादी साईभक्त आवर्जून उपस्थित होते. सदर नाटकात एकंदर ३० कलाकार असून प्रत्येकजण ४/४ भूमिका करतात. श्रीबाबांनी केलेले चमत्कार दाखविण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न या नाटकात केला आहे. तसेच आपण शंभर वर्षापूर्वीच्या श्री बाबा सदेह रूपात असतानाच्या काळात वावरत असल्याचा भास होतो. त्याचप्रमाणे श्रीबाबांच्या वेळची सर्व माणसे प्रत्यक्ष रूपात दिसतात. प्रामुख्याने म्हाळसापती, अबदूल बाबा, चांदोरकर, शामा दिक्षित, दाभोळकर, बायजाबाई, लक्ष्मी तात्या कोते पाटील वगैरे.

मराठी प्रमाणेच हिंदी भाषिक साईभक्तांनी या **"शिरडीवाले साईबाबा"** नाटकास भरपूर प्रतिसाद द्यावा व साईदर्शनाचा लाभ घ्यावा. अनुवादक मधुसूदन जोशी व दिग्दर्शक किरण दुधाळकर आहेत. साईबाबांची मध्यवर्ती भूमिका किरणकुमार हे करतात. निर्मिती प्रमुख सौ. अनुराधा गुप्ते व निर्माते कुमारसेन गुप्ते हे आहेत.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग [illegible] पोस्ट[illegible] |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्‌चरित | मराठी | ३१-०० | ६-५० |
| २. | —''— | इंग्रजी | १४-५० | ५-२५ |
| ३. | —''— | हिंदी | ८-५० | ५-२५ |
| ४. | —''— | गुजराथी | १९-०० | ५-२५ |
| ५. | —''— | कन्नड | १०-०० | ४-०० |
| ६. | —''— | तेलगु | — | — |
| ७. | —''— | तामीळ | — | — |
| ८. | —''— | सिंधी | २२-०० | ४-५० |
| ९. | श्री साई सत्‌चरित पोथी | गुजराथी | ३१-०० | ६-५० |
| १०. | श्री साई लिलामृत | मराठी | — | — |
| ११. | —''— | हिंदी | १०-५० | ४-०० |
| १२. | —''— | गुजराथी | ६-६५ | ४-०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६-०० | ४-०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | ०-६५ | ३-५० |
| १५. | —''— | हिंदी | १-०० | ३-५० |
| १६. | —''— | गुजराथी | — | — |
| १७. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०-७० | ३-५० |
| १८. | —''— | हिंदी | १-२५ | ३-५० |
| १९. | —''— | गुजराथी | ०-८० | ३-५० |
| २०. | —''— | तेलगु | — | — |
| २१. | —''— | सिंधी | १-२५ | ३-५० |
| २२. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | १-८५ | ३-५० |
| २३. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | — | — |
| २४. | मुलांचे साईबाबा | मराठी | १-६५ | ३-५० |
| २५. | —''— | इंग्रजी | १-६५ | ३-५० |
| २६. | —''— | हिंदी | १-६५ | ३-५० |
| २७. | —''— | गुजराथी | १-६५ | ३-५० |
| २८. | —''— | तेलगु | २-०० | ३-५० |
| २९. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | ०-८० | ३-५० |
| ३०. | मार्गदर्शिका (शिर्डी गाईड) | मराठी | १-५० | ३-५० |
| ३१. | —''— | इंग्रजी | १-५० | ३-५० |
| ३२. | —''— | गुजराथी | १-५० | ३-५० |
| ३३. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ७-२५ | ४-०० |
| ३४. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ६-५० | ४-०० |
| ३५. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३-०० | ४-०० |
| ३६. | अष्टोत्तर शत नामावली | मराठी | १-०० | ३-५० |
| ३७. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५-२५ | ४-५० |